# महात्मा गांधी : विचार दर्शन



3G
155N5

■ संपादक ■

**प्रा. नागोराव कुंभार**

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

8G
155N5
6872
Kumbhar, Nagarao, Ed
Mahatma Gandhi:
Vichardarshan

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

3G
155 N5

6872

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

❁❁❁❁❁

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# म. गांधी : विचार दर्शन

– संपादक –

**प्रा. नागोराव कुंभार**

**प्रबोधन प्रकाशन**
'आई' शिवनगर, लातूर – ४१३५१२

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

प्रकाशिका
सौ. प्रेमा कुंभार
शिवनगर, लातूर

3G
155 N5

मुद्रक
प्रगती मुद्रणालय,
शिवनगर, लातूर
४१३५१२.

सर्व हक्क प्रकाशकांच्या हाती

मूल्य ६५ रुपये

प्रथमावृत्ती डिसेंबर १९९५

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

## संपादकीय निवेदन - - - -

युगपुरूष महात्मा गांधी यांनी मांडलेले विचार आजच्या स्थितीत मानवाला अत्यंत अुपयूक्त आहेत यामुळे विचारशलाकाच्या सौजन्याने हा लेखसंग्रह प्रकाशित करीत आहोत. वाचकांना याचा निश्चित लाभ होईल

– प्राचार्य नागोराव कुंभार

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# अनुक्रमणिका



| अ. क्र. | संपादकीय | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १) | गांधीजीचा जीवनविचार | वसंत पळशीकर | १ |
| २) | म. गांधीजींचे नैतिक विचार | श्रीनिवास दीक्षित | १४ |
| ३) | सत्याग्रह : अन्याय प्रतिकाराचा मार्ग | डॉ. ना. य. डोळे | १२ |
| ४) | म. गांधीजींची ग्राम-स्वाराज्य संदर्भ | प्रा. ज. रा. दाभोळे | २४ |
| ५) | म. गांधीजींचे अर्थविज्ञान | दादा धर्माधिकारी | २९ |
| ६) | म. गांधीजीं आणि शिक्षणाचे संदर्भ | देवदत्त दाभोळकर | ३९ |
| ७) | अहिंसक चळवळ : गाधीजींची मोठी देणगी | चंद्रशेखर धर्माधिकारी | ४२ |
| ८) | म. गांधीजींचीच्या विचाराची सद्य : स्थितीत आवश्यकता | ठाकूरदास बंग | ४९ |
| ९) | म. गांधीं दर्शनाची प्रासंगिकता | यदुनाथ थत्ते | ५१ |
| १०) | गांधी विचारांची प्रासंगिकता | डॉ. सूर्यनारायण रणसुभे | ५५ |
| ११) | म. गांधीजींचा विचार आणि आचार व आजच्या समस्या | ग. प्र. प्रधान | ६१ |
| १२) | म. गांधी आणि आजचा संदर्भ | कांतीभाई शहा (अनु पराग चोळकर) | ६२ |
| १३) | व्रत एकादशी : एक संस्कृती साधना | ताराबाई परांजपे | ७६ |
| १४) | गांधीजीची जागतिक शांतता | डॉ. भाऊराव चिंचनसूरे | ८० |
| १५] | म, गांधीजींचा अठरा कलमी कार्यक्रम | नागोराव कुंभार | ८२ |
| १६) | आत्मचरित्रातून जाणवणारे म. गांधीजींचे मनोवळ | गो. न. मग्गीरवार | ८९ |
| १७) | सांप्रदायिक एकता : गांधीजींचा दृष्टिकोन | सादीक अली | १०० |
| १८] | चार पावल प्रकाशाच्या दिशेनं | प्रभाकर बागले | १०५ |
| १९) | मार्क्स, फुले, गांधी व आंबेडकर | ल. भा. कुरकुरे | १०८ |
| २०) | गांधी आणि नेहरु : दोन परंपरा | आचार्य राममूर्ती | १११ |
| २१) | गांधी व विनोबा | रामभाऊ म्हसकर | ११७ |
| २२) | गांधीजीं व त्यांचे टीकाकार | वसंत बोंबटकर | ११८ |



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

॥ १ ॥

# गांधीजींचा जीवनविचार

## वसंत पळशीकर

॥ भाग पहिला ॥

महात्मा गांधी यांनी स्वतःच्या 'आत्मकथेस' माझे सत्याचे प्रयोग' म्हटले ही मोठी अर्थपूर्ण गोष्ट आहे. बौद्धिकदृष्ट्या सुसंगत, सर्वव्यापी, सर्वंकष तत्त्वज्ञानाची मांडणी करणाऱ्या तत्त्वज्ञानाचा त्यांचा पिंड नव्हता. हेगेल, मार्क्स यांचा पिंड तत्त्वज्ञाञ्चा होता. लिबरल विचारप्रणालीची मांडणी करणाऱ्या जॉन स्टुअर्ट मिल याचाही पिंड तत्त्वज्ञाचा होता. भारतीय उदाहरणे द्यावयाची तर, योगी श्री. अरविंद ! स्वामी विवेकानंद आणि काही प्रमाणात लोकमान्य टिळक यांच्या बाबतीतही असे म्हणता येईल.महात्मा गांधी या सर्वांहून वेगळे होते. या कारणाने त्यांच्या लेखनामधून 'गांधीवाद' नावाची प्रणाली सिद्ध करणे हा तसा अव्यापारेषु व्यापार म्हणायला हवा.

गांधीजींच्या जीवनात, त्यांनी हाती घेतलेल्या अनेकविध कार्यांमध्ये, आणि त्यांनी केलेल्या प्रासंगिक पण विपुल लेखन-भाषणामध्ये कोणतेच सुसंगत अंतःसूत्र सापडत नाही असा मात्र याचा अर्थ नाही. सत्य आणि अहिंसा या दोन डगरींवर स्वतःच्या जीवनाची व कार्यांची उभारणी त्यांनी जाणीवपूर्वक केली. गांधीजींच्या विचारव्यूहामध्ये या दोन तत्त्वांना मध्यवर्ती स्थान व महत्व आहे. त्या विचारव्यूहाची ही दोन तत्त्वे ही बैठक वा पाया आहे.

### सत्य

'सत्य हाच ईश्वर' हे गांधीजीचे वचन सुप्रसिद्ध आहे. या विश्वात. ईश्वराच्या इच्छेखेरीज एक पानही हालत नाही अशी गांधीजींची श्रद्धा होती. पण दैनंदिन जीवनांच्या व्यवहारात माणसाने कोणत्या कृती कराव्यात याविषयी ही श्रद्धा कोणतेच मार्गदर्शन करीत नाही. ईश्वरी इच्छा नेमकी काय आहे हे मर्त्य माणसाला कळण्याचा उपाय कोणता ? जे काही मी करीत आहे तीच ईश्वरी इच्छा आहे असे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

प्रत्येक जण म्हणू शकतो ! ईश्वरी इच्छा काय हे निश्चित करण्याच्या वाटेला न जाता माणसाने ' सत्य असत्याला मन केले ग्वाही ' या भूमिकेचा अंगीकार करुन कृती करणे हाच एकमेव उपाय होय; लौकिक व्यवहारी जगात मर्त्य, स्खलनशील सर्वज्ञ नसलेल्या माणसांच्या दृष्टीने ' सत्य हाच ईश्वर'या निष्कर्षावर गांधी पोचले.

सत्य कशास म्हणावयाचे आणि ते शोधून कसे काढावयाचे ? तत्त्वज्ञ माणुस बौद्धिक युक्तिवादाच्या आधारे याचे उत्तर शोधून काढायचा प्रयत्न करील. गांधीजींचा तो पिंड नव्हता. स्वतःच्या दैनंदिन जीवनात पडणारे प्रश्न, उपस्थित होणाऱ्या समस्या आणि झेलावी लागणारी आव्हाने यांच्या संदर्भात, व्यावहारिक पातळीवर, गांधीजी उत्तर शोधीत. एका उदाहरणाने मुद्दा स्पष्ट होईल.

दक्षिण आफ्रिकेतल्या पहिल्याच प्रवासात ' काला आदमी ' या नात्याने, वर्णभेदाधिष्टित समाजात गांधीच्यावर कठीण प्रसंग ओढवला. कडाक्याच्या थंडीच्या रात्री सामानासह त्यांना पहिल्या वर्गाच्या डब्यामधून बाहेर उतरविण्यात आले. हा प्रसंग प्रसिद्ध आहे. आपले कर्तव्य काय, आपण कसे वागायला हवे, सत्य काय व त्याचा प्रयोग करावयाचा म्हणजे काय हे प्रश्न अतिशय तीव्र, टोकदार गांधीसमोर–त्या रात्री उपस्थित झाले.

काळा, गोरा, पिवळा–कातडीचा रंग कोणताही असला तरी ' मानव तितुका एकच आहे ' हे मूल्य व तत्त्व गांधीजींनी स्वीकारले होते. ज्या ब्रिटिश साम्राज्याचे ते सभासद होते त्या ब्रिटिश साम्राज्यसत्तेनेही वर्ण–वंशविरहित समान वागणुकीस स्वतःची वचनबद्धता जाहीर केलेली होती. दक्षिण आफ्रिका ही ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वसाहत होती. कायद्यानुसार तेथेही सर्व समान होते.गांधीजवळ पहिल्या वर्गाचे तिकिट होते. त्यातच आणखी विशेष मुद्दा असा होता की, इंग्लंडमध्ये शिक्षण घेऊन बॅरिस्टरची पदवी त्यांनी घेतली होती व पोशाख, चालचलणूक भाषा या सर्व दृष्टींनी साहेब बनलेले होते. दक्षिण आफ्रिकेत स्थायिक झालेल्या इतर नागरिका–प्रमाणे ते अशिक्षित मजूर नव्हते. असे असूनही तिकिट तपासनिसाने त्यांना बेदरकार-पणे उतरवून दिले होते. पुस्तकातला कायदा आणि वास्तव यातले अंतर स्पष्ट करुन गांधीना त्यांची जागा दाखवून दिली होती. दक्षिण आफ्रिकेत राहावयाचे असेल तर कोणती पायरी सांभाळून राहयला लागेल ते नागवेपणाने स्पष्ट केले होते. दक्षिण आफ्रिकी गोऱ्या समाजाच्या दृष्टीने वंशभेद व असानता हे सत्य होते. कायदा काहीही असला तरी, गौरवर्णीय श्रेष्ठ व कृष्णवर्णीय कनिष्ठ–हीन हे ईश्वरी सत्य होते. पण गांधीजींच्या दृष्टीने वर्णवंश यानुसार माणसांमध्ये उच्चनीच अशा भेद करणे असत्य होते. ईश्वरी असत्य होते. ' आकाशातील प्रभूची सर्व लेकरे आहेत ' ही ख्रिश्चन धर्माचीच शिकवण होती. दक्षिण आफ्रिकेत राहून पोटापाण्याचा व्यवसाय करायचा तर सत्य–असत्याचा निवाडा करण्याचे, सत्याविषयी आग्रह राखण्याचे, घटनात्मक

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

हक्क व अधिकार यांच्यावर अडून राहण्याचे सोडून वास्तवाचा स्वीकार गांधींनी केलेला बरा असा सल्लाही त्यांना दिला गेला होता ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

सत्य काय याचे एक उत्तर वास्तव व्यवहार कसा होतो या अंगाने नेहमीच देता येते. सत्य काय याचे आणखी एक उत्तर रीत, कायदा, धर्मपंथ काय सांगतो या अंगाने देता येते, आणि सत्य काय याचे उत्तर इष्ट व आदर्श आणि सनातन शुभ यांच्या प्रकाशात देता येते. नेहमीच तिसऱ्या कसोटीवर सत्य काय याचा निर्णय करावा ही गांधींची भूमिका होती.

इष्ट काय, आदर्श काय, सनातन शुभ कशात आहे किंवा विश्वाचा 'नियम, काय आहे याची उत्तरे त्या त्या समाजात एकेका कालखंडात दिलेली असतात. धर्मशास्त्र, राज्यघटना–कायदेकानू, समाजरुढी व रीतिरिवाज, लौकिक व्यवहार उत्तरे देत असतात. त्यांच्यात अनेकदा सुसंगती नसतेही. अस्पृश्यतापालनाविषयीची भारतातील आजचे वास्तव ध्यानात घ्या, परस्पर विसंगत उत्तरे उपलब्ध आहेत, आणि लोक सोयीनुसार, स्वार्थानुसार त्यांचा आश्रय घेत आहेत. त्यांचे सत्य म्हणून समर्थन करीत आहेत. अशा वेळी सत्यविषयक निर्णय कसा करावा ? गांधीजींची भूमिका जाणून घेणे महत्वाचे आहे. गांधी स्वतःस सनातनी हिंदु म्हणवीत. पण सत्य काय याचा निर्णय करतेवेळी ते धर्मशास्त्र अंतिमतः प्रमाण मानीत नसत. शास्त्रीपंडितांचे मत जाणून घेत असले तरी त्यांनाही अनुसरत नसत. रुढी, रीतिरिवाज यांचे बळ ते मान्य करीत पण त्यांना प्रामाण्य नाकारीत. राज्यघटना, कायदेकानू, न्यायधीशांचे निवाडे यांचा आदर ते करीत, पण त्यांचेही प्रामाण्य अंतिमतः मान्य करीत नसत. स्वतःच्या 'आतल्या आवाजा' ची साक्ष ते प्रमाण मानीत. प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या अंतरात्म्याशी इमान राखून सत्यासत्याचा निर्णय करायचा असतो. आपण करु त्या निर्णयाची जबाबदारी उचलावयाची असते अशी त्यांची भूमिका होती.

'आतल्या आवाजा' वर भरवसा ठेवणे म्हणजे ज्याच्या त्याच्या लहरीवर सत्यासत्याचा निवाडा सोडून देणे नव्हे काय अशा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. चराचर सृष्टीशी तादात्म्य पावून सर्वभूतहितरत होऊन, निर्विकार, निःस्वार्थ व अनासक्त मनोवस्थेत जे शब्द ऐकू येतात त्यांना उद्देशून गांधी 'आतला आवाज' ही संज्ञा वापरतात ही गोष्ट ध्यानात घ्यायला हवी.

अगदी बालवयापासून सत्यासत्याचा निवाडा करुन सत्यनिष्ठ कृती करण्याचे आव्हानात्मक प्रसंग गांधींच्या जीवनात उपस्थित झाले. सत्याचरण हेच सदाचरण आणि सदाचरणी जीवन हेच कृतार्थ जीवन हा संस्कार गांधींनी बालवयात आत्मसात केला. त्यांचे जीवन हे सत्याच्या प्रयोगाचे एक अखंड अविरत, असिधारा व्रतच बनले असल्यास नवल नाही.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

## सत्याग्रह

सत्याग्रह म्हणजे कायदेभंगाचे लढे असे समीकरण आज मनात ठसले आहे. ही काहीशी दुर्दैवाची गोष्ट आहे. हिंसक मार्गांचा अवलंब न करता कायदा मोडून तुरुंगवास यत्तकरला की तो सत्याग्रह ठरतोच असे नाही. सत्याग्रही जीवनाचा पुरस्कार करीत असताना गांधीजींना नेमके काय अभिप्रेत होते ते समजावून घेणे महत्वाचे आहे.

स्वत:स प्रतीत झालेल्या सत्यावर दृढ राहणे, त्यानुसार आचरण करणे या गोष्टीस गांधीजींच्या लेखी प्रथमता व महत्व आहे. सत्याचरणामधून दरवेळी कायद्याचा भंग करण्यापर्यंत पाळी येईलच असे नाही. उदाहरणार्थ, परीक्षेच्या हॉलमध्ये दुसऱ्यांचे पाहून वा पुस्तक / टिपने जवळ ठेवून पेपर सोडविणे गैर आहे असे प्रतीत झाल्याने त्याआधी कॉपी न करता पेपर सोडविला तर ती कृती देखील सत्याग्रहातच मोडेल. तसेच पर्यदेक्षक म्हणून नेमणूक झालेल्या प्राध्यापकाने परीक्षेच्या हॉलमध्ये कॉपी करण्यास विद्यार्थी प्रतिबंध करणे वा टच्युटोरियल / कॉलेजच्या अंतर्गत परीक्षा यांचे मार्क देताना काटेकोर वस्तुनिष्ठ राहणे हा देखील सत्याग्रहच असेल. वरील दोन्ही उदाहरणामध्ये कायदा व नियम याचा भंग होत नाही ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

पण सत्याच्या प्रतीतीशी इमान राखून त्यानुसार दृढनिश्चयाने आचरण करण्यातून अनेकदा संघर्ष उपस्थित होतो. हा संघर्ष पुष्कळदा स्वत:शीच असतो. , सर्वच विद्यार्थी कॉपी करतात, मग मी पण का करु नको ? ' असे समर्थन करुन सोपी वाट काढण्याचा मोह आवरुन व संधी नाकारुन कॉपी न करता पेपर सोडविण्याचा निर्णय जाणीवपूर्वक घेत असता सौम्य संघर्ष स्वत:शी करावा लागतो. ज्या शिक्षणसंस्थेत / परीक्षा व्यवस्थेत पर्यवेक्षकाने कॉपीकडे सोईने दुर्लक्ष करावे वा उलट स्वत:च्या संस्थेच्या विद्यार्थ्यांना ' मदत ' करावी अशी अलिखित रीत पडलेली असेल म्हणजेच सर्वसाधारण औपचारिक नियमापेक्षा वेगळा नियम; कायदा व्यवहारात लागू केलेला असेल, तेथे पर्यवेक्षकाने असहकार पुकारला व सत्याचरण केले तर संघर्षाला सार्वजनिक स्वरुप प्राप्त होते व संघर्ष तीव्रही बनतो.

वरील उदाहरणांवरुन दोन मुद्दे ध्यानात येतात. सत्य या शब्दाच्या पोटात न्याय्य, उचित, नैतिक, सुष्ट, शुभ या शब्दाच्या समावेश गृहीत आहे. कोणत्याही प्रसंगी सत्य काय याचा निर्णय करताना रूढ व्यवहार काय आहे, सोयीचे, फायद्याचे, स्वार्थाचे काय आहे याचा कायदा करावयाचा नाही; तर, जीवनात अंगीकृत केलेल्या मूल्यांच्या, श्रेयांच्या संदर्भात, योग्य काय, नैतिक काय, न्याय काय अशासारखे प्रश्न उपस्थित करुन निर्णय करावयाचा असतो. ही मूल्ये, श्रेये कशी निवडावयाची ? सर्व माणसांचे सहोदरत्व व एकत्व ज्यांमध्ये ग्रंथित, आविष्कृत वा अध्याहृत आहे अशी मूल्ये व ध्येये निवडणे याखेरीज अन्य पर्याय नाही, असे गांधीजींचे उत्तर

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

येईल.

दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, व्यक्ती वा समुदाय यांनी स्वतःचे सत्याचरण करण्याचे कर्तव्य पार पाडण्यावर भर आहे. स्वतः सत्याचरण न करता बदल घडवून आणण्यासाठी दबाव आणणें वा संघर्ष करणे सत्याग्रहामध्ये बसत नाही.

मात्र सत्यानुसार दृढनिश्चयाने कृती करण्यामधून जो कोणता संघर्ष उपस्थित होईल तो पत्करण्यास, त्याला सामोरे जाण्याची तयारी सत्याग्रहचाने ठेवावयाची असते. त्याच्या वा त्यांच्या या तयारीमधून लढा आकारास येतो. या लढचाचे स्वरुप प्रतिपक्षावर मात करण्याचे नसते ही गोष्ट मात्र ध्यानात ठेवली पाहिजे. १९२०, १९३०, व १९४२ साली जे देशव्यापी लढे झाले त्यांचे उदाहरण आपण घेऊ. भारतीयांनी ब्रिटिशांनी प्रस्थापित केलेल्या अन्याय व शोषणावर आधारित व्यवस्थेशी असहकार पुकारुन शिक्षण, न्यायदान, प्रशासन, रोजच्या वापरातल्या वस्तू इत्यादींच्या बाबतीत स्वदेशीनिष्ठ स्वायत्त व्यवहारास आरंभ करावयाचा होता. मिठावरील कर अन्याय्य होता म्हणून स्वतःच मीठ तयार करावयाचे, परदेशी कापड वापरणे पारतंत्र्याला बळकटी आणणारे असल्याने चरख्यावर सूत कातून खादीचे कापड वापरावयाचे, असा कार्यक्रम होता. १९४२ साली तर आपण स्वतंत्र झालोच आहोत असे मानून कृती करा, असाच गांधींचा संदेश होता. म्हणजेच, प्रतिपक्षावर मात करणे, त्याला नामोहरम वा नेस्तनाबूद करणे हे लक्ष नसते तर स्वतःच्या आचरणाने सत्याची, म्हणजेच न्यायाची, मुक्तीची, नीतिमत्तेची, सुष्टाची प्रस्थापना करणे हे लक्ष्य असते.

अर्थातच जेथे सारी समाजव्यवस्था वा राजवट वा रुढ प्रतिष्ठित व्यवहार अन्याय, शोषण, दडपणूक, अनीती यावर आधारलेली असते तेथे व्यक्ती व समुदाय यांनी कर्तव्यपालनाच्या भूमिकेतून सत्याचरणाचा आग्रह धरला की सत्याचरण्यांना दडपून टाकण्याच्या प्रस्थापितांच्या प्रयत्नांतून अटळपणे प्रचंड व तीव्र संघर्ष उपस्थित होतो.

अशा संघर्षाकडे कसे बघावे, या प्रसंगी कसे वागावे यासंबंधी गांधीजींची विशेष दृष्टी होती. व्यक्ती समाजात राहतो याचाच अर्थ असा की, रोजच्या प्रत्येक व्यवहारात इतर अनेकांशी तिचा संबंध येत असतो. व्यक्ती जर सत्याचरणी असेल तर तिच्या वागण्याने भोवतालची माणसे प्रभावित होतातच. आपल्या भूमिकेचा, वागण्याबोलण्याचा त्यांना पुर्नविचार करावा लागतोच. जेव्हा सभोवतालची माणसे समाजव्यवस्था राजवट प्रभावित होऊन सत्याग्रहाच्या भूमिकेवर आली तर परिवर्तन संघर्षाशिवाय घडून येईल. एका अर्थी सत्याग्रहाची प्रत्येक कृती हा सभोवतालच्या सर्वांशी चालविलेला कृतिरुप संवादच म्हणायला हरकत नाही. गांधींची विशेष दृष्टी व शिकवण अशी की, संघर्ष हाही सत्याग्रहयाने कृतिरुप संवादच मानावा.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

प्रतिपक्ष त्वेषाने, शत्रुत्वाच्या भावनेने, नष्ट करण्याच्या ईर्ष्येने तुटून पडलेला असताना जर सत्याग्रहयास लढाईलाही संवादाचे रुप द्यावयाचे असेल तर काय केले पाहिजे ? गांधीजींच्या प्रतिभेची सूक्ष्मता व मार्मिकता येथे प्रत्ययाला येते प्रतिपक्षाविषयी भ्रातृभाव व प्रेम बाळगून, सत्यासाठी आत्मक्लेश आनंदाने सहन करुन आत्मक्लेशाद्वारे प्रतिपक्षाच्या सद्भावाचे व सद्सद्विवेकाचे जागरण करण्याचा मार्ग अनुसरण्याची त्यांनी शिकवण दिली.

## अहिंसा

गांधीजींच्या अहिंसा तत्त्वाच्या स्पष्टतेकडे आता वळले पाहिजे. गांधींचा पिंड शामळू, मवाळ, भित्रा होता म्हणून त्यांनी अहिंसेचा उदोउदो केला नाही. बलदंड ब्रिटिश सत्तेशी यशस्वी सामना करण्यासाठी बलोपासना केली पाहिजे या पक्क्या समजुतीपोटी त्यांनी बालवयात मांसाशनाचा प्रयोग केल्याचे आपणास माहीत आहे. आपल्या समवयस्क पत्नी कस्तुरबा यांच्याशी तरुणपणी गांधींचे वर्तन पुरुषी अहंतेला व वर्चस्व वृत्तीला साजेसे होते हेही आपणास 'आत्मकथे' वरुन माहीत आहे. मूळ पिंड वेगळा असूनही गांधी अहिंसेचे उपासक का बनले ?

सत्याचा शोध, सत्याचे आचरण यांच्या आड जर कोणत्या गोष्टी येत असतील तर त्या माणसाच्या ठायी वास करणारे षड्विकार, त्याला आंधळे बन विणारे, त्याला अहंकेंद्री व स्वार्थी बनविणारे स्वतःविषयीचे ममत्व वा आसक्ती. व्यक्तिगत व सामाजिक जीवनात हिंसाचार घडतो त्याच्या मुळाशी याच गोष्टी असतात याचे सूक्ष्म व साक्षात दर्शन गांधींना स्वतःचेच परखड आत्मपरीक्षण करताना घडले असा तर्क करता येतो. स्वतःच्या मनासारखे घडावे, म्हणजे त्या त्य वेळची इच्छा वा लहर वा आग्रह प्रमाण मानला जावा या पोटी इतरांवर ( व अनेकदा स्वतःवरही) जोरजबरदस्ती करण्यास उद्युक्त होणारी व्यक्ती ' स्व ला जेवढे महत्व देते तेवढे महत्व दिल्यावर सत्याच्या शोधाच्या वाटाच बंद होतात. सत्याचे प्रयोग करण्याची इच्छा असणाऱ्यास मनोविकारांना आवर घालणे अतिशय निकडीचे असते.गांधीजी सार्वजनिक जीवनात पडले नसते तरीदेखील त्यांनी अहिंसेच्या तत्त्वाचा अंगीकार केला असता.

गांधीजी इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी गेले असताना आणि पुढे दक्षिण आफ्रिकेत त्यांच्यावर ख्रिस्ताच्या शिकवणुकीचा प्रभाव पडला. ' सर्मन ऑन द माऊंट ' हा बायबलमधील ख्रिस्तोपदेश यांनी शिरोधार्य मानल्याने आपणास माहीत आहे. इंग्लंडमध्यें असतानाच त्यांनी भगवद्गीता, बुद्धचरित्र यांचाही परिचय करुन घेतला व पुढे त्यांचा अभ्यास वाढविला. आपरभेद करणे चुकीचे आहे, मानवच नव्हे तर प्राणिमात्रांशी वागतानाही प्रेम व करुणा हेच भाव मनात जागृत असले पाहिजेत, जीवनाचे साफल्य आत्मशुद्धी व भूतमात्रांची सेवा यात आहे. हीच सर्व

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

धर्माची मूळ व खरी शिकवण आहे याविषयी त्यांची खात्री पटली. दक्षिण आफ्रिकेत सार्वजनिक क्षेत्रात, व तेही राजकीय लढ्यात, गांधींजी ओढले गेले नसते तर संसार करीत असतानाच ते साधकाचे सेवाभावी जीवन जगलें असते.

मनाची व विचारांची ही बैठक घेऊन गांधीजी सार्वजनिक जीवनात लढयाच्या पवित्र्यात उतरले तेव्हा स्वाभाविकपणेच त्यांच्या पुढे कोणत्या साधन–मार्गाचा अवलंब करुन लढा द्यावा असा प्रश्न उपस्थित झाला. अहिंसक मार्गाचा–सत्याग्रहाचा–पुरस्कार त्यांनी केला यामागे वरील पार्श्वभूमीच्या जोडीला आणखीही एक मुद्दा होता. हा मुद्दाही जाणून घेणे महत्वाचे आहे. त्यांच्या असे ध्यानात आले की, वंश व वर्ण यांनुसार हीन वागणूक देणे उचित आहे, कारण तोच ईश्वरी न्याय आहे अशी प्रामाणिक व पक्की धारणा / श्रद्धा अनेक साधारण गौरवर्णीयांची होती. ( अस्पृश्यास्पृश्यता व जातिभेद यांच्या संदर्भात, त्यांच्या अनुषंगाने विषम व हीन वागणूक देण्याच्या बाबतीतही भारतातही आपणास हा अनुभव येतोच.) त्यांचे सत्याचे दर्शन वेगळे व सर्वस्वी विरोधी होते, असे मत बाळगणारी गौरवर्णीय माणसे एरवी सज्जन, पापभीरु, दयाळू, प्रामाणिक, न्यायी असल्याचाही गांधीजींचा अनुभवा होता अखेरीस त्याने स्वतःच्या 'आतल्या आवाजाचे' प्रामाण्य मानावे अशी गांधीजींची भूमिका असल्याने हीच कसोटी इतरांनीही लावावी असे मोकळया मनाने त्यांनी स्वीकारले. वादात वा लढ्यात परस्परविरोधी उभ्या ठाकलेल्या दोन पक्षांचे सत्याचे दर्शनच जेथे वेगळे, विरुद्ध टोकाचे असते तेथे प्रतिपक्षानेही त्याल स्वतःला प्रतीत झालेले सत्यच वागणुकीचा व कृतीचा आधार बनवावे असा निष्कर्ष निघतो. प्रतिपक्षीयाविषयी अशी न्यायाची व आदराची भूमिका घेतल्यावर हिंसक साधन–मार्गाचा अवलंब अनुचित ठरतो, हे ओघानेच आले.

याचा अर्थ लढाऊ बाणाच सोडून द्यायचा असा गांधीजींनी केला नाही ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. जे असत्य आहे, अनैतिक व अन्याय्य आहे त्याचा दृढ सत्याचरणाच्या उपायाने–सत्याग्रहाने–प्राणपणाने प्रतिकार करण्याचे कर्तव्य पार पाडावयाचे असते. पण या लढ्याचे उद्दिष्ट प्रतिपक्षीच्या ठायी हृदयपरिवर्तन घडवून आणण्याचे असते. ( सत्याचरणाच्या ओघात अहिंसेच्या उपासकाला ते आत्मक्लेश सहन, करावे लागतात त्यामुळे सत्याग्रही पण त्याचे स्वतःचे 'सत्य' पुनःपुन्हा तपासून पाहण्यास उद्युक होतो.) येथे आपण 'संघर्ष हा देखील संवादच' या मुद्द्या–वर परत येऊन पोचतो.

गांधीजींच्या अहिंसा तत्त्वाकडे आणखी एका अंगाने बघता येते. 'बळी तो कान पिळी' हा आजवरचा युद्धाचा नियम व न्याय राहिला आहे. त्याचा परिणाम असा होतो की लढाई जिंकतो त्याचा पक्ष खरा असे ठरते. पग बळाचा मुद्दाच जर रद्दबातला ठरविला तर मग युद्ध हे धर्मयुद्ध बनते आणि जय कोणाचा यापेक्षा धर्माची

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सत्याची बाजू कोणाची व कोणती ही गोष्ट महत्वाची ठरते. सत्याग्रहाचे सत्याचे दर्शन जर अचूक असेल आणि तो जर सत्यावर दृढ राहिला तर अंतिमत: त्याला हे यश येणारच. अहिंसक सत्याग्रह ही लढाई अशी आहे की प्रत्यक्ष लढाईत सहभागी नसलेल्या साक्षी असलेल्या साधारण लोकांच्या सद्सद्विवेकाचे जागरणही होते व त्यांचाहीं प्रभाव पडत असतो. महात्मा गांधींनी हाती घेतलेल्या लहानमोठ्या सर्व लढ्यांमुळे त्या त्या देशीय समाजातच नव्हे तर सर्व जगात सद्भाव जागरण व मानसपरिवर्तन घडून आले. अहिंसेच्या मार्गाचा हाही एक विशेष आहे.

॥ भाग दुसरा ॥

येथवर आपण गांधीच्या जीवनाची व कार्यांची आधारशीला असलेल्या सत्य व अहिंसा या दोन तत्त्वांची स्पष्टता केली. सत्य व अहिंसा या तत्त्वानुसार, जीवन जगण्याचा एक भाग म्हणून गांधी त्यांच्या वेळच्या समाजातील अन्याय शोषण, दारिद्र्य व दडपणूक यांना सामोरे गेले. औद्योगिक क्रांतीची पहिली भरती इंग्लंडमध्ये ज्या काळात आली त्या काळात गांधी तरुण वयात तेथे बॅरिस्टरच्या शिक्षणासाठी गेले. नफेखोर भांडवलशाहीचा निर्घृण आविष्कार त्यांना दक्षिण आफ्रिकेत पहावयास मिळाला. आधुनिक पाश्चिमात्य सभ्यता ( सिव्हिलायझेशन ) ही दडपणूक व शोषण यावर आधारलेली आहे असे त्यांचे अनुभवांती मत बनलें होते. हा बोध त्यांच्या मनात खोलवर रुजण्यास एक विशेष परिस्थिती कारणीभूत झाली. मद्यपान, मांसभक्षण करणार नाही अशी शपथ गांधींनी आईपाशी घेतली होती. लंडनमध्ये वास्तव करताना शाकाहारी जेवणाच्या शोधात ते अशा एका खानावळीत जाऊन पोचले की जेथें कारखानदारी संस्कृतीच्या विरोधात क्रांतिकारक नवविचारांची मांडणी करणारी मंडळी विचारविमर्शासाठी जमत असत. त्यांनी नवविचारांचा एक भाग म्हणून शाकाहाराचा स्वीकार केला तर होता. या मंडळीच्या सहवासात गांधीजींनी निसर्गाशी जवळीक साधणाऱ्या, श्रमनिष्ठ, साध्या शोषणमुक्त व समताधिष्ठित नवसमाजाची स्वप्ने पाहिली. जॉन रस्किन यांच्या 'अन टू धिस लास्ट' या पुस्तकाने आपल्या जीवनाला कसे आमूलाग्र वेगळे वळण लागले याचे वर्णन गांधींचे आत्मकथेत केले आहे. तात्पर्य असे की, वैयक्तिक व कौटुंबिक जीवनातले गांधींचे सत्याचे प्रयोग हे स्वाभाविकच नवसमाजनिर्मितीचें प्रयोग ठरले. दक्षिण आफ्रिकेत त्यांनीं फिनिक्स आश्रम व टॉलस्टॉय फार्म या दोन ठिकाणी श्रमनिष्ठ, वैराग्यशील समुदाय जीवनाचे अर्थपूर्ण प्रयोग फार्म या दोन ठिकाणी श्रमनिष्ठ, वैराग्यशील समुदाय जीवनाचे अर्थपूर्ण प्रयोग केले. शेती, उद्योग, आरोग्य आध्यात्मिक साधना आणि राजकीय व सामाजिक जीवनात सक्रिय सहभाग असा सर्वस्पर्शी कार्यक्रम त्यांनी राबविला. भारतात परतल्यावरही त्यांनी अहमबादजवळ प्रथम एक आश्रम स्थापन केला व स्वत:च्या कल्पनेतील आदर्श व्यक्तिगत,

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पारिवारिक व सामुदायिक जीवनाच्या उभारणीचे काम हाती घेतले. या प्रयोगां-मधून जी तत्त्वे त्यांनी समाजापुढे ठेवली त्यांची ओळख करुन घेतली नाही तर तर गांधींचा विचार समग्र स्वरुपात जाणून घेतला असे होणार नाही.

गांधींची एकादश व्रते विनोनाजींनी पुढीलप्रमाणे सांगितली आहेत :

अहिंसा सत्य अस्तेय ब्रम्हचर्य असंग्रह / शरीरश्रम आस्वाद सर्वत्र भयर्जन
सर्वधर्मी समानुत्व स्वदेशी स्पर्शभावना / ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये

यापैकी अहिंसा व सत्य आणि सर्वत्र भयवर्जन यांचा आपण विचार केला. आहे. उरलेल्यांचा विचार येथे आता करावयाचा आहे.

यापैकी 'स्पर्शभावना' व 'सर्वधर्मी समानत्व' याचा अर्थ व महत्व सम-ण्यासारखे आहे. आपण सर्वच जर एकाच 'ईश्वराची लेकरे' असू तर वर्ण, वंश जातपात, धर्म वा इतरही कोण्या कारणाने आपापसात तटबंद्या उभारणे, स्पृश्या-स्पृश्य, उच्चनीच असा भेदभाव करणे, द्वेष बाळगणे हे असत्य आहे. हे भेद मानव-निर्मित आहेत. यांपैकी काही भेद अज्ञानापोटी केले गेले. अज्ञान दूर झाल्यावरही काहीविषयी आग्रह बाळगला जातो याचे कारण भेदाभेद करण्यात स्वार्थ व लाभ आहेत. म्हणजेच त्यात अन्याय, शोषण व दडपणूक आहे. ( उदा. वर्णभेद, वंशभेद, आतिभेद, अस्पृश्यता इत्यादी) वेगवेगळे धर्म या ईश्वराप्रत जाण्याच्या वेगवेगळ्या वाटा होत. वेगळ्या वाटांची उत्पत्ती ऐतिहासिक मीमांसेच्या आधारे समजून घेता येते. आज सारे जग एक होत असताना, वाटा वेगळ्या असल्या तरी त्याच एका सत्याप्रत आपणां सर्वांना जावयाचे आहे हे जाणून सर्वधर्मसमभाव बाणवला पाहिजें.

'अस्तेय' 'असंग्रह' 'शरीरश्रम' 'स्वदेशी' यांचा एक स्वाभाविक गट आहे. या चार व्रतांमध्ये गांधींचा संपूर्ण अर्थविचार सामावलेला आहे असे म्हणता येईल.

गांधीजी तत्त्वज्ञ नव्हते, पण गोष्टींचा थेट मुळाशी जाऊन चिकित्सा कर-ण्याची क्षमता व धैर्य त्यांच्यात विलक्षण होते. समाजव्यवस्थेतला अन्याय, शोषण, दडपणूक यांचा उगम कशात आहे व उगम का होतो असा प्रश्न त्यांनी विचारला. इतरांजवळ पुरेसे नसताना माझी चंगळ असली पाहिजे, माझी चंगळ होण्यासाठी जमेल तेवढे इतरांचे काढून घेतले पाहिजे ही इच्छा, हा लोभ साऱ्या अनर्थांच्या मुळाशी आहे असे या प्रश्नांचे उत्तर त्यांना गवसले. उपभोगाविषयीची स्वत:ची लालसा सतत वाढवीत राहावे, सर्व व्यवहार 'आवळा देऊन भोपळा काढण्या' च्या युक्तीने करावेत ( म्हणजे जास्तीत जास्त स्वार्थ साधावा व नफा कमवावा ) अशी, आधुनिक अर्थशास्त्रास उद्देशून रस्किप्रमाणेच त्यांनी,, 'हे अर्थशास्त्र की अनर्थशास्त्र?' असा प्रश्न उपस्थित केला. त्यांचा असा ठाम निवाडा होता की दुसऱ्याच्या श्रमांच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

'स्वदेशी' च्या व्रताचा अर्थ आता जाणून घेऊ या. शोषणमुक्त बळावर, दुसऱ्याला लुबाडण्याच्या तत्त्वावर स्वतःची चंगळ करावयास शिकविणारे अर्थशास्त्र हे असत्य, अन्याय्य व अनर्थकारी आहे.

शोषणमुक्त समताधिष्ठित समाज खऱ्या अर्थाने अस्तित्वात यावयाचा असेल तर समाजातील प्रत्येकाने (उत्पादक) शरीरश्रम करावयास हवेत या निष्कर्षांवर ते पोचले. उत्पादक–अनुत्पादक अशी विभागणी कशाच्या आधारे करणे उचित होईल ? माणसाच्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी ज्या भौतिक वस्तू वा सेवा यांच्या उत्पादनाची गरज असते त्या वस्तू वा सेवासाठी करावे लागणारे श्रम उत्पापक गरजांमध्ये समाविष्ट करता येतील. पण गांधीजी या बाबतीत थोडे काटेकोर होते. बौद्धिक-सांस्कृतिक व्यापार हे श्रेष्ठ व शरीरश्रम कनिष्ठ मानणारी आजची सभ्यता (सिव्हिलायझेशन) आहे. या भेदामुळे 'हात खराब न करता' जो उपजीविका हस्तगत करू शकतो ती व्यक्ती व ज्या व्यवसायात 'स्वच्छ', नाजुक व मुलायम राहतात तो व्यवसाय श्रेष्ठ हे मूल्य रुजलेले आहे. भारतीय समाजात तर ही गोष्ट पदोपदी आपल्या अनुभवाला येते. या पार्श्वभूमीवर गांधीजींनी 'शरीरश्रम' हे व्रत म्हणून सांगितले. गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोरांसारख्या कविवर्यांनी देखील सूत कातून वा वस्त्र विणून वा शेतात काम करुन वा अन्य प्रकारे नियमितपणे नित्य उत्पादक शरीरश्रम करायला हवेत असे आवर्जून म्हटले ते याच कारणासाठी.

अस्तेय व असंग्रह या दोन व्रतांचेही महत्व आपोआपच स्पष्ट होईल. खासगी मालमत्तेचा सोस, संग्रह करुन ठेवण्याचा लोभ, दुसऱ्यापेक्षा माझ्या जवळ जास्त आहे याचे कौतुक व गर्व यामधून आर्थिक, सामाजिक व राजकीय शोषणाचा जन्म होतो. माझ्या गरजेपेक्षा मी जास्त घेणार नाही, उगीच जास्त संग्रह करुन ठेवणार नाही. आणि माझ्या गरजाही सतत वाढवीत नेणार नाहीं असे प्रत्येकाने ठरविले पाहिजे. दारिद्र्याने गांजलेल्या लोकसंख्येचे मान अति जास्त असणाऱ्या भारतासारख्या विषम समाजात तर गरजांच्या नावाने वस्तुंचा व उपभोगांचा हव्यास वाढविल्यामुळे किती विपरीत, घातक परिणाम होत आहे. आपण हे अनुभवीत आहोत. काळाबाजार, स्मगलिंग, सभ्य स्वरुपातली लूटमार, दरोडेखोरी या सर्वांचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत आहे. कायदे करुन, पोलिस व कस्टम खात्यांचा पसारा वाढवून, प्रशासकीय नियंत्रणे वाढवून यांना आळा बसणार नाही हे आज स्पष्ट झाले आहे. कारण चोरीची, लूटमारीची, तिजोऱ्या भरण्याची वृत्तीच आपण मूल्य म्हणून जोपासत आहोत.

शरीरश्रम, अस्तेय व असंग्रह ही तीन व्रते आपण एकत्र विचारात घेतली तर आजच्या यंत्रप्रधान कारखानदारी व्यवस्थेला गांधींचा विरोध यथार्थ होता हे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आपणास समजू शकते. यंत्रालाच गांधीचा विरोध नव्हता. मानवी श्रमांचे शोषण करणाऱ्या वा माणसाला बेकार बनवून उकिरड्यावर फेकणाऱ्या यंत्रप्रधानतेला विरोध होता. आजचे औद्योगिक तंत्रविज्ञान व त्याद्वारा करण्यात येणारी केंद्रीभूत मोठ्या प्रमाणावरील उत्पादन यांचे मुख्य उद्दिष्ट शोषण व नफेखोरी हे आहे. शोषण व नफेखोरी यांना वाव न देता यंत्राचा सुयोग वापर करावयाचा असेल तर काही पथ्ये काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे असे गांधींचे म्हणणे होते. समाजात सर्वांना प्रतिष्ठित रोजगार मिळावयास हवा, रोजगारामधून मानवाला साजेसे जीवन जगण्याइतके उत्पन्न प्रत्येकास मिळावयास हवे, आणि यंत्राच्या वापराने विषमता उत्पन्न होता कामा नये. यंत्राधिष्ठित कारखानदारी माणसाला यंत्राचा गुलाम बनविते व त्याचे नैतिक-आध्यात्मिक पतन घडवून आणते हा अनुभव गांधींना होता. शेकडो-हजारो माणसांना यंत्रावर काम करणारे यंत्रवत कामगार बनवून टाकणारी कारखानापद्धती व त्यातून अस्तित्वात येणारी झोपडपट्ट्या/कामगारवर्गीय चाळींवर अधिष्ठित बकाल शहरे यांनाही विरोध होता.

यंत्रावर मर्यादा असावी, यंत्रे माणसाच्या कह्यात असावीत ती त्याला सहाय्यक असावीत आणि उत्पादन विकेंद्रित स्वरुपात केलें जावे या आग्रहामागे सर्वसामान्य माणसाला प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्याची थोर दृष्टी होती. केंद्रीभूत कारखान्यामध्ये यंत्राच्या साहाय्याने प्रचंड प्रमाणावर प्रमाणित वस्तूंचे उत्पादन केले जाते तेथे उत्पादक कामगार हा कवडीमोलाचा ठरतो. यंत्रे अतिशय महागडी व नाजूक असल्यानें ती जास्त काळजीपूर्वक जपली जातात. (त्यांच्यासाठी खोल्याही वातानुकूलित बनविल्या जातात. ) उत्पादनापेक्षा ते महाग दराने सर्वदूर विकून पैसा करण्यास महत्व येते. जाहिरातबाजी, दलाली, व्यापारी हिकमत, बनवाबनवी यांना महत्व येते. अनीती, भ्रष्टाचार व असत्य बोकाळते या सगळ्याचा तीव्र अनुभव आपण आज घेत आहोत. उत्पादकाला मानसन्मान व प्रतिष्ठा प्राप्त व्हायची असेल, त्याचे उत्पादन नावाजले जायचे असेल, त्याच्या नावाने हातातली हुन्नर, कला यांचे चीज व्हायचे असेल तर त्याचे उत्पादन त्याच्या नावाने ओळखता यायला हवे; तो तयार करीत असलेली वस्तू वापरणाऱ्याला त्याची ओळख पटायला हवी. म्हणजेच निर्माता व उपभोक्ता यांच्यामध्ये वस्तूच्या माध्यमातून जिव्हाळ्याचा, मैत्रीचा हृद्य मानवी संबंध प्रस्थापित व्हायला हवा. उत्पादन जर विकेंद्रित स्वरुपात केले गेले आणि यंत्राचे सहाय्य मर्यादित ठेवले तरच गोष्टी साध्य होऊ शकतात. माणसांनी ऐहिक-दृष्ट्या सुखी, समाधानी व संपन्न जीवन जगावे हे गांधीजींचेही लक्ष्य होते. पण माणसाचे ऐहिक जीवन हे त्याच्या नैतिक, आध्यात्मिक उन्नतीचे, ईश्वरभक्तीचे व मोक्षाचे देखील माध्यम असावे हा त्यांचा आग्रह होता.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

समताधिष्ठित समाजाचा पायाभूत, प्राणभूत भाव बंधुभाव हाच आहे. दळणवळणाच्या, संप्रेषणाच्या साधनांमधील क्रांतीमुळे सारे जग इतके जवळ आले आहे की आज 'द ग्लोबल व्हिलेज' असा शब्दप्रयोग अर्थपूर्ण केला जात आहे. या पार्श्वभूमीवर स्वदेशी, ग्रामस्वालंबन व स्वयंपूर्णता या गोष्टी संकुचित वृत्तीच्या द्योतक वाटतात. जगाच्या कानाकोपऱ्यातून अनेकविध नवनव्या वस्तू मिळवून वापरण्यात लोकांना भूषण वाटते. पण दुरदूरच्या माणसाविषयी बंधुभाव, आत्मीयता वाटते पण शेजाऱ्यापाजाऱ्याविषयी मात्र उपेक्षा आढळते याचा खरा अर्थ कोणाबद्दलच बंधुभाव मनात नाही असाच असतो. माझी आवडनिवड, माझी लहर व सोय, माझा स्वार्थं तेवढा मी पाहात असतो. शेजाऱ्याविषयीचे माझे कर्तव्य पार न पाडता मी जर जगाच्या ऐक्याच्या गोष्टी करीत असेन तर त्यामधून सरळ सरळ शोषणाधिष्ठित विषम समाजच अस्तित्वात येणार. तलम, मुलायम व स्वस्त म्हणून हिंदी माणसे जेव्हा मँचेस्टरचे कापड वापरण्यात भूषण मानीत होती तेव्हा येथील कोटयावधी विणकरांचा व कत्तिनांचा रोजगार छिनला गेला होता आणि देश पारतंत्र्यात जखडला गेला होता. धन इंग्लंडमधील कारखानदार–भांडवलदारांची होत होती. स्वदेशीचा साधा सरळ अर्थ असा आहे की सर्वप्रथम माझ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांविषयीचे माझे कर्तव्य पूर्ण करण्यास मी प्राधान्य दिले पाहिजे. भारत हा आजही खेडयांचा देश आहे. शंभरातले सत्तर टक्के लोक आजही खेडयांत राहतात. या लोकांविषयीच्या कर्तव्याची आम्ही प्रथमतः पूर्तता करावयास हवी. स्वदेशीचे तत्त्व अंगीकारले की स्वाभाविपणेच ग्रामस्वालंबन, ग्रामस्वयंपूर्णता प्रस्थापित करण्याच्या दिशेने पावले उचलली जातील.

शेवटी आपण ब्रम्हचर्य, आस्वाद व सर्वत्र भयवर्जन या व्रतांचा विचार करु. सत्य या तत्त्वाचा विचार आपण असे पाहिले की, देहधारणेबरोबरच येणाऱ्या काम–क्रोध–लोभ–मोह–मद–मत्सर या षड्विकारांच्या प्रभावाखाली असेतोवर सत्याचे दर्शन होत नाही. दृष्टी गढूळलेली राहते शरीर आहे तोवर या षड्विकारांपासून सदासर्वकाळ पूर्णतः मुक्त असा कोणीच असू शकत नाही याची तीव्र जाण गांधीजींना होती. जगातील सर्व अन्याय–अत्याचारांचे शोषणांचे, लालसेचे मूळ या विकारामध्येच आहे. सत्याच्या मार्गावरुन वाटचाल करावयाची असेल, शोषणमुक्त व समताधिष्ठित समाज निर्माण करावयाचा असेल तर षड्विकारांना सतत, जागरुकतेने काबूत ठेवले पाहिजे. ब्रम्हचर्य, आस्वाद आणि सर्वत्र भयवर्जन या तीन व्रतांचे प्रयोजन व महत्व स्पष्ट होईल. भोगप्रधान संस्कृतीमध्ये वासना पेटल्या व वाढत्या ठेवण्यावर भर इतका आहे. ती गोष्ट इतकी वांच्छनीय व भूषणास्पद मानली जाते की ब्रम्हचर्य व आस्वाद ही व्रत आचरावयाची म्हणजे सर्वांनी विरक्त, संन्याशीच व्हावयाचा आग्रह गांधीजी धरीत आहेत असा आरोप केला जातो.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

योग्य वयात व अवस्थेंत विरक्त होऊन संन्यस्त जीवन प्रत्येकाने जगावे असे गांधी नक्कीच म्हणाले असते. पण स्त्री पुरुषांनी वैवाहिक जीवन जगण्यासच त्यांचा विरोध होता वा नीरसपणे कसेही जगावे अशी त्यांची शिफारस होती असे मानणे गांधी-जींना अन्याय करणारे होईल. जन्मजात पिंड व स्वभाव यांच्या दृष्टीने गांधीजीचे विकार विशेष तीव्र होते व याची मनमोकळी कबुली आत्मकथेत त्यांनी दिली आहे. म्हणूनच त्यांना अनासक्त बनण्याच्या दृष्टीने ब्रम्हचर्य व आस्वाद या व्रतांची विशेष गरज वाटत होती.

'सर्वत्र भयवर्जन' करण्याचे महत्व विशद करुन सांगण्याची खरे तर आवश्यकता नाही. माणसाला चालना देणाऱ्या चार मूलभूत शक्ती-प्रवृत्ती 'आहार, निद्रा, भय व मैथुन' सांगितलेल्या आहेत. भय ही उपजतच गोष्ट आहे. पण भयग्रस्त माणूस सत्याचा शोध लागला तरी सत्याचे आचरण करण्यास धजत नाही. काही नाही तर लोकापवादाचे त्याला भय वाटेल. निर्भय बनण्याचे म्हणून महत्व आहे. पण आसक्त, आकांक्षी व विकारी माणूस,निर्भय बनू शकत नाही. आपणास ज्या गोष्टीची कामना आहे ती न मिळण्याचे व मिळालीच तर ती गमावण्याचे भय त्याला जखडून ठेवत असते. भयग्रस्त माणूस भयापोटी चटकन हिंसेचा अवलंब करतो, हिंस्र बनतो. समाजजीवनातली पुष्कळशी हिंसा ही खोलवर मुरलेल्या भयापोटी घडून येत असते असे मानसशास्त्रज्ञ आज म्हणतात. निर्भय बनू पाहणाऱ्या व्यक्तीस अनासक्त, विकार मुक्त, आकांक्षाविरहित बनण्याची, स्वतःचे धड व शरीर स्वस्थ, शुद्ध राखण्याची सतत गरज असते. म्हणजेच ब्रम्हचर्य, आस्वाद व सर्वत्र भयवर्जन यांचा परस्परांशी व सत्य आणि अहिंसा यांच्याशी अन्योन्य संबंध आहे.

लेखाच्या आरंभीच महात्मा गांधी यांचा पिंड सर्वंकष तात्त्विक विचार-प्रणाली मांडण्याचा नव्हता ही गोष्ट स्पष्ट केली होती. राजकारण आणि समाज-परिवर्तन या क्षेत्रात गांधीजी ओढले गेले. भारत हा परतंत्र्य देश असल्याने राज-कारणाने व्यक्तीचे जीवनही इतके समग्रपणे व्यापलेले, वेढलेले होते की राजकारण व समाजकारण केल्याखेरीज गत्यंतर नव्हते. दक्षिण आफ्रिकेत जाते वेळी तर चार पैसे मिळावेत, व्यवसाय स्थिर व्हावे इतकाच मर्यादित हेतू त्यांचा होता. पण तेथे तर हिंदी माणसाला स्वतःचा स्वाभिमान टिकवायचा तरी राजकारणात पडणे क्रमप्राप्तच होते. वैयक्तिक जीवनात अध्यात्मिक साधना करावयाची ठरवून संसाराकडे, संसारी जगाकडे गांधींनी पाठ फिरविली नाही, कारण जीवनाचे असे तुकडे करता येतात हीच गोष्ट अमान्य होती. हे खासगी-ते सार्वजनिक, हे व्यक्तिगत-ते सामाजिक अशी विभागणी करता येत नाही, एकाच वेळी माणसाच्या जीवनाला दोन्ही अंगे असतात, अशी त्यांची भूमिका होती.

जीवनाच्या अगदी आरंभालाच, बालवयातच त्यांनी सत्यनिष्ठेचा अंगीकार केला. निष्ठापूर्वक सत्याचे आचरण करावयाचे असेल तर कोणत्या मार्गदर्शक तत्त्वांचा अंगीकार केला पाहिजे, आणि कोणती व्रते आचरली पाहिजेत याची स्पष्टता स्वतः-साठी ते करीत गेले. व्यक्तिगत जीवनासाठी व समाजासाठी विचार, धोरणे, लढे व रचनात्मक कार्यक्रम देखील सत्याचा आचरणामधूनच आकारास येत गेलेल्या गोष्टी होत्या. गांधीजींचा विचार याच पद्धतीने समजून घेणे महत्वाचे आहे.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

॥२॥

# म. गांधीजींचा नैतिक विचार

## श्रीनिवास दिक्षित

ा स्तविक पाहता म. गांधींचे नैतिक विचार, किंबहुना कोणताही नैतिक विचार, आणि प्राप्तस्थिती यांचा काही विशेष संबंध असला पाहिजे असे नाही. नैतिक विचार हा सार्वकालिक असतो. तो ग्राह्य असेल तर कोणत्याही काली ग्राह्य असतो आणि नसेल तर केव्हाच नसतो. नीतीची तत्त्वे शाश्वत असतात पण जेव्हा ती आचरणात आणणाचा आपण प्रयत्न करतो तेव्हा परिस्थितीप्रमाणे तपशीलात बाहृयतः काही बदल होतात. नीतीच्या तत्त्वांत बदल होत नाही. झाला तर ती नीती नव्हे. नीती सनातन असते.

असे आपण समजू नये की, भारतात राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी गांधींनी काही एक विचार निर्माण केला नाही; असे बिल्कुल नाही. भारताचे स्वातंत्र्य ही त्यांच्या दृष्टीने ऐक गौण गोष्ट होती; मूलतः ते मिळविणे हे आपले जीवन-कार्य आहे असे त्यांनी मानले नाही.

त्यांना मोक्षाची साधना करावयाची होती. त्यासाठी ते झुरत होते. आत्म-कथेच्या प्रस्तावनेत त्यांनी स्वदस्तुरने तसे लिहिले आहे. ती साधना करतांना त्यांनी स्वतःला इतिहासाच्या अशा टप्प्यावर पाहिले की भारतीय स्वातंत्र्यासाठी संबंध आयुष्य वाहणे हे त्यांना स्वतःचे कर्तव्य म्हणून दिसले. स्वतःच्या मोक्षाच्या सिद्धी-साठी या कर्तव्याचे पालन केलेच पाहिजे अशी त्यांची धारणा होती. या राष्ट्रासाठी त्यांनी जे जे काही केले ते ते त्यांच्या आध्यात्मिक साधनेचा भाग होता. ती एक इतिहास दत्त गोष्ट होती. राजकारणाचे आध्यात्मिकरण झाले पाहिजे असे त्यांचे गुरु नामदार गोखले म्हणत असत. ते गांधींच्या बाबतीत सहजच घडून आले.

या आध्यात्मिक साधनेचे स्वरुप विशुद्ध नैतिक होते. सत्य आणि अहिंसा या दोन संकल्पनाद्वारे त्यांनी आपल्या साधनेचे स्वरुप विशद केले.

### सत्य

सत्य याचे अनेक अर्थ आहेत. खरे बोलणे हा तर त्याचा अर्थ आहेच. पण बोलण्याप्रमाणे वागणे; वाणी, विचार व आचार यांच्यातील

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सुसंवाद साधणे हाही त्याचा अर्थ आहे. व्यक्तीचे जीवन पारदर्शी पाहिजे. खरे का बोलावयाचे ? त्याला कांही कारण लागत नाही. खोटे बोलण्याला काही कारण अथवा हेतू हवा असतो. खरे बोलावयाचे ते वस्तुस्थिती जशी आहे तशी ती आहे म्हणून. खरे बोलणे ही सहज क्रिया आहे. आपण खोटे बोलतो तेव्हा वस्तुस्थितीवर पडदा घालतो. पडद्याचे ते आवरण आपल्याही घेरतेच. आपण घुसमटतो. मोकळ्या हवेत श्वासोच्छ्वास केल्याचा आनंद खरे बोलण्याने मिळतो. म्हणून खोटेपणाच्या भिंती घालून स्वत:साठी तुरुंग निर्माण करावयाचा नाही. आपण पारदर्शक असावे. या प्रकारच्या जीवनास नैतिक मूल्य आहे, ते जीवन शोभिवंत असते. प्रसन्न असते. हा आदर्श गांधींनी व्यक्तिव्यक्तीमधील व्यहारापुरता मर्यादित ठेवला नाही. सार्व–जनिक जीवनातही त्याचा आग्रह धरला. त्याचा अर्थ राजकारणात डावपेच, फसवा–फसवी असू नयेत असा होतो.

आपले साध्य विशुद्ध असेल तर साधन म्हणून डावपेच वापरण्यास हरकत नाही हे म्हणणे गांधींच्या नीतिविचारात बसत नाही. आपण डावपेच करतो याचा अर्थच असत्यास आश्रय दिला असा होतो. जीवनात आलेल्या अस–त्याने जीवन दुषित होतेच. त्याचे परिणाम पाहण्याची गरज नाही. परिणाम पहावयाचे म्हटले तर परिणामांचे परिणाम का पहावयाचे नाहीत? थांबावयाचे कोठे ? जीवन प्रवाहाला अंतच नसतो. म्हणून जीवनाचा प्रत्येक क्षण 'शुचि' पाहिजे. साधन-शुचितेचा आग्रह धरावयाचा तो साधन आणि साध्य हा फरक कृत्रिम आहे म्हणून. आयुष्याचा शेवटचा टप्पा असू शकते. जीवन, शुचि–जीवन, हेच साध्य आहे. दर क्षणीच आपण जीवन जगत असतो. म्हणून आयुष्याचा प्रत्येक क्षण सत्यपूत पाहिजे, सत्य–पुलकित पाहिजे. त्यात दंभ असता कामा नये. कोणाची फसवणूकही असता कामा नये.

## अहिंसा

क्षणाक्षणाला जशी सत्याची निर्मलता पाहिजे. त्याप्रमाणे समोरच्या व्यक्तीच्या प्रेमाने तो क्षण ओथंबलेला असला पाहिजे. मी स्वत:वर अतिशय प्रेम करतो. मी अतिशय महत्वाचा आहे असे मला वाटते. कारण आयुष्यात जे काही मला मिळवावयाचे आहे ते अतिशय महत्वाचे आहे. ते व्हावयालाच पाहिजे. ते परम मंगल आहे. त्या मांगल्याचा मी साधक असल्याने मी महत्वाचा आहे. आणि, मी महत्वाचा असल्याने स्वत:वर प्रेम करतो. मी परम–प्रेमास्पद आहे. पण जी गोष्ट माझ्या संबंधी खरी ती दुसऱ्या कोणत्याही माणसासंबंधी खरी आहे. माझ्याप्रमाणे तोही स्वत:ला परम कल्याणाचा वाटसरु आहे असेच मानतो. कदाचित मला तो दुष्ट आहे असे वाटत असेल. पण त्याचा अर्थ एवढाच की त्याची धारणा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(Judegement) चुकलेली आहे किंवा मुक्कामास पोचण्याच्या ठिकाणाची वाट चुकलेली आहे. पण एखाद्याचे आकलन कमी पडले आणि त्यामुळे त्याचा मार्ग भिन्न कदाचित चुकीचाही–झाला याबद्दल त्याचा द्वेष कसा समर्थनीय ठरेल ? माझी ही धारणा अयथार्थ असेल आणि त्यामुळे माझाही मार्ग चुकलेला असेल. माझ्याप्रमाणे त्याचेही प्राप्तव्य विश्वमांगल्य हेच असल्यामुळे मी त्याच्यावर, त्या दुष्ट आणि नकोशा वाटणाऱ्या माणसावर प्रेम केलें पाहिजे.

कोणत्याही माणसावरील–किंवहुना प्राणिमात्रावरील असीम प्रेम म्हणजे गांधींची अहिंसा होय. दुसऱ्या व्यक्तीस शारीरिक इजा न करणे एवढाच अहिंसा याचा अर्थ घेतल्यास तो फार संकुचित होईल. तो अर्थ नकारात्मक होईल. गांधींची अहिंसा याचा अर्थ घेतल्यास तो फार संकुचित होईल. तो अर्थ नकरात्मक होईल. गांधींची अहिंसा भावरुप होती. जो कोणी प्रतिपक्षीय असेल त्याचा एक मानवी व्यक्ती म्हणून संपूर्ण स्वीकार व त्याच्यावर अनासक्त प्रेम हे गांधींच्या अहिंसेचे स्वरुप होते.

प्रतिपक्षी हा आपला विरोधक का असतो ? जे घडून यावे असे आपणांस वाटते, म्हणजेच जे चांगले आहे असे आपण समजतो, ते त्याला तसे दिसत नाही. त्याला जे चांगले म्हणून भावते ते आपणांस तसे भावत नाही. जे खरोखर चांगले, कल्याणमय, शुभमंगल असे आहे तेच घडून यावे या बाबतीत मतभेद नसतो. नेमकी कोणती गोष्ट चांगली होय याविषयी मतभिन्नता असते. ही मतभिन्नता नाहीशी करण्याचा मार्ग एकाने दुसऱ्याचे डोके फोडणे हा नव्हे असे अहिंसा सिद्धांत सांगतो.

## सत्याग्रह

गांधींच्या विचाराच्या चौकटीत दुरिताचे निवारण करण्यासाठी सत्याग्रह हा मार्ग आहे. सत्य या शब्दाचे दोन अर्थ गांधींच्या विचारात आहेत. गांधींनी ते निराळे करुन दाखविलें नाहीत. ते काम आपण करु या.

सत्य हा एक शब्द ‘ सत् ’ या विशेषणावरुन सिद्ध झालेला आहे. ‘ सत् ’ याचा अर्थ ‘ असणारे जे आहेत ते ’ जे खरे आहे ते ’ असा होतो. ‘ सद्वस्तू ’ याचा दुसरा अर्थ ‘ चांगले ’ असा आहे. सज्जन या शब्दातील सत् हा शब्द या अर्थाचा आहे. गांधींनी ‘ सत्य ’ हा शब्द कधी ‘ सत् ’ चा पहिला अर्थ घेऊन तर कधी दुसरा अर्थ घेऊन वापरलेला आहे. जेव्हा ते त्याचा पहिला अर्थ घेतात तेव्हा बोलण्यात खरेपणा पाहिजे, वाणीत आणि वागण्यात एकरुपता पाहिजे, व्यक्तित्त्व, पारदर्शक पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. ‘ सत्य हाच ईश्वर होय ’ असे जेव्हा त्यांनी तेव्हा सत्य याचा ‘ कल्याण ’ ‘ विश्वमांगल्य ’ हा अर्थ त्यांच्या मनात होता.

‘ सत्याग्रहा ’ चा मार्ग त्यांनी सांगितला त्यात सत्य याचा हा दुसरा अर्थ

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

होता. अगदी सुरवातीस 'सद् आग्रह' असेच नाव त्यांनी योजिले होते. माझ्या धारणेप्रमाणे जे खरोखर कल्याणाचे आहे, जे खऱ्या हिताचे आहे त्याचा मी आग्रह धरावयाचा. येथे असे गृहीत आहे की जे खरे कल्याण आहे त्यात सर्वांचेच हित असते. हे गृहीत मार्क्सवाद्यांना मान्य होणार नाही. माणसांचा एक वर्ग आणि दुसरा वर्ग यांच्यातील हितविरोध अंतिम आहे असे ते मानतात. म्हणून 'हृदय–परिवर्तन' ही गोष्ट मार्क्सवादात बसत नाही.

गांधींच्या सत्याग्रहात हृदय–परिवर्तन ही कळीची जागा आहे. गांधी मानीत की, भारतीय स्वातंत्र्य हे केवळ येथील लोकांच्या हिताचे आहे असे नाही. तर इंग्लंडमधील लोकांच्या, अगदी चर्चिल धरुन सर्व लोकांच्या, हिताचे आहे. माझे खरे हित तेच की जे तुझ्या खऱ्या हिताच्या विरोधी नाही. अशा रीतीने मानवाचे जे परमहित ठरेल ते सत्य होय. वाटल्यास याला ईश्वर असेही म्हणावे. त्याची प्रतिच्छाया प्रत्येकाच्या हृदयात असते. त्याला हृदयातील परमेश्वर म्हणावयाचे. सत्याग्रहाच्या प्रक्रियेत मी जे आत्मक्लेश भोगेन आणि ते भोगत असताना प्रतिपक्षावर जे असीम अनासक्त प्रेम करेन त्यामुळे त्याच्या हृदयातील परमेश्वर जागा होतो. अशी गांधींची श्रद्धा होती. त्यामुळे कधी ना कधी विरोधक माझे म्हणणे मान्य करेल अशी उमेद धरता येते. जर असे घडले नाही तर माझी सत्याची धारणा सांभाळीत होती. (म्हणजे माझे सत्य हे पुरे सत्य नाही) किंवा प्रतिपक्षावर मी असीम प्रेम करीत नाही. ( माझी अहिंसा अपुरी आहे ) असा त्याचा अर्थ होतो. अशा वेळी गांधी सत्याग्रह मागे घेऊन आत्मसंशोधन करीत आणि कधी कधी उपवासासही बसत.

सत्याग्रहाचे तंत्र जेव्हा सामुदायिक चळवळीसाठी स्वीकारले जाते तेव्हा त्याला सविनय कायदेभंगाचे स्वरुप येते. मोठ्या प्रमाणातील कायदेभंगात सत्याग्रहाच्या तंत्रानी अहिंसा हा आध्यात्मिक अंश गाळून पडतो. म्हणून शेवटी, शेवटी गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाचा पुरस्कार केला.

## सद्यस्थिती

आता प्रश्न आहे की सद्यःस्थितीत अन्याय निवारण्याचे साधन म्हणून गांधींच्या सत्याग्रह तंत्राचा वापर करणे योग्य होईल काय ? गांधींचा विचार ज्यांनी शंभर टक्के आत्मसात केला होता त्या विनोबांचे म्हणणे होते की लोकशाही व्यवस्था असलेल्या स्वतंत्र्य भारतात सत्याग्रहाला अवसर नाही. पारतंत्र्याच्या काळात तुमचे म्हणणे खरे असले. तरी त्याचे कायद्यात रुपांतर होईल अशी हमी नव्हती. स्वातंत्र्यात स्थिती पालटली. चर्चा करुन, विचार–विनियम करुन आपले म्हणणे दुसऱ्याला पटवून देण्याचे भरपूर स्वातंत्र्य आपणांस आज आहे. तसेच बहुसंख्य लोकांस एखादी गोष्ट पटल्यास तिचे कायद्यात रुपांतर होणे हे लोकशाहीत अंगभूत आहे. ही सोय असल्यावर सत्याग्रहाचा–सविनय कायदेभंगाचा मार्ग अवलंबणे ही गोष्ट धोक्याची आहे. एक तर गांधींच्या तोलाचा सर्वत्र समदर्शी आणि सतत आत्म संशोधन करणारा नेता आज उपलब्ध नाही आणि दुसरे असे की सत्याग्रहीची पात्रता येण्यासाठी जी सत्यनिष्ठा आणि अहिंसावृत्ती अपेक्षित आहे ती फारच दुर्मिळ गोष्ट आहे.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# ३

# सत्याग्रह : अन्याय प्रतिकाराचा मार्ग

## डॉ. ना. य. डोळे

राज्यसंस्थेने अन्याय केला तर व्यक्तीने वा अन्यायपिडित लोकसमूहाने त्या अन्यायाचा प्रतिकार करुन न्याय कसा प्रस्थापित करावा याचा सम्यक् मार्ग गांधीजींनी जगासमोर प्रत्यक्ष प्रयोग करुन सादर केला. गांधींच्या पूर्वकाळात अन्यायाचा प्रतिकार करण्याचे मार्ग कोणते होते व्यक्तीच्या वा लोकसमूहाच्या मानसिक शक्तीवर फारसा कोणाचा विश्वास नसे. अन्याय झाला तर परमेश्वराची इच्छा, पूर्वजन्मीच्या कर्माचे फळ म्हणून अन्याय सहन करावयाचा अशीच सर्वसाधारण शिकवण होती आणि लोक ती मानीत.

दुसरा मार्ग होता अन्यायाचा बदला घेण्याचा. आपल्यावर झालेल्या अन्यायाचा बदला व्यक्ती अन्याय करणाराचा, सूड घेऊन प्रसंगी खून करुन घेत असे प्रस्थापित कायद्यानुसार अशी व्यक्ती गुन्हेगार ठरत असे आणि पोलिसांच्या तावडीत सापडली तर तिला शिक्षा ही होत असे.

काही वेळा अशा व्यक्ती समाजातून पळून जाऊन टोळयाही स्थापत करीत. व्यक्तीगत अन्याय झालेले अनेक लोक सूडाच्या भावनेने पेटून उठून अशा टोळयांमध्ये सामील होत. या टोळयांचा भर शस्त्रास्त्रांच्या वापरावर असे. काहीं प्रमाणात अन्यायी लोकांवर दहशत वसविण्याचे कार्य या टोळयांनी केले. पण त्यांच्यामुळे समाजपरिवर्तन होवू शकले नाही. समाजातील शोषण पद्धती जशीच्या तशी राहिली. उलट कायदा हातात घेतला म्हणून संपूर्ण राजव्यवस्थाच त्यांच्या विरोधी गेली. कायदेच बदलले पाहिजेत असा विचार लक्षात आला नाही.

लोकसमूहावर अन्याय झाले त्यावेळीही एकतर लोकांनी अन्याय सहन केले किंवा सशस्त्र उठाव करण्याचे प्रयत्न केलें. बहुतेकवेळी लोकसमूहाचे उठाव अयशस्वी ठरले कारण राज्यसंस्थेची ताकद निर्विवादपणे अधिक असते. लोकसमूह सशस्त्र संघर्षाला तयार होतो त्यावेळी अधिक हिंसा करुन त्यांना चिरडून टाकण्यास

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

राज्य संस्थेला आयते निमित्त प्राप्त होते.

ज्या ठिकाणी लोकसमूहांच्या उठावाला परदेशांकडून भरीव अर्थ साहच, शस्त्राशस्त्रे, प्रशिक्षण मिळाले तेथे लोकसमूहांचे सशस्त्र उठाव यशस्वी झाल्याचे दिसतात. पण त्यातून नवीन समस्या निर्माण झाल्याचेही लक्षात येते. अन्याय करणारे बदलतात अन्याय तसाच राहतो.

अन्यायाच्या प्रतिकारार्थ शस्त्र हाती घेणे सर्वसामान्य व्यक्तींना शक्य नसते. शिवाय जे शस्त्राने दुसऱ्यांचा संहार करतात त्यांचाही नाश शस्त्रानेच होतो. शस्त्रास्त्रांच्या वापरामध्ये जो अन्याय करतो त्यांच्याजवळ अधिक प्रभावी शस्त्रास्त्रे असतील तर त्याचाच विजय होतो. म्हणजे न्याय अन्यायाच्या लढाईत न्यायाचाच विजय होईल अशी खात्री नसते तर ज्या बाजूकडे अधिक संहारक शस्त्रास्त्रे असतील त्याचा विजय होतो.

अन्यायाचा प्रतिकार करणारांसाठी गांधींनी जो मार्ग सांगितला तो भारतीय जनतेने स्वातंत्र्य लढचात तर उपयोगात आणलाच पण गांधींच्या मार्गाचा अवलंब जगात अनेक देशातील जनतेने केला. मार्टिन ल्यूथर किंग (ज्यु.) नेल्सन मँडेला ही दक्षिण आफ्रिकेतील वंशभेदाच्या अन्यायाविरुद्ध शांततापूर्ण संघर्षाची ठळक उदाहरणे. फिलिपाइन्समध्ये मार्कोसच्या हुकूमशाही विरुद्ध अॅक्विनोला याच मार्गाने यश मिळाले. बांगला देशात अवामी लीग गांधीच्याच सविनय कायदेभंगाचा सत्याग्रहाचा मार्ग अवलंबत आहे. पश्चिम युरोपात अनेक पर्यावरणवादी गट आणि पक्ष (ग्रीन पार्टीज) गांधीच्या मार्गावर निष्ठा ठेवून अन्यायाविरुद्ध संघर्ष करीत आहेत. म्यानमार (ब्रम्हदेश) मधे आँग सॅन सू की चे उदाहरण असेच आहे. तिचाही लष्करी हुकूमशहांविरुद्धचा लोकशाही प्रस्थापनेचा संघर्ष गांधी मार्गानेच चालला आहे.

गांधींनी सांगितले की, अन्यायाचा प्रतिकार करा पण अन्याय करणाऱ्या व्यक्तीचा द्वेष करु नका. कारण अन्यायी व्यवस्थेचा अन्याय करणारी व्यक्ती ही एक घटक मात्र असते. व्यवस्था परिवर्तन महत्वाचे. व्यवस्था परिवर्तन करावयाचे तर समाजातील बहुसंख्य व्यक्तींचा त्या कामात सहभाग पाहिजे. महिलांचा सहभाग तर गांधीजींनी अपरिहार्य मानला होता. त्यामुळे गांधीजींच्या चळवळीत जितक्या स्त्रियां सहभागी झाल्या तितक्या अन्य चळवळीत सामील झालेल्या दिसत नाहीत.

अन्याय करणाराचे हृदयपरिवर्तन करण्यासाठी आत्मक्लेषाचा गांधींचा मार्ग लोकांना ओळखीचा आणि सोपा वाटला. मुलाने काही चूक केली तर आई नाही का उपोषण करीत. पतीची वर्तणूक चुकीची असेल तर पत्नी मौनव्रत धारण करते. त्या मौनाचा परिणाम प्रत्यक्ष वादावादीपेक्षा अधिक होतो.

घरात अन्न उपलब्ध असताना आत्मशुद्धीसाठी उपवास करणे हे भारतीयांना

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

नवीन नव्हते. उपवासाचा अर्थ परमेश्वराच्या जवळ निवास असा होतो. उपोषणामुळे इतरावर दडपण येता कामा नये आपली मात्र चित्तशुद्धी झाली पाहिजे.

अन्याय झालेली व्यक्ती जेव्हा प्रतिकार न करता स्वत:ला आत्मक्लेष करुन घेते त्यावेळी अन्याय करणाराच्या मनातील परमेश्श्वर जागा होत असतो. त्याची सद्सद्विवेकबुद्धी जागृत होण्यास प्रारंभ होतो.आपण अन्याय करतो हे बरोबर नाही हे त्याचे त्यालाच टोचू लागते. कायद्याने वा शस्त्राच्या धाकाने जे होऊ शकत नाही ते गांधींच्या मार्गाने होते. या मार्गाचे सामर्थ्य म्हणजे पुरुषांप्रमाणे स्त्रिया व मुले, सुशिक्षितांप्रमाणे ग्रामीण कोणीही या मार्गांचा अवलंब करुन आपल्या अन्यायाविरुद्ध समाजासमोर दाद मागू शकतो. सर्वंशक्तीमान शासन संस्थेलाही दखल घ्यावी लागते.

गांधींच्या पश्चात् उपोषणाच्या मार्गाचे फार अवमूल्यन झाले आहे हे कबूल करावे लागेल. सरकार तर परक्या ब्रिटिश सरकारपेक्षा बधिर बनले आहे. उपोषणही आता कोणीही कशासाठीही करतो. सहा तासाचे, चक्री असे उपोषणाचे केवळ प्रसिद्धी मिळविण्यासाठीचे मार्ग लोकांनी शोधले आहेत. गांधींचा मूळ विचार लक्षात घेऊन केलेले उपोषण वाया जात नाही हे मेधा पाटकर, सुंदरलाल बहुगुणा या सारख्या तत्त्वनिष्ठांनी सिद्ध केले आहे.

अन्यायाच्या प्रतिकारासाठी व्यक्तीने आत्मनियंत्रण केले पाहिजे असा गांधींचा आग्रह होता. यासाठी गरजा कमीतकमी ठेवणे, अतिशय साधे राहणे यावर यांनी भर दिला. सुखवस्तू चैनी जीवनाची सवय लागलेली, किंवा त्याची गुलाम बनलेली व्यक्ती वा लोकसमूह अन्याय सहन करत राहतो कारण प्रतिकार केल्यावर होणारा त्रास आपल्याला झेपणार नाही असा त्याचा विश्वास असतो. सुखी चैनी जीवनासाठी व्यक्ती वाटेल ती तडजोड करते. मुकाटयाने अन्याय सोसते. ज्याच्या गरजा अगदी किमान आहेत त्याला खडतर आयुष्याची फिकीर वाटत नाही वा तुरुंगवासाचे भय राहत नाही.

आज आपल्या देशासमोर इतकी संकटे उभी असताना मध्यममवर्गातील मंडळी अन्यायाच्या प्रतिकारार्थ उभी राहिली आहेत असे दिसत नाही. कारण गेल्या दहापंधरा वर्षात हा मध्यमवर्ग कमालीचा सुखलोलुप बनला आहे. चैनीच्या अधिकाअधिक वस्तू खरेदी करण्याची त्याला चटक लागलेली आहे. या न संपणाऱ्या धडपडीमुळे तो कमालीचा आत्मकेंद्रित बनला आहे. तो अन्याय सहन करत राहतो कारण उच्च-उच्चत्तम जीवनमान हे त्याचे अग्रक्रमाचे मूल्य बनले आहे.

त्या मानाने जे गरीब आहेत साधे जीवन जगतात असे आदिवासी, अल्पसंख्य, दलित असे लोकसमूह अन्यायाविरुद्ध संघर्षासाठी सिद्ध झालेले असतात. संघटित कामगारही आता व्यापक संघर्ष करीत नाहीत कारण तेही प्रस्थापित

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

उपभोगवादी, चंगळवादी व्यवस्थेचे घटक बनू पाहतात. असंघटित कष्टकरी संघर्षाला तयार होतात. महिला, विद्यार्थी व युवक संघर्षाला तयार असतात कारण अद्याप ते भोगवादी संस्कृतीपासून दूर असतात.

परदेशी कंपन्याना आपला विरोध आहे ना ? गांधींनी साधा मार्ग सांगितला की त्यांचा माल वापरु नका. स्वदेशी वस्तूच वापरीन असा आग्रह धरा.

आता सध्या जे स्वदेशीचे आंदोलन चालू आहे त्यात सरकारने अमुक करावे, तमुक करु नये असे सांगितले जाते. मी काय करणार, आपण काय करावे यासंबंधी काहीच आग्रह धरला जात नाही. उलट स्वदेशीचा प्रचार करणारा वक्ताच परदेशी कपडे, बूट, घड्याळ, पेन, चष्मा, वापरीत असतो. त्यामुळे त्यांच्या सांगण्याचा प्रभाव लोकांवर तर दूरच पण प्रभावर लोकांवर तर दूरच पण त्यांच्या घरातील मंडळींवरही पडत नाही.

गांधींचा साधेपणाबरोबर काटकसरीवर विशेष आग्रह होता. समाजाचे जीवन साधे आणि काटकसरीचे असेल तर समाजाला समतेकडे जाणे सोपे पडते. ज्या समाजातील मान्यवर मंडळी ऐषारामात राहतात त्या समाजाला समतेच्या दिशेने नेणे अवघड बनते आणि सामान्य लोक मान्यवरांचे अनुकरण करीत असतात.

साधे, काटकसरीचे जीवन व्यक्तीने स्वीकारले तर तिला दुसऱ्या व्यक्तीचे शोषण करण्याची गरजच पडणार नाही. अन्याय कमी होण्यास मदत होईल. चंगळवादी जीवन म्हणजे निसर्गाचे शोषण, उपभोगवादी जीवनामुळे जमीन, जंगल, पाणी, नैसर्गिक साधनसामुग्री याचे कमालीचे शोषण होते. पर्यावरणाचे, प्रदुषणाचे, विस्थापितांचे प्रश्न निर्माण होतात.

गांधी म्हणायचे की, साबणाचा वापर न करता, अर्धीच बादली थंड पाण्याचे, अंग चांगले चोळून स्नान होऊ शकतें. आता मोठ शहरातील लोकांना दिवसातून तीनदा साबन शांपू वापरुन स्नान करावे असे वाटते. ग्रामीण भागातील लोकांना पिण्यासाठीही पाणी मिळत नाही याची त्यांना पर्वा नसते. शहराच्या तथाकथित विकासाला पाणी कमी पडले की, ग्रामीण आदिवासी क्षेत्रात धरणे बांधायची लाखो लोकांना विस्थापित करावयाचे अशी आधुनिक प्रगतीची नीती आहे. यातून किती अन्याय आपण निसर्गावर, माणसावर करतो. सर्वांनी साधे काटकसरीने जगावयाचे ठरविले तर सर्वांना सुखी समाधानी जीवन जगता येईल असा गाधींचा मार्ग होता.

सरकार अन्याय करते त्यावेळी लोकांनी काय करावे ? आपल्यापुरते त्सरकार अस्तित्वातच नाही असे समजावे. कायदेभंग सविनय पध्दतीने करावा, यासाठी मिळणारी शिक्षा आनंदाने भोगावी असे गांधींचे मत होते.

गांधींनी स्वातंत्र्यलढ्यात सविनय कायदेभंगाचे हत्यार उपसली त्यावेळी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्यांना सर्वसामान्य जनतेकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. सरकारने लादलेला अन्याय्य कायदा शांततापूर्ण मार्गाने मोडायचा, त्यासाठी लोकांनी सत्याग्रह करावयाचा, रस्त्यावर यावयाचे, पोलिसांचा लाठीमार गोळीबार सहन करावयाचा, दीर्घ तुरुंगवास भोगावयाचा असे गांधींनी शिकविले.

नेमस्त पुढाऱ्यांचा आणि सरकार धार्जिण्या मंडळींचा गांधींच्या या शिकवणीला विरोध होता. त्यांचे म्हणणे असे होते की लोकांना एकदा कायदे मोडायची सवय लागली तर उद्या स्वराज्यात लोकशाही राज्यव्यवस्था स्थापन झाल्यावरही लोक कायदे मोडतील.

या वादविवादातून एक प्रश्न लोकांसमोर प्रकर्षाने चर्चेला आला आणि तो म्हणजे लोकशाहीमध्ये सत्याग्रहाला स्थान राहील की नाही ?

गांधींनी या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर दिले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही राजवट स्थापन झाल्यावरही सरकार अन्याय करणार नाही अशी खात्री नसल्याने लोकशाहीतही अन्याय कायद्याच्या विरुद्ध शांततापूर्ण मार्गाने संघर्ष करण्याच्या लोकांना हक्क आहे. गांधींना लोकशाहींतही सत्याग्रह, सविनय कायदेभंग मान्य होता मात्र त्यांची अट होती की सत्याग्रह संपूर्णपणें अहिंसक असला पाहिजे लोकशाहीतील पाच वर्षांच्या मुदतीसाठी निवडून आलेले सरकार बहुमताच्या जोरावर काहीही अन्याय करु लागले तर आता पुढच्या निवडणूकीपर्यंन्त थांबा असे त्यांना सांगता येणार नाही. बहुमताने ठरलेले निर्णय शंभर टक्के सत्य आणि न्याय्य असतीलच असे नाही. शिवाय लोकशाहीत सरकार विशिष्ट राजकीय पक्षाचे असणार. पक्षीय सरकार न्याय अन्यायाचा, सत्य असत्याचा विचार करेलच अशी खात्री नाही. निवडणुकीच्यावेळी दिलेली अभिवचने सत्ताधारी पक्ष नंतर मोडू लागला तर मतदारांना सत्याग्रह करुन त्यांना जाब विचारण्याचा अधिकार असला पाहिजे

आपला तर अनुभव असा आहे की सरकारी यंत्रणा, सरकारने केलेल्या कायद्याप्रमाणे वागत नाही. त्यामुळें कित्येकदा तुम्हास केलेल्या कायद्याची अंमलबजावणी करा या मागणीसाठी सुद्धा लोकांना आंदोलन करावे लागते. सरकार अशी आंदोलने सुद्धा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न जभ्या करुन दडपून टाकण्याचा प्रयत्न करते. विशेषत: आदिवासी, महिला, अल्पसंख्यांक, समाजातील दुर्बल घटक यांना. हा अनुभव नेहमी येतो. संविधान सर्वश्रेष्ठ असे सांगणारे सरकार कित्येकदा संविधानातील तत्त्वांची बूज राखत नाही. न्यायालयांनी दिलेल्या निर्णयांचीही अंमलबजावणी होत नाही. व्यक्ती स्वातंत्र्यानंवर घाला येतो, अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेतले जाते.

अशावेळी लोकांना संविधानाचे श्रेष्ठत्व अबाधित राखण्यासाठी, कायद्याप्रमाणे कारभार करा हे सांगण्यासाठी, न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अम्मल-

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

बजावणी करा असा आग्रह धरण्यासाठी, व्यक्तिस्वातंत्र्य जपण्यासाठी सत्याग्रह करावा लागतो. अशी मागणी करणाऱ्या आंदोलकांवरही सरकारने पोलिस लाठीमार करतात, तुरुंगात पाठवितात.

अन्याय झाला तर कोर्टात दाद मागावी असा उपाय काही लोक सुचवतील. गरीब माणसांना कोर्टाचा मार्ग काळकाढूपणाचा आणि खर्चाचा वाटतो. शिवाय कोर्टाने निर्णय दिला तरी कित्येकदा सरकार काही हालचाल करीत नाही.

अशा परिस्थितीत अन्यायाच्या परिमार्जनासाठी शांततापूर्ण सत्याग्रह या गांधींच्या मार्गाशिवाय लोकांना पर्याय नाही.

काही वेळा मला वाटते की, काश्मिरच्या जनतेने स्वयंनिर्णयाच्या हक्कासाठी गांधींचा मार्ग स्वीकारला असता तर त्यांना कधीच यश मिळाले असते. त्यांनी बंदुकीचा मार्ग स्वीकारला त्यामुळे सरकारला तेथे निमलष्करी, लष्करी दले ठेवून त्यांचे आंदोलन चिरडण्यासाठी समर्थन प्राप्त झाले. आता हा प्रश्न इतका जटिल झाला आहे की तो सुटणेच अशक्य आहे असे वाटते.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

४

# म. गांधीजींची ग्राम–स्वराज्य संकल्पना

## प्रा. ज. रा. दाभोळे

विसावे शतक हे आपल्या देशाच्या राजकीय आर्थिक व सामाजिक विचा–रांच्या जडण–घडणीचे शतक म्हणून मान्य करण्यास कोणीही फारशी खळ–खळ करणार नाही. त्यामध्ये अनेकांचे योगदान लाभल्याचे दिसून येते. दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, ना. गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा गांधी, डॉ, बाबासाहेब आंबेडकर, आचार्य विनोबा भावे इ. विचारवंतानी या संदर्भात सक्रीय वाटा उचलण्याचे दिसून येते. न्यायमूर्ती रानडे दादाभाई नौरोजी कडून गोपाळ कृष्ण गोखले यांनी राजकारणाचे धडे घेतले. गोखले न्यायमूर्ती रानड्यांना गुरुस्थानी मानत; तर म. गांधी हे गोखल्याना गुरु मानत. गांधींच्या नंतर त्यांच्या विचारांचा वारसा आचार्य विनोबांनी पुढे चालविला. असे असले तरीही वरील सर्व व्यक्तिचे आर्थिक व राजकीय विचार एकाच पठडीतले होते असे म्हणता येणार नाही. तत्त–कालीन परिस्थितीला व प्रश्नांना अनुसरुन ही मंडळी आप–आपल्या परीने निश्चत असा विचारपूर्वक प्रतिसाद देत होती. या सर्व विचारवंतांमध्ये काही समान सूत्रे जशी सांगता येतील तशीच तत्कालिन परिस्थितीनुसार त्यांच्यातील भिन्नता व त्यांच्या–त्यांच्या मर्यादाही दाखवून देता येतील.

दादाभाई नौरोजी व गोपाकृष्ण गोखले ह्यांच्या विचारांचा रोख तत्का–लीन ब्रिटीश राजवटीने हिंदुस्थानी जनतेसाठी काही तरी करावे, हा होता. कृतीचा आराखडा मात्र त्यांच्या पुढे नव्हता. म. गांधींनी मात्र ह्या देशाची स्थिती सुधा–रण्यासाठी विविध उपाय आणि योजना अंमलात आणण्यासाठी आयुष्यभर कृती–शीलतेवर भर दिल्याचे दिसून येते.

गांधीजींनी भारतात जे प्रयोग आणि उपक्रम १९२० नंतर राबविले त्या सर्वांचा प्रारंभ दक्षिण आफ्रिकेत त्यांनी जो लढा उभा केला त्यामध्ये दिसून येतो. त्या लढ्याला भारतीय जनतेचा मनोमन पाठिंबा होता. येथील राजकीय व सामा–जिक घटनांना त्यामुळे काही एक आकार प्राप्त होत होता. भारतात चालू असलेल्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

राजकीय व आर्थिक घडामोडींना ही त्यामुळे एक नवा आशय प्राप्त होत होता. गांधींजींची एक प्रतिमा आपल्या देशातील समाज जीवनावर उमटत होती. १९०९ च्या कॉंग्रेस अधिवेशनात गोपाल कृष्ण गोखले यांनी म. गांधींचे जे वर्णन केले आहे त्यावरुन ही प्रतिमा कशी तयार झाली होती याची कल्पना येऊ शकते. गोपाळ कृष्ण गोखले म्हणतात, " .....He is a man, who may well be discribed as a man among men, a hero among heros, patriot among patriots and we may will say that in him Indian humnity has realy reached its high watermark" ( speeches and writings of Gopal Krishna Gokhule Vol-1 ( 1966 Page 194]

लोकमान्य टिळकांच्या निधना नंतर भारतात 'गांधीयुग' अवतरलें असे म्हणता येईल. १९२० पर्यन्त येथील जहाल नेत्यांनी अवलंबिलेल्या सशस्त्र व क्रांतिकारक उठावांना तत्कालीन राजकीय नेतृत्वाने सर्वं साधारण मान्यता दिल्याचे दिसून येते. परंतु १९२० नंतरच्या कालखंडात ब्रिटीश राजवटीला सशस्त्र विरोध करणाऱ्या व्यक्ती व गटांना फारशी मान्यता मिळू शकली नाही. ह्याचे कारण म. गांधींनी ब्रिटीश राज्यसत्तेविरुद्ध सत्याग्रह आणि सविनय कायदेभंगासारखे निःशस्त्र तंत्र उपसले. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला आर्थिक स्वालंबन, ग्रामीण व कुटीरोद्योग, स्वदेशी वस्तूंचा वापर इ. विधायक उपक्रमांवर भर दिला. गांधींनी हे जे विविध उपक्रम आखले त्या सर्वांना मिळून 'गांधीवादी अर्थशास्त्र' गांधींचे नियोजन' इ. संज्ञा वापरल्या जातात.

म. गांधींचे संपूर्ण अर्थशास्त्र मांडणे त्यातील सर्व तपशील मांडावा असा हेतू लेख लिहण्यामागे नाही. काही ठळक संकल्पनांना स्पर्श करावा एवढा मर्यादित हेतू या लेखनामागे आहे. आर्थिक दृष्टया आपला देश स्वावलंबी व्हावा हा हेतू समोर ठेऊन विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात अनेक राजकीय नेत्यांनी व समाज– सुधारकांनी सखोल असे चिंतन केल्याचे दिसून येते. परकिय राजवटीकडून होणारे आर्थिक शोषण थांबावे, गरिब श्रीमंतामधील दरी कमी व्हावी, या देशातील उत्पा– दनाला वेग यावा इ. गोष्टींना प्राधान्य देऊन आपल्या देशाच्या अर्थकारणाविषयीचे चिंतन झाल्याचे दिसून येते.

म. गांधींना रुढ अर्थाने 'अर्थशास्त्रज्ञ' म्हणता येणार नाही. ते ही स्वतःचे वेगळे असे अर्थशास्त्र आपण मांडले आहे असा दावा ही त्यांनीं कधीं केलेला नाहीं त्यांच्या आर्थिक विचारांवर लियो टॉलस्टॉय, थोरो, रस्किन इ. विचारवंतांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. सर्वं विचारवंत एकतर तत्त्वज्ञ अथवा साहित्यिक म्हणून ओळखले जातात.त्यांनाही अर्थशास्त्रज्ञ म्हणता येणार ना सर्वंही पाश्चात्य मंडळीं थोर 'मानवतावादी' होती हे गांधींजींनीच नमुद करुन ठेवले आहे.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

या देशातील दारिद्रय आणि बेकारी हे दोन मुख्य प्रश्न त्यांना भेडसावीत होते. आंतरराष्ट्रीय क्षेत्राचा त्यांनी केलेला अभ्यास स्वत:ची राजकीय मते, आपल्या देशातील धार्मिक व सामाजिक आचार–विचार इत्यादी गोष्टींचा विचार करुन दारिद्रय बेकारीचे समूळ उच्चाटन करण्याच्या हेतूने त्यांनी कितीतरी कृतीशील उपक्रम हाती घेतले. आपल्या समोर ठेवलेलें आदर्श व ते आदर्श प्रत्यक्षात उतर–विण्यासाठी केलेली कृती असा एक अभूतपूर्व संयोग म. गांधींच्या व्यक्तिमत्वात दिसून येतो. उदा. विदेशी कापडावर बहिष्कार घालण्याचे त्यांनी जाहिर केले. एका बाजूला परदेशी वस्तूंची होळी करण्यात आले; तर दुसऱ्या बाजूला स्वदेशीचा पुरस्कार करुन चरख्यावर सूत कातून विणलेंल्या खादीच्या कापडाला त्यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. काळ खूपच बदलला आहे, नवे संदर्भ, नवे धोरण आणि जागतिक पातळीवरील नवीन पाऊले आज आपण उचलित असलो तरी गांधीजींच्या या प्रयोगाचा ठसा काही प्रमाणात आजही कायम असल्याचे दिसून येते. खादी ग्रामो–द्योग मंडळे देशभर चालविली जात आहेत. ग्रामीण कारागीरांना प्रोत्साहन देण्याच्या योजना ही राबविल्या जात आहेत. मात्र हे करीत असताना गांधीजींचा स्वदे–शीचा विचार आपण खरोखर समजून घेतला आहे काय ? असा प्रश्न निर्माण होतो.

आपला देश हा कृषीप्रधान असून तो अनेक खेड्या–पाड्यांनी बनलेला आहे, हे वास्तव गांधीजींच्या आर्थिक विचाराचे मुख्य सूत्र होय. आपल्या देशाला आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनवायचे असेल तर 'खेडे' हा घटक केंद्रबिंदु मानला पाहिजे. ती स्वावलंबी व स्वयंपूर्ण कशी होतील ह्या दिशेने त्यांनी पाऊले उच–लली. 'ग्रामस्वराज्य' ग्रामीण अर्थशास्त्र' 'गांधीवादी नियोजन' इ. संज्ञा त्यामुळे किती अर्थवाहक आहेत ह्याचा प्रत्यय आपणांस येऊ शकेल. उदा. यांत्रिकीकरण, उदयोगधंदयातून मिळविणारे प्रचंड उत्पादन आदी गोष्टींना त्याचा विरोध होता. ते स्वत: इंग्लंडमध्ये काही वर्षे राहिले होते. वाढत्या औद्योगिकरणाचे मानवी जीव–नावर होणारे दुष्परिणाम त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते. मुख्यदुष्परिणाम म्हणजे उत्पादनाच्या साधनांचे वाढते केंद्रिकरण हा होय. म्हणूनच गांधींनी विकेंद्रिकरण अर्थव्यवस्थेवर आपले लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येते.

ब्रिटिशांनी या देशाचे आर्थिक शोषण केले. कारण तो एक आर्थिक वसा–हतवादच होता. एक देश आपल्या वसाहतीचे शोषण करतो ही गोष्ट दादाभाई नौरोजींनाही पटली होती. तत्कालीन व तद्नंतरच्या अनेक अर्थशास्त्रज्ञांनी ही गोष्ट निर्दशनास आणून दिली. आहे. गांधीजींनी या ही पुढे जाऊन असे दाखवून दिले की, शहरे देखील खेड्यांचे शोषण करीत असतात. सुप्रसिद्ध दिवंगत अर्थशास्त्रज्ञ डॉ. वि. म. खांडेकरांनी ह्यासच 'अंतर्गत वसाहतवाद' असे म्हटले आहे. खरा भारत

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

खेड्यात आहे. म्हणून खेड्यातील लोकांना रोजगार मिळावा, त्यांच्यात आत्म-विश्वास निर्माण व्हावा ह्यासाठी गांधीजींनी अनेक उपाय योजना सुचविल्या.

खादी व कुटिरोद्योगांना प्रोत्साहन देणे, शेतीमध्ये सुधारणा करणे, ग्रामीण समाजास स्वावलंबी बनविणे, अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण, गरिब आणि श्रीमंताच्या उत्पन्नातील विषमता कमी करणे, भांडवलदार आणि व्यापारी वर्गाने समाजाचे विश्वस्त या नात्याने स्वत:कडील संपत्ती समाजहितैषी बुद्धीने वापरावी इ. तत्त्वे म. गांधींच्या ग्रामीण अर्थनियोजनाची ठळक वैशिष्ठे म्हणून सांगता येतील. या सर्व आर्थिक चिंतनामागे म. गांधींचे जीवन विषयक तत्त्वज्ञान उभे होते. हे ह्या संदर्भात ध्यानात घेणे जरुरीचे आहे.

व्यक्तिचे ( आणि समाजाचेही) खरे सुख भौतिक गरजा वाढविण्यात नसून त्यांना लगाम घालण्यात आहे. साधी राहणी आणि मूल्याधिष्ठित विचार-सरणी हे म. गांधींच्या जीवन विषयक नीतीचे अधिष्ठान होते. “अधिकाअधिक माणसांचे अधिकाधिक सुख” व त्या सुखाचा सतत पाठ पुरावा करणाऱ्या पाश्चात्य देशामध्ये आज समृद्धी असूनही अनेक व्यक्तिगत व सामाजिक समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते. ह्याची कारणे त्यांनी स्विकारलेल्या ‘सुखवादी’ अथवा ‘चंगळवादी’ तत्त्वज्ञानात शोधावी लागतात.

म. गांधींनी हे वेळीच ओळखले होते. खेड्यात राहणाऱ्यांना उपजीविकेचे साधन खेड्यात उपलब्ध करुन दिल्यास खेड्यातील माणसांचे लोंढे उपजीविकेसाठी व रोजगारासाठी शहराकडे धाव घेणार नाहीत. दुसरे असे की, खेड्यातील माणसे शहरांमध्ये रोजगारासाठी व पोटापाण्यासाठी येत राहतील तर शहरांचे प्रश्नही बिकट बनतात. ही गोष्ट आम्हा सर्वांना गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षात प्रत्य-यास आली आहे. वाढते औद्योगिकरण झाल्याने ‘महानगरे’ अस्तित्वात आली. तेथील पर्यावरण, आरोग्य इ. जीवनावश्यक गोष्टी लोप पावल्या आणि अशी अनि-योजित वाढ झाल्याने व रोजगाराच्या संधी त्या प्रमाणात कमी होत गेल्याने आमच्या देशातील मोठी शहरे गुन्हेगारीस आवर घालण्यात अयशस्वी ठरत अस-ल्याचे आपण पाहात आहोतच. अजूनही वेळ गेलेली नाही. महाकाय शहरांची अति-योजितवाढ रोखली गेली पाहिजे. त्यासाठी आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेकडे स्वावलंबनाच्या दृष्टीकोणातून पाहण्याची आवश्यकता आहे. पुढारलेल्या ‘भांडवल-वादी’ देशांनी स्वीकारलेले सिद्धात ‘अविकसीत’ देशांना जसेच्या तसे लागू पडत नाहीत ही गोष्ट न्यायमूर्ती म. गो रानडे यांनी देखील ओळखली होती. भारताच्या आर्थिक विकासाच्या प्रश्नाला ब्रिटीशांनी अग्रक्रम दिला पाहिजे, अशी त्यांची मागणी होती.

म. गांधींनी या देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणन जोरदार लढा उभा केला.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्यावेळी हे स्वातंत्र्य कोणासही असावे, हे देखील मनोमन ठरवून होते. साम्राज्य-वादी विचाराचे वैशिष्ठय हे की, एका देशाच्या विकासासाठी दुसऱ्या देशाला वेठीस धरले जाते व त्याचे शोषण केले जाते. येथून कच्चा माल इंग्लंडला पाठवायचा आणि तेथून पक्का माल आयात करावयाचा हे ब्रिटिशांचे धोरण होते. या धोरणामुळे इंग्लंडातील उद्योगधंद्यांना प्रोत्साहन मिळत राहिले.

भारतीय उद्योग-धंदे बेबंद सत्तेला लगाम घालायचा असेल तर परदेशी 'खेडे' हा घटक केन्द्रस्थानी मानून आत्मनिर्भर अशी अर्थव्यवस्था निर्माण करुन आपल्या देशातील सर्वसामान्य माणसाला, श्रमिकाला निदान सामान्य प्रतीचे जीवन जगणे शक्य व्हावे असा विचारही गांधींच्या 'ग्राम स्वराज्य' संकल्पनेमागे निश्चित-पणे होता. या संदर्भात 'Unto This Last' या रस्किनच्या ग्रंथातील विचारांचा त्यांच्यावर खूपच प्रभाव पडल्याचे दिसून येते. वकील आणि न्हावी यांच्या श्रमाचे मूल्य समान असले पाहिजे. कारण दोघेही एकाच समाजाचे घटक होत. दुसरे असे की वकीलांचे काम व न्हाव्याचे काम या दोन्ही कामाची श्रमप्रतिष्ठा समान लेखली पाहिजे. ह्याचे महत्वाचे कारण असे की दोघांचे काम समाजास तितकेच उपयुक्त ठरणारे आहे असा एक मूलत: नवीन दृष्टीकोण स्वीकारुन आर्थिक पुनर्रचनेचा मुल-मंत्र म. गांधींनी आपल्या देशाला दिला.

'स्वदेशी म्हणजे आपल्यातील ती भावना, की जी दुसऱ्यांना वगळून आपल्या भोवतालच्या गोष्टींचा उपयोग व सेवा या पूरते आपल्याला मर्यादित ठेवते ? अशी स्वदेशीची व्याख्या गांधींनी केली आहे. व्यापक अर्थाने विचार केल्यास ही व्याख्या जीवनाच्या सर्व अंगाना लागू पडणारी आहे, हे दिसून येते. आपण आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रात स्वदेशीच्या मंत्रापासून दूर गेल्यानेंच या देशात दारिद्रय आणि गरीबी निर्माण झाली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात सरकारने ढवळा-ढवळ केलेली त्यांना मान्य नव्हते. तरीही सर-कारने विदेश वस्तुंवर जबर कर बसविला पाहिजे ही गोष्ट त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केली होते. अर्थात संपूर्ण स्वदेशी धोरण काही प्रमाणात अशक्य आहे. ही गोष्ट त्यांना पटली होती. तथापी त्या आदर्श समाजव्यवस्थेपर्यन्त पोहोचण्याठी सतत प्रयत्नांची नितांत आवश्यकता आहे, हे ही आग्रहाने नमूद करुन ठेवले आहे. थोड-क्यात स्वदेशीची संकल्पना ही ग्राम स्वराज्याशी सुसंगत ठरणारी आहेच त्याचप्रमाणे सत्य, अहिंसा इ. तत्त्वांशीही ती संकल्पना तितकीच सुसंगत ठरणारो आहे. स्वदेशी म्हणजे संपत्तीचे समान वाटप होय. तसेच स्वदेशीमुळे शेतीला पूरक धंदा मिळतो. आणि गरीबीचा प्रश्न सोडवायला मदत होते. स्वदेशी म्हणजे सर्व गरजा पूर्ण कर-णारी व अनेक कठीण प्रश्न सोडविणारी एक कामधेनुच आहे. ▣▣▣

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# ५

# महात्मा गांधीजींचे अर्थविज्ञान

## दादा धर्माधिकारी

गांधीजींचे स्वत:चे असे एक 'अर्थविज्ञान' होते. समाजाची अर्थरचना कशा प्रकारची असावी याविषयी गांधीजींची मते जीर्ण मतवादी प्रतिगामी स्वरुपाची आहेत असा आभास उत्पन्न करण्याचा पद्धतशीर प्रयत्न कित्येक क्रांतिवाद्यांनी आज अनेक वर्षे बुद्धया चालविलेला आहे. गांधींना वैभवाचे वावडे आहे. भौतिक-शास्त्रात झालेली प्रगति त्यांच्या पुराणप्रिय प्रकृतीला खपत नाही, त्यांना बैलगाड्याचे, गवता-मातीच्या खोपट्यांचे आणि पणत्यांच्या प्रकाशाचे अस्तगत होऊ घातलेले युगच हवे आहे, अशी हाकाटी करण्यात आलेली आहे. पण ही सारी टीका भ्रान्तिमूलक आहे. गांधी प्रगति-विरोधक होते की प्रगतिवादी होते, हे ठरविण्याकरिता आधी प्रगति कशात आहे याचा निर्णय झाला पाहिजे.

'लोहयुगात, प्रस्तरयुगाच्या, मानाने मानवाची प्रगतिच झालेली आहे याविषयी निश्चित होकारार्थी उत्तर देणे कठिण आहे' असे एक विधान गांधींनी केले आहे. या विधानाच्या आधारावर देखील मनात आणल्यास गांधींवर प्रतिगामी-त्वाचा आरोप करता येण्यासारखा आहे. पण प्रश्न आहे की, त्यात गांधींना म्हणावचे काय आहे ? प्रस्तरयुगात तीक्ष्ण धारेच्या पाषाणाने आपल्या बांधवांचा जीव घेणारा माणूस आज त्या कामी तीक्ष्ण तलवारीचा प्रयोग करीत असेल. यावरुन फार तर त्याच्या उपकरणात प्रगती झाली एवढेच म्हणता येईल. पण त्यांची हत्यावृत्ति म्हणजे हिंस्रपणा जर कमी झाला नसेल तर त्याची प्रगति झाली असे मात्र खात्रीने म्हणता येणार नाही. प्रगति कशात मानायची हा मूळ मुद्दा आहे. गांधींचे म्हणणे असे की, मानवजातीचे अंतिम साध्य सुनिश्चित आहे. त्या साध्याला उपकारक अशी साधने शोधणे व योजणे, अशी उपकरणे घडविणे व वापरणे ही भौतिक-शास्त्राची प्रगति आहे. साध्याच्या बाबतीत वादाला जागा नाही. अगदी कट्टा भौतिकवादीदेखील मानवी समाजातून विषमतेचा निरास झाला पाहिजे आणि तो होणार आहे, तशी प्रतिज्ञा करीतो. वाद कांय तो साधनांच्या स्वरुपाच्या व अनुरुपतेच्या बाबतीत असतो

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

साध्यानुरुप साधने व उपकरणे निर्माण करण्यात भौतिक-शास्त्राची प्रगति आहे असे गांधींचे म्हणणे. तेव्हा आर्थिक संयोजनाचे साध्य काय आहे हाच प्रश्न मुद्याचा आणि मूलभूत आहे.

या प्रश्नाचे उत्तर थोडक्यात असे–

(१)आर्थिक विषमता नाहीशी करणे म्हणजे मानवा–मानवातील संपन्न व विपन्न हा भेद नाहीसे करणे. (२)विषमतेचा निरास म्हणजे समान विपन्नता नव्हे. सगळ्यांचेच जीवन सारखें कष्टमय, दैन्यमय व दुःखमय झालें म्हणजे मानवी समतेचा आदर्श सिद्ध झाला असे नाही. म्हणून आर्थिक संयोजनाचा दुसरा उद्देश जीवनाची समृद्धि हा आहे. (३) पण जीवन समृद्ध झाले म्हणजे ते सुसंस्कृत होतेच असे नाही. सांस्कृतिक विकास फक्त संपन्नतेत नाही. तो जीवनाच्या व्यापकतेत आहे. म्हणून आर्थिक संयोजनाचा परिणाम जीवनाच्या कार्पण्यात न होता जीवनाच्या औदार्यात किंवा व्यापकतेत झाला पाहिजे हा तिसरा उद्देश.

या तिन्ही उद्देश्यांच्या पूर्ततेकरिता जी अर्थयोजना साधनभूत होईल तीच प्रगतिकारक किंवा क्रांतिकारक म्हणता येईल. उत्पादनाच्या साधनांवर व उपकरणावर उत्पादनाची पद्धती व उत्पादनाचे संबंध अवलंबून असतात आणि उत्पादनाच्या संबंधावर सामाजिक संबंध, म्हणजेच सांस्कृतिक विकास अवलंबून असतात. आणि असा आधुनिक भौतिकवाद्यांचा सिद्धान्त आहे. त्यात बराच तथ्यांश आहे. सांस्कृतिक विकास कशाला म्हणायचें, याचा अगोदर निर्णय करणें आवश्यक आहे. संस्कृती म्हणजे इतरांबरोबर राहण्याची कला ' इतर ' म्हणजे आपणाहून निराळे, स्वतःहून आणि स्वकीयाहून भिन्न जे परके असतील त्यांना स्वकीय बनविणे आणि जे लांबचे असतील त्यांना जवळ करणे हा जीवनाच्या व्यापकतेचा अभ्यास आहे. या अभ्यासाचा परिणाम म्हणून जीवनातील आपला परका हा भेदच निघाला म्हणजे संबंध 'वसुधा' हेच कुटुंब झालें. चारचौघात जगता येण्यालाच आपण 'सभ्यता' किंवा ' शील ' म्हणतो. या चारचौघांबरोबर जगता येणे हीच सभ्य जीवनाची कला म्हणता येईल. हिलाच संस्कृती म्हणतात. संस्कृती वागण्याची रीत. ज्यांची वागण्याची रीत चारचौघांबरोबर जगण्याला पोषक असेल त्यांची संस्कृती उन्नत, प्रगतीशील आणि मानवतेच्या विकासाला अनुकुल ज्याची वागण्याची रीत चारचौघांबरोबर वागण्याला बाधक, त्याची संस्कृती हीन, प्रतिगामी आणि मानवाच्या विकासाला प्रतिकूल. अर्थात व्यापक जीवनम्हणजेच सुसंस्कृत जीवन हा सिद्धांत निष्पन्न झाला. व्यापक जीवन म्हणजे स्वतःच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनाची कक्षा सारखी रुंद करीतजाण्याचा प्रामाणिक प्रयत्न. जीवनाची व्याप्ति वाढविण्याच्या दोन पायऱ्या आहेत. एक इतर माणसांना म्हणजे इतर धर्मातील, सांप्रदायातील, प्रांतातील व जातीतील व्यक्तींना आपल्या जीवनात दाखल करुन घेण्याचीं प्रक्रिया. आणि दुसरी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

म्हणजे मानवेतर जीवांना आपल्या संसारात सामील करुन घेण्याची प्रक्रिया इतर मानवाशी व मानवेतर जीवांशी संबंध जोडण्याच्या बाबतीत दोन प्रकारच्या प्रबल वृत्ती दिसून येतात. एक प्रभुत्व–वृत्ति आणि दुसरी मित्रत्व-वृत्ती. प्रभुत्वाकरिता किंवा मित्रत्वाकरिता इतरांशी नाते जोडण्याची आकांक्षा मानवमात्रात अत्यंत स्वाभाविक होऊन बसली आहे.इतरावर आपला अमल गाजविण्याची किंवा स्वतःच्या मर्जीप्रमाणे इतरांचा उपयोग करुन घेण्याची जी भावना, तिचे नांव प्रभुत्वभावना. एक व्यक्ती इतरांवर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करते. पण ज्यांच्यावर ती आपले वर्चस्व गाज-विते त्यांचाहि स्नेह आणि कृतज्ञताबुद्धि संपादन करता यावी अशी आकांक्षा तिला असतेच. मानवेतर प्राण्याच्या बाबतीतहि मानवांच्या ठिकाणी ही आकांक्षा अस–ल्याचे नित्य प्रत्ययाला येते. माणसे राघू पाळतात, कुत्रे पाळतात, हरिण पाळतात, फार काय कोंकरे खाणारे लोकदेखील एखादे आवडते कोकरु बाळगतात. माणसाच्या कुत्र्याच्या बाबतीतील सुहृद्भाव व सार्वभौम प्रसिद्धच आहे. माणूस ज्याला पोशीत नाही असा प्राणी नाही. सर्कशीत वाघ, सिंह, अस्वल, मुंगूस, माकड यासारख्या अनेक प्राण्यावर आपला अमल कसा चालतो हे दाखविण्यात माणसाला जसे भूषण वाटते. त्याचप्रमाणे जेव्हा ते प्राणी आपापल्या पद्धतीने त्याच्या विषयीचा आपला स्नेहभाव व्यक्त करु लागतात तेव्हा त्याला धन्यता वाटते. प्रभुत्व भावनेत माणसाला ' अहंतृप्ति ' लाभत असेल, पण मित्रलाभाने त्याच्या जीवनात प्रसाद निर्माण होतो-मनुष्येतर प्राण्यांना मानवी कुटुंबात अथवा समाज जीवनात बरोबरीच्या नात्याने दाखल करुन घेता येणार नाही हे उघडच आहे.पण कुटुंबाच्या किंवा समाजाच्या संसारात मान. वेतर प्राण्याची उपयुक्तता जितकी अधिक तितकेच त्यांचे स्थान अधिक महत्वाचे व अढळ राहील. अर्थात जीवनात व्यापकतेच्या दृष्टीने मानवाच्या सांस्कृ–तिक विकासात मानवेतर प्राण्यांचे स्थान अत्यंत महत्वाचे ठरते.सांस्कृतिक उन्नती आर्थिक व्यवस्थेवर अवलंबून आहे हा सिद्धांत आपण मान्य केलेलाच आहे. म्हणून आर्थिक संयोजनात मानवेतर प्राण्यांचे स्थान असले पाहिजे हे क्रमप्राप्त ठरते. एरवी मानवी जीवन यंत्रमय होईल आणि माणूसहि यंत्राकार बनेल. गाईगुरांत राहून राहून गोपालहि ' गोमय' होतो अशा अर्थाचे एक संस्कृत सुभाषित आहे-गवां संसर्गमात्रेण गोपो भवति बालिशः। त्याचप्रमाणे यंत्राच्या निर्जीव संसर्गाचा परिणाम यांत्रिक जीवनात होणे अशक्य नाही. शुल्क व जीवनविमुख धर्मशास्त्राने मानवाच्या जीवनात तांत्रिकता; आणली. भौतिकशास्त्रे ' यांत्रिकता ' आणतील. तंत्रवादाने माणू-सकीची गळचेपी केली. यंत्रवादहि तिचा कोंडमारा केल्यावाचून राहणार नाही म्हणून यंत्राचे वावडे नाही. विज्ञानाचे तर नाहीच नाही.विज्ञानाच्या प्रगतीची मर्यादाहि बाधा-यची नाही. विज्ञानाची अखंड व अबाधित प्रगती हवी आणि यंत्रशक्तीचाहि अबाधित उपयोग बिनदिक्कत करावा.पण जीवनाच्या संपन्नतेच्या वादात जीवनाच्या व्यापकतेचा

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पडू नये एवढीच गांधीजींची नम्र मागणी आहे. जीवनाच्या व्यापकतेत आर्यता आहे, सभ्यता आहे; जीवनाच्या संकोचात अनार्यता आहे, माणुसकीचा ऱ्हास आहे.

पण यंत्रावादाने माणसाला 'यंत्रजडत्व' येऊ नये आणि तंत्रवादाने त्याला 'तंत्रजडत्व' येऊ नये याबद्दल सावध राहणे जितके आवश्यक आहे, तितकेच माणूस हा पशूनिष्ठेने जड पशूपूजेत रत होऊन मानवप्रेमाला पारखा होऊ नये हेहि आहे. मानवी सहानुभूतीचा विकास भूतदयेत होणे निराळे आणि पशुसंगोपनाच्या नादी लागून मानवी बंधुभावाला मुकणे निराळे. पहिल्या प्रक्रियेत जीवनाची व्यापकता आहे, 'गाय ही विधात्याने करुणेवर केलेली कविता होय.' या सुन्दर काव्यमय शब्दात तिचा गौरव करणाऱ्या गांधीजींनी तिला मानवापेक्षा श्रेष्ठ कधीच मानले नाही.

अर्थयोजनेचा परिणाम मानवी संबंधावर होतो हे निर्विवाद आहे. ज्या अर्थव्यवस्थेत काही व्यक्तींकडे उत्पादनाच्या साधनांची मालकी असते त्या व्यवस्थेत सामान्य माणसाचे व्यक्तित्व नाहीसे होऊन तो केवळ एक साधन बनून जातो. सरंजामशाहीत भूमिधनाचे व पशूधनाचे महत्व असते. ज्याच्या जवळ जितकी भूमि गोधन असेल तो गबर. सरंजामशाही व्यवस्थेत शेतावर राबणाऱ्या माणसाला हि जवळजवळ गुरांइतकेच महत्व असते. आर्थिक दृष्टीने तो पशूवत् नसला तरी पशुतुल्य असतो. म्हणजे घोडा व बैल यांच्याप्रमाणेच तो एक उत्पादनाचे फक्त साधन बनून जातो. उत्पादन हे त्यांच्या उपभोगाकरिता नसते. तो निर्माता असला तरी भोक्ता नसतो. सरंजामशाहीत जे धराधीश असतात तेच नराधीश बनतात. मानवाला आर्थिक योजनेत पशूत्वाच्या कोटीला पोचविण्यास सरंजामदारी पद्धती कारणीभूत झाली म्हणून तिचा नायनाट केल्याखेरीज गुरांची माणसे बनविता येणे अशक्यच आहे. आणि गुरांची माणसे बनविणे हे तर गांधीप्रणीत अर्थविज्ञानाचे पहिले कलम आहे.

सरंजामी पद्धतीत माणसांची गुरे बनली तशी भांडवलशाही पद्धतीत माणसे अवजारे बनली आहेत. उत्पादनाची काही साधने अचेतन आहेत. आणि काही सचेतन आहेत. जी सचेतन साधने आहेत त्यांना आपण 'मजूर' म्हणतो. विज्ञानाची कितीही प्रगति झाली तरी जोपर्यंत 'मालकशाही' शिल्लक राहील तोपर्यंत माणूस हा साधनच राहील. अवजारांची माणसे बनविण्याकरिता भांडवलशाही पद्धतीचा म्हणजे मालकशाहीचा समूळ उच्छेद झाला पाहिजे हे उघड आहे. म्हणून गांधी-कल्पित आर्थिक स्वास्थ्याच्या किंवा अर्थशास्त्राच्या योजनेत सरंजामदारी किंवा भांडवलदारीचा लवलेशहि अवशिष्ट राहील हे शक्य नाही.

अवजारांची माणसे बनविणे याचा आणखी एक अर्थ आहे. अवजारांच्या प्रयोगात व यंत्राच्या शोधात मानवी जीवनाची प्रगती आहे हे इतिहास प्रसिद्ध आहे.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पण अवजारांच्या व यंत्राच्या प्रयोगाने मानवी शरीराची कार्यक्षमता, तरतरी व प्रतिकारक्षमता कमी न होता त्या गुणात भर पडली तरच ती प्रगति यथार्थ ठरेल, एरवी नाही. हल्लीच्या परिस्थितीत परिश्रमहि 'वेळ' आहे. कारण तो बहुधा स्वतःच्या अभिमानाविरुद्ध, प्रवृत्तिविरुद्ध आणि मर्जीविरुद्ध करावा लागतो. श्रमविषयी एक प्रकारची अरुची व कमीपणाची भावना निर्माण झाली आहे. श्रम जितका माण–साच्या आवडीला, त्याने प्राप्त केलेल्या विशिष्ट योग्यतेला आणि सोयीला अनुकूल असेल तितका तो जीवनाचे तेज व क्षमता वाढवितो. आज परिश्रमात मौज किंवा गोडी तर वाटत नाहीच, पण त्याबद्दल कळकळहि वाटत नाही. पोटाकरिता निराळ्या प्रकारचे श्रम करुन शरीराचे सौष्ठव, चपळता आणि कार्यक्षमता वाढविण्या–करिता निराळ्या प्रकारचे श्रम शोधावे लागतात. त्यांना आपण व्यायाम आणि खेळ म्हणतो. स्वतःच्या मर्जीप्रमाणे व आवडीप्रमाणे माणूस जो उद्योग करतो त्याला आपण त्याचा 'नाद', 'छंद' (हाबी) किंवा हौसेचा व्यवसाय म्हणतो. माणसाला पोहूनपोहून, धावूनधावून किंवा उठावशा काढूनकाढून शरीर शिणविण्यात भूषण किंवा गंमत वाटावी, पण उत्पादक किंवा उपयुक्त शरीरश्रमात वाटू नये, याला मूख्यतः भांडवलदारी सभ्यतेत रुढ झालेल्या सामाजिक प्रतिष्ठाच कारणीभूत आहेत. करमणूक व काम यातील अंतर कमी–कमी करावयाचे असल्यास या सामाजिक प्रतिष्ठा बदलल्यावाचून गत्यंतर नाही. एरवी उत्पादनाकरिता करायचा श्रम निराळा आणि शरीराची क्षमता व उपयुक्तता वाढविण्याकरिता करावयाचा श्रम निराळा, असे दोन कप्पे पडून आर्थिक जीवनाचा सांस्कृतिक जीवनाशी अभेद्य संबंध राखता येणार नाही. आर्थिक जीवनाचा सांस्कृतिक जीवनाशी बेमालून सांधा जोडता यावा म्हणून अलीकडे समाजवादी वळणाच्या राष्ट्रात उत्पादक परिश्रम सुखकर व शिक्षण-प्रद असा प्रयत्न चालू आहे. असे झाले तरच यंत्राच्या साहचाने मानवांच्या कौश–ल्याचा व बुद्धीचा उत्कर्ष होईल. अन्यथा तो यंत्रवत् व यंत्रतुल्य बनून जाईल. म्हणून 'यंत्रविरोध' ज्याप्रमाणे प्रतिगामीत्वाचा द्योतक आहे, त्याचप्रमाणे मानवी शरीराची व मानवोपयोगी पशूंची उपयुक्तता वाढविण्याची दखल न घेणारा यंत्रवादहि आधु–निक असला तरी प्रतिगामीच. त्यामुळे गांधींनी भौतिकशास्त्रांच्या विकासाशी शरीर-श्रमाच्या प्रतिष्ठेचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला. यंत्रानी मानव व मानवोपयोगी पशूचे स्थान न बळकावता त्यांच्या उपयुक्ततेत व आनंदात भर घातली पाहिजे हा, त्यांचा कटाक्ष होता.

माणसाला उपकरणांचे स्वरुप प्राप्त होऊ नये म्हणून आणखी एका बाबतीत दक्षता बाळगावी लागेल. कष्ट व कला यांच्यातील फरक कमी–कमी करावा लागेल, कारागिरी व मेहनत; हमाली अथवा कुशल श्रम व अकुशल परिश्रम, हुन्नर व हाडमारी यांच्यातील अंतर तोडण्याचे प्रयत्न अद्यतन समाजवादी अर्थयोजनेत होत

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आहेत असे म्हणतात. कारागिरी म्हणजे निर्मितीची कला. निर्मितीच्या व्यापारात माणसाच्या विशिष्ट गुणांचा विकास होतो. यालाच व्यक्तित्वाचा विकास म्हणतात. माणूस हा साधन न बनता साध्य रहावा, उपकरण न बनता व्यक्ति रहावा, हा आर्थिक संयोजनाचा हेतु आहे. म्हणून माणसाच्या व्यक्तित्वाच्या विकासाकरिता उपकरणेहि त्यांच्या इंद्रियांच्या कौशल्यात भर घालणारी असली पाहिजेत, तरच जीवनात वैभवाबरोबर सौंदर्य येईल आणि अर्थव्यवस्थेतून सांस्कृतिक उन्नति साध्य होईल.

सारांश, गांधीजींची गाईविषयीची आस्था म्हणजे गोब्राह्मण प्रतिपालक क्षत्रियांचे गोप्रतिपालन किंवा गोपूजक वैश्याचे गोरक्षण नव्हे. जीवनाची सुख-समृद्धि ही जीवनाच्या व्यापकतेला उपकारक व्हावी; नव्हे, त्यांच्यात उत्तरोत्तर अभेद स्थापन व्हावा एवढाच काय तो गांधींचा कटाक्ष. त्या दृष्टीने त्यांचा आग्रह असा की, मानवाच्या अर्थव्यवस्थेत जेथे पशूंची आधीच योजना झालेली असेल, ही जीवन. मूल्यांची साधने आहेत. जीवनमूल्येच अंतिम व निरपेक्ष आहेत.

'हातोडा व कोयता' यांच्याप्रमाणेच 'चरखा' हेहि श्रमप्रतिष्ठेचे प्रतीक आहे. उत्पादनाचे उपकरण हे उत्पादक–परिश्रमाचे प्रतिक आहे. केंद्रीकरण किंवा विकेंद्रीकरण हा काही अंतिम किंवा निरपवाद सिद्धांत नाही. आर्थिक समृद्धी व समविभाग यांची ती साधने आहेत. या दृष्टीने जुन्या जमान्यातील म्हाताऱ्या बाया, कुलीन कुमारिका किंवा सुखवस्तु गृहिणी यांच्या चरख्यात आणि गांधींच्या चरख्यात, भंग्याच्या केरसुणीत आणि गांधींच्या केरसुणीत तात्त्विक व मूलभूत भेद आहेत. म्हणून त्यांचा 'चरखा' भगवान बुद्धाच्या 'धर्मचक्रात' विलीन होऊ शकला. आणि स्वास्थ्याचा परिणाम सामाजिक स्वस्थतेत हमखास होणार या निष्ठेचे ते निदर्शक आहे. समृद्धि आणि स्वास्थ्य, पुष्टि आणि शांती यांच्यात अभेद स्थापन झाल्यावांचून 'जीवन' हेच सर्वश्रेष्ठ मूल्य सिद्ध होणार नाही.

विषमतेसारखे बंधुत्वाला विघातक दुसरे काहीहि नाही. विषमतेमुळे परस्परविरोधी स्वार्थसंबंध अस्तित्वात येतात. एकाचे जे अन्न तेच दुसऱ्याचे विष ठरते. एकाचा उत्कर्ष हाच दुसऱ्याचा अपकर्ष ठरतो. त्यामुळे मत्सर व परोत्कर्षासहिष्णुता यांचा अमल सुरु होतो. म्हणून विषमतेचा नायनाट करणे ही आर्थिक संयोजनाची पहिली प्रतिज्ञा असली पाहिजे. बुभुक्षेसारखे दुसरे पाप प्रेरक नाही. म्हणून बुभुक्षा नाहीशी करुन क्षुधा लागण्यासारखी आणि ती तृप्त होण्यासारखी परिस्थिती निर्माण करणे ही आर्थिक संयोजनाची दुसरी प्रतिज्ञा असली पाहिजे. आणि मानवी जीवन हे जसजसे संपन्न होत जाईल, तसतसे ते व्यापकहि करीत जाणे ही आर्थिक संयोजनाची तिसरी प्रतिज्ञा असलीं पाहिजे. म्हणजेच समता, सुबत्ता आणि बंधुता ही आर्थिक संयोजनाची साध्ये असली पाहिजेत.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गांधींचे अर्थविज्ञान थोडक्यात असे आहे. त्यात तंत्रनिषेध नाही. यांत्रीकर-विरोध नाही. त्यात वैभावाचा निषेध नाही. पण जीवनाची समृद्धि जीवनाच्या व्यापकतेने मर्यादित व्हावी, विज्ञानाच्या प्रगतीची परिसीमा मानवी बंधुत्वाच्या स्थापनेत व्हावी म्हणून अर्थविज्ञान हे स्वार्थविज्ञान राहू नये, अर्थकारण अनर्थाचे मूळ ठरु नये, असा इषारा या मानवजातीच्या प्रस्थापकाने दिला आहे. त्याने अर्थसमृद्धि व अर्थसाम्याबरोबर अर्थशुद्धीचेहि प्रतिपादन केले आहे.

गांधींची विभूति अनेक दृष्टींनी अभूतपूर्व होती. जीवनाचा इतक्या समग्र-तेने, जीवनातील सत्याच्या आविष्करणाच्या दृष्टीने इतका सांगोपांग विचार यापूर्वी इतर कुणी केला असेल की नाही याची शंकाच आहे. जीवन हेच परम सत्य आहे, त्याची सगळी अंगे व उपांगे मिळून एक अखंड पूर्णांक बनलेला आहे हे सत्य माणसाच्या रोजच्या व्यवहारात साकार करण्याचा प्रयत्न गांधींनी केला. हीच त्यांची जीवनसाधना. या साधनेलाच त्यांनी 'सत्याचे प्रयोग' हे नांव दिले. गांधींनी कुठलेहि आयते तत्त्वज्ञान स्वीकारुन त्याप्रमाणे जीवन घडविण्याचा प्रयत्न केला नाही. माणसा-माणसाच्या संबंधामध्ये जीवनाच्या एकतेकडे सतत वाटचाल म्हणजे सामाजिक प्रगति व प्रयोग म्हणजे त्या दिशेने केलेले सतत प्रयत्न. प्रयत्न म्हटले की यशापयश आलेच. पण प्रयोग ठराविक दिशेने असला तर त्यातील अपयश, खरे म्हणजे अपयश नसून अल्पयश असते. प्रयोग-वीराच्या वाटयाला अल्पयश येते. अशा अल्पयशासहि अनेक प्रयोगानंतर सिद्धि मिळते. सिद्धि म्हणजे पूर्ण यश. याचा अर्थ असा की गांधींचे सारे दर्शन त्या प्रयोगातून त्यांना उमगले. म्हणून ते तत्त्वज्ञान नव्हे, ते दर्शन आहे.

माणसांच्या स्वार्थामध्ये विरोध असला म्हणजे त्यातून चुरस, चढाओढ व विरोध उत्पन्न होतो आणि शेवटी याचा परिणाम संघर्षात किंवा लढयात होतो. असा लढा निरंतर चालला तर माणसांचे एकमेकाबरोबर राहणे अशक्य होते. संघटनेत किंवा संस्थेत एकत्र आले तरी मनात वितुष्ट असते, वैमनस्य असते. गांधींना हे खपले नाही. एकत्र राहणे किंवा बरोबर राहणे म्हणजे गुण्यागोविंदाने राहणे, खेळी-मेळीने राहणे, एकमेकांस जगविण्यास जगणे असे गांधीचे सोपे व सुटसुटीत जीवन-सुत्र होते. हे सूत्र जीवनात साकार करायचे तर राज्यसत्ता, मालकी, मिळकत आणि हत्यार व्यक्तिच्या किंवा व्यक्तीच्या गटाच्या हातात असू नये हे सहज लक्षात येण्या-सारखे आहे. कारण सत्ता, संपत्ति व शास्त्र ही माणसांना जोडणारी साधने नाहीत; तोडणारी आहेत. म्हणून माणसा-माणसांच्या संबंधात याची लुडबुड नको हे गांधींनी ठामपणे ठरविले व त्यात यश मिळविण्याकरता उपाय शोधण्याच्या उद्योगास ते लागले. यातून माणसा-माणसाचा वैरभाव नाहीसा करावयाचा तर भांडण निर्माण करणाऱ्या साधनांच्या ऐवजी वेगळी साधने योजली पाहिजेत, हें ओघानेच आले.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

म्हणून प्रतिकाराचा असा मार्ग त्यांनी शोधला की, ज्याच्यायोगे भांडणाचे कारण नाहीसे करता येईल. पण ते करीत असतांना माणसे मनाने एकमेकांच्या जवळ येतील. याचेच नांव सत्याग्रह. प्रतिकाराने वाईटाचा नाईनाट होईल. समाजातील माणसामध्ये जवळीक निर्माण होईल. मळकतीची मालकी कुणाकडे नसली, ती देवा-कडे म्हणजेच समाजाकडे असली, तर भांडणाचे मूळ नाहीसे होईल. समाज म्हणजे माणसांची गर्दी किंवा संख्या नव्हे. ज्या माणसांत गोडीगुलाबीचे, सलोख्याचे व आपु-कीचे संबंध असतात त्याचा समाज बनतो,मग ती संघटित असोत किंवा नसोत. माण-माणसांतील स्नेहसंबंध म्हणजेच समाज. या दृष्टीने समाजाची मालकी म्हणजे देवाची मालकी. हूकमत, मिळकत यांच्यावरील मालकी गेली की मग हत्याराचे प्रयोजनच नाही.

## ट्रस्टीशिप

मिळकतीवरील ही मालकी नाहीसी करण्याकरिता गांधींनी सलोख्याचा मार्ग शोधून काढला, त्याचे नांव ट्रस्टीशिप. हा मालक, तो नोकर; हा मजूर, तो महाजन; हा राबणारा, तो काम घेणारा; हा कष्ट करणारा, तो कष्टाची किंमत देणारा–हे संबंध माणसामाणसांतील आपुलकीला विघातक आहेत. विघातक संबंधामुळे कष्ट करणारा हैवान बनतो व कष्टाचे मोल देणारा सैतान बनतो, तरी दर एक कष्टकऱ्याला मालक बनण्याची भयंकर आकांक्षा असते. म्हणजे आजचा मजूर व आजचा गरीब हे मालक व श्रीमंत बनू इच्छितात. म्हणजे काय, की आपण सारेच शैतान बनू इच्छितो. याने माणुसकीचा विकास कसा होईल ? अमीर, गरीब, मालक, मजूर या काही जाती नाहीत. आजचा गरीब उद्या अमीर बनतो व आजचा अमीर उद्या भणंग भिकारी बनतो, हे आपण नेहमी बघतो. म्हणून अमीर म्हणजे सैतान व गरीब म्हणजे हैवान हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. दोघांनाही इन्सान बनविण्याची तळमळ लागली पाहिजे, इन्सान बन-ण्याच्या दृष्टीने अमीरीदेखील संकटच आहे. कारण अमीराला नेहमी भीतभीत रहावे लागते म्हणून तो आपली अमीरी सांभाळण्याकरिता व अब्रु सांभाळण्याकरिता भाडोत्री माणसे ठेवतो व त्याचे त्यांना भाडे देतो. भाडोत्री माणसांच्या भरोशावर ज्या अमीराची, अमिराच्या इभ्रतीची राखणदारी होते, ती इभ्रत व ती मिळकत खरे पाहता त्या राखणदारांचीच होऊन जाते. तिकडे राखण करणारा दुसऱ्याचे संपत्तीचे व प्रतिष्ठेचे ओझे वाहून शुद्ध हमाली करतो आणि केव्हा सुटका होईल, केव्हा आपण अमीर बनू यांची अतुरतेने वाट पाहत असतो. हे काय जगणे झाले ? भित्रेपणा व लोभ काय माणसाचा स्वभाव आहे ? तसे असते तर त्याने त्यांचा इन्कार केला नसता. आपण कुणाला भित्रे अगर लोभी म्हटले, हावरा म्हटले तर तो म्हणतो, 'छे छे मी काही भित्रा नाही आणि मी लोभिहि नाही' असे म्हणून

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

फुशारकी मिरवण्याकरता आपल्या बहादुरीची व उदारपणाची काही उदाहरणे देतो. म्हणजे काय, की लोभ व भय माणसाचा स्वभाव नव्हे. ते विकार आहेत दोष आहेत. पण माणसे गरीबी–अमीरीचे ओझे वाहतात. यावर उपाय काय ?

सगळ्यांनी मिळून सुख व दुःख, काम व आराम, अमीरी आणि गरीबी वाटून घ्यायला पाहिजे. आजहि कुणी सुख किंवा दुःख आप्पलपोटेपणाने भोगू शकत नाही. बारशाला वा मर्तिकाला, लग्नाला वा श्राद्धालाहि आपण सारे अमीर–गरीब इतरांना बोलवून घेतो आणि जेवू घालतो; तेहि त्यांचा सत्कार करुन. आनंद असला, उत्सव असला तरी त्यात इतरांना सामील करुन घेतो. हा स्वभाव आहेच. हा स्वभाव सत्ता व संपत्तीलाहि लागू झाला पाहिजे.

पण यात एक अडचण आहे. आपल्याला स्वातंत्र्य तर हवे आहे, पण जबाबदारी नको. स्वातंत्र्य व जबाबदारी एकाच नाण्याच्या दोन दोन बाजू आहेत. स्वातंत्र्य हवे असेल तर जबाबदारी टाळता येणे शक्य नाही. काम करणारा वेगळा व कामाचा हिशेब घेणारा वेगळा. एक मजूर व दुसरा मुकादम, हे नारे–सुद्धा माणुसकीला मानवण्यासारखे नाही. कारण कामावर देखरेख ठेवणारा व्यवस्थापक किंवा मॅनेजर होऊन बसतो आणि त्याच्या हाताखाली काम करणारा त्याचा ताबेदार होऊन बसतो. स्वातंत्र्याला मालकशाहीचे जसे वावडे आहे, तसेच व्यवस्थापकशाहीचे आहे. मग काय करावे ? यातून मार्ग असा की, श्रमाचा संबंध उत्पादनाशी जोडला जावा, मोबदल्याशी किंवा उपभोगाकरता नव्हे. श्रम सग–ळ्यांच्या उपभोगाकरिता, फक्त आपल्या उपभोगाशी नव्हे. जे उत्पादन होईल ते सर्वांचे. त्यांचे वाटपहि गरजेप्रमाणे व शक्य झाल्यास आवडीप्रमाणे होईल. आपण घरात तसेच करतो. पुरुष लाकडे फोडतो, ते साऱ्या कुटुंबाकरिता. घरा–तील मुख्य बाई भाकरी बनवते, त्याहि सगळ्याकरिता. त्यातहि गंमत अशी की फक्त हिशोबाप्रमाणे बनवत नाही. म्हणजे पांच माणसे व दहा मांणसे असा ती हिशोब नाही करीत. पांच माणसापैकी म्हाताऱ्याकरिता वेगळ्या प्रकारची एक भाकरी. लहान मुलाकरिता चिमुकल्या चांदक्या, पण वाटोळ्या गरगरीत आणि प्रौढांकरिता सामान्य भाकरी असा तिचा विवेक असतो. कारण हे काही नुसतेच उत्पादन नव्हे. एकमेकांच्या गरजेचाहि त्यात विचार आहे. याचेच नाव कौटुंबिकता. सारा समाजच आपले कुटुंब बनला पाहिजे म्हणजे आपला शेजारी, आपला नातलग आणि जगातील सर्व माणसे आपले शेजारी. म्हणजे सारे विश्वच आपले कुटुंब बनते अशा रितीने रक्ताचे नाते सोयरीकीचे नाते संपूर्ण होते. आपल्या घराचे आवार आभाळाएवढे होऊन जाते. कुपणे व भिंती उरतच नाहीत. हे ट्रस्टीशिपचे भव्यदिव्य स्वप्न आहे.

आपण एखाद्या दुसऱ्याची वस्तु सांभाळायला ठेवली म्हणजे तिला दुसऱ्याची

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ठेव मानतो. मोठ्या कसोशीने सांभाळून ठेवतो. ज्याच्याकडे वस्तु सांभाळायला सोपवली जाते त्यांचे नांव ट्रस्टी, म्हणजे विश्वस्त. भरवशाचा माणूस. सांभाळायला जो ऐवज दिला जातो, त्या वस्तुला 'ट्रस्ट' म्हणतात. म्हणजे विश्वासाने ठेवलेली ठेव. तेव्हा ठेवीदार किंवा ट्रस्टी हा झाला 'विश्वस्त' आणि जी वस्तु ठेंव म्हणून दिली ती ट्रस्ट. ह्यांचे नांव 'विश्वस्त योग' गांधींची ट्रस्टीशिपची योजना ती हीच. दैवाने किंवा योगायोगाने ज्याचे हातात संपत्ति आली असेल त्याने ती समाजाची ठेव मानावी. स्वतःच्या मालकीची मानू नये. जे उत्पादन करीत असतील त्यांनी आपलें श्रम व त्यातून होणारे उत्पादन हेहि समाजाचेच मानावे. स्वतःचे नव्हे. अशी विलक्षण खुबी या योजनेत आहे कर लावून संपत्तीचा क्षय करणे फार कठिण आहे कारण कर देणारा युक्ति-प्रयुक्तीनें कर चुकवतो. राज्याने संपति जप्त करण्याचा घाट घातला तर त्यातूंनहि पळवाट काढता येते. गरीबांनी ती बळकावून घेण्याचा प्रयत्न केला तर बळकावणारेच अमीर बनतील व इतरांनी ती बळकावू नये म्हणून सतत काळजी घेतील. तेव्हा टॅक्स, जप्ती अगर बळजबरीने हिरावून घेंणे, हे सारे मार्ग अपुरे आहेत. त्यांनी माणसांची मने विटतात. व नासतात. अशा विटक्या नाशक्या मनाची माणसे कशा प्रकारचे जग बनवतींल ? ते माणसाच्या जगण्याच्या लायकीचे तरी असेल काय ?

लोक म्हणतील हे स्वप्न मोठें गोंडस आहे. पण ते प्रत्यक्षात घेणे अशक्यच आहे. जे शक्य असेल तेवढेच करणे म्हणजे राजकारण. त्याने समाज-परिवर्तन होत नाही. आहे तीच व्यवस्था टिकून राहते. पण आपल्याला तर समाज मुळापासून बदलायचा आहे. त्याचे सुत्र आहे-'अशक्य ते शक्य करणे' यांचे नांव क्रांति. भारताचे स्वराज्य अशक्य वाटत होते, ते शक्य झाले. लोकांमध्ये पुरुषार्थाची प्रेरणा जागी झाली. गांधीच्या पूर्वीपर्यंत सर्व महापुरुषांनी प्रयत्न केले त्यांना थोडे थोडे यश आले. म्हणून शेवटी गांधींना यश येऊ शकले. काल जे अशक्य होते ते आज शक्य करुन दाखवू. हा आहे क्रांतिकारचा बाणा. तो आपण स्वीकारला तर यश लाभल्यावांचून राहणार नाही.



CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# ६

# महात्मा गांधीजी आणि शिक्षणाचे संदर्भ

## देवदत्त दाभोळकर

सुमारे वीस वर्षापूर्वी अिव्हॅन अिलिज यांचे " Deschooling Society " हे पुस्तक जगभर गाजत होते.

त्याच सुमारास ऐका चर्चासत्रासाठी ते पुण्यात आले होते. मी काहीसा कार्यवाह होतो. सकाळी त्याना भेटावयास गेलो. त्यावेळी ते ऐक पुस्तक वाचत स्वस्थपणे पहूडले होते.

मी विचारले " कोणते पुस्तक आहे ? "

अिलिच म्हणाले : " मी विनोबांचे शिक्षणविषयक विचार वाचतो आहे. "

मी पुढे विचारले " आपल्याला ते विचार कसे वाटतात. "

अिलिचनी उत्तर दिले: ,,This old man has Said many decades ago what I am trying to say now " (मी आज सांगण्याचा प्रयत्न करतो आहे ते तर या म्हातार्‍याने अनेक दशकापूर्वीच म्हणून ठेवले आहे. )

या उद्‌गारात अिलिच यांच्या मनाच्या मोठेपणा होता. तशीच पुष्कळशी वस्तुस्थितीही होती.

याचा गांधींजीशी काय संबंध ? गांधीजी आणि विनोबा यांचे अेक लोक-शिक्षण असे नाते होते. ते नाते गुरु-शिष्याचे होते. परंतु गुरु कोण हा अनेकदा त्या उभयतातच प्रेमळ संवाद होत असे. काही लेखीही झाला आहे.

त्यांचे विचार पुष्कळच मिळते जुळते होते. परंतु विनोबा तसे स्वयंप्रज्ञ होते. काही बाबतीत उभयतांचे विचार तंतोतंत जुळतही नसत. विनोबानी गांधीजींचे सत्याग्रहाचे शस्त्र स्वतंत्र्य भारतात वापरण्याचे नाकारले म्हणून त्याना दोष देणारे असंख्य लोक आहेत.

असो. परंतु शिक्षण क्षेत्रात मात्र त्या उभयतांचे विचार वेगवेगळया शब्दात मांडलेले असले तरी पूर्णपणे सारखे आहेत. आणि हा काही केवळ अेक अपघात नव्हता. त्या समान जीवनदृष्टीचा तो परिपाक होता.

आणि त्यामुळे अिलिचने वाहिलेली आदरांजलि अढळपणे गांधींजी पर्यन्तही

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जाऊन पोचते.

२

मूळ संदर्भ शोधता येतील; देता येतील. परंतु ते मी या लेखात करत नाही. कोणाला विशेष कुतूहल असल्यास त्याच्याशी स्वतंत्र्य संवाद करावयास मला आवडेल.

गांधीजींची शिक्षणविषयक मूलभूत भूमिका काय होती ?

(१) सर्वजन साक्षर असावेत. परंतु (२) साक्षरता हेच सारसर्वस्व नव्हे. शिक्षणाने माणसाचे शील घडविले पाहिजे व शिक्षण जीवनोपयोगी असले पाहिजे. त्याने व्यक्तीला स्वावलंबन, आत्मनिर्भरता, आत्मविश्वास व निर्भयता शिकविली पाहिजे. (३) हे कसे करावे याचा विचार, याचे प्रयोग, शिक्षणतज्ञानी करावेत व नवनवे मार्ग शोधावेत. (४) अशा वृत्तीने काम करणारे शिक्षकच शिक्षण व्यवस्थेचा कणा असू शकतात. विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षक घडविणे हे आद्य महत्वाचे आहे (केवळ तांत्रिक पद्धती शिकविणारी शिक्षक–महाविद्यालये हे काम करु शकणार नाहीत.) हा खरा कळीचा प्रश्न आहे. त्याचे उत्तर अजूनही भारताग्त आपल्याल शोधून काढता आलेले नाही.

याखेरीज ऐकूण आखणी सामान्यपणे कशी असावी? गांधीजींचे सांगणे होते : (१)प्रत्येकाला चौदा वर्षाच्या वयापर्यंत शिक्षण मिळावयास हवे व तो पर्यन्त त्याची सातवी इयत्ता पूर्ण व्हावयास हवी. (२) या सातवी इयत्तेपर्यन्त मॅट्रिक्युलेट होणाऱ्या विद्यार्थ्याला जितके ज्ञान द्यावयास हवे तितके दिले गेले पाहिजे. इंग्रजी विषयाचा यात समावेश ठेवण्याचे काम नाही (३) कला व वाणिज्य महाविद्यालयाना अनुदान देण्याचे कारण नाही. ज्याना ते शिक्षण हवे असेल त्यांच्यासाठी तशी महाविद्यालये मागणीप्रमाणे निर्माण होतील. (४) विज्ञान तंत्रज्ञान यांचे शिक्षण राष्ट्राच्या गरजेप्रमाणे राष्ट्राने दिले पाहिजे. या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड करताना अध्ययन–क्षमता व सामाजिक न्याय या दोन्ही गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. (५) उच्च शिक्षणाची संधी ही आपल्याला मिळालेली एक विशेष संधी आहे व यासाठी आपण राष्ट्राचे ऋणी असले पाहिजे या वृत्तीने विद्यार्थ्यांनी पाहिले पाहिजे. या वृत्तीचा परिणाम समाजसेवेसाठी विश्वस्त वृत्तीने आपल्या गुणांचे उपयोजन करण्यात दिसून आला पाहिजे. ( विवेकानंदानीही असेच सांगितले होते. )

३

प्रत्यक्षात काय घडले ? गांधीजींचे व्यक्तिमत्व इतके महान होते की त्यानः पूर्णपणे नाकारणे तर शक्यच नव्हते. परंतु त्यानी स्वीकारणेही अवघड होते कारण गांधीजींच्या विचारांच्या मागे त्यांची जीवनदृष्टी होती. सेवाभाव, विश्वस्तवृत्ती,

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मानवतावादी दृष्टिकोण, साधेपणा, चंगळवादाला विरोध, निर्भयता, सर्वधर्मसमभाव, नि:स्वार्थ आध्यात्मिक वृत्ती इत्यादी सामान्य मानवाला न रुचणाऱ्या न पेलणाऱ्या गोष्टी या जीवनदृष्टीत अंतर्भूत होत्या. आपल्या स्वार्थी हितसंबंधांच्या आड येणारी कोणतीच रचना सुप्रतिष्ठित वर्गांना नको होती व तळागाळातून चुकूनमाकून धड-पडून सुप्रतिष्ठित होणारे लोकही या सुप्रतिष्ठित वर्गाशी हातमिळवणी करण्यातच धन्यता मानत होते. हा वर्ग सत्तेत आहे व शिक्षणव्यवस्थेवर या वर्गाची पकड आहे. माझ्या मुलाला मेडिकला प्रवेश मिळत नाही याचे या वर्गाला दु:ख आहे. परंतु खेड्यातील मुलाला शाळेत शिक्षकाचे दर्शनही होत नाही याची त्याला खंत वाटत नाही. ( लंडनमध्ये ऐखाद्या हॉटेलमध्ये प्रवेश मिळत नाही म्हणून लोक संतापत परंतु आपल्या देशात कोटवधि लोकांची सावलीही आपण अंगावर पडू देत नाही याचे भान रहात नसे त्यासारखाच हा प्रकार आहे.)

ही कोंडी फुटत नाही हीच भारताच्या शिक्षण व्यस्थेची व ऐकूण भारतीय परिस्थितीचीही कोंडी आहे. वरिष्ठ वर्ग मानभावीपणाने गांधीजींना वंदन करुन परंतु आपाल्या हितसंबंधाना धक्का लागणार नाही अशी दक्षता घेऊन ही कोंडी पार करत असतो. विचारवंताना याचे भान आहे परंतु ही कोंडी फोडण्याची कुवत त्यांच्यामध्ये नाही. ( वर्ग म्हणून ही वृत्तीदेखील नसण्याचीच शक्यता अधिक आहे.)

Basic Education च्या चर्चेत मी या ठिकाणी शिरत नाही. या कल्पनेचा खेळ खंडोबा झाला किंवा करण्यात आला. तेव्हा गांधीजींना काहीसे वंदन म्हणून कोठारी आयोगात Work experience ची कल्पना पुढे आली.त्यावेळच्या चर्चेत समितीचे अेक सदस्य म्हणाले : " नावात बदल करुन काही साधणार नाही. कारण basic education चा ज्या लोकानी खेळ खंडोबा केला तेच लोक आजही अधिकारावर आहेत आणि ते या कल्पनेचा देखील खेळ खंडोबा केल्याखेरीज राहणार नाहीत. "

१९८० मध्ये याविषयी लिहिताना जे. पी. नाईक यानी खेदाने नोंद केली आहे : " दुर्दैवाने त्या सदस्यांचे ते म्हणणे खरेच होते असे शेवटी अनुभवास आले. "

४

गांधींजी- विनोबाजींच्या भूमिकेविषयी विचारवंत कोणती भूमिका घेवू शकतात याची तात्त्विक दृष्टिकोनातून केलेली मांडणी " education for our People " या १९७८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या निवेदनात आहे 'भारतीय जनतेचे शिक्षण ' या शीर्षकाखाली इंडियन इन्स्टिटयूट ऑफ अेज्युकेशन पुणे-२१ या संस्थेने त्या निवेदनाचे भाषांतर प्रसिद्ध केले आहे. त्या निवेदनाचा आराखडा जे. पी. नाईक यांनी तयार केला होता व भारतातील सुमारे चाळीस व्यक्तींच्या

(पान ४३ वर पहा)

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# ७

# अहिंसक चळवळ : गांधीची मोठी देणगी

## न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी

" महाराष्ट्रातील गांधीवादाचे जेष्ठ व्यासंगी अभ्यासक व समर्थ भाष्यकार सेवानिवृत्त न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांची म. गांधी बंधीची गांधी मार्ग मीमासातील मुलाखत वाचकासाठी येथे देत आहोत. "
— संपादक

※ गांधीजींना आफ्रिकेत वर्ण विषमतेचे चटके बसले. मानवी हक्क प्राप्त व सामाजिक समतेसाठी तेथील जनतेला त्यांनी आपल्या सोबत घेऊन अद्वितीय असा अपूर्व राजकीय संघर्ष केला. जनशक्ती निर्माण करुन अन्यायाचा अहिंसक पद्धतीने प्रतिकार करणारे सत्याग्रही अस्त्र गांधींच्या प्रतिभेतून प्रथमच या धरतीवर प्रकट झाले. जागतिक क्षेत्रात ऐतिहासिक ठरावी अशा युगपरिवर्तनाची ही नांदी होय. गांधींच्या या प्रथम प्रवेशाविषयी आपणाला काय वाटते ?

—या पहिल्या कामातूनचं गांधींची प्रतिमा समोर येते ती म्हणजे अन्याया-बद्दलची चीड आणि प्राणपणाने त्याचा प्रतिकार करण्याची आकांक्षा. कुठल्याही प्रकारचा अन्याय सहन न करणे हे गांधीजींचे त्या वेळेपासूनचेच ब्रीद होते हे स्पष्ट दिसून येते.

※ आफ्रिकेतील टॉलस्टॉय आश्रमाचे गांधीजींच्या जीवनात स्थान काय ?

—आश्रमांतून आश्रम जीवनाची सुरवात हा गांधींच्या जीवन साधनेचा एक भाग होता, एक गैरसमज असा आहे की, जो व्रतांनी बांधला जातो, तो व्रतस्थ असताना स्वतंत्र्य नसतो. खर म्हणजे व्रतांनी बांधल जाणे म्हणजे मोह—मायेतून मुक्त होणे. मोह, माया आणि वासना यांतून मुक्त होणे हे स्वातंत्र्याचे मूळ आहे. म्हणून गांधींचे आश्रम हे स्वातंत्र्याची प्रेरणास्थानेच होती असे नव्हे तर ती प्रक्षेपण केंद्रे होती.

संस्कार करावे लागत नाहीत. ते आपोआपच होतात. जर वातावरण

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सुसंस्कृत असेल तर हे घडते.

संस्कृती पाश्चिमात्य किंवा पौर्वात्य नसते,तर ती भोगावर किंवा त्यागावर आधारित भिन्न संस्कृती असते. सुखलोलुपता कमी झाली की माणसाच्या मुक्तीचा मार्ग सोपा होतो. इंग्रजीत नीड (Need) आणि ग्रीड (Greed) असे दोन शब्द आहेत. नीड म्हणजे गरज. गरजा कमी झाल्या की हावही कमी होतें.गरजा मर्यादित तर हाव अमर्याद असते. ही गांधीजींच्या आश्रम स्थापनेमागची भूमिका तयार करणारी प्रयोगशाळा असते.

※ स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्व लोकमान्यानंतर गांधींच्या हाती आले. दोघातले साम्य आणि विंशेषता कोणती?

–लोकमान्य टिळकांबद्दल गांधींना अमाप आदर होता. टिळक स्वातंत्र्याचे केवळ जनकच नव्हते तर ते असंतोषाचेही जनक होते. गांधीजींनी म्हटले आहे की, कुठल्याही क्रांतीला चार पिढ्या लागतात.

पहिली पिढी शरणागती पत्करते. दुसरी असंतोष व्यक्त करते. तिसरी विरोधाची भूमिका घेते. या पाश्वभूमीवर चौथी पिढी कृती करते. लोकमान्यांनी गुलामगिरीविरुद्ध जो असंतोष निर्माण केला. स्वदेशीची भावना जागृत केली. त्या पाश्वभूमीवर गांधीजींचे नेतृत्व उजाळून निघाले.

काही अंशी दोघांचे मार्ग भिन्न होते. पण ध्येय एकच होते. दोघांच्याही राजकारणाला अध्यात्माचे अधिष्ठान होते. दोन्ही चळवळी सर्वार्थांनं स्वदेशी होत्या.

※ स्वराज्यसंग्राम आणि रचनात्मक कार्य गांधीजींनी समान्तर का

---

(पान ४१ वरुन)

त्यावर सह्या आहेत. त्या निवेदनात जयप्रकाश नारायण यांचा प्रशस्तिपूर्ण पुरस्कार आहे.

त्या निवेदनाशी आजही मी नव्वद टक्के सहमत आहे व ते निवेदन खोडून काढाण्याच्या दृष्टीने देखील कोणाला वाद घालावयाचा असेल तर त्या चर्चेत मला रस आहे. हे सारे योग्य आहे. परंतु आजच्या परिस्थितीत अशक्य आहे असे कोणी म्हटले तर त्याच्याशी सहमत न होणे कठीण आहे.

कारण–

गांधीजी, विनोबा, जयप्रकाश यांची जीवनदृष्टीच वेगळी होती आणि भारतात आज अधिकारावर असणाऱ्या लोकांची ( मग ते कोणत्याही राजकीय पक्षाचे असोत) जीवनदृष्टीच वेगळी आहे.

–आणि जीवनदृष्टी वेगळी असली की सारेच संदर्भ बदलतात. ▣▣▣

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

चालवले ?

–स्वराज्याची तहान सुराज्याने भागणार नाही, हे जितके खरे आहे. तितकेच सुराज्याशिवाय स्वराज्य प्राणवान होणार नाही, हेही खरे आहे.

स्वराज्य शब्दातला स्व म्हणजे सामान्य माणसांतील स्वत्व. हे स्वत्व जर जागृत करायचे आणि जोपासायचे असेल तर स्वदेशीशिवाय पर्याय नव्हता. आणि या सगळ्या आंदोलनात सामान्य जनतेचा सक्रिय सहभाग असावा अशी भूमिका गांधींनी स्वीकारल्यामुळे त्यांनी रचनात्मक कार्यक्रमाला स्वराज्य आंदोलनासोबत स्थान दिले. ते पूर्ण करुन क्रांती होत असते. त्याच्या करिता स्वातंत्र्याचा संपूर्ण ब्लू प्रिंट किंवा आराखडा आवश्यक असतो.

म्हणून स्व–राज्य, सु–राज्य व स्व–देशी या तिन्हीची सांगड गांधींनी साधली. यालाच संपूर्ण क्रांतीच्या दिशेने उचललेले पाऊल म्हणतात. जिच्यातून प्रतीक्रांती निर्माण होईल हा धोका नसतो ती संपूर्ण क्रांती. द्वेष अगर वैर यावर ती आधारित असू शकत नाही. म्हणून गांधीनी वीरवृत्तीचा विकास केला वैरवृत्तीचा नव्हे. गांधींचा संतापसुद्धा दुर्वासारखा शाप देणारा नव्हता.तर वाल्मिकीसारखा सात्विक होता ज्यातून वाल्मिकी रामायणाची निर्मित्ती झाली.

❋ स्वराज्य–संग्राम आणि सर्वोदय-दर्शन यांचा अनुबंध काय ?

–स्वराज्यसंग्राम आणि सर्वोदय हे परस्पर पूरक आहेत. स्वराज्याशिवाय सर्वोदय संभवत नाही. सर्वोदयाखेरीज सामान्य माणसाचे सत्व जागृत होऊ शकत नाही सत्वविहीन स्वराज्य हे खऱ्या अर्थाने स्वराज्य नव्हेच.

कमीत कमी शासन आणि जास्तीत जास्त स्व–शासन ही स्वराज्याची गुरुकिल्ली आहे. स्वराज्य म्हणजे स्वैराचार नव्हे. स्वराज्य म्हणजे काही बोटावर मोजण्याइतपत लोकांचे राज्य नव्हे, स्वराज्यात सामान्यातल्या सामान्य माणसाला सहयोगाची आणि सहभागाची संधी मिळावी लागते. याची सुरुवात अगदी खालच्या माणसापासून व्हावी लागते. ज्याला गांधी 'अंतोदय' म्हणतात आणि यालाच आपण स्वराज्य आणि सर्वोदय म्हणतो. खालच्या पासून वरच्यापर्यन्त सर्वांचाच उदय, सर्वांचाच सक्रीय सहभाग व विघातक सहयोग.

❋ स्वातंत्र्य आंदोलनाच्या तसल्या उग्र राजकीय काळांत आणि जागतिक शस्त्रास्त्र वाढीच्या युद्धजन्य परिस्थितीतही गांधीजी सत्य, अहिंसेवरका स्थिर होते ?

–गांधींच्या सत्याच्या प्रयोगाचे मूळ समजून घेतले पाहिजे. प्रथमत: गांधींना वाटले, की ईश्वर जो जगनियन्ता आहे, तोच सत्य आहे. मग लक्षात आल की हिंदूचे तर ३३ कोटी देव आहेत. मुसलमान, पारशी, ख्रिश्चन यांचे देव वेगवेगळे आहेत.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

इतके सत्य कसे असू शकते ? म्हणून गांधी प्रयोगांती या मुक्कामावर पोहचलें कीं "सत्यच ईश्वर आहे ! "

त्यामुळे गांधींच्या चळवळीचे अधिष्ठान सत्य आहे. सत्य आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहू शकते. असत्याला चालवायचे असेल तर सत्याचा मुलामा द्यावा लागतो. ते आपल्या पायावर उभे राहू शकत नाही.

गांधींच्या अहिंसेचे दोन भाग आहेत. हिंसा न करणे हा एक दृष्टोत्पत्तीस पडणारा भाग. परंतु अहिंसेचे मूळ शोषणरहित–समाज यात आहे. कुठल्याही प्रकारचे शोषण न करणे किंवा त्यात शोषण नसणे, हे अहिंसेचे मूळ तत्त्व आहे.

स्वत: जगणे व दुसऱ्यालाही जगू देणें हे पुरेसे नाही. पूर्वी "जीवो जीवस्य जीवनम्" हा सिद्धांत होता. पण तो पशूलाही लागू होता. नंतर "स्वत: जगा इतना व इतरांना जगू द्या" हा उत्क्रांतीचा दुसरा टप्पा आला. पण हाही पुरेसा नव्हता. म्हणून शेवटी "स्वत: तर जगाच पण इतरांनाही जगण्यात मदत करा." ही भूमिका माणसाने स्वीकारली.

दुसऱ्याला जगण्यास मदत करणे व त्यात येणारे सारे अडसर दूर करुन सहयोगात्मक सहजीवन व पारस्परिकता स्थापन करणे हा अहिंसेचा सकारात्मक अर्थ होता आणि हेच गांधींना हवे होते.

※ आज तर युद्धे, आतंकवाद, दंगे... हे सारे पाहिले म्हणजे पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने परिस्थिति संहराकडे जात असताना आणि गांधी, विनोबा नसताना, प्रभावीपणे सत्याग्रह-अहिंसेची पाऊलों कशी टाकावीत ?

–गांधी आणि विनोबा नाहीत म्हणूनच तुमच्या आणि माझ्या म्हणजे सामान्य माणसाच्या पुरुषार्थाला संधी आहे. जेवढे मोठे आव्हान असते तेवढीच मोठी संधी मिळत असते.

गांधींचा सत्याग्रही अनैतिक असलेल्या वस्तूंच्या विरुद्धच स्वत: क्लेश सोसून विरोधात्मक चळवळ करीत असे.

त्यांचा कायदेभंग स–विनय कायदेभंग होता. अ–विनय नव्हे. अनैतिक कायदा मोडल्यावर तो त्याची न्यायालयात कबुली देत असे व त्यासाठी असलेली जास्तीत जास्त शिक्षा न्यायधिशाने त्याला करावी अशी मागणी करीत असे.

अहिंसक सत्याग्रहाने तो सामाजिक मूल्ये प्रस्थापित करुन समाज परिवर्तनाच्या दिशेने पाऊल टाकत असे. व त्यासाठी भोगावी लागणारी शिक्षा आणि क्लेश सोसून तो कायद्याच्या राज्याची प्रतिष्ठाही कायम ठेवत असे.

राज्य व्यक्तीचे नसावे, कायद्याचे असावे, अस आपण मानतो. संहार करुन अशी समाज–रचना प्रस्थापित करता येत नाही. माणसाचे डोके छाटून टाकल्याने

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

विचार संपत नसतो. विचारवंतांच्या हातात दगड नसतात, पण डोक्यात विचार असतात. विचाराचा संघर्ष वैचारिक असतो. आणि तो त्या पातळीवर करावा लागतो. हिंसेने प्रतीहिंसेची भीती असते. अहिंसेने शाश्वत मूल्ये प्रस्थापित होत असतात. म्हणून जगाला आज गांधींच्या विचारांची गरज वाटते.

※ गांधीच्या युगपरिवर्तनकारी विभुतिमत्वामागे न जाता स्वा. सावरकर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र्य कार्य उभारणी का केली ?

—मी असं मानतो, क्रांतिकारकांनी केलेल्या हिंसक चळवळीसुद्धा स्वराज्यासाठीच होत्या. सर्वस्वाचे बलिदान करण्याची त्यांची शक्ती आणि प्रेरणा कौतुकास्पद होती. त्याने एक वातावरण तयार झाले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितोद्धाराची चळवळ, म. गांधींची हरिजन सेवेची चळवळ या चळवळी परस्पर पूरक होत्या. प्रायश्चित्ताच्या भूमिकेवरुन सवर्णांच्या मनात रुजलेली अस्पृश्यता संपविण्याची चळवळ गांधीजींनी केली नसती तर अस्पृश्यतेचा अंत कधीच झाला नसता. गांधींची हरिजन सेवेची चळवळ ही सवर्णांच्या उत्थानासाठी होती. सवर्णांच्या हृदय परिवर्तनासाठी ती आवश्यक होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दलितोद्धाराची चळवळ दलितांच्या उद्धारासाठी होती. ह्या दोन्ही चळवळी परस्पर पूरक असल्यामुळेच समाजाचा उद्धार शक्य होता.

ज्यांच्याजवळ शस्त्रे नसतात त्यांना शस्त्रांचा मोह असतो. एका शस्त्रापेक्षा दुप्पट मोठे दुसरे शस्त्र आणि विध्वंसक शस्त्र असू शकते.

जनताव्यापी योजलेली आंदोलने हत्यार आणि शस्त्राने लढताच येत नाहीत कारण सामान्य जनतेजवळ शस्त्रे असूच शकत नाहीत. संहारक क्रांतीतून पुन्हा प्रतिक्रांती होण्याचा संभव असतो.

गांधीजींची चळवळ शेलक्या लोकाची नसल्यामुळे ती शाश्वत अशा अहिंसक मूल्यावर आधारित होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर उदयाला येईपर्यन्त हिंदूच्या ३३ कोटी देवांत सुद्धा एकही देव असा नव्हता जो हरिजनांचे प्रतिनिधीत्व करु शकला असता. चोखामेळ्याला पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरांत महाद्वाराच्या पहिल्या पायरी पलीकडे प्रवेश नव्हता. म्हणून जे भोगित होते आणि ज्यांना भोगावे लागले त्यांची प्रतिक्रिया तीव्र असणे आवश्यक होते.

पण आपण हे विसरुन चालणार नाही की शेवटी पुणे करार करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गांधीचे प्राण वाचविले. तर मंत्रिमंडळात व घटना समितीत

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

स्थान देऊन गांधीजींनी डॉ. आंबेडकरांना सामाजिक आणि राजकीय प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. म्हणून या चळवळी परस्पर पूरक होत्या, असे मी मानतो.

गांधीचा उदय होईपर्यंत अहिंसेने स्वराज्य मिळू शकते यावर विश्वास असणारा नेता संपूर्ण जगात नव्हता. त्यामुळेच गांधी अद्वितीय होते. निष्पक्ष, निर्वैर निर्भय अशी अहिंसक चळवळ गांधी निर्माण करु शकले. आणि हीच गांधींची जगाला सगळचात मोठी देणगी आहे.

※ महात्माजी आणि नेताजी यांचे अनुबंध कसे होते? दोघात अंतर का पडलें?

–गांधींजी आणि सुभाषबाबू यांच्या धोरणांत फरक होता. पण दोघांचे ध्येय आणि उद्दिष्ट एकच होते. दोघांच्याही मनात एकमेकांबद्दल असीम प्रेम होते. नेताजींचे स्वातंत्र्य चळवळीला योगदान फार मोठे होते. देशात राहून महात्मा गांधी आणि इतर पुढाऱ्यांनी स्वराज्याची चळवळ चालवली तर देशाबाहेर राहून नेताजींनी त्या चळवळीला पूरक अशी चळवळ उभी केली.

नेताजींची आझाद हिंद फौज हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक होते.त्यात वैर–वृत्ती कमी व वीर–वृत्ती जास्त होती. स्त्री-पुरुष सह–जीवनाचा लष्करी क्षेत्रातला तो अप्रतीम असा प्रयोग होता. आझाद हिंद फौजेची गाणी, त्यात सामील असलेले सर्व जाती धर्मांचे लोक, त्यातील स्त्रियांचा सक्रिय सहभाग हा भारतीय स्वातंत्र्याचा लढाईचा अनुपम असा इतिहास आहे.

विचार भिन्नता, मत भिन्नता म्हणजे मानसिक वितुष्ट किंवा वैर नव्हे. मार्ग वेगळे पण उद्दिष्ट मात्र एकच असले की सर्वच चळवळी परस्पर पूरक असतात. सुभाषबाबूंबद्दल गांधीजींनी जे आदराचे उद्गार काढले ते याचेच द्योतक आहे.

सुभाषबाबुंच्या महत् सायासांचा, साहसाचा विचार करताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

परतंत्र्य राष्ट्रात राजद्रोह म्हणजे देशद्रोह नव्हे. उलट ती देशभक्ती असते. अनेकदा फितुरीसुद्धा स्व–जन निष्ठा असते. कारण त्याचा पाया स्वराज्य मिळवणे हा असतो.

सुभाषबाबूंच्या आझाद–हिंद फौजेत हिंदु–मुसलमानांची एकी होती. ' वंदे–मातरम्' नव्हते. ' अल्ला हो अकबर ' ही नव्हते.

लक्ष्मीबाईचीही वेगळी तुकडी होती. स्वतंत्र्य हिंदुस्थानचा प्रतिनिधी कसा वागेल याचे प्रतिक यात सामावले होते. सैन्य हिंदी लोकांचेच होते आणि बाणा स्वातंत्र्याचा होता. सुभाषबाबूंच्या चळवळीची ही वैशिष्टये अनमोल होती.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

※ आनुनिक विकासनीतीचे घातक परिणाम आज जगाच्या रंगमंचावर हवा पाणी, पशू, पक्षी, जंगले आणि जमीन या सर्वच क्षेत्रात भयानक स्वरुप धारण करुन नैसर्गिक संतुलनाचा त्रास करत आहे. अशा परिस्थितीत गांधी अर्थकारणाची पाऊले कशी टाकावीत ?

–गांधीजींच्या अर्थकारणात वनस्पती, पशु आणि माणस ह्या तिघांच्याही सहजीवनांवर जोर दिला आहे. या तिघांच्याही सहयोगात्मक प्रक्रियेतून प्रगती आणि विकास साधण्याची वृत्ती होती.

कुटुंबे फक्त राजाराणीची नसतात. त्यांत इतर स्नेहसंबंधही असतात. तेवढ्यानेही पोट भरत नाही. म्हणून संयुक्त कुटुंबात एक तरी प्राणी सदस्यासारखा सामील होतो. मग तो गाय, बैल, घोडा, कुत्रा, मांजर किंवा पोपट असेल. तरी यानेही कुटुंबाला पूर्णत्व प्राप्त होत नाही. म्हणून वनस्पती आणि झाडे यांचाही कौटूंबिक सहभाग असतो. जागा नसेल तर एकच तुळशीचे रोपटे असते. निसर्ग, पशू आणि माणूस यांचे सहयोगात्मक सहजीवन तर स्वयंपूर्ण आहे.

शेवटी विकास म्हणजे काय हे ठरवावेच लागेल. विनाशातून विकास की सहयोगातून विकास हा मूलभूत प्रश्न आहे उत्पादक 'मकान के लिये या दुकान के लिये ?' योजना ?' 'मॅन पावरवर आधारित का हॉर्स–पॉवरवर ? यंत्र 'माणसाची जागा घेतील का त्याची सोबती होतील ?' हे सगळे विकास नितीतले प्रश्न आहेत !

कुणाच्या तरी विनाशातून शेलक्या लोकांचा विकास म्हणजे भकासपणा आहे. ते अर्थशास्त्र नव्हे, अनर्थशास्त्र आहे. व्यर्थशास्त्र आहे आणि एका शब्दात सांगायचे तर 'स्वार्थ–शास्त्र' आहे.

※ पुराणमतवादी कट्टर धार्मिक मूलतत्ववाद भारतात आणिं जगभर फोफावला आहे. पूर्वीपेक्षा अधिक बनला आहे गांधी विचाराने या बाबतीत काय करावे ?

–धर्म माणसांना आणि मनांना जोडतो. तोडतो तो अधर्म ! कुठल्याही धर्माचे दुसऱ्या धर्माशी भांडण नसते. सर्व धर्माचे अधर्माशी भांडण असते.

तस पाहिल तर शाश्वत मूलतत्त्व सर्व धर्मात जवळपास समानच आहेत. सत्य बोलणारा हिंदूही आहे तसाच मुसलमानही आहे. कुठल्लाही धर्म खोटे बोला, अस म्हणत नाही. सर्व धर्मांत समान असणारी चांगली तत्त्वे रद्द केल्यावर जे कर्मकाण्ड उरते त्याला धर्म म्हटले जाते. आणि हीच खरी अडचण आहे.

मुल्ला–मौलवी आणि पुरोहित हे धर्मक्षेत्रांतले दलाल असतात. म्हणून

(पान ५२ वर)

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# ८

# म. गांधींच्या विचारांची सद्यः स्थितीत आवश्यकता

## ठाकुरदास बंग

आज जगात साम्यवादाच्या विचारसरणीचे प्रतीक रशिया व चीन साम्यवाद सोडून वैश्वीकरणाकडे व बाजाराच्या अर्थशास्त्राकडे झपाट्याने वळत आहेत. भारतानेही मिश्र अर्थव्यवस्थेचा त्याग करुन वैश्वीकरणावर आधारलेल्या नव्या आर्थिक नीतिचा अवलंब केला आहे. जगभर या नवीन परिवर्तनाचे जोरदार वारे वहात असतानाच यातील दोष ही वैचारिक व व्यावहारिक क्षेत्रात स्पष्टपणे जाणवू लागले आहेत. त्यामुळे जगभर या परिवर्तनाचा विरोधही वाढत आहे. आज विरोधक अल्प मतात असले तरी ही वैश्वीकरणातील अंतर्विरोध जसजसे अधिकाधिक स्पष्ट होऊ लागतील तसतसा विरोधही वाढत जाईल.

नवी अर्थनीती प्रतिस्पर्धेच्या तत्त्वज्ञानावर आधारलेली असल्यामुळे व अधिकाधिक नफा हे मर्म असल्यामुळे नफ्यासाठी हावेची मजल माणसास नीतीभ्रष्ट करते. नफ्यास म्हणजे लोभास कोणतीही सीमा नाही. यामुळे प्रतियोगीता संपून चढाओढीऐवजी ट्रस्ट-कार्टेल आदींचा जन्म होऊन याचे पर्यवसान कमी जास्त एकाधिकारात होते. एकाधिकारामुळे महागाईस व नफ्यास कोणताही धरबंधच राहत नाही. कृत्रिम आवश्यकता नफ्यासाठी पैदा केल्या जातात. अनाश्यक वस्तूंचा संग्रह वाढतो, यंत्रे व कारखाने वाढतात, हवा, पाणी प्रदुषित होते, औद्योगिकरणातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या विल्हेवाटीचा प्रचंड प्रश्न निर्माण होतो आणि परिस्थिती पूर्णपणे बिघडते. अणु उर्जेचा वापर कारखानदारीत झाला असल्यास कचऱ्याचा प्रश्न आणखीनच जीवघेणा बनतो. चढाओढीस्तव भीमकाय बहुराष्ट्रीय कॉरपोरेशनांची वाढ होते, वाटेल ती अनैतिक कृत्य लोभाच्या हव्यासापायी करण्यात या कंपन्या मागेपुढे पाहत नाहीत. या कंपन्यांना वाव न देणाऱ्या सरकारांची उलथा-

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पालथ करण्याचेही त्यांना वावडे नसते. दुरदर्शनद्वारे व जाहिरात बाजीने लोकांच्या उपभोगाची वृत्ती व काम वासना जागृत करुन आज नैतिकतेच्या कल्पना उध्वस्त केल्या जात आहेत. यामुळे लोभावर नियंत्रण कसे घालता येईल व पर्यावरण शुद्धी कशी टिकेल, आजच्या जीवनातून तणाव, कंटाळवाणे बेरोजगारीस कसे रोकावे हे प्रश्न निर्माण झाले आहेत. याचे उत्तर आज प्रचलित विचारधारेजवळ म्हणजे बाजाराच्या अर्थशास्त्राजवळ नाही.

म्हणून जगभरात शोध सुरु झाला आहे की, संबंध मानव जातीस शांत, ताणतणावमुक्त, समृद्ध प्रेममय जीवन कसे लाभेल ? विज्ञान व अध्यात्म यांचा समन्वय हा आज कळीचा प्रश्न बनला आहे याचे उत्तर पूंजीवाद वा साम्यवादात वा लोकशाहीच्या आजच्या पक्ष प्रणालीत सापडत नाही नेमके याचे उत्तर गांधींच्या/विचारात आहे. प्रत्येक माणसाची गरज पूर्ण करण्याइतकी साधनसामुग्री पृथ्वीतलावर उपलब्ध आहे. पण एकाही माणसाचा लोभ पुरा करण्याचे सामर्थ्य अवघ्या पृथ्वीतलावरील सार्‍या साधन संपत्तीत नाही.कारण लोभ अनंत आहे गांधी येथ पासूनच मुळी सुरुवात करतात. म्हणून माणसाच्या सर्व स्वाभाविक गरजा परिश्रमाने पूर्ण व्हाव्यात, पण कृत्रिम गरजांचे चोचले नकोत. साधी राहणी व उच्च विचारसरणी हे गांधी विचाराचे हृदय आहे. यामुळे हव्यास, मानसिक ताणतणाव व यांतून निघणारे मानसिक रोग, व्यसने, कामुकता व युद्ध यांना आपसुकच फाटा मिळतो कारण यांचे मूळ-लोभच कापले जाते. मानव जातीचे प्रयोजन सत्ता, संपत्ती व इन्द्रिय सुखाचा हव्यास यात नसून सत्याचा शोध यात आहे. येथून गांधीजी सुरुवात करतात. म्हणूनच त्यानी आपल्या आत्मकथेस " सत्याचे प्रयोग " हे अन्वर्थक नाव दिले. गांधी विचारानुसार होणाऱ्या समाज रचनेत सत्ता व सत्तेचे विकेंन्द्रिकरण होईल, सर्वांना आनंददायक उत्पादक काम लाभेल व शारीरिक, मानसिक व सांस्कृतिक गरजा पूर्ण झाल्यामुळे आनंद लाभेल भय भिऊन पळून जाईल, युद्ध समाप्त होईल.

आजच्या स्थितीतून ही आदर्श समाज रचना निर्माण करण्यासाठी म. गांधींनी एकादशव्रते, विधायक कार्यक्रम व सत्याग्रह ही त्रिविध उपाययोजना मांडली. सत्याग्रहाच्या अवलंबनाने अन्यायाचे निराकरण होईल व युद्धाचे प्रयोजनच संपेल. जीवन साधे व समाजरचना समजण्यास सोपी बनल्यामुळे व प्रत्येकाच्या भागीदारीने ती निर्माण होत असल्यामुळे आजचे यांत्रिक, प्रयोजनशून्य जीवन संपुष्टात येऊन ते प्रयोजनपूर्ण व आनंददायक बनेल. म्हणून गांधी विचाराचा अभ्यास व तदनुसार व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाची उभारणी केली. जाणे. आजचा युगधर्म बनत आहे. मृत्युनंतर गांधी अधिकाधिक प्रासंगिक बनत आहेत.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

१

# गांधी दर्शनाची प्रासंगिकता

## यदुनाथ थत्ते

गांधीदर्शन त्यांच्या काळात जेवढे प्रासंगिक होते त्याहून आज अधिक प्रासंगिक बनले आहे. कारण भीषण अण्वस्त्रांनी जगाला आत्मघाताच्या कडेलोटा पाशी आणून उभे केले आहे. आता सर्वोदय किंवा सर्वनाश यातून मानवाला निवड करावी लागणार आहे आणि सर्वनाशाचा मार्ग कोणीच निवडणार नाही.

### सद्यःस्थिती

कायद्यावर कायदे जगभर काढले जात आहेत आणि त्यातून पळवाटा आणि चोर-दरवाजे शोधून देणारा कायदेपंडितांचा एक वर्ग उभा राहात आहे. जितके कायदे तितके चोरदरवाजे आणि पळवाटा ! त्यातही लॉ अँड ऑर्डर च्या नावाखाली कायदा धाब्यावर बसवणारांना शासन यंत्रणेचे संरक्षण मिळत आहे आणि कायद्याच्या अंमलबजावणीचा आग्रह धरणाऱ्यांना सरकारी दंडुक्याचा प्रसाद मिळत आहे.

### कायदा आणि व्रतानुशासन

गांधीजी बॅरिस्टर असल्याने कायद्याच्या मर्यादा त्यांना ठाऊक होत्या. या उलट त्यांचा जीवनानुभव होता. त्यांच्या आईने त्यांना व्रतांचे आत्मरक्षक कवच दिले होते. त्या व्रतांनी त्यांचे ब्रिटनमधील वास्तव्यात रक्षण केले होते. त्यामुळे भारतात त्यांनी सत्याग्रही व्रतानुं शासन रुजवण्याचा प्रयत्न केला. व्रत स्वेच्छेने घेतले जात असल्याने त्यातून पळवाटा किंवा चोरदरवाजे शोधण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. परंपरागत व्रताच गांधीजीनी कालानुकूल नव्या व्रतांची भर घातली आणि संख्या अकरावर पोचवली

अहिंसा, सत्य, असत्य, ब्रम्हचर्य, असंग्रह, शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भय-वर्जन, सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी, स्पशभावना ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये!

### मानव र्माची दीक्षा

हे व्रतानुशासन म्हणजे मानवधर्माची दीक्षाच होय. गांधीजींना येणाऱ्या

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

युगाची चाहुल लागल्यामुळे त्यांनी आपल्या आत्मकथेला 'सत्याचे प्रयोग–माय एक्सपेरिमेंटस् वुईथ ट्रुथ्' असे नाव दिले. माणसाला हव्यास अंतिम सत्याचा असला तरी त्याला सापेक्ष सत्यच गवसते, त्या सापेक्ष सत्याच्या प्रकाशातच त्याला जीवनाची वाटचाल करावी लागते, मात्र नवे सत्य पुढे आले की त्याचा उमदे-पणाने स्वीकार करण्याची त्याला तयारी ठेवावी लागते. विज्ञान युगाला साजेशी ही गांधीजींची भूमिका आहे.

## संस्कृतीचा प्रश्न

माणूस जी उत्पादनाची साधने वापरतो त्यातून त्याच्या संस्कृतीचे स्वरुप ठरते. भांडवलशाहीची उत्पानद साधने व उत्पादन तंत्र कम्पुटरांनी वापरली आणि एक नव्या प्रकारची भांडवलशाही संस्कृतीच रशियात आकारास आली ! युगो-स्वालो मधील तत्त्वचितक मिरडो जिलास याने 'द न्यू क्लास' या पुस्तकात या बाबीचा मूलभूत विचार केला आहे. गांधीजींना भांडवलशाही उत्पादन तंत्राची जागा घेईल असे नवे उत्पादन विकसित करायचे होते. त्या दृष्टीने त्यांची आणि त्या दर्शनाचा समर्थकांची नवी औजारे आणि उपकरणे शोधण्याचा प्रयत्न केला. गांधीजी यंत्रविरोधी नव्हते, पण यंत्राने माणसावर नियत्रंण न करता त्याने आपल्या मर्यादित राहिले पाहिजे, असे त्यांचे मत होते. सिंगरचे शिवणयंत्र त्यांना मान्य होते. गरजेप्रमाणे मकाणात वापरावे, दुकानात ते आणू नये असे ते म्हणत.

## अनुकूल स्थिती

आधुनिक विज्ञानाचे जग आता आकारले आहे. देश इतके परस्परांजवळ आले आहेत की स्वतःचा फायदा बघून घ्यायचा तर इतरांना त्यात वाटेकरी करावे लागते आणि दुसऱ्याचे नुकसान करावचे तर स्वतःचे नुकसान करुन घ्यावे लागते. गांधी दर्शनाला ही स्थिती अकुकूल आहे.

---

(पान ४८ वरुन )

गांधींनी धर्म आणि अध्यात्म असे दोन शब्द वापरले. धर्मान्धता म्हणजे धर्म नव्हे किंवा धार्मिकता नव्हे. म्हणून वैयक्तिक पूजेच्या ऐवजी गांधींनी सामुदायिक प्रार्थना हे अध्यात्माचे प्रतिक मानले. वैयक्तिक पूजेने माणूस स्वतःसाठी मागणे मागतो. आणि राजकारणी असेल तर शत्रूच वाईट व्हावं अशीही भगवंताला प्रार्थना करतो.

गांधींच्या सर्वधर्म सामुदायिक प्रार्थनेत परस्परांच्या भलाईसाठी केलेले आवाहन असते. हिंदू, मुसलमानांचं भल व्हाव म्हणून प्रार्थना करील. मुसलमान हिंदू व खिश्चनांच भल व्हाव, म्हणून प्रार्थना करील. सर्व मिळून परस्परांच्या भलाईसाठी वाढतो. म्हणून गांधींचा धर्म अगर अध्यात्म माणसांना जोडणारे होते, तोडणारे नव्हे.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

## सर्वोदय दर्शन

गांधीजींना जॉन रस्कीन यांच्या 'अंटु धिस लास्ट' या पुस्तकाने प्रभावित केले आणि त्यातून महत्वाचे जीवन सिद्धान्त त्यांच्या हाती आले (१) सर्वांच्या भल्यात व्यक्तीचे भले असते. (२) उत्पादकाची जिंदगी ही खरी जिंदगी होय (३) सर्वांच्या प्राथमिक परिश्रमांची नैतिक व आर्थिक किंमत सारखी असली पाहिजे. बॅरिस्टर (आणि भंगी) यांच्या प्रामाणिक परिश्रमाला तुल्य आर्थिक मोबदला आणि समान प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. असे झाले तर पैशासाठी जी जीववेणी स्पर्धा समाजात माजलेली दिसते ती कमी होईल आणि आपल्या आवडीच्या क्षेत्रात माणसे सहभागी होतील. माणूस माणसाला शत्रू न वाटता साथी वाटेल. गांधी दर्शनाची ही दृष्टी आता जगात वेगवेगळचा रुपात अवतरत असल्याचे दिसते.

## मार्टिन ल्यूथर किंग

गांधीजींनी आफ्रिकेत वर्णभेदाविरुद्ध शांततामय लढा उभा केला. मार्टिन ल्यूथर किंगने गांधीजींचा सामूहिक सत्याग्रहाचा मार्ग अवलंबून अमेरिकेत वर्णभेदा-विरुद्ध यशस्वीपणे लढा दिला. द्वेषाने द्वेषाचे क्षमन होत नाही. अग्नीने अग्नी विझत नाही, पाण्याने विझतो. शठं प्रति शाष्ठर्म यामुळे दोन शंढ निर्माण होतात, शठम् सत्यंमुळे निदान शढाची संख्या तरी वाढत नाही.

## वैज्ञानिकांचे उत्तर

अण्वस्त्रांची भीषणता आणि जगाचे आधुनिक विज्ञानाने जगाचे आकसणे यामुळे अण्वस्त्रांचे भंडार असणाऱ्या देशानाही गेल्या चार तपांत त्यांचा उपयोग करता आलेला नाही. रोजगारासाठी ही निरर्थक शस्त्रास्त्र निर्मिती केली जात आहे ! या शस्त्रांच्या आधी वापर केला तर परंपरात शस्त्र युद्धाप्रमाणे यशाची हमी मिळेल काय, असे राजकीय नेते सैन्याराधिकाऱ्यांना विचारित आहेत. सैनाधिकारी म्हणत आहेत की त्याबाबतचा अनुभव पदरी नसल्याने खात्रीने काही सांगणे शक्य नाही ! याचाच सरळ अर्थ असा की आत्मघाताचा धोका पत्करल्यावाचून याबाबत काही सांगणे शक्य नाही.

## चेर्नोविलचा इषारा

अण्वस्त्रे तर भीषण आहेतच, पण रशियातील चेर्नोविलच्या अणु विद्युत निर्मिती केंद्रातील अपघाताने जगाला जो हादरा दिला त्यामुळे अशी वीज निर्माण करण्याबाबतही जगाला इषारा दिला आहे. किरणोत्सर्जी धुळीचा उपद्रव जगात कुठेही होऊ शकतो. अणु विद्युत केंद्र बंद करण्याचा (डी कमिशन) खर्च हाही प्रचंड

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आहे. हा संभाव्य धोका टाळण्यासाठी अणुवीज निर्माण करणाऱ्या भटयांचे काम थांबवण्यात आले आहे.

## सत्याचा विजय

मग शांततेचा नावाखाली माणसाने अन्यायापुढे मान तुकवावी काय? गांधी दर्शनाचे उत्तर आहे की शांततामय सत्याग्रहाचा मार्गाने अन्यायनिवारणाचा मार्ग चोखाळावा, कारण सत्याग्रहात अपयश नसते. अंतीम जय सत्याचाच होतो. पण माणसाला सत्यापेक्षा 'माझ्या सत्या'चा जय व्हावा असे वाटते. 'मम सत्य' हेच युद्धाचे कारण असते. माणसाने सत्योपासना करावी पण अनासक्त वृत्तीने करावी, असे गांधीदर्शन सांगते. व्यक्तिनिरपेक्ष सत्याचा शोध घेत राहाणे, अंतिम सत्य हाती लागावे अशी आकांक्षा धरणे आणि सापेक्ष सत्याची आराधना करीत अंतिम सत्यासाठी धडपडत राहणे हेच शक्य आहे.

## प्रबोधनाचा नवा मार्ग

विचारांच्या तीन पातळया असतात. आदर्शांचा कैफ चढलेंल्या माणसांना वास्तवाचे विस्मरण होते आणि सद्वचने ही वस्तुस्थिती समजून त्या भ्रमात ते वावरतात ! वास्तवाची निंदा केल्यावाचून आदर्शाचे आकर्षन वाटत नाही, पण विचारांची संभवाची पातळी ही विधायक कार्यक्रमांना जन्म देते. गांधींजी असे म्हणत की विधायक कार्यांची परिपूर्ती म्हणजेच स्व–राज्याची सिद्धी होय. अल्प शब्द शक्ती असणाऱ्या समाजाचे प्रबोधन शब्दांनी करता येत नाही. रचनात्मक कामांमुळें त्यांच्याशी संपर्क साधता येतो आणि असा संपर्क आला की प्रबोधनाची वाटचाल करता येते.

## शूराचा मार्ग

बदलत्या जागतिक आणि शस्त्राशस्त्रांच्या संदर्भात विचार केला तर गांधीदर्शनाची प्रासंगिकता सहज आपल्या लक्षात येऊ शकेल. पण त्यासाठी गांधीजींच्या आवडत्या भजनात म्हटल्याप्रमाणे

हरिचा मार्ग असे शुरांचा भ्याडाचे ते काम नसे रे ।

माणसाने मृत्युभय जिंकल्यावाचून गांधीजींचा मार्ग अनुसरता येणार नाही. त्यामुळे गांधीदर्शन प्रासंगिक आहे, असे शिफारसपत्र देऊन उपयोग नाही. गांधीजींनी जे सत्याग्रही व्रतानुशासन जोपासण्याचा प्रयत्न केला ते जोपासावे लागेल. अभय वृत्तीचा अर्थ आपण कोणाला भिणार नाही, एवढा मर्यादित नसून आपली कोणाला भीती वाटणार नाही इथपर्यंत विस्तारावा लागेल.

( पान ५६ वर )

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# १०

# गांधी विचाराची प्रासंगिकता

## डॉ. सुर्यनारायण रणसुभे

म. गांधींची १२५ वी जयंती देशभर साजरी होत आहे. आणखी तीन वर्षानंतर त्यांची ५० वी पुण्यतिथी देखील येथे साजरी केली जाईल. याचा अर्थच असा की गांधीना पाहिलेली, गांधींच्या सोबत प्रत्यक्ष कार्य केलेली मंडळी आता खूपच वृद्ध अशी आहेत. म्हणजे गांधी हत्येच्या वेळी ज्यांचे वय १६-१७ वर्षाचे होते, त्यांचे वय आज ६४-६५ वर्षाचे आहे. त्यांच्यासोबत १०-१०, १५-१५ वर्षे प्रत्यक्ष कार्य केलेली मंडळी आता इतिहासजमा झालेली आहेत. त्या अर्थी ज्या पिढील गांधींनी भारावून टाकले होते अथवा जी पिढी गांधीजींच्या व्यक्तिमत्वामुळे, कार्यामुळे, तत्त्वज्ञानामुळे भारावून गेलेली होती, ती आता इतिहासजमा झालेली आहे. या पिढीने गांधींजी प्रत्यक्ष त्यांच्या कार्यातून अनुभवलेला होता. त्यांच्या शब्दामुळे कोणता चमत्कार घडतो, हे त्यांनी पाहिलेले होते. पण माझ्या पिढीने गांधीना प्रत्यक्ष पाहिलेले नाही, माझ्या पिढीने गांधींना इतरांच्या माध्यमातून समजावून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवातून एका महामानवास समजून घेणे वेगळे व इतरांच्या माध्यमातून त्यांची ओळख करुन घेणे वेगळे, माझ्या पिढीला गांधी समजला तो नलिनी पंडितांनी लिहिलेल्या 'गांधी' या पुस्तकातून डॉ. लोहिया, नेहरु, मौ. आझाद या व इतर जेष्ठ-श्रेष्ठ गांधीच्या समकालीनांनी गांधीबद्दल जे काही लिहून ठेवलेले सारे ते वाचून गांधी समजून घेण्याचा प्रयत्न माझ्या पिढीने केला आहे. माझ्या नंतरच्या पिढीने तर पुस्तकात गांधी समजून घेण्याचा फारसा प्रयत्न केलेला नाही, असे खेदाने म्हणावे लागेल. त्यांना गांधी समजला तो रिचर्ड बर्टन यांच्या 'गांधी' चित्रपटातून. आता काहींना तर गांधी हा वसंत दत्तात्रय गुर्जर यांच्या 'गांधी' नावाच्या कवितेतून भेटत आहे तर गांधी सोबत प्रत्यक्ष कार्यरत असणारी पिढी इतिहास जमा झाल्यानंतर गांधीना समजावून कसे घ्यावे असा प्रश्न माझ्या पिढीसमोर उभा ठाकलेला नाही. कारण गांधी समजून घेण्यासाठी एक महत्वाचे मध्यम अजूनही माझ्या पिढीसमोर आहे. आणि हे माध्यम जोपर्यंत माझ्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पिढीसमोर आहे, आणि या माध्यमासंबंधी ज्या प्रमाणात माझ्यात अस्वस्थता आहे, त्या प्रमाणात गांधी मला अधिक स्पष्ट होत जाणार आहे. म्हणजे गांधी न वाचता, गांधी बद्दल जं लिहिले गेलेले आहे, ते ही न वाचता गांधी समजणे शक्य आहे असे मला म्हणावयाचे आहे. कवीवर्य नारायण सुर्वेनी आपल्या एका कवितेत लिहुन ठेवले आहे की मार्क्स न वाचताच त्यांना मार्क्स हा कामगारांच्या जथ्यात भेटत गेल्या. दारिद्र्य, विषमता आणि शोषणाच्या क्रूर व्यवस्थेत जगताना संवेदनशील माणूस हा त्याच्या विरुद्ध बोलू लागतो. या विषम आणि शोषक शक्तींच्या विरुद्ध संघटित होऊ लागतो. त्याला कल्पनाहीनसने की कोणा मार्क्सने या संबंधीची माडणी केलेली आहे. मार्क्स न वाचणारी तो अनुभवातून जे बोलू लागतो. त्यावरुन त्याला इतर कोणी मार्क्सवादीं ठरवित असतील तर, त्यामुळ त्याचे काही बिघडत नसते. उलट शोषणाच्या विरुद्ध असे कोणीतरी बोलणारा होता हे कळल्यावर तो मार्क्स वाचू लागतो. आपल्या अनुभवाचे आणि व्यवस्थेचे विश्लेषण तो अधिक तर्कसंगत पद्धतीने करु लागतो. हे जसे मार्क्सच्या संबंधात अनेक ठिकाणी घडले तसे गांधीच्या संदर्भांत घडत आहे आणि घडत राहणार त्यामुळेच गांधी आणि गांधीवाद ही टाकाऊ किंवा इतिहासजमा व्यक्ती आणि तत्त्वज्ञानहोऊ शकणार नाही.

---

(पान ५४ वरुन)

## विज्ञान वेत्याची ग्वाही

वैज्ञानिक पत्रकार श्रीमती बाबीदा वार्ड यांनी जगातल्या श्रेष्ठ विज्ञान वेत्यांच्या मुलाखती घेऊन 'द ओनली वन अर्थ एकच पृथ्वी' नावाचे पुस्तक लिहिले असून त्यात असे सांगितले आहे की आता जगातला कोणताही प्रश्न सुटावा असे वाटत असेल तर अवघे जग हाच एक घटक समजून विचार करावा लागेल ! सर्वांच्या भल्यात आपले भले असते या सर्वोदय दर्शनाच्या पहिल्या सिद्धांताशी त्यांचे म्हणणे मिळते जुळते आहे. सोयूझ या समानव रशियन अवकाश यानाशी अमेरिकेच्या अपोलो या समानव अवकाश यांनाही अवकाशात जोडणी केल्यावर रशियन व अमेरिकन अवकाश यांनी परस्परांना भेटले व तेथून त्यांनी पृथ्वीकडे दृष्टिक्षेप टाकला तेव्हा रशियन अवकाश यांत्रीकी रशियाची महती गायिली नाही की अमेरिकन अवकाशयांत्रीकी अमेरिकेची ते म्हणाले, " अवघी पृथ्वी एकाद्या सफर चदासारखी सुंदर दिसत आहे ! " अवघी पृथ्वी हाच एक घटक समजण्याच्या वॉर्ड यांच्या निर्णयाचेच त्यांनी समर्थन केले. अशा या परिस्थितीत सर्वोदयदर्शन हे कालोचित दर्शन आहे, असे म्हणणे भाग आहे.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

इतर तत्त्वेते, महापुरुष किंवा विचारसरणीच्या बाबतीत जे घडत असते. ' गांधीवादासंबंधी नेमके उलट घडत आहे. आणि हाच त्याचा जीवंतपणा आहे. एखाद्या विशिष्ट तत्त्वज्ञानाची ज्यावेळी मांडणी केली जाते, त्यावेळी त्याच्या नाविन्या मुळे अनेकजण त्याकडे आकृष्ट होतात, त्याची चर्चा होते. पण हळू-हळू जसा काळ पुढे जातो, तस तसे नाविन्य कमी होते. अनुयायी कमी होतात, चर्चा देखील कमी होते, झालीच तर त्याची मर्यादा स्पष्ट केली जाते. नंतर ही विचारसरणी काही मूठभर लोकापर्यन्तच मर्यादित राहते. अगदी अलीकडचे उदाहरण द्यायचे झाल्यास आर्य समाजाच्या चळवळीचे देता येईल. ५०-६० वर्षापूर्वी संपूर्ण मराठवाडा या चळवळीने ढवळून काढला होता.८०-९० वर्षापूर्वी तीन चतुर्थांश देश या विचाराने प्रेरित झाला होता पण नंतर काय घडले ? ब्राह्मो समाज, आर्यसमाज, थियोसाफिकल सोसायटी, या अलीकडच्या चळवळीचा आणि मध्यकाळातीत अशाच शेकडो चळवळींचा, तत्त्वज्ञानांचा आढावा घेतल्यास हेच जाणवते की एका विशिष्ट कालखंडानंतर ते तत्वज्ञान विशिष्ट जाती किंवा वर्णापर्यन्त मर्यादित झाले. त्यातील सर्जनशीलता संपुष्टात आली आणि त्यात कर्मकांड शिरले.

पण गांधीवादाबद्दल असे म्हणता येईल काय ? गांधी नावाची व्यक्ती संपुष्टात आल्यानंतर या देशातील परंपरेप्रमाणे जागोजागी गांधींचे पुतळे उभे कर-ण्यात आले. कर्मकांडी गांधीवादी हे विनोदाचे विषय झाले. गांधीवादाचा अतिरेक सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनातून हळू हळू कमी झाला पण या वरवरच्या गोष्टी जरी संपल्या तरी गांधी विचाराचा जो मूळ आत्मा आहे, तो मात्र जगभर मूळ धरु लागला. जसा-जसा काळ जातोय. गांधीवादानी दिलेल्या साधनांचा वापर देखील वाढत जातोय. हे कशाचे लक्षण आहे ? दक्षिण आफ्रिकेत काळ्यांच्या प्रतिष्ठेसाठी म्हणून सुरु केलेला लढा हा त्यानंतर कित्येक वर्षं यातून अहिंसा आणि काळ्यांच्या हातात अर्थात् बहुसंख्याकांच्या हातात सत्ता आल्यानंतरच एका अर्थाने हा लढा संपला. या लढयाची प्रेरणा गांधी आणि गांधी तत्त्वज्ञानातच आहे ना ! गांधीच्या कट्टर विरोधकाना देखील गांधीनी दिलेल्या साधनांचाच वापर करावा लागतो हे विशेष. गांधीवादाचा विरोध करण्यासाठी म्हणून गांधीच्याच साधनांचा वापर करावा लागतो यात गांधीनी दिलेल्या साधनांचे महत्वच सिद्ध होत असते. संघठित पण अन्यायी व्यवस्थेविरुद्ध लढण्यासाठी माणसाकडे कोणतेच हत्यार नव्हते. अगदी प्राचीन काळापासून ते गांधीचा राजकीय उदय होण्यापूर्वीच्या इतिहासाचा आढावा घेतल्यास असे लक्षात येईल की अन्यायी अविवेकी आणि अनैतिक व्यवस्था किंवा शक्तीसमोर एकटा माणूस किंवा माणसांचा समूह पूर्णपणे पराभूत होता. आपण काहींच करु शकत नाही ही भावना त्याच्यात यायची. अशा वेळी अन्यायी माणसाचा बेसावधपणे खून करणे, किंवा अन्यायाला कंटाळून स्वत: आत्महत्या करणे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

किंवा अन्याय सहन करणाऱ्यांचे संघटन करुन युद्ध करणे. हे तीनच मार्ग त्याच्या-समोर होते. यातून पहिले दोन मार्ग आत्मघातकी स्वरुपाचे होते. कारण यातून अन्याय किंवा शोषण संपण्याची शक्यताच नसायची. तिसरा मार्ग हा निश्चित यश देणारा नव्हता आणि यात मनुष्य हानीची शक्यता होती.अशावेळी आपले आणि इत-रांचे अस्तित्व न गमावता अन्यायी किंवा शोषकाविरुद्ध आपला असंतोष वेगळया मार्गाने मांडता येणे शक्य आहे हे गांधीनी आपल्या सत्याच्या प्रयोगातून सिद्ध करुन दाखवले. हा एक विलक्षण अनुभव होता. सर्वसामान्य अशी माणसे माणसावर होणाऱ्या अन्या-याच्या विरोधात एकत्र येतात, सामुहिकपणे शोषकासमोर जाऊन आपल्या मागण्या मांडतात, तो जर मान्य करीत नसेल तर सत्याचा आग्रह धरतात, विनयाने कायदा मोडतात, कायद्या आणि सुरक्षिततेची ज्यांना चिंता आहे ते त्याना अटक करतात, निमुटपणे ते त्यांचे अत्याचार सहन करतात पण सत्याचा आग्रह सोडत नाहीत. हे दोन–चारदा घडल्यानंतर सत्ताधाऱ्याला किंवा शोषकाला या संदर्भात विचार करावाच लागतो कारण जनमत त्या सत्याग्रहीच्या बाजूने उभे राहू लागते. मानवी मनाला एका विशिष्ट पद्धतीने वळवण्याचे सामर्थ्य गांधींच्या या साधनात आहे, आणि ज्याचे पुरावे वेळोवेळी जगातल्या सत्ताधाऱ्याना मिळत गेले, त्यातून गांधीवादाची महती सर्वांना पटू लागली.

सर्वसामान्य माणसात जो विश्वास गांधीनी निर्माण केला, तो अभूतपूर्व असाच आहे. मध्यकाळात काही धर्मसंस्थापकानी किंवा संतानी असा आत्मविश्वास सर्वसामान्यात निर्माण केला होता, त्यामुळे आजही ते वंदनीय आहेत. त्या धर्म-संस्थापक किंवा संतापेक्षा गांधी खूपच वेगळे आहेत. गांधी माणूस आणि माणसाचे अस्तित्व यांचा विचार मूलभूत गरजा आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाच्या संदर्भात करीत होते. माणसाचा सगळा झगडा हा स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्या-साठी चाललेला असतो आणि हे अस्तित्व टिकवण्यासाठी त्याला हवी असते स्वतंत्रता आणि शांतता. स्वाभिमानाशिवाय स्वतंत्रेची भाषा करता येत नसते आणि समते-शिवाय शांतता शक्य नसते अशी त्यांची मांडणी होती. सर्वांनी आपल्या गरजांवर किमान नियंत्रण टाकल्या शिवाय सर्वांच्या गरजा भागल्या जाऊ शकत नाहीत हे ही त्यांना स्पष्ट दिसत होते आणि त्यामुळेच ते संयम आणि किमान गरजांच्यावर भर देतात. हा शेवटचा माणूस त्यांच्या चिंतनाचा विषय होता आणि त्यामुळेच या शेवट-च्या माणसाजवळ त्याच्या शरीर आणि मनाशिवाय दुसरे कसलेच सांधन नाही आणि त्यामूळेच ते या शरीर आणि मनालाच शस्त्राचे रुप देतात आणि सत्याग्रहाची कल्पना मांडतात. त्यामुळे गांधी समजून घेण्यासाठी या देशातीलच नव्हे तर जगा-तील अर्थ आणि समाजव्यवस्थेत जो अगदी शेवटचा, नागावलेलां माणूस आहे त्याची मानसिकता समजून घेण्याची गरज आहे. हाच माणूस गांधीवर मनापासून प्रेम

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

करी असतो, याच माणसाला गांधी न वाचताही गांधीवाद समजलेला असतो. त्यामुळे हा माणूस जेवढ्या प्रमाणात स्वाभिमाने उभा राहू लागेल तेवढया प्रमाणात गांधीवादाची पुन्हा-पुन्हा चर्चा सुरु होईल. हाच घटक आपल्या सृजनशीलतेतून गांधीवादाचा नवीन आविष्कार करु लागेल.

मागील काही वर्षापासून आपल्याकडे काही वाद जाणीवपूर्वक घडवून आणले जात आहेत. आंबेडकर विरुद्ध गांधीवाद असा वाद उभा करण्याचा अयशस्वी प्रयत्न अलीकडे झाला. जवळपास चाळीस वर्षं संघ आणि हिंदुत्ववाद्यांनी गांधी आणि गांधीवादाची यथेच्छ बदनामी केली. अगदी गांधींच्या वैयक्तिक जीवनावर विकृत हल्ले करण्यात आले. अफवा पसरवण्यात आल्या. गांधीच्या तत्त्वज्ञानाने सवर्णांचे हितसंबंधच धोक्यात आल्यामुळे त्यानी हा प्रकार करावा हे स्वाभाविकच आहे. जी-जी मंडळी सामान्यांच्या बाजूने उभी राहिली त्यांच्या विरोधात प्रस्थापितानी आणि सवर्णानी आज पर्यन्त हाच उद्योग केलेला आहे. गांधी हे सामान्यांच्या मनात पक्के घर करुन आहेत हे लक्षात आल्यावर मग या मंडळीनी आपला मोर्चा तिकडे वळवला. मूळात दोन महापुरुषांच्या कर्तृत्वाची, विचाराची तुलनाच ही चुकीची असते. आणि ही तुलना करताना कालचे संदर्भ विसरणे हे दुसरी चूकीची गोष्ट असते. प्रत्येक महापुरुष हा काळाच्या चौकटीत आणि त्याच्या मर्यादेतच काम करीत असतो. त्याच्या मर्यादा त्या त्या काळाच्या मर्यादा असतात. एखादा महापुरुष हा त्या मर्यादाचे उल्लंघन करुन काळाच्या थोडासा पलीकडे झेप घेत असतो. दुसऱ्याची झेप तेवढी नसते पण म्हणून त्यांच्या प्रामाणिकपणावर अविश्वास व्यक्त करणे तर्कशुद्ध ठरणार आहे काय ? व्यवस्थेची चौकट किती प्रमाणात झुगारुन द्यायची, यावरुन महापुरुषाचे श्रेष्ठत्व ठरत नसते तर व्यवस्थेची चौकट त्याने किती प्रमाणात खिळखिळी करुन टाकली हा महत्वाचा मुद्दा असतो. प्रत्येकाला विश्वासात घेऊन काम करायचे की एका गटास घेऊन काम करायचे, हा पुन्हा ज्याच्या त्याच्या कर्तुत्वाचा, विश्वासाचा आणि दूरदृष्टीचा प्रश्न असतो. आणि त्यामुळे गांधी-आंबेडकर, गांधी-मार्क्स, गांधी-नेहरु अशा प्रकारचे निरर्थक वाद निर्माण करुन बुद्धीभेद करण्यापेक्षा या सर्वांच्या प्रयत्नातून या देशातील समाज-व्यवस्था आपल्या पारंपरिक चौकटीतून किती प्रमाणात बाहेर पडू शकली अशी मांडणी ही काळाची गरज आहे. अशा वादातून या दोन महापुरुषांचे अनुयायी परस्परापासून आणखिन दूर जाण्याचा धोका असतो. परिवर्तनाच्या प्रक्रियेत क्रियाशील असणाऱ्या मंडळींचे वेगवेगळे तंबू असणे हे प्रस्थापितांच्या हितांचे असते, किंबहुना त्यांचा तसा जाणीवपूर्वक प्रयत्न चाललेला असतो याचे भान आक्रमक परिवर्तवाद्यांना असू नये याचे आश्चर्य वाटते.

अशा वादातून गांधी किंवा आंबेडकराचे काहीच बिघडणारे नसते. पण या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

दोघानी ज्या शेवटच्या माणसाचे मात्र खूपच नुकसान होणारे असते याचे भान ठेवणे गरजेचे आहे.

गांधींचे तत्त्वज्ञान हे सर्वसामान्य माणसाला लढावू सैनिक बनवणारे तत्त्वज्ञान आहे. माणसाच्या मनात (त्यांच्या शब्दात आत्म्यात) जी अभुतपूर्व अशी शक्ती आहे, त्याचा शोध गांधींनी घेतला. या उर्जेचा वापर कसा करता येईल यासाठी अनेक प्रयोग त्यानी केले. या उर्जेचा वापर सत्ता आणि व्यवस्था बदलण्यासाठी कसा करता येईल याचा त्यानी शोध घेतला. केवळ तत्त्वज्ञानाच्या पातळीवर नव्हे तर त्यानी हे सर्व घडवून आणले. मानवी मनाच्या उर्जेचा शोध यापूर्वी अनेकानी घेतलेला होता. पण या उर्जेचा वापर वैयक्तिक मोक्ष, मुक्ती किंवा चमत्कार यासाठीच करण्यात आला. गांधींनी वैयक्तिक मनाच्या उर्जेची सांगड समूह मनाशी घालून रक्तहीन परिवर्तनाची शक्यता सिद्ध करुन दाखवलेली आहे. त्यामुळे गांधी हे केवळ ऐतिहासिक व्यक्ती ठरत नाहीत. कालौघात त्यांचे तत्त्वज्ञान संपुष्टात येत नाही. तर जेव्हा-जेव्हा माणूस व्यवस्थेच्या क्रूर प्रहाराने हतवल होईल, तेव्हा-तेव्हा जाणते अजाणतेपणे तो गांधीवादाकडे वळेल. विशेषतः लोकशाही व्यवस्थेत वैयक्तिक किंवा सामुहिक अन्यायाच्या विरोधात उभे ठाकण्याचा मंत्र गांधीवादाकडेच आहे. काल प्रवाहात गांधीवादातील जातिवादी सिद्धांत हे गळून पडतील. गळून जात आहेतच. यंत्र संस्कृतीचा त्यांचा विरोध देखील टिकू शकणार नाही. गांधीवादातील अनेक गोष्टी संपल्या असे अनेकाना आज जाणवत आहे. आणि त्यामुळे गांधीवादाचे प्रयोजनच राहिले नाही, गांधीवाद पराभूत झाला. असे इशारेचे किंवा आनंदाचे उद्‌गार त्यांच्यावर प्रेम करणारी किंवा त्यांचा तत्त्वज्ञानाचा नेहमीच विरोध करणारी मंडळी काढत असतात.

पण गांधीवादाचा जो आत्मा आहे. गांधींच्या विचाराचे मुख्य सूत्र आहे त्याचा पराभव आजपर्यन्त तरी झालेला नाही. उलट दिवसें-दिवस या सूत्राचे प्रतिपादन वेगवेगळया व्यासपीठावरुन, तत्त्वज्ञानातून होत आहे. ते सूत्र आहे मानवी मन आणि प्रस्थापित व्यवस्थेचा संबंध. व्यवस्थेत आवश्यक असणारा बदल आणण्यासाठी सामान्य माणूस काय करु शकेल ? तो आपला निषेध कसा नोदवलें ? बदलासाठी तो काय करु शकेल ? याचे उत्तर गांधीवादाने ज्या पद्धतीने दिलेले आहे, त्यातच त्याचे मोठेपण आणि त्यांची शाश्वतता लपलेली आहे.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# ११

# गांधीजींचा विचार आणि आचार व आजच्या समस्या

## ग. प्र. प्रधान

राजकीय नेते हे त्यांची राजकीय उद्दिष्टे सफल व्हावी यासाठीच मुख्यतः काम करीत असल्यामुळे जीवनविषयक मूल्यांचा विचार करण्यासाठी त्यांना फारसा अवसर मिळत नाही. काही राजकीय नेत्यांच्या कृतीला विचारांचे अधिष्ठान असले तरी वर्तमानकाली प्रश्नांतच गुंतलेले असल्यामुळे सर्वकालीन प्रश्नांसंबंधी तात्त्विक भूमिका मांडीत नाहीत. म. गांधी हे असे एक थोर नेते होते की १९२० ते १९४२ या काळात भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाचे नेतृत्व करतांना त्यांनी भविष्यकाळात भारत कसा असावा या संबंधीचे आणि जीवनातील मूल्याबाबतचे विचार सतत मांडले. गांधीजींनी अहिंसक मार्गाने चळवळ चालवून जनसामान्यांना स्वातंत्र्य संग्रामात सहभागी करुन घेतांना, भारताच्या स्वातंत्र्य चळवळीस नैतिक अधिष्ठान आहे असे सतत, आग्रहाने प्रतिपादन केले. स्वातंत्र्याचे उदात्त उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्या उद्दिष्टास अनुरुप अशी शुद्ध साधनेच वापरली पाहिजेत ही भूमिका मांडून, गांधीजींनी शांततामय सत्याग्रहाच्या मार्गाने ब्रिटिश साम्राज्यशाहीशी लढा दिला. गांधीजींची अहिंसेबांबतची तात्त्विक भूमिका त्यांचे काही निष्ठावान अनुयायी वगळता, स्वातंत्र्य लढयातील त्यांच्या अनेक सहकाऱ्यांना मान्य नव्हती. काँग्रेसने गांधीजींचे नेतृत्व स्वीकारतांना अहिंसात्मक प्रतिकार हे धोरण म्हणून मान्य केले, तात्त्विक भूमिका म्हणून नव्हे. पं. नेहरु आणि मौलाना आझाद यांनी हे अनेकदा स्पष्टपणे लिहिले आणि सांगितले. तत्कालीन परिस्थितीत जनआंदोलन हे शांततेच्या मार्गानेच चालविणे शक्य आहे ही जाणीव असल्यामुळे काँग्रेसने असहकाराची चळवळ त्या मार्गानें चालविली. १९४२ च्या आंदोलनातील भूमिगत चळवळ ही गांधीजींच्या पेक्षा अगदी वेगळया मार्गानें चालविण्यात आली. जयप्रकाश नारायण यांनी १९४१ साली देवळी तुरुंगातून जे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पत्र आपल्या समाजवादी मित्रांना पाठविले होते त्यामध्ये आगामी स्वातंत्र्य लढ्याचे स्वरुप युरोपात हिटलरने पादाक्रांत केलेल्या देशातील भूमिगत चळवळीप्रमाणे असले पाहिजे आणि शक्य असेल सर्व मार्गांनी ब्रिटिशांचे राज्य खिळखिळें केले पाहिजे हे स्पष्टपणे लिहिले होते. जयप्रकाश नारायण यांनी म. गांधींच्या वैयक्तिक सत्याग्रहा-वर, त्या पत्रात टीकाही केली होती. म. गांधींनी जयप्रकाश नारायण यांच्या भूमि-केचा निषेध केला नाही, परंतु वैयक्तिक सत्याग्रहाचे सामर्थ्य त्यांना उमजलेले नाही असे 'हरिजन' मध्ये लिहिले आणि आपण स्वातंत्र्य लढा अहिंसक मार्गानेच चालवू हे निःसंदिग्धपणे सांगितले. हा सर्व इतिहास सांगण्याचे प्रयोजन हे की म. गांधी हे तत्कालीन राजकीय समस्यांना सामोरे जातांना आपली तात्त्विक भूमिका अढळ ठेवीत होते. हे विचार त्यांनी प्रसंगानुरुप स्फुट लेखांतून वा अग्रलेखांतून मांडले. आपली वैचारिक भूमिका तर्कसंगत रीतीने मांडणारा ग्रंथ त्यांनी लिहिला नाही. समाजवादी विचारांची मांडणी मार्क्सने ज्या तत्त्वज्ञानात्मक पद्धतीने केली त्या रीतीने गांधीजींनी त्यांची वैचारिक भूमिका मांडलेली नाही. मात्र त्यांनी वेळोवेळी लेखणातून वा भाषणातून व्यक्त केलेल्या विचारांमध्ये नैतिक मूल्यांचे अंतःसूत्र होते आणि म्हणूनच आचार्य जावडेकरांसारख्या विचारवंतांनी 'गांधीवाद' असा शब्द प्रयोग सतत केला. गांधींजी स्वतःला तत्त्वज्ञानी माणीत नसत. 'मी आयुष्यभर सत्याचे प्रयोग केले' असेच ते म्हणत, मात्र सत्याचा आविष्कार अहिंसेच्या मार्गानेच होईल अशी त्यांची भूमिका होती; आणि म्हणून सत्य आणि अहिंसा हे अविभाज्य आहेत असे ते सांगत.

## विचार आणि आचार

टॉलस्टॉय यांच्या धर्मविषयक मतांचा आणि जीवनदृष्टीचा गांधीजींच्या वर प्रभाव पडला होता. सत्याग्रहाच्या मार्गानेच अन्यायाचा प्रतिकार केला पाहिजे या त्यांच्या भूमिकेस थोरोचे विचार वाचल्यानंतर, एक खंबीर आधार मिळाला होता. रस्किनने 'अन टू धिस लास्ट' या ग्रंथात मांडलेल्या श्रमविषयक सिद्धांतामुळे आणि अन्त्यो-दयाच्या कल्पनेमुळे गांधीजींच्या विचारांना निश्चित दिशा मिळाली होती परंतु हे लक्षात ठेवले पाहिजे की या थोर ऋषितुल्य विचारवंतांनी आपली तत्त्वे वैयक्तिक जीवनात आचरण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. गांधीजींनी हे विचार स्वतः आच-रणात आणताना जनसामान्यानाही आचरता येतात हे दाखवून दिले. विचा-रानुरुप आचरण करणारी मोठी माणसे असतात. परंतु उदात्त विचार हा केवळ मुठभर साधकांसाठी नाही. सर्वसामान्य माणूस अन्यायाचा निर्भयपणे प्रतिकार कर-ताना उदात्त विचारांप्रमाणे कृती करतो हे गांधीजींनी स्वातंत्र्य लढयात जगाला दाखवून दिले. सत्याग्रह हा हिंसक मार्गापेक्षा श्रेष्ठ आहे हे सांगतांना गांधीजींनी, हिंसक कृतीतून द्वेष वाढतो, सूडाची साखळी सुरु होते; उलट अहिंसक प्रतिकार

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

करतांना साम्राज्यासारख्या अनैतिक व्यवस्थेविरुद्ध आपण लढत असतो आणि या लढयात व्यक्तिद्वेषाला स्थान नसते हा विचार सतत मांडला 'मी ब्रिटिश साम्राज्याचा सर्वात मोठा शत्रू आहे आणि त्याच वेळी ब्रिटिशांचा सर्वात मोठा मित्र आहे' हे गांधीजींचे वाक्य टाळी मिळवण्यासाठी उच्चारलेले नव्हते. अन्यायाचा प्रतिकार अहिंसेच्या मार्गाने केल्यास प्रतिपक्षाचे अंतःकरण जिंकता येईल, त्यालाही आपली नैतिक भूमिका मान्य करावी लागेल असा गांधीजींचा मनोमन विश्वास होता. ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध लढा करताना गांधीजींनी सामुदायिक सत्याग्रहाचा जो प्रयोग करुन दाखविला, त्यामुळेच जगात अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या अनेक थोर राजकीय नेत्यांना त्यांचे मोठेपण समजून आले. निग्रोना अमेरिकेत सन्मानाने जगता यावे या साठी प्रदीर्घ प्रयत्न करणारे मार्टिन ल्यूथर किंग आणि फिलिपाइन्स मध्ये हुकुमशाहीचा प्रतिकार करतांना निर्भयपणे मृत्यूला सामोरा जाणारे थॉमस अक्किनो यांना गांधीजींच्या विचारांमुळेच प्रकाशकिरण गवसला. दक्षिण आफ्रिकेचे नेते नेल्सन मंडेला यांनी म. गांधींचे तत्त्वज्ञान स्वीकारले नसले तरी गांधीजींचे ऋण त्यांनी मान्य केले आहे.

गांधीजींनी सत्याग्रहाला देशव्यापी स्वरुप प्राप्त करुन दिल्यामुळे स्वातंत्र्याचा विचार देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला, रुजला आणि फोफावला. यामधून स्वातंत्र्य लढयाची तीव्रता जशी वाढत गेली त्याचप्रमाणे त्याकाळात भारताच्या सार्वजनिक जीवनाची पातळीही उंचावली जे स्वातंत्र्य लढयात प्रत्यक्ष सहभागी झाले नाहीत अशा असंख्य लोकांवरही गांधीजींच्या नैतिक शिकवणुकीचा प्रभाव पडला. सत्य आणि अहिंसा हे केवळ भारताच्या राजकीय चळवळीतील परवलींचे शब्द राहिले नव्हते. या शब्दाच्या आशयाने भारताच्या सामाजिक जीवनातील दंभ, दुराचार आणि हिंसा काही प्रमाणात कमी झाली. आज भारतात भ्रष्टाचार आणि हिंसा यांनी थैमान घातले असताना गांधीजींचा नैतिक आचरणात्मक आग्रह कसा अमोल होता हे जाणवते.

## हिंद स्वराज्य

गांधीजींनी १९०८ मध्ये 'हिंद-स्वराज्य हे पुस्तक लिहिले. त्यामध्ये त्यांनी भविष्यकाळात भारताने कोणत्या दिशेने वाटचाल करावी यासंबंधीचे जे विचार मांडले. त्यापैकी अनेक विचार अत्यंत मौलिक आहेत. भारतातील नागरिक निर्भय असावा, अन्याय आणि विषमता यांना त्याने सतत विरोध करावा, अस्पृश्यतेचा कलंक नष्ट व्हावा, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान असावे हे गांधीजींचे विचार कोणीच अमान्य करु शकणार नाही. अर्थात भारताच्या समा–

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जरचनेचे स्वरुप काय असावे या संबंधी गांधीजींचे सर्व विचार त्यांच्या निकटच्या अनुयायांनाहीं मान्य नव्हते. गांधीजी 'पं. नेहरु हे माझे राजकीय वारस आहेत' असे म्हणत. स्वातंत्र्य चळवळीत गांधीजींचे नेतृत्व पं. नेहरुंनी मान्य केले आणि त्यासाठी आपल्या अनेक विचारांना मुरड घातली. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पं. नेहरुंनी पंतप्रधान म्हणून जी धोरणे कार्यवाहित केली ती गांधीजींनी 'हिंद स्वराज' मध्य मांडलेल्या काही विचारापेक्षा अगदी वेगळी होती. आधुनिक जगात भारताला अन्य राष्ट्रांच्या समवेत सन्मानाचे स्थान प्राप्त होण्यासाठी आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान स्वीकारले पाहिजे आणि केवळ शेतीतर अवलंबून न राहता भारताचे औद्योगीकरण केले पाहिजे असा निर्णय पं. नेहरुंनी घेतला आणि सरदार पटेल व चिंतामणराव देशमुख व अन्य सहकाऱ्यांच्या संमतीने या निर्णयाची कार्यवाही केली. ज्याला मूलभूत उद्योग (बेसिक् इंडस्ट्रीज) म्हणतात त्यांची उभारणी पं. नेहरु पंतप्रधान असतानाच झाली आणि त्यामुळेच आपल्या राष्ट्राच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेला पाया घातला गेला. तसेच वीजनिर्मिती, पोलादाचे उत्पादन यामुळे देशाच्या प्रगतीस चालना मिळाली.पं.नेहरुंच्या नियोजन विषयक धोरणात आणि म.गांधींच्या ग्रामस्वराज्याच्या कल्पनेत कोणतेही साम्य नव्हते.म.गांधींना अर्थव्यवस्था संपूर्ण विकेन्द्रित असावी असे वाटत होते आणि खेडी स्वयंपूर्ण झाली पाहिजेत असा त्यांचा दृष्टिकोण होता.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा या विकेन्द्रीकरणास कडवा विरोध होता आपल्या खेडे गावांतील समाज हा जातीव्यवस्थेने सडला असून तेथे दलितांना न्याय मिळणे शक्य नाही, असे त्यांचे म्हणणे होते आणि म्हणून भारताचे आधुनिकीकरण व औद्योगीकरण झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. सामाजिक विषमतेच्या निर्मूलनाच्या संदर्भांत डॉ. आंबेडकराचा विकेन्द्रीकरणास जो विरोध होता तो योग्य होता असे मला वाटते. परंतु औद्योगीकरण आणि आधुनिकीकरण यामुळे काही बाबतीत प्रगती झाली तरी अनेक नव्या समस्याही निर्माण झाल्या या कठोर सत्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

## गांधी विचार आणि डॉ. लोहिया

अशा गुंतागुंतीच्या परिस्थितीत नवा विचार मांडणाऱ्या प्रतिभावान नेत्याची आवश्यकता असते आणि समाजवादी नेते डॉ. राम मनोहर लोहिया यांनी असा नवा विचार मांडला हे मान्य केलेंच पाहिजे. १९५३ साली पंचमढी येथे भरलेल्या समाजवादी पक्षाच्या अधिवेशनात, 'भारताने आपला विकास साधताना' आपल्या परिस्थीला अनुरुप असे तंत्रविज्ञान (अॅप्रोप्रिअेट टेक्नॉलजी) स्वीकारावी आणि उत्पादन क्षेत्रात छोटया यंत्रांचा वापर करावा,' असा विचार डॉ. लोहिया

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

यांनी मांडला. भांडवलशाही व कम्युनिझम हे राजकीय क्षेत्रात दोन ध्रुव असले तरी भांडवलशाही राष्ट्रांनी आणि रशिया व अन्य कम्युनिष्ट राष्ट्रांनी एकाच तऱ्हेचे प्रचंड यंत्राधिष्ठित उत्पादनतंत्र स्वीकारले आहे हे सांगून, या दोन भिन्न समाजरचना मध्ये अर्थसत्ता व राजसत्ता यांचे केन्द्रीकरण झाले आहे हे डॉ. लोहिया यांनी दाखवून दिले. ' माणूस हा विकासाचा केन्द्रबिंदू असला पाहिजे ' हा गांधीजींचा दृष्टिकोन स्वीकारतांना, डॉ. लोहिया यांनी आपण कालानुरुप विज्ञान व तंत्रविज्ञान यांचा शहाणपणाने वापर केला पाहिजे असे प्रतिपादन केले. खेदाची गोष्ट ही की सांकेतिक विचार करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांनी आणि म. गांधींच्या विचारापलीकडे नवा विचार मांडणे हे पाखंड आहे असे मानणाऱ्या अनेक सर्वोदयी नेत्यांनीही डॉ. लोहिया यांच्या विचारांची पुरेशी दखल घेतली नाही.

## आजच्या सदर्भात गांधी विचार

जगामध्ये गेल्या अर्ध-शतकात तंत्रविज्ञानात फार मोठे बदल झाले आहेत.ज्ञानाचे क्षितीज विस्तीर्ण होत चालले आहे.दळण वळणाच्या साधनांमध्ये फार मोठे बदल झाले आहेत. कॉम्प्युटर,इलेक्ट्रॉनिक्स,उपग्रहाच्या साहाय्याने दूरदर्शनचे वाढलेले सामर्थ्य या सर्वांचा परिणाम उत्पादन तंत्रावर, आणि सर्वसामान्य माणसाच्या जीवन विषयक अपेक्षांवर आणि आकांक्षावर होणे अपरिहार्य आहे. जगातील लोक झपाटयाने एकमेकाच्या जवळ येत असताना, जगातील विज्ञान आणि तंत्रविज्ञान क्षेत्रातील घडामोडींचा परिणाम सर्वांवर होणारच. सुरुवातीस या बदलांमुळे जग दिपून गेले तरी काही अत्यंत जटील समस्या निर्माण झाल्यामुळे हा बदल म्हणजे इष्ट अशी प्रगती नाही याचे भान विचारवतांना येऊ लागले आहे. माणसाला भोवळ येईल इतका वेग जीवनाला आला आहे. या वेगामुळे माणसे स्वताला पारखी होऊ लागली आहेत शांतपणे जगणे, विचार करणे, चिंतन करणे, कुटुंबात व समाजात जिव्हाळा राहणे अशक्य प्राय होऊ लागले आहे. एकीकडे संपत्ती अमाप वाढत असतानाच कोटयावधी लोक दारिद्र्यरेषेखाली जगत आहेत. विषमतेमुळे ताण तणाव अत्यंत तीव्र झाले आहेत. त्यामुळे हिंसाचार प्रचंड प्रमाणात वाढला आहे चैन वाढली आहे आणि समाधान हरपले आहे. चंगळवाद बोकाळला आहे आणि माणसांची मने रिती, भकास होऊ लागली आहेत. अशा परिस्थितीत जगातील काही विचारवंतांना म. गांधींच्या विचाराकडे वळावेसे वाटत आहे : ' माणूस मुक्त झाला पाहिजे, तो यंत्राचा गुलाम होऊन चालणार नाही, ' या गांधीजींच्या विचाराचे परिशीलन अनेकजण करु लागले आहेत. ' निसर्गाशी माणसाचे जिव्हाळयाचे नाते आहे, ' हा गांधीजींचा विचार, आधुनिक काळात निसर्गाचा विनाश होताना पाहून, अनेकांना आज मौलिक वाटत आहे. पर्यावरणवादी चळवळीतील विचारवंतांनी गांधीजींच्या. विचारांकडे जगाचे लक्ष वेधले

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आहे.

## तिसरी लाट

पंधरा वर्षापूर्वी टॉफलर यांचे 'थर्ड वेव्ह' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्या पुस्तकात टॉफलर यांनी मानवी संस्कृतीची पहिली लाट कृषी संस्कृती होती, दुसरी लाट औद्योगिक संस्कृती होती आणि आता तिसरी लाट येऊ पहात आहे असा विचार मांडला आहे. औद्योगिक संस्कृतीमुळे अर्थव्यवस्था, राज्यव्यवस्था, सामाजिक आणि कौटुंबिक जीवन यात कोणते उत्पात झाले. निसर्गावर आक्रमण करणारा मानव स्वतःच्याच विनाशाकडे कसा चालला आहे याचे भेदक विवेचन टॉफ्लर यांनी केले असून या सर्व आपत्तींवर मात करण्यासाठी मानवाने नवा मार्ग चोखाळला पाहिजे असा विचार मांडला पाहिजे. हा नवा मार्ग 'निसर्गाकडे परत' (बॅक टू नेचर) असा असू शकणार नाही हे त्यांनी स्पष्ट केले आहे. तंत्रविज्ञानासंबंधी विवेचन करताना माणसाला घडयाळाचे काटे मागे फिरविता येणार नाहीत, हे त्यानी मान्य केले आहे. परंतु उपलब्ध विज्ञान, तंत्रविज्ञान याचा वापर कोणत्या रीतीने करावयाचा याचे नवे मार्ग शोधण्याची आवश्यकता आधुनिक जगातील विचारवंतांना वाटू लागली आहे, आणि या विचारमंथनातूनच मानवी संस्कृतीची तिसरी लाट येईल असे टॉफ्लर यांचे प्रतिपादन आहे. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान स्वीकारुन त्याचा वापर गांधीजींनी सांगितलेल्या विकेन्द्रित रीतीने केला तर आपल्या अनेक समस्या सुटू शकतील असा टॉफ्लर यांचा सिद्धांत आहे. उत्पादन व्यवस्थेचे केन्द्रिकरण करुन प्रचंड मोठे औद्योगिक प्रकल्प शहरात उभारण्याऐवजी आपण झोपडोपर्यंत इलेक्ट्रॉनिक्स नेले पाहिजेत आणि उत्पादनाचे घटक विकेन्द्रित केले पाहिजेत असे टॉफ्लर यांचे म्हणणे आहे. उपग्रहाच्या साहाय्याने मिळणारे ज्ञान आपण जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचविले पाहिजे आणि समाजजीवन हे गांधीजींनी म्हटल्या प्रमाणे छोटया गावा गावात बहरले पाहिजे असे सांगताना टॉफलर यांनी 'गांधींच्या समवेत उपग्रह' (गांधी वुअिथ सॅटलाइट) असे एका प्रकरणाला शीर्षक दिले आहे. निसर्गाला ओरबाडून काढून उर्जा मिळविणे घातक आहे हे सांगतांना टॉफ्लर यांनी सौर उर्जा, बायोगॅस यंत्रातून निर्माण होणारी उर्जा आदींचा पुरस्कार केला आहे. पाणी अडवावे लागणार परंतु प्रचंड धरणे बांधून अनेकांचे जीवन उध्वस्त करण्याऐवजी, निसर्गाची लय सांभाळून छोटी धरणे बांधणे जरुरी आहे, या विवेचनातून सूचित झालें आहे अशा रीतीने उत्पादन व्यवस्थेची पुनर्रचना केली तर कुटूंब व्यवस्थेत आणि समाज व्यवस्थेत काय बदल होतील हे टॉफ्लर यांनी विस्ताराने मांडले आहे.

## सर्व हाताना काम

'अॅप्रोचिंग टेव्न्हटी फर्स्ट सेंच्युरी' या पुस्तकात पॉल केनेडी यांनी एकविसाव्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

शतकात विकसनशील राष्ट्रांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे याचे विवेचन करताना भारताच्या प्रचंड लोकसंख्येचा उल्लेख केला आहे. आधुनिक तंत्र-विज्ञानाच्या साह्याने उत्पादन वाढविता येईल, झपाट्याने करता येईल, परंतु बेकारीचा प्रश्न कसा भीषण होईल, याकडे केनेडी यांनी लक्ष वेधले आहे. 'सर्वांच्या हाताना काम मिळाले पाहिजे आणि श्रमांना प्रतिष्ठा लाभली पाहिजे,' असा गांधी-जींचा दृष्टिकोन होता. आज आपल्या अर्थव्यवस्थेत जे प्रचंड बदल होत आहेत, बहु-राष्ट्रीय कंपन्या ज्या रीतीने भांडवलाची गूंतवणूक करुन आधुनिक तंत्रविज्ञानाधिष्ठित कारखाने काढत आहेत, त्यांच्यामुळे भारतात नवश्रीमंतांचा एक वर्ग वाढू लागला आहे. परंतु या अर्थव्यवस्थेचे फायदे गरीब माणसाला मिळण्याची सुतराम शक्यता दिसत नाही. अत्याधुनिक तंत्रविज्ञानामुळे अनेक कारखान्यामध्ये नोकर कपातच सुरु झाली आहे अशा वेळी बेकारी कमी करण्यासाठी आपल्याला पुन्हा गांधीजींच्या विचाराच्या आधारानेच उत्पादन व्यवस्थेची उभारणी करावी लागेल.

## स्वत्व आणि सहिष्णुता

अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या 'ग्लोबल पॅरॅडॉक्स' (जगाला व्यापून टाक-णारी विसंगती) या ग्रंथात, एका बाजूला आर्थिक क्षेत्रातील नव्या प्रवाहांमुळे राष्ट्रांच्या सीमा धूसर होत आहेत, टी. व्ही. आणि दळवळणाच्या सुविधा यामुळे जगातील लोक एकमेकांच्या अधिकाधिक जवळ येत आहेत, आणि त्याच वेळी वंश धर्म, पंथ, जात, भाषा, प्रदेश याबाबचे मानवसमूहांचे अहंकार अत्यंत तीव्र झाल्या-मुळे जगभर हिंसाचार आणि रक्तपात उसळला आहे- या विसंगतीकडे लक्ष वेधले आहे. या विसंगतीमुळेच सोव्हिएट संघराज्यातून अनेक घटक फूटून बाहेर पडले आणि बॉस्निया व सर्बिआ याच्यांत वंशिक युद्ध चालू आहे. या व अशा संघर्षांबाबतचे विवे-चन वाचताना गांधीजींचा शांततामय सहजीवनाचा आग्रह किती महत्वाचा होता याची जाणीव मला झाली. सर्व भेदांवर मात करुन मानवा-मानवांत ऐक्य व बंधु-भाव निर्माण करण्यासाठी सहिष्णुवृत्ती जोपासली पाहिजे अशी गांधीजींची शिकवण होती मात्र सहिष्णुता म्हणजे दुबळेपणा नव्हे हेही त्यांनी स्पष्ट केले. इतराचा दृष्टि-कोन समजून घेतांना, अन्यायाशी तडजोड करुन चालणार नाही, सत्याचा आग्रह कधीही सोडता येणार नाही अशी गांधीजींची भूमिका होती. प्रत्येकाने स्वतःशी प्रामाणिक राहिले पाहिजे, स्वत्व गमावून चालणार नाही, हे त्यांना आपल्या अनुया-यांना बजावून सांगितले. "माझ्या घरात सर्व दिशांनी वारे वाहू देत; परंतु त्या वाऱ्यामुळे माझे घर मात्र उडून जाऊन चालणार नाही,' गांधीजींचे वाक्य त्यांच्या वैशिष्टपूर्ण व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे आहे. बदलत्या जगाचा विचार कर-तांना आणि तत्कालीन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतांना गांधीजींनी शाश्वत मूल्याचे आणि सत्याचे भान सतत राखले. त्यामुळेच १२५ व्या जयंती वर्षांतही त्यांच्या अनेक विचारांचा ताजेपणा आपल्याला मुग्ध करतो.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# १२

# महात्मा गांधी आणि आजचा संदर्भ

## कान्तिभाई शाह

'हिंदस्वराज्य' ला मी गांधींचा जाहीरनामा मानतो. सर्वोदयाचे घोषणा-पत्र मानतो. ते एका सर्वनाशक तत्त्वज्ञानापुढचे बुलंद आव्हान आहे; एका नव्या युगाचे प्रवर्तन करणारे दिव्य दर्शन आहे. माझ्यासाठी गांधी म्हणजे 'हिंदस्वराज्या' चा गांधी.

'हिंदस्वराज्या' चा गांधी हा सर्व मानवजातीचा आत्मीय स्वजन आहे, परमहितचिंतक आहे, सहृदय मित्र आहे. 'हिंदस्वराज्य' च्या पानापानावर एक बेचैनी आहे, व्याकुळता आहे. त्याला जणू कळले आहे की या मार्गावर तर सर्वनाशा-शिवाय काहीच नाही. आपल्या आप्तजणांना त्यापासून कसे वाचवायचे?– यासाठीची तळमळ त्यात आहे. या पुस्तकात बुद्धीला पटवण्याचा खूप प्रयत्न आहे, पण मनाला स्पर्शून जाते ती मानवजातीला वाचवण्यासाठी एका महापुरुषाची व्याकुळता. त्यातच 'हिंदस्वराज्य' चे मर्म आहे.

म्हणूनच विनोबांनी म्हटले की 'हिंदस्वराज्य' मध्ये गांधीचे विशुद्ध हृदय प्रकट झाले आहे. विशुद्ध हृदयातच सत्याचे खरे रुप प्रतिबिंबित होते. यालाच तर प्रतिभा म्हणतात. प्रतिभासते इति प्रतिभा। हिंदस्वराज्यमध्ये अशा प्रतिभेची झलक दिसते. विशुद्ध हृदयामुळेच गोष्टीच्या मुळाचा वेध घेणारी सुक्ष्म दृष्टी, आर्ष दृष्टी प्राप्त झाली आहे.

गांधीजींच्या रस्त्याने जाणारे जितके सहप्रवासी आहेत, संघटना आहेत, सर्व एकत्र येऊन एकजुटीने गांधींच्या स्वप्नातला भारत घडविण्यासाठी निघाले आहेत. आम्ही सर्व एकदिलाने, एकदम गांधी-कस्तुरबाच्या सवाशे व विनोबा-गोप-बंधुच्या शताब्दीच्या प्रसंगी, एकाच ध्येयाने प्रेरित होऊन ग्रामस्वराज्याच्या प्राप्ती-करिता एकत्र येऊ या. नवीन सहकारी जोडू या. जनतेला जागृत व संघटित करु या व आपल्या ध्येयाप्रत अधिक वेगाने जाऊ या.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गांधीजींनी भौतिकवादी पाश्चिमात्य सभ्यतेला आव्हान दिले. या सभ्यतेचा तेव्हा सर्वत्र बोलबाला होता. दुनियाभर तिचे साम्राज्य पसरले होते. तिच्या माया-जालाने सारे दिपून गेले होते. परंतु गांधींनी तिला पूर्णपणे नकार दिला. तिच्या-बंड पुकारले. ही सभ्यता मानवद्रोही आहे, अनीतिमय आहे, मनुष्यजातीसाठी सर्वथा अकल्याणकारी आहे हे त्यांनी पाहिले.

निघाले तर ते होते भारताच्या स्वातंत्र्याची गोष्ट करायला. पण ते गुलामींच्या मुळाशी पोचले. या सभ्यतेच्या गुलामीतच राजकीय गुलामीचे मूळ आहे असे त्यांनी म्हटले. फक्त राजकीय गुलामीपासून मुक्ती पुरेशी नाही जग-भर पसरणाऱ्या वैचारिक साम्राज्यवादापासून मुक्त व्हायचे आहे. खरी गुलामी तत्त्वज्ञानाची गुलामी आहे. हे तत्त्वज्ञान सर्वनाशाकडे नेणारे आहे. त्याच्या मुळा-शीच पाप आहे.

'हिंदस्वराज्य' त्या तत्त्वज्ञानाचे सूक्ष्म विश्लेषण करते. गांधींनी काही मूल्ये, काहीं कसोटया मांडल्या, आणि त्या संदर्भात ही सभ्यता कशीं विपरीत दिशेने जात आहें हे दाखवून दिले. 'हिंदस्वराज्य' मधल्या अनेक गोष्ठी आजही आपल्याला मार्ग दाखवू शकतात. त्यात गोष्टी नव्या आहे असे नाही; काही गोष्टी तर सनातन कालापासून अनेक महापुरुष सांगत आले आहेत. काही गोष्टी मात्र गांधींनीच प्रथम मांडल्या. विनोबांनी म्हटले होते की गांधींसारखे महापुरुष विरळच, ज्यांच्या व्यक्तित्त्वात प्राचीन परंपरेचे बीज आहे. हे अगदी खरे आहे.

गांधींचे म्हणणे नेहमी अगदी-सरळ असते. ते शास्त्री नव्हते. म्हणून गांधींनी प्रकट केलेली तत्त्वेही अत्यंत सरळ आहे. सत्य खरोखर सरळच असते. आपण उगाचाच तर्कानि, बुद्धीने त्याला गुंतागुंतीचे करतो. 'हिंदस्वराज्य' मध्ये विशुद्ध हृदयाने सांगितलेल्या गोष्टी अगदी सरळ आहेत. विशुद्ध हृदयाने ग्रहण करण्याचा, समजून घेण्याचा प्रयत्न केला तर त्या लगेच कळतील.

गांधींनी या सभ्यतेच्या रोगाचे मूळ शोधले. ही सभ्यता भौतिकवादी आहे; इंद्रियसुख तिचे मुख्य ध्येय आहे भोगसाधनांची जमवाजमव करण्यात ती एवढी गुंग झाली आहे की उच्चतर गोष्टींसाठी तिच्यापाशी वेळच नाही. गांधी म्हणालें- " या सभ्यतेची ओळख ही आहे की याने मनुष्य बाहेरच्या शोधात आणि शरीरसुखात सार्थकता व पुरुषार्थ मानतो. "

सुखवाद आणि भोगवाद या काही नव्या गोष्टी नाहीत. परंतु आधुनिक सभ्यतेने त्यांनाच जीवनाचे लक्ष्य मानलें, विकासाचा, प्रगतीचा मानदंड मानले विज्ञान त्यांच्या हातचे खेळणे बनले. गांधीच्या मर्मभेदी दृष्टीने हे अचूक ओळखले.

त्यांनी हेही पाहिले की या सभ्यतेने स्पर्धेला सर्वोपरि मानले आहे. स्वार्थ साधनालाच ध्येय मानले आहे. त्यामुळे तर मनुष्य शेवटी मानवताच गमावून बसेल.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गांधींच्या मर्मभेदी दृष्टीने अचूक ओळखले.

त्यांनी हेही पाहिले की या सभ्यतेने स्पर्धेला सर्वोपरि मानले आहे. स्वार्थ–साधनालाच ध्येय मानले आहे. त्यामुळे तर मनुष्य शेवटी मानवताच गमावून बसेल. ही मानवीय संस्कृती नाही.

म्हणून गांधीनी तीव्रपणें म्हटले की हे सारे चूक आहे. या रस्त्याने जाऊन माणूस कधी सुखी व्हावयाचा नाही.

आज इतक्या वर्षांनंतर काय स्थिती आहे ? भोगवाद कित्येक पटींनी वाढला आहे. सुख–साधनांची रेलचेल आहे. आम्ही ऐकले होते की गरज ही शोधांची जननी आहे, परंतु आज नफेखोरीसाठी निरुपयोगी वस्तू बनवल्या जात आहेत व मग धुवांधार जाहिरातबाजीने कृत्रिम मागणी निर्माण केली जात आहे. मनुष्य उपभोक्ता-वादाचा बळी झाला आहे.

तरीही जीवनात सुख–संतोष आहे काय ? उलट भोगाची भूक वाढली आहे. नशाखोरी, मानसिक रोग वाढले आहेत. सुख सुविधांची रेलचेल असलेल्या अमेरिकेत एका वर्षात चार लाख किशोर–कुमारांनी आत्महत्येचा प्रयत्न केला. हेच दिसते की या व्यवस्थेत कुठेतरी काहीतरी गडबड निश्चित आहे.

आणि हा भोगवाद जितका ओंगळ आणि बीभत्स आहे, त्याहून जास्त बीभत्स आहे भोगवाद आणि भुकेचे सहअस्तित्व. लाखो लोक भुकेने मरत आहेत. जागतिक आरोग्य संस्थेचे आकडे सांगतात की जगात जवळपास ७० कोटी लोक भुकेने पीडित आहेत. दरवर्षी दीड कोटी लोक भुकेने मरतात. सोमालियात एक तृतीयांश लोकांची उपासमारी होत आहे. पाच वर्षाहून कमी वयाच्या बालकांपैकी २५ टक्के जण उपासमारीने मेले. आयर्लंडची मेरी रॉबिन्सन हे सारे पाहून आली आणि नंतर नैरोबीला पत्रकार परिषदेत बोलताना तिला हुंदका आवरेना. म्हणाली "माझे हृदय शरमेने भरुन गेले आहे. आम्ही स्वतःला विकसित म्हणवणारे मानव–ताच तर हरवून बसलेलो नाही ? "

विकासाच्या वेदीवर माणसांचे बळी जात आहेत. पोटाला पुरेसे अन्न नाही. ल्यायला पुरेसा कपडा नाही. १९६५ मध्ये आपल्या येथे प्रतिव्यक्ती १६ मीटर कापड खपत होते. १९९१ मध्ये फक्त ८ मीटर कापड विकले गेले.

अमानुष विकास रोखण्यासाठीच गांधींनी उपनिषदासारखा मंत्र दिला– 'पृथ्वी प्रत्येकाच्या गरजा पूर्ण करु शकते, परंतु कोणा एकाचाही लोभ नव्हे' गांधींचा हा मंत्र ध्रुवताऱ्यासारखा सदैव मार्गदर्शन करेल.

यंत्राबद्दलही गांधींनी असाच एक मंत्र दिला. गांधींच्या यंत्रविषयक भूमिके–बद्दल उगाच वादविवाद होतात. पण त्यांची भूमिका अगदी साधी आहे. भौतिकवादी सभ्यतेतील यंत्रवेड शोषणासाठी, सत्तेसाठी आहे. ते थांबले पाहिजे. मानवी श्रम

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वाचवणे हा यंत्राचा खरा उद्देश आहे, म्हणून लोभाऐवजी प्रेम त्याच्या मागे पाहिजे. गांधींनी सिंगर शिवणयंत्राचे उदाहरण दिलें. ' लोभाची जागा प्रेमाने घेतली की सारे काही ठीक होईल. "

म्हणून माझ्या पींडवळच्या आदिवासाला रोजीरोटी मिळावी यासाठी मला चरखा हवा असला तरी भंगीकाम किंवा खाणकामासाठी मी यंत्रमानवही पसंत करेन अतिनाजुक कामासाठी अद्यतन यंत्राचे मी समर्थन करीन गांधींची कसोटी 'लोभाची जागा प्रेमाला द्या '–नजर साफ करते.

महादेवभाईच्या दैनंदिनीत प्राचीन व आधुनिक अमेरिकेबद्दलच्या एका पुस्तकात उल्लेख आहे. त्यात रोमन सम्राट वेस्पासियनची गोष्ट आहे. एका माणसाने त्याला एका यंत्राचा नमुना दाखवला आणि सांगितले की या यंत्राने आपल्याला खूप कमी मजूर लागतील, खर्चही कमी लागेल, आणि उत्पादन अनेकपट होईल. सम्राटाने यंत्र कुतुहलाने पाहिले. ते बनवणाऱ्याची तारीफ केली, त्याला इनाम दिले–आणि तो निघून गेल्यावर ते यंत्र मोडून टाकले ! म्हटले–माणसाकडून काम हिरावून घेणारे आणि माझ्या प्रजेला उपासमारीकडे ढकलणारे असे यंत्र मला नको.

प्रेम यंत्रावर नसून माणसावर असले तर प्रत्येक समंजस ' सहृदय माणस हेच करेल.

प्रत्येक माणसाला अर्थपूर्ण काम मिळायला हवे, त्यातच त्याचा समुचित विकास आहे. म्हणून गांधींनी आपल्याला सावध केले–मनुष्याच्या अवयवांना काम न मिळाल्याने ते गंजून जाऊ नयेत. तसे करणारी यंत्रे नकोत.

आजच्या भौतिकवादी सभ्यतेत मनुष्य मुख्य नाही, तर धनलालसा आहे म्हणून मनुष्य अत्यंत दयनीय अवस्थेला पोचला आहे. बेकारी जगभर एक कठीण प्रश्न बनला आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या आकडयांनुसार जगात १२ कोटी लोक बेकार व ७० कोटी जवळपास बेकार आहेत. औद्योगिकदृष्टचा विकसित देशांतही बेकारीची समस्या उग्र बनली आहे. श्रीमंत अमेरिकेत प्रत्येक दहाजणांमागे एकजण, म्हणजे सुमारे अडीच कोटी लोक दानधर्मांवर जगत आहेत. पश्चिम युरोप–मध्ये साडेतीन कोटी लोक बेकार आहेत. कोटचावधी लोकांची कार्यक्षमता शून्य करणारी ही कसली व्यवस्था आहे ?

ही अर्थव्यवस्था अनर्थव्यवस्था आहे. मानवभक्षी व्यवस्था आहे. गांधींनी तिच्याविरुद्ध आवाज उठवला तो मानवप्रेमातून. म्हणूनच त्यांनी म्हटले की शहरी–करणाने माणसाचे कल्याण होणार नाही. या भौतिकवादी सभ्यतेमुळे गावे तुटू लागली तेव्हा मार्क्स खूष झाला. कामगार क्रांतीसाठी यामुळे अनुकूलता वाढेल असे त्याला वाटले. गांधींनी उलट पाहिले की यामुळे मनुष्य संस्कृतीचा ऱ्हास होईल. आज शहरे वाढताहेत शहरी लोकांपैकी १०० कोटी लोक झोपडपट्टयांमध्ये

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

राहत आहेत.

पैशाच्या मोहामुळे कसा अनर्थ होत आहे हे गांधींच्या सूक्ष्मदृष्टीने ताडले. त्यांनी म्हटले. " हा पैसा आपले रक्तशोषण करील, कारण आपला नीतिधर्मच तो हिरावून घेईल. "

सभ्यतेच्या रोगाच्या नाडीवर गांधींनी अचूक बोट ठेवले. जगात अनेक भुकेले लोक असूनही, भाव पडू नयेत म्हणून ही सभ्यता अन्नधान्य, दूध नष्ट करु शकते. हाच शास्त्रीय आर्थिक व्यवहार मानते. संहारक शस्त्रांच्या व्यापारात तिला संकोच वाटत नाही. पैशासाठी वाटेल ते करायला माणूस तयार होतो. बालकासाठी आईचे दुध सर्वोत्तम असल्याचे सर्वसामान्य असताना 'बेबीफूड' चा व्यापार ही व्यवस्था उभा करु शकते. आता हृदय, किडणी यांचे ट्रान्सप्लँट होऊ लागले आहे, तर त्या अवयवांचा व्यापार वाढतो आहे.गरीब लाचारीने अवयव विकत आहेत, त्यासाठी खून होत आहेत, लहान मुलांचे अपहरण होत आहे. पैशामागे पागल झालेली ही: सभ्यता नैतिक व मानवीय मूल्यांचा कसा सत्यानाश करते, याची ही सारी उदाहरणे आहेत.

या सभ्यतेची इमारतच शोषणाच्या पायावर उभी आहे. युरोप-अमेरिका-वाले आज आपल्या इथल्या बालमजुरीबाबत होहल्ला करताहेत, पण त्यांचे औद्योगीकरण मुलांच्या घाम व रक्तावर उभे आहे. १८१९ मध्ये इंग्लंडमध्ये कायदा बनला की ९ वर्षाखालच्या मुलांना कामावर ठेवता येणार नाही, आणि ९ ते १६ वयाच्या मुलांकडून १२ तासांवर काम घेता येणार नाही. तेव्हा या कायद्याविरुद्ध कारखान-दारांनी मोठा गहजब केला की यामुळे विकासावर प्रतिकूल परिणाम होईल !

या व्यवस्थेने आपल्या मजुरांचे शोषण केले. मग जगभरच्या लोकांचे बेसुमार शोषण केलें. आफ्रिकेतून लोकांना गुलाम म्हणून नेले. त्याचा इतिहास शहारे आणणारा आहे. तो माणसासाठी लांच्छनास्पद इतिहास आहे.

ही सभ्यता गोऱ्या माणसाच्या घमेंडीवर उभी आहे. गोऱ्या माणसाला वाटते की तो सर्वश्रेष्ठ आहे. बाकीच्या असभ्य लोकांना त्याला सभ्य बनवायचे आहे' कोलंबस अमेरिकेत पोचला तेव्हा तेथील आदिवासींची संख्या ११ कोटी होती. आज त्यांची संख्या हजारांमध्येही नसेल ! तास्मानियांत आदिवासींचे सरसहा शिरकाण करण्यात आले. डार्विनने म्हटले, " आता यापुढे, सभ्य वंश जगातील जंगली जमा-तींना नष्ट करुन त्यांची जागा घेतील. '

सभ्यतेचा हा रानटी चेहरा पाहूनच सत्य-अहिंसेचे उपासक असलेल्या गांधींचे हृदय बंड करुन उठले.

गांधींनी म्हटले-" युरोप सर्व काळ्या आदिवासींना आपले भक्ष्य मानतो. केवळ पैशाचा लोभच जेथे असेल तेथे दुसरे काय होऊ शकते ? कुठलाही नवा देश

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

दिसला की कावळ्याने मांसावर तुटून पडावे तसे ते लोक त्यावर तुटून पडतात!"

या केवळ गतकाळच्या गोष्टी नाहीत. आजही आपल्या डोळ्यापुढे हे घडत आहे. तीच घमेंड, तीच निर्दयता, तीच निर्लज्जता ! फरक एवढाच की आता सुरा भोसकून मारले जात नाही–विजेच्या शॉकने मारले जाते. रक्ताचा एक थेंब गळत नाही !

श्रीमंत देशांनी आपल्यासारख्या देशांना जणू कचरापेटी मानले आहे. आरोग्यावर घातक परिणाम करणाऱ्या अनेक औषधांना ते त्यांच्या देशात बंदी घालतात आणि आपल्याकडे खूप विकतात. तीच गोष्ट कीटकनाशकांची. विषारी औद्योगिक कचराही ते शक्कलहुशारीने गरीब देशात ढकलून देतात. विषारी कच–ऱ्याची निर्यात बंद करण्याठी जागतिक कायदा करण्याचा प्रयत्न झाला, पण श्रीमंत देशांनी तो हाणून पाडला. त्यांचे वेकार तंत्रज्ञानही ते आम्हाला निर्यात करतात.

तेव्हा, रंगभेद, गुलामी, नरबळी, साम्राज्यवाद वगैरेचा जमाना गेला असा भ्रम नको. या साऱ्या गोष्टी सोफिस्टिकेटेड रुपात आजही अस्तित्वात आहेत. शोष–णही आहे. ते सूक्ष्म बनले आहे, नियमबद्ध बनले आहे.

जगाला लुटायचे, साऱ्या जगातील साधनसंपत्ती हडप करायची हे या सभ्य–तेचे पहिल्यापासूनच एक मुख्य लक्षण आहे. यासाठी स्पर्धा चालते. त्यातून विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दोन महायुद्धे झाली. आता त्यासाठी तिसरे महायुद्धही होऊ शकते.

या सभ्यतेने निसर्गावर अनन्वित अत्याचार केले आहेत. नैसर्गिक संपत्तीचे कितीतरी खनिजे तिने रिते केले आहेत. ही ययाति–सभ्यता आहे. भावी पिढ्यांच्या वाट्याची नैसर्गिक संपत्तीही ती गिळंकृत करुन बसली आहे. पृथ्वीच्या पर्यावरणाशी तिने जो पोरखेळ केला आहे त्याचे भयंकर परिणाम मानवजातीला शेकडो वर्षे भोगावे लागतील. जग इतके विषयुक्त कधीही नव्हते. हवा, पाणी, जमीन अन्न-इतकेच नव्हे तर आईच्या दुधातही विषारी पदार्थ भरले आहेत. ओझोन आवरणाचा ऱ्हास, आम्लवर्षा, पृथ्वीचे वाढते तापमान इ. समस्यांनी तर पृथ्वीवरील मानव–जातीचे अस्तित्वच धोक्यात आणलें आहे. माणूस स्वतःला बुद्धिवान प्राणी समजतो, पण कोणत्याही अन्य प्राण्याने आपले घरटे इतके घाणेरडे, इतके विषारी केले नसेल. रियो–द–जानिरो च्या पृथ्वी परिषदेत क्यूबाच्या फिडेल कॅस्ट्रोनी श्रीमंत देशावर कोरडे ओढले–"भयंकर नुकसान आणि अनर्थ करणारी तुमची जीवनशैली आणि उद्योगपद्धती आमच्यावर थोपू नका. त्यामुळेच तर आमच्यावर एवढे विदेशी कर्ज झाले आहे. त्या विदेशी कर्जाची गोष्ट करु नका. तुमच्यावर जे पर्यावरणीय कर्ज आहे ते तुम्ही फेडा. फक्त आपला स्वार्थ साधणे आणि दुसऱ्यांवर अधिपत्य गाजवणे या निकृष्ट मनोवृत्तीतून बाहेर या. निर्दयता, बेजबाबदारपणा, कपट, दांभिकता

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सोडा."

मानवी मूल्यांचा विकास हाच खरा विकास, अशी घोषणा बुलंद स्वरात करावी लागेल. भौतिक वाढ हवी पण त्यातच जीवनाचे सार–सर्वस्व नाही. भौतिक वाढीला विवेकपूर्ण लगाम लावला जावा. माणसाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक विकासाकडेही पुरेसे लक्ष असावे. समाजातील शेवटच्या माणसाची भौतिक उन्नती सर्वप्रथम व्हावी. समाजात विषमता सतत कमी व्हावी. सामाजिक न्यायाशिवाय समाजात शांतता कदापि नांदू शकत नाही.समाजात प्रत्येकाला अर्थपूर्ण व प्रतिष्ठित काम, हा एक अनिवार्य उद्देश असावा. आमचा विकास सृष्टीशी सुसंवादी असेल.

विकासाचा नवा स्वदेशी नमुना, मानवीय नमुना पेश करण्याचे आज आपल्यासमोर आव्हान आहे. या दिशेने भरपूर विचार झाला आहे, अनेक प्रयोगही झाले आहेत, अनेक नव्या गोष्टी पुढे आल्या आहेत. आता गरज आहे सामूहिक इच्छाशक्तीची, आत्मविश्वासपूर्ण संकल्पबळाची, भ्रमापासून मुक्त होण्याची, 'विकासाच्या' दौडीत सामील होण्यसा नकार देण्याची. त्यांच्यापासून शिकण्यासारखे जे असेल ते आम्ही अवश्य शिकू, पण विकास आमच्या पद्धतीनेच करु. आमचीही एक संस्कृती आहे, एक जीवन–दर्शन आहे, विश्व दर्शन आहे, काही मूल्ये आहेत–आमचीच नव्हे, तर सर्व मनुष्यजातीचीच मूल्ये आहेत. आमचा विकास त्यांच्यावर आधारित नसावा.

हाच गांधींचा संदेश आहे.'हिंदस्वराज्य'मध्ये तो शब्दांकित झाला आहे.हा संदेश सगळया मानवजातीसाठी आहे. हा सर्वोदयाचा संदेश आहे. विनोबांनी ठीकच म्हटले होते की सर्वोदय समाजाचे मूळ स्वरुप थोडयाशा 'क्रुड' शब्दात 'हिंदस्वराज्य'मध्ये सापडते.

गांधी म्हणाले होते, या सभ्यतेत जितके पाखंड, आहे, तसे पाखंड कोणत्याही धर्मांत दिसत नाही. याचा परिणाम जेव्हा लोकांना दिसेल, तेव्हा पूर्वीच्या काळचे अंधविश्वास तुलनेत बरे वाटतील."

सभ्यतेच्या अंधविश्वासापासून माणसाला वाचण्यासाठीच गांधींचा जन्म आहे. तेच त्यांचे युगकार्य आहे.

हे युगकार्य नीट समजून घ्यायचे आहे आणि ते पुढे चालवायचे आहे. ही केवळ चरखा किंवा तकली चालविण्याची गोष्ट नाही, केवळ बहुराष्ट्रीय कंपन्याना विरोध करण्याची गोष्ट नाही, केवळ प्रदूषण रोखण्याची गोष्ट नाही. एका चुकीचे तत्त्वज्ञान बाजूला सारुन त्याच्या जागी मानवकल्याणकारी नव्या तत्त्वज्ञानाची प्रतिष्ठापना करण्याचे हे काम आहे. यासाठी बदलावे लागेल, आमची चिंतनपद्धती बदलावी लागेल, आमची जीवनदृष्टी बदलावी लागेल.

यासाठी पंचविध कार्यक्रम हाती घ्यावा लागेल–

(१) पहिले काम आहे सातत्यपूर्वक व्यापक व सखोल विचार प्रचाराचे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ही विचाराची लढाई आहे. समोरच्या विचाराचे दुष्परिणाम, त्याची अर्थशून्यता दाखवीत रहावे लागेल आणि आपला विचार नाना परींनी सांगत रहावा लागेल. नवे लोकमानस तयार करावयाचे आहे.

दुसरे काम आहे जीवन-उपासनेचे. आमचा विचार आमच्या जीवनात किती उतरला आहे ? गांधी असा मनुष्य होता, ज्याने रात्री आगगाडीत रस्किनचे पुस्तक वाचले आणि सकाळ झाल्याबरोबर त्यानुसार जीवन बदलण्याचा संकल्प केला. दीड महिन्यांच्या आत नव्या जीवनाची साधना सुरु केली. त्याचे जीवनच त्याचा संदेश होता. अशा महापुरुषाचा संदेश आपल्या जीवनाद्वाराच आपण जगात पसरवू शकू.

(३) तीसरी गोष्ट आहे प्रयोग. विचारानुसार प्रयोग करुन दाखवावे लाग-तील. नको असे आपण म्हणत असू, तर मानवीय तंत्रज्ञानाचे प्रयोग करुन पर्याय पुढे ठेवावा लागेल, रासायनिक खते-जंतुनाशके नको म्हणत असू तर सजीव शेतीचे प्रयोग करावे लागतील. प्रत्येक सेवकाचे एक प्रयोगक्षेत्र असावे, जेथे त्याने आपला विचार प्रत्यक्षात आणण्याची धडपड करीत रहावी. प्रयोगांचे, अनुभवाचे आदान-प्रदान होत रहावे.

(४) चौथी गोष्ट म्हणजे एक समूह उभा करावा लागेल. हे काम व्यक्ति-गत उपासनेचे किंवा व्यक्तिगत क्रांतीचे नाही. आम्हाला तर समाज परिवर्तन करा-यचे आहे. अशा लोकांचे भ्रातृमंडळ बनवले पाहिजे. आज परिवर्तनवाले वेगवेगळ्या गटात विभागले गेले आहेत. त्यांनी एकत्र यावे. बाह्य रुपाचा आग्रहही नको. अमुक खादी वापरत नाही, अमुक राजकारण सोडत नाही, वगैरे गोष्टी आड येऊ नयेत. तंत्र सोडा, तत्त्व पकडा. आज वाद जवळपास संपले आहे. आज एका बाजूला आहे जीवनाचा विचार, तर दुसऱ्या बाजूला आहे मरणचा विचार. जीवनाचा विचार मानणाऱ्याचे भ्रातृमंडळ बनावे. जगभर असे लोक आहेत, त्या सर्वांचा घनिष्ठ संपर्क व्हावा.

(५) प्रतिकाराचे प्रसंगही होऊ शकतात, असे कारगिलचे प्रकरण आले. असा पंचविध कार्यक्रम ही आजच्या युगाची मागणी आहे. जे काही करा-यचे, ते जागतिक दृष्टिकोनातून करायला हवे. त्या संदर्भात वर्तमानातील समस्यांकडे पहावे, त्यांच्यावरचे उपाय शोधावे.

जगातील अधिकांश दुःखद दारिद्रय अस्तेय-सिद्धांताच्या भंगामुळे निर्माण झाले आहे.

— गांधीजी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# १३

# व्रत-एकादशी : एक संस्कृति-साधना

## प्राचार्या ताराबाई परांजपे

म.गांधी येरवडा जेलमध्ये असताना त्यांनी आश्रमवासीयांसाठी दर मंगळवारी अेक प्रवचन लिहून पाठविले.या प्रवचनांचे संकलन "मंगल प्रभात' या नावाने प्रसिद्ध आहे. ही प्रवचने आणि म. गांधींनी वेळोवेळी सांगितलेली आचारसंहिता अेका श्लोकात सूत्रबद्ध करुन पू. विनोबाजी भावे, यांनी त्याला "व्रत एकादशी" असे नाव दिले. ही व्रत-एकादशी पुढीलप्रमाणे-

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, असंग्रह, शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन ।
सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना ही अेकादश सेवाची नम्रत्वे व्रत-निश्चये ।

अखिल चलाचल सृष्टीत मनुष्य हा अेक अत्यंत बुद्धिमान प्राणी आहे, होय. तो बुद्धिमान आहे, पण प्राणीच आहे. त्याच्या बुद्धीला सद्भावनेची जोड मिळाली नाही तर तो पशूपेक्षाही अधिक हिंस्र होऊन भयानक संहार करु शकतो. म्हणूनच माकडापासून बनलेल्या या प्राण्यावर सुसंस्कार करुन त्याला मनुष्य बनवावे लागते. प्रत्येक माणसात जन्मत:च अेक ईश्वरी अंशही दडलेला असतो अशी म. गांधीची श्रद्धा होती. या ईश्वरी अंशाला आवाहन केले तर वानरापासून बबलेल्या नरापासून नारायण होवू शकतो. नराचा नारायण बनवण्याचे काम सस्कृतीने केले आहे. म्हणून म. गांधींनी व्रत-एकादशीच्या निमित्ताने जी आचार-संहिता सांगितली आहे, ती ऐक संस्कृती-साधना आहे.

मानवी संस्कृतीचा स्तर उंचावण्याचे काम करणारा परमेश्वराचा प्रेषित मानव-कल्याणासाठी युगायुगाला अवतार घेत असतो. तो द्रष्टा असतो. वर्तमान-कालाच्या पलीकडे जाऊन तो भविष्यात डोकावून पाहू शकतो. म्हणूनच त्यांचा संदेश त्रिकालाबाधित असतो. त्याच्या समकालीनांना त्याचे महात्म्य जाणवत नाही. पटत तर मुळीच नाही. म्हणून ते त्याची अवहेलना करतात, त्याचा छळ करतात, त्याला सुळावर चढवतात आणि त्याच्यावर गोळया झाडून त्याला ठार करतात. त्याला ठार केले तरी त्याचा दिव्य सदेश उरलेला असतो. त्या संदेशामधील सामर्थ्य

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

लोकांना त्याच्या बलिदानानंतर पटते. म. गांधींच्या संबंधातही तेच घडले आहे.

आजच्या काळात म. गांधींची शिकवण केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात शिरोधार्य मानली जात आहे. शस्त्रास्त्रबलाने कुणी वर्षांनुवर्षे राज्य करु शकत नाही आणि दडपशाहीने स्वातंत्र्यकांक्षेला दाबून ठेवू शकत नाही हे लोखंडी पडद्याआडच्या जगाला सुद्धा पटले आहे. म. गांधींनी माणसाच्या मुक्तीसाठी सांगि-तलेली व्रत–एकादशी सर्वोदयी संस्कृती निर्माण करणारी आहे.जगातल्या सर्व वादाचे प्रयोग होऊन गेल्यावर शेवटी उरणार आहे तो सर्वोदय, अंतोदय. मानवी संस्कृतीला 'सर्वेऽपिसुखिन:संतु' या ध्येयाकडे नेण्यासाठीच म. गांधींनी व्रत–एकादशीचे निरुपण केलेले आहे.

## अहिंसा

'अहिंसा परमो धर्म' हे वचन धार्मिक क्षेत्रात मान्यता पावलेले, पण राजकारणाच्या क्षेत्रात मात्र 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ?' असा सवाल करणाऱ्या तत्त्वावर दृढ विश्वास होता. त्यामुळे म. गांधींची अहिंसा हा अेक पलायन-मार्ग आहे, ते भ्याडाचे तत्त्वज्ञान आहे अशी अत्यंत प्रतिकूल टीका झाली, याच अहिंसा तत्त्वाच्या जोरावर म. गांधींनी ब्रिटीश साम्राज्यशाहीला टक्कर दिली. म. गांधींची अहिंसा हा भेकाडाचा पलायनवाद नसून शांतिसैनिकांचा मृत्यूजंय मंत्र होता. ही अहिंसा 'अभया' च्या हातात हात घालून आलेली होती. 'सर्वत्र भय-वर्जन' या तत्त्वावर ही अभय–भावना आधारलेली होती. म्हणूनच ती मृत्यूवर मात करणाऱ्या हुतात्म्यांची यशोगाथा ठरली. आजच्या युगात तर अहिंसक लढयांचा हा महामंत्र साऱ्या जगातील महान शक्तींना नमविण्यासाठी यशस्वीरीत्या वापरला जात आहे.

म. गांधींची अहिंसा हे राजकारण साधण्यासाठी वापरलेले एक धोरण नव्हते, तर ती एक जीवनश्रद्धा होती. या जीवनव्यापी तत्त्वाचा त्यांनी अगदी सूक्ष्म आणि अनेक अंगोपांगानी विचार केलेला होता. एखाद्या माणसाला शारीरिक इजा करणेच नव्हे, तर त्याचे मन दुखावणं सुद्धा हिंसाच आहे असे म. गांधींनी सांगितलेले आहे. मानवी संस्कृतीच्या दृष्टीने हा विचार फारच मोलाचा आहे. पशुपातळीवरच मनुष्य मारामारी करतो. तो थोडा सुसंस्कृत झाला तर शब्दाचा मारा करतो, कोर्ट-कचेऱ्या करतो. पण प्रतिपक्षाला क्षमा करणे, हा जो दैवी गुण आहे तो दैवी गुण आत्मसात करुन कुणाचेही मनसुद्धा न दुखावणे, कुणाचे मनानेसुद्धा वाईट न चिंतने ही खरी अहिंसा. या अहिंसा तत्त्वाने माणसांच्या मनामनांची जोडणी होते. ही मना-मनाची जोडणी करण्यासाठीच म. गांधींनी अहिंसेबरोबरच 'सर्वधर्मसमभाव' आणि 'स्पर्शभावना' ही तत्त्वे सांगितली. 'मग जुळते तो क्षण सोन्याचा' अशी अवस्था असल्यामुळे मने जुळली की माणूस जुळतो आणि माणूस जुळला की देश एकसंघ

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

होतो. म्हणून आजच्या विघटनवादी वातावरणात पुन्हा एकदा म. गांधींची विचा-रांचा प्रचार होणे अधिक अगत्याचे आहे.

दैनंदिन जीवनात वैयक्तिक पातळीवर सुद्धा कुणाला लागेल असे न बोलणे म्हणजे अहिंसा व्रताचे पालन करणे आहे. आणि हेही फार अवघड आहे. कारण माणसांची जीभ फार बेलगाम आहे. ही जीभ शब्दांच्या शस्त्राने बेछूट वार करीत सुटते आणि शेवटी मनुष्य जेव्हा भानावर येतो तेव्हा " फटकळ जिभेले काय बोल-लीस " असे म्हणून कपाळाला हात लावतो. म्हणून जिव्हा या इंद्रियावर बोलणे आणि खाणे या दोन्ही बाबतीत नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

## संस्कृती-स्वयंनियत्रण

इंद्रियांवर नियंत्रण ठेवणे म्हणजेच संस्कृती आहे, असे सुप्रसिद्ध विचारवंत श्री. जे. सी. पोवीज म्हणतात. Culture and self-control are synony-mous terms " संस्कृती आणि स्वयंनियंत्रण ह्या पर्यायवाची संज्ञा आहेत या शब्दात त्यांनी आत्मसंयमनाचे महत्व सांगितले आहे. म्हणून म. गांधींनी सांगितले ' अस्वाद ' हे जिभेवर नियंत्रण ठेवणारे व्रत माणूस जिभेचे लाड पुरविण्यासाठी भर-भरुन खातो आणि स्वतःच्या शरीरावर अत्याचार करतो. हे खाण्याचे चोजले पुर-विण्यासाठी तो दुसऱ्यांच्या हक्काचे सर्व काही खाऊन टाकतो.निरनिराळया स्वादांच्या संवर्धनांच्या उपभोगाच्या मागे लागलेला माणूस बिनदिक्कतपणे पैसा खातो. म्हणून ' अस्वाद ' हे व्रत स्वीकारुन सर्व प्रकारच्या उपभोगांवर नियंत्रण ठेवावे असे म. गांधी म्हणतात. ' व्रम्हचर्य ' हे व्रत म्हणजे त्यांच्या दृष्टिकोणातून केवळ जननेंद्रिय-दमन नव्हे तर, ते सर्वेन्द्रिय-दमन आहे. व्रम्हाच्या शोधार्थं चर्या, म्हणजे आचरण असा त्याचा विशेष अर्थ आहे.

म. गांधींनी सांगितलेली सत्याची उपासना ही आजच्या काळात फारच आवश्यक आहे. आजच्या जगात सत्याचा शोधच करावा लागत आहे. कविवर्य विंदा करंदीकर एका कवितेत म्हणतात, ' मला अेक कळाले आहे, सुवर्णाच्या रथात बसून सत्य येथून पळाले आहे. " कधीकाळी तरी सत्याची जागा माणसांच्या हृदय-सिंहा-सनावर होती पण तो स्वार्थांच्या पाठीमागे लागला. सत्याला त्याने पदच्युत केले, म्हणून सुवर्णाच्या रथात बसून पळून गेले, हे म्हणणे तंतोतंत पटते. या जगात मात्र सुवर्णाला-पैशाला. पैसा नसेल तर " दारिद्रय दुःखा दुसरी उपाधी " अशी अवस्था होते.

## विषमतेचा नाश

आर्थिक विषमतेने ग्रासलेल्या या जगात माणूसकी संपून गेली. ही आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी म. गांधींनी अस्तेय, असंग्रह आणि शरीरश्रम ही तीन

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

व्रते सांगितलेली आहेत. अस्तेय म्हणजे चोरी न करणे.दुसऱ्याच्या हक्काची कोणतीही वस्तू स्वत:साठी हिरावून घेणे म्हणजे चोरी करणे. कामगारांच्या श्रमशक्तीतून निर्माण झालेले "अतिरिक्त मूल्य" (Surplus value) हिसकावून घेणे म्हणजे सुद्धा चोरीच आहे असे सांगून म. गांधींनी साम्यवादाशी जवळीक साधली. याच अस्तेयाची दुसरी बाजू आहे शरीरश्रम. ही कल्पना टॉल्स्टॉयच्या Bread-labour या कल्पनेशी मिळतीजुळती आहे. स्वत:ची भाकरी प्रत्येकाने स्वत:च्या निढळाच्या घामानेच मिळविली पाहिजे असा शरीरश्रम या व्रताचा संदेश आहे. या व्रतामध्येच श्रमप्रतिष्ठा अंतर्भूत आहे. राजेशाहीमध्ये वतनदार ऐतखाऊ होते. नव्या इंग्रजांच्या राजवटीत या वतनदारांच्या जोडीला ब्रिटिश साम्राज्यशाहीचे अनेक हस्तक स्वत: श्रम न करता दुसऱ्यांच्या श्रमशक्तींवर जगावयाला लागले. ब्रिटिशांच्या राजवटीत केवळ पांढरे कपडे घालून बौद्धिक श्रम करणाऱ्या पांढरपेशा समाजाची प्रतिष्ठा वाढली. शेतात, कारखान्यात, बांधकामावर, खाणीत आणि जंगलांत कष्टाची कामे करणाऱ्या शेतकरी-कामगारांला प्रतिष्ठा नव्हती. म्हणून म. गांधींनी समाजातले हलक्यातले हलके काम करणारा भंगी हा शरीरश्रमाचा आदर्श मानला. प्रत्येकाने शरीरश्रम करुन स्वत:ची भाकरी मिळवावी हे त्यांचे तत्त्व साम्यवादाला जवळचे आहे. या तत्त्वामध्ये जमीनदारी, जहागीरदारी आणि भांडवलशाहीचा विरोध आहे. म्हणूनच म. गांधींजीची विचारप्रणाली पुरोगामी समजली जाते.

अशी ही म. गांधींजीची व्रत-अेकादशी सर्व प्रकारच्या पिळवणूकीच्या शापापासून मुक्त आहे. ती वर्गविहीन समाजरचना आणण्यास वचनबद्ध आहे. ही व्रत एकादशी समताधिष्ठित समाजात राहणारा सुसंस्कृत माणूस निर्माण करणारी आहे. व्रत-अेकादशी मानवाच्या मनाची उंची वाढविणारी, बुद्धी आणि भावना याचा सुमधुर संगम करुन विशाल मानवतेची पूजक अशी नवी संस्कृती निर्माण करणारी एक संस्कृती-साधना आहे.

---

"माझें घर सर्व बाजूंनी बंद व्हावे आणि खिडक्या घट्ट बसाव्यात, अशी माझी ईच्छा नाहीं सर्व राष्ट्रातल्या संस्कृतीने माझ्या घरात शक्य तेवढ्या मोकळेपणाने घुसावे असे मला वाटते. परंतु त्या कोणामुळेच माझे पाय घसरावेत असे मला मुळीच वाटत नाहीं." – गांधीजी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# १४

# गांधींजी व जागतिक शांतता

## डॉ. भाऊराव चिंचनसुरे

पूर्वी वहातुकीचे साधन फारच मर्यादित स्वरुपात होती. जग अफाट दिसत होते.आता ज्ञानातील वाढ,व विज्ञान तंत्रज्ञानामुळे जग अगदी जवळ जवळ आले आहे जागतिक संस्कृती एक बनत आहे. परंतु, विज्ञान आणि तंत्रज्ञानाने निर्माण झालेल्या अत्याधुनिक सुविधामुळे मानवी जीवन हे संपूर्णतया सुखी झाले असे म्हणणे चुकीचे ठरेल. कारण, येणाऱ्या सुखसोयी बरोबरच येणाऱ्या आधुनिक सुविधा. सोबत; मानवी जीवन ही तणावग्रस्त बनले आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाने जीवनाला प्रेरणा मिळत नाही.

आज जगाची धाव पैसा गोळा करणे, सत्ता वाढविणे, चंगळ करणे त्या करिता प्रसंगी हिंसा देखील करणे; याकडे दिसून येते. पाश्चात्य औद्योगिक भौतिक भोगवादी ऐहिकनिष्ठ संस्कृतीचा आक्रमणाचा परिणाम संपूर्ण जगावर होऊन,असंतोष अतृप्ती, अनिती याची दाट छाया पडलेली दिसते. आज नितीमत्तेचा ऱ्हास झपाट्याने होत आहे. यामुळे धर्मवेड, हिंसा, विध्वंसक प्रवृत्ती, संवेदनशील व गोंधळमय अवस्था वाढली आहे.

आध्यात्मिक वा नैतिक विचारानेच जीवनाला प्रेरणा मिळत असते. मावनी जीवनाच्या ज्ञानाच्या कक्षा जरी विस्तारल्या तरी ज्ञानास आध्यात्मिक जोड असणे आवश्यक आहे. कारण आध्यात्मिक व नैतिक जाणीवामुळे मानवी जीवनात घडणाऱ्या गोष्टीची दखलही केवळ जाणीव पातळीवर न घेता, ती दखल, मूल्याधिष्ठीत गृहीतावर घेतली जाते.

मानवी समाजाला नेहमी बदल पाहिजे असतात. समाज सतत परिवर्तनशील असतो. बदलासाठी भांडणे, युद्ध होतात. जात, धर्म वंश, आर्थिक विषमता, राष्ट्रीय कल्पना, वगैरेमुळे देशात, आंतरराष्ट्रीय जगतात तणाव आहे. आपण तणावातच जीवन कंठीत आहोत. आपण भांडण, तंटे, लढाई, झगडयात रहात आहोत. लढाईचा अंतिम उद्देश शांतताच असते. परंतु, युद्धाने जी शांतता प्राप्त होते ती

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

शस्त्र-संधी असते.म्हणजे, अन्याय व जुलम हिंसेने कायमचे रोखले जाऊ शकत नाहीत. केवळ भितीने जुलमाला,मनुष्य शरण जातो.बळी पडतो म्हणून अणुबाँब सारखे शस्त्रा-शस्त्रावर संयुक्त राष्ट्राचे पूर्णत: नियंत्रण असावे. परंतु वैचारिक सत्य, मूल्याधिष्ठीत बदल नेहमी चांगल्यासाठी असते. तथापी, मी, मी जे समजतो, तेच खरे ! म्हणून पर विचारी लोकांचे शिरच्छेद करा. निर्दालन करा आपण ज्याला सत्य चांगले समजतो, ती समज चूक असू शकते.ध्येय नेहमी अमूर्त (abstract) स्वरुपात असतात. जर उदिधृष्ट आणि साधनही चागली नैतिकदृष्या शुद्ध सुचीत स्वरुपात असली तर, सहसा उद्दिष्ट चुकीचे असत नाही, व आपल्या हातून चुकीच्या समजूतीसाठी भलतेच अनिष्ठ फॅसिस्ट कृत्य घडत नाही. मनुष्याला जास्त काळ तणावात रहाणे आवडत नाही. तणावात प्रगती खुंटते. शांती, समाधान नसते.

म्हणून, शांततामय मार्गाने वाटाघाटी, अहिंसामय सामुदायिक कृती (Mass action), सत्याग्रह, नैतिक दबाब (उपवास),इत्यादी गांधींजीचे मूलमंत्र हेच केवळ याना निर्भयपणे तोंड देण्यासाठी सर्वोत्तम मार्ग होय. खरा उपाय होय. याशिवाय पाश्चात्य प्रातिनीधिक लोकशाही निवडणूक पद्धतीमुळे गुन्हेगार लोकांची संख्या झपाट्याने सत्येवर येत आहे त्या ऐवजी, वार्डा-वार्डांतून, प्रत्येक खेड्या-खेड्यातून "प्रत्यक्ष लोकशाही" (Direct Democracy) मार्गाने राबविल्यास छोटी छोटी विकेन्द्रीत सरकार (Village Rupubliccs) प्रस्थापित केल्यास चांगले नितीमान विवेकी सज्जन, लोक पुढे येतील. राजकारणाचे आध्यात्मिकरण होईल.

स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व, न्याय, आरोग्य, शांती, समाधान आदि मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी, जतन करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नरत राहिले पाहिजे.

सामाजिक जीवनात सचोटी, प्रामाणिकपणा, आपुलकीला जास्त महत्व दिले आहे. (Life is based upon the idea of the supremacy of moral law) नैतिक मूल्यांच्या प्रभुत्वावर निती नियमावर जीवन अवलंबून आहे. श्रम प्रतिष्ठा वाढविणे, गरजा मर्यादित करणे, उपभोगात संयम पाळणे, साधी रहाणी, आर्थिक दृष्टया मनुष्य व ग्रामस्वावलंबी करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात व बहुराष्ट्रीय कंपनीना विश्वस्त पद्धती लागू करणे, नितांत गरजेचे आहे. तरच मानवाच्या सर्व जीवन स्तरात सुख, शांती, समाधान निर्माण होईल.

अहिंसात्मक मार्गाचा उपयोग व्यक्ति, समाज व राष्ट्र आणि संपूर्ण आंतरराष्ट्रीय जगतात देखील करु शकतो. नैतिक व व बौद्धिक दृष्टया शांततेची पद्धत एकच आहे. मानवीभाव जीवनात मूल्यांच्या प्रस्थापनेत सत्याग्रह सारख्या अहिंसक पद्धतीचा अवलंब केल्यास, आपल्या सर्वांना अभिप्रेत असलेले महत्वपूर्ण मूल्याधिष्ठीत फेरबदल हे शांततेने सुसंस्कृत मार्गाने होवू शकतील.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# १५

# म.गांधींचा अठरा कलमी रचनात्मक कार्यक्रम

## नागोराव कुंभार

म. गांधींजीनी " रचनात्मक कार्यंक्रम " या छोटया पुस्तकात सांगितलेला अठरा कलमी रचनात्मक कार्यंक्रम अतिशय महत्वाचा आहे. परंतु दुर्देवाने देशातील विचारवंत आणि कार्यंकर्त्यांनी याकडे म्हणावे तितके गांभीर्याने लक्ष दिले नाही. हा कार्यंक्रम निष्ठेनी राबविला गेला असता तर आजच्या अनेकसमस्या सोडविण्यास वा सौम्य करण्यास मदत झाली असती. कारण यातील प्रत्येंक कलम म्हणजे आपल्या एक एक सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व उपेक्षितांच्या समस्या आहेत.

### छोटे पण महत्वाचे पुस्तक

म. गांधींनी १९४१ साली सेवाग्राम ते बारडोली या रेल्वे प्रवासात " रचनात्मक कार्यंक्रम " हे छोटे २५ पानी पुस्तक लिहिले. त्यांनी १९४५ मध्ये कस्तुरबा गांधी नीधीच्या कार्यंकर्त्यासमोर भाषण दिल्यानंतर त्याचे पुर्नलेखन करुन देशाच्या व काँग्रेस कार्यंकर्त्यांसमोर अठरा कलमी रचनात्मक कार्यंक्रम मांडला त्यात त्यांनी (१) जातीय ऐक्य (२) अस्पृशता निवारण (३) दारुबंदी (४) खादी (५) ग्रामोद्योग (६) ग्राम सफाई (७) नई तालीम (८) प्रौढशिक्षण (९) स्त्रीयांची सेवा (१०) आरोग्य आणि स्वच्छतेचे शिक्षण (११) प्रांतीक भाषा (१२) राष्ट्रभाषा (१३) आर्थिक समता (१४) शेतकरी (१५) मजूर (१६) आदिवासी लोक (१७) महारोगी (१८) विद्यार्थी आदि कलमांचा समावेश केला. त्यांनी कार्यंकर्त्यांना यात परिस्थितीनुरुप कांही अधिक कलमांचा समावेश करण्यासंबंधी मुभा दिली.

### कार्यक्रमाचे महत्व

म. गांधींना रचनात्मक कार्यंक्रम राजकीय कार्यांपेक्षा शंभरपटीने प्रीय वाटत होता. ते म्हणत रचनात्मक कार्यंक्रमाद्वारे ब्रिटिशाच्या साम्राज्यवादातून स्वतंत्र्य होणे व प्राप्त स्वातंत्र्याचे सुराज्य करणे शक्य आहे. हा कार्यंक्रम म्हणजे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

स्वातंत्र्याचे तंत्र नसून स्वातंत्र्याचा आत्मा आहे. सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने विषमता, अज्ञान दारिद्र्यरहित व शोषणमुक्त सर्वोदय समाज उभारणीचा क्रांती-कारक मार्ग म्हणजे रचनात्मक कार्यक्रम होय. या कार्यक्रमाद्वारा प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य समता व बंधुत्व या सामाजिक मूल्यांचा उपभोग घेणे शक्य होईल. व सर्वांना शांततेनी व सुखानी जीवन जगणे शक्य होणारे रामराज्य निर्माण करता येईल. यातून "नवा माणूस" आणि "नवे राष्ट्र" घडविता येईल.

म. गांधींनी या कार्यक्रमाच्या आमलबजावणीसाठी स्वातंत्र्यानंतर कॉंग्रेस-पक्ष विसर्जतीत करुन मानवजातीची सेवा करणारा "लोक सेवा संघ" स्थापन करावा असे सूचविले होते. त्यांची अशी कल्पना होती की देशातील सात लक्ष खेड्यात सात लक्ष कांग्रेसचे कार्यकर्ते पाठवावेत. कार्यकर्त्यांना खेडयात पाठविण्या-पूर्वी सत्य, अहिंसा, सर्वधर्मसमभाव, व सहिष्णूवृत्ती या कांग्रेसच्या तत्त्वांसंबंधी व कार्य-क्रमातील सर्व कलमासंबंधी योग्य असे प्रशिक्षण द्यावे. समाधानकारक प्रशिक्षण पूर्ण केलेल्या कार्यकर्त्यांनी खेड्यात जाऊन लोकांना मूल्यांचे शिक्षण द्यावे. तेथे त्यांनी स्वालंबी जीवन जगावे. विचार व कृतीत अंतर न ठेवता स्वतःच्या आचरणा-तून लोकासाठी आदर्श निर्माण करावा. त्यांची राहणी साधी व विचारसरणी उच्च असावी. कार्यकर्त्यांनी ग्रामीण जीवन व समस्या व्यवस्थीत समजावून घेऊन त्या सोडविण्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करावे. त्यांच्या या प्रय-त्नातून संपूर्ण देशाचा भौतिक व नैतिक विकास होईल.

## मूलभूत तत्त्वे

वरकरणी हा कार्यक्रम सोपा वाटतो. परंतु या कार्यक्रमला विशिष्ट तत्त्वांचे अधिष्ठान आहे. समाजाचा समतोल विकास व्हावा. समतोल समाजातच सर्वांचे हितसंबंध सुरक्षित राहतात. अधिकाअधिक लोकांचे अधिकाधिक कल्याण नव्हे तर सर्वांचे कल्याण हे आपले ध्येय असले पाहिजे. या कार्यक्रमासाठी केलेली कृती नैतिक असते. त्यातून वैयक्तिक व सामाजिक जीवनात नैतिकता वाढते. समाजाचा भौतिक नव्हे तर नैतिक विकासही झाला पाहिजे. समाजाची पुनंबांधणी वरुन नव्हे तर खालच्या स्तरापासून झाली पाहिजे. व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा. व्यक्ती-व्यक्तीत बंधुत्वाची व सहकार्याची भावना विकसित व्हावी. सर्व सत्तेचे विकेन्द्रिकरण व्हावे. देशातील कांही नव्हे तर सर्व सात लाख खेडयाची एकाच वेळी सर्वांगीन उन्नती व्हावी. या कार्यक्रमातून ही तत्त्वे साध्य व्हावीत अशी त्यांची अपेक्षा होती.

## सामाजिक कार्यक्रम

म. गांधीजींचा रचनात्मक कार्यक्रम हा समग्र समाजपरिवर्तनाचा कार्यक्रम

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आहे. त्यांनी सामाजिक सुधारणेसाठी जातीय ऐक्य, अस्पृशता निवारण आणि दारुबंदी हा कार्यक्रम सांगितला. भारतासारख्या भिन्न धर्म, वंश, जात आणि पंथ असलेल्या समाजात जातीय ऐक्य प्रस्थापित झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही अशी त्यांची धारणा होती. जातीय ऐक्यासाठी प्रत्येकांनी अन्य धार्मियांच्या सुखदु:खात आत्मीयतेनी सहभागी झाले पाहिजे. अन्य धर्मियांशी सर्वांनी मैत्रीचे नाते जोडले पाहिजेत. राजकीय क्षेत्रातील नेत्यांनी अन्य धर्मियाच्या सर्वांगीण विकासाठी प्रयत्न करावेत. समाजात जात वा धर्म यांच्या आधारे शिक्षणसंस्था व दवाखाने उघडू नयेत, जातीय ऐक्य केवळ राजकीय ऐक्यानी निर्माण होणार नाही असे त्यांचे ठाम मत होते.

जातीय ऐक्या प्रमाणे त्यांनी अस्पृशता निवारणाची आवश्यकता प्रतिपादन केली. अस्पृशता निवारणाशिवाय स्वातंत्र्याची इमारत उभी राहणार नाही. यामुळे हिंदुधर्मावरील हा कलंक वा भारतीय समाजाला लागलेला हा शाप लवकर संपविला पाहिजे. अस्पृशता निवारणासाठी प्रत्येक हिंदुनी हरिजनाचे दु:ख आपले स्वत:चे दु:ख म्हणून त्याकडे पाहवे. त्यांच्याशी मैत्री केली पाहिजे सतातनी हिंदुत्ववाद्यांना हिंदू धर्माच्या आस्तितासाठी याची निकड समजावून सांगावी.

व्यसनाधीनता या आपल्या गंभीर समस्याकडे त्यांनी आपले लक्ष वेधले आहे. दारु, अफू आणि मादक पदार्थाच्या व्यसनानी लाखो स्त्री-पुरुष गांजले आहेत समाजाच्या नैतिक सुधारणेसाठी दारुबंदीसारखा कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. वैद्य व डॉक्टरांनी मानवाला व्यसनमुक्त करण्यासाठी नवनवीन उपचार तंत्रे शोधून काढावीत असे म. गांधीनी त्याना आवाहन केले आहे. नेहमी प्रेम भावनेनी कार्य करणाऱ्या स्त्रीया आणि विद्यार्थ्यांनीं या कामी पुढाकार घेवून प्रेमानी व्यसनी व्यक्तीना व्यसनमुक्त करावे. शारिरीक श्रम करणाऱ्या व्यक्ती अति श्रमामुळे थकतात. मग श्रम परिहारासाठी ते व्यसनी बनतात. त्यांना व्यवसनापासून दूर ठेवण्यासाठी " विश्रांती व करमणूकगृह " बांधावीत, तेथे त्यांना त्यांच्या आवडीचे खेळ खेळण्याची, आरोग्याला पोषक अशा स्वस्त फळांची व पदार्थांची व्यवस्था असावी. आनंद हा व्यसनातून वा हव्यासातून नव्हे तर आतून म्हणजे चितशुद्धीतून प्राप्त होतो हे त्यांना समजावून सांगीतले पाहिजे.

## आर्थिक कार्यक्रम

त्यांच्या रचनात्मक कार्यक्रमात खादी, ग्रामोद्योग आणि आर्थिक समानता हा आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम आहे. त्याच्या मते या कार्यक्रमाच्या आमलबजावणीतून भारतासारख्या खंडप्राय देशातील लोक मूलभूत गरजापुर्तीच्या संदर्भात स्वालंबी बनविणे, मानवी शक्तीचा अधिकाधिक उपयोग करुन अत्यंत अल्प

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

भांडवल गुंतवणूक व साधे तंत्रज्ञान याआधारे अधिकाधिक उत्पादन वाढविणे आणि दारिद्रय, उपासमार आणि प्रचंड बेकारी, या आपल्या अवघड समस्यांवर मात करणे शक्य होईल. यास्तव त्यांनी 'खादी' प्रचारावर भर देवून असे म्हटले की खादी देशातील सर्व लोकाच्या स्वातंत्र्याची व समतेची गुरुकिल्ली आहे. ती एक सर्वव्यापी स्वदेशी मनोवृत्ती आहे. खादीचा कार्यक्रम म्हणजे आपल्या जीवनाच्या सर्व गरजा देशातूनच आणि त्याही खेडयातील लोकांच्या श्रम आणि बुद्धी यांचा उपयोग करुन भागविण्याचा कृती निश्चित होय. पं. नेहरुने खादीचे काव्यमयरित्या महत्व सांगताना म्हटले आहे "खादी म्हणजे स्वातंत्र्याचा पोषाख होय."

आज मूठभर शहरे सात लक्ष खेडयांचे शोषण करीत आहेत.खेडयांचे शोषण थांबविण्यासाठी व खेडी स्वालंबी व स्वयंपूर्ण करण्यासाठी खादी प्रचार करणे आवश्यक आहे. चरख्यांचे महत्व सांगताना गांधी म्हणतात "चरख्याला दोन पैलू आहेत. एक आक्रमक व दुसरा कल्याणप्रद. त्याच्या आक्रमक पैलू मधून भारतासारख्या देशाला स्वतंत्र्य राष्ट्रीय आस्तित्वासाठी ज्याची गरज आहे तो बहिष्कार घडून येणार आहे. त्यातून लोकांचा पुरुषार्थ नष्ट करणाऱ्या इंग्रजाच्या स्वार्थावर आघात होईल. त्याच्या विधायक बाजू मधून येथील ग्रामजीवनाला नवी पालवी फुटेल" आपल्या देशात शारिरीक श्रम आणि बुद्धी याची फारकत झाल्यामुळे आपली प्रगती खुंटली आहे. खादीच्या कार्यक्रमातून पुनः श्रम आणि बुद्धी यात समन्वय साधने व शहरी व खेडे यांना जोडणे शक्य होईल.

यास्तव त्यांना खादीचा प्रचार करणे आवश्यक वाटत. खादीच्या उत्पादनासाठी कापसाची लागवड करणे, कापूस वेचणे, कापूस रेचणे तो साफ करणे, पिंजणे पेळू करणे, कातणे, खळ देणे, रंगविणे, ताणावाणा करणे, विणणे, आणि धुणे इ. गोष्टी खेड्यातील व्यक्तीकडून घेतल्या पाहिजेत. खादीचा कार्यक्रय यशस्वी करण्यासाठी स्वतःच्या मालकीची जमिन असलेल्या प्रत्येक कुटूंबाने निदान आपल्या उपयोगापुरती तरी कापसाची लागवड केली पाहिजे. प्रत्येक कास्तकाराने त्याच्या-जवळ स्वतःचा कापूस नसेल तर पुरेसा कापूस रेचण्यासाठी विकत घ्यावा.कार्यकर्तांनी खादीचा प्रामाणिकपणे प्रचार करावा अशी त्यांची इच्छा होती.

ग्रामोद्यागाशिवाय ग्रामीण अर्थकारण अर्थपूर्ण होणार नाही अशी त्यांची धारणा होती. ग्रामोद्योग अल्प भांडवल आणि किमान कौशल्य आणि सोप्या ज्ञानावर चालू शकतात. दळणे, कांडणे, सावण, कागद, आगपेटचा, तेल काढणे, कातडी कमावणे आदि ग्रामोद्योग ग्रामीण भागात सुरु केल्यास ग्रामीण अर्थकारण अर्थपूर्ण व स्वालंबी होईल. त्याच्या मते प्रत्येक नागरिकाची वृत्ती ग्रामोन्मुख असावी. त्यामुळे त्यांना पाश्चात्यांच्या नकलेच्या वा यंत्रानी बनविलेल्या वस्तू हव्याशा वाटणार नाहीत. ग्रामोद्योगामुळे दारिद्रय, उपासमार आणि बेकारी आदि समस्या सोडविण्यास

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मदत होईल. यास्तव प्रत्येकांनी दैनंदिन जीवनात खेडयातून बनविलेल्या वस्तू वापरण्यात प्रतिष्ठा मानावी. त्या वापरण्याचा प्रत्येकानी निश्चय करावा असे त्यांनी आवाहन केले आहे.

## शैक्षणिक कार्यक्रम

त्यांनी लोकशिक्षणासाठी सांगिललेला ग्राम सफाई, आरोग्य व स्वच्छतेचे शिक्षण, प्रौढ शिक्षण, नई तालीम प्रांतीय भाषा आणि राष्ट्रभाषा हा महत्वाचा कार्यक्रम आहे. त्यांच्यामते बुद्धी व श्रम यांचा विच्छेद झाल्यामुळे आपलें खेडयाकडे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. सुंदर खेडी उकिरडी बनली आहेत. तेथे सर्वत्र घाण व दुर्गंधी पसरली आहे. अस्वच्छतेमुळे विविध रोग पसरतात. यास्तव नागरिकांना राष्ट्रीय व सामाजिक स्वच्छतेचे महत्व पटवून दिले पाहिजे. सर्वांनी खेडी व त्यातील विहिरी, तलाव व नद्या स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

ग्राम सफाई बरोबर सुव्यवस्थीत समाज निर्मितीसाठी नागरिकांना आरोग्य आणि स्वच्छतेच्या नियमाचे ज्ञान करुन दिले पाहिजे. आरोग्य विषययक ज्ञान वाढले तर नागरिक रोगमुक्त होतील व मृत्यूचे प्रमाण घटेल. आरोग्य आणि स्वच्छतेचे महत्व सांगताना म. गांधी म्हणतात प्रत्येकांनी रिकाम्या व मलीन विचाराची हकाल पट्टी करुन अत्यंत शुद्ध विचार मनात आणावेत, रात्रंदिवस शुद्ध हवा घ्यावी, शारिरीक व मानसिक श्रमात समतोल राखावा, केवळ स्वतःच्या स्वादतृप्तीसाठी, नव्हे तर आपल्या देश बांधवाच्या सेवेसाठीं, मन व शरिर संतुलीत राहील असा संतुलीत आहार घ्यावा.

प्रौढ शिक्षणकडे झालेल्या दुर्लक्षाबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली आहे. अज्ञानामुळे लोकांना त्यांच्या अंगभूत गुणांचा व दोषांचा परिचय होत नाही. यास्तव त्यांना प्रौढ शिक्षण कार्यक्रम राबविणे महत्वाचे वाटले. प्रौढ शिक्षणातून नागरिकांना अक्षर व अंक ज्ञानाबरोबर राजकीय शिक्षण दिले पाहिजे. त्यातून त्यांना आपल्या. देशाची महानता व विशालता पटवून द्यावी.

नई तालिम वा वर्धा शिक्षण ही त्यांची एक वैशिष्टयपूर्ण शैक्षणिक कल्पना आहे. खेडयातील मुलांना शिक्षण देवून आदर्श ग्रामीण नागरिक बनविणे हे नई तालीमचे प्रधान उद्दिष्ट आहे. ते म्हणत स्वातंत्र्याची व्यवस्थीत उभारणी करावयाची असेल तर देशातील मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करता कामा नये. मुलांना त्यांच्या शरिर व मनाचा विकास करणारे, सामाजिक जबाबदारीची जाणिव निर्माण करणारे, त्याचे उज्वल भविष्य घडविणारे, व समाजाच्या गरजांची पूर्तता करणारे, शिक्षण दिले पाहिजे असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते.

म. गांधीनी भाषेसंबंधी मांडलेली मतेही अत्यंत मौलिक आहेत. त्यांचा इंग्रजी भाषेला विरोध होता. इंग्रजी भाषेमुळे सुशिक्षीत व राजकीय दृष्टया जागृत

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

असलेली मंडळी व सामान्य जनता ही परंपरांपासून दुरावली आहे. इंग्रजीमुळे भारतीय भाषा दरिद्री झाल्या. मातृभाषा समृद्ध न झाल्यामुळे सामान्य जनता आधुनिक ज्ञानापासून वंचित राहते. नवनवीन विचार मातृभाषेतून लोकांना समजून सांगितल्याशिवाय कोणत्याही चळवळी यशस्वी होवू शकत नाहीत. म्हणून मातृभाषेला फार महत्व आहे. राष्ट्रीय पातळीवर नागरिकांत विचारांचे आदानप्रधान होण्यासाठी 'हिंदी' ही राष्ट्रभाषा उपयक्त आहे असे मत त्यांनी नमूद केले आहे.

## उपेक्षतांसाठी कार्यकम

उपेक्षितांचा विकास हे विकासाचे मानदंड असावे असे म. गांधीचे मत होते. यामुळे त्यानी रचनात्मक कार्यक्रमात स्त्री, मजूर, आदिवाशी लोक, शेतकरी आणि महारोगी आदि कलमाचा समावेश केला व या घटकांच्या विकासाकडे लक्ष दिले पाहिजे असे आवर्जून सांगितले.

आपण स्त्रीयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. स्त्री ही प्रभूत्व वा मालकी गाजविण्याची वस्तू नसून ती आपली सहकारी असते. येथील कायदा आणि रुढी परंपरामुळे स्त्रीया वंचित राहिल्या. यामुळे त्यांच्यात पुरुषा बरोबर काम करण्याचे त्यांच्यातील सामर्थ्य त्याना प्रतिष्ठेची जाणीव करुन देण्यासाठी,आणि त्याच्यातील दास्यत्वाच्या भावनेच्या निर्मुंलनासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सामाजिक आचरणाचे नियम आणि कायदे स्त्री–पुरुषांनी एकमेकांच्या सहकार्यांने सलल्याने तयार केले पाहिजेत असे म. गांधी सांगतात

म. गांधी शेतकऱ्याच्या शक्तीचे महत्व स्पष्ट करताना म्हणतात देशात संख्येने सर्वांत अधिक असलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या अंगाती अंहिसक शक्तीची जाणीव करुन दिल्यास जगातील कोणतीही सत्ता त्यांच्या समोर टिकणार नाही. शेतकऱ्याच्या कोणत्याही चळवळी राजकीय हेतूनी नव्हे तर त्यांच्या प्रश्नांच्या पूर्ततेसाठी चालविल्या पाहिजेत.या भूमिकेमुळेच खेडा, बारडोली आणि बोसद येथील शेतकऱ्यांच्या चळवळी यशस्वी झाल्याचे म. गांधी नमूद करतात.

त्यांच्या मते मजूराच्या संस्था व चळवळी अंहिसक मार्गानी चालविल्या पाहिजेत. अन्य मजूर संघटनांनी आपल्या कार्यासाठी अहमदाबाद येथील "मजूर महाजन" या संस्थेचा आदर्श समोर ठेवावा असा त्यांनी सल्ला दिला होता. मजूर महासंघ वा गिरणी कामगार संघ ही संस्था अंहिसेच्या पायावर उभा राहून कोणतेही अवडबंर न माजवता बलवान झाली, या संस्थेकडे मालकीचे हॉस्पीटल, गिरणी कामगारासाठी स्वत:च्या शाळा, प्रौढासाठी वर्ग, मालकीचा एक खादी भांडार आणि राहण्यासाठी निवासस्थाने आहेत.अन्य मजूर संघटनानी अशी उपक्रमे राबवावीत.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

भिल्ल, गोंड आदि अतिदुर्गम डोंगराळ भागात कठिण जीवन जगणाऱ्या आदिवासी बांधवाच्या कल्याणाचा प्राधाने विचार करावा असे म. गांधी आग्रहाने सांगतात.

महारोग्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधताना ते म्हणतात महारोगी हा शब्दच घृणास्पद आहे. आपण महारोग्यांची बुद्धिपुरस्कार उपेक्षा केली. कारण वरच्या पाय-रीवरच्या लोकाना सेवेची कमी जरुरी असूनही त्याकडेच अधिक लक्ष देण्याची आपली मनोवृत्ती आहे. आपल्या देशात संख्येनी अधिक असलेल्या महारोग्यांविषयी काळजी वाहून मिशनरी लोकांनी त्यांची सेवा केली आहे, हे मुद्दाम ते नमूद करतात.

## विद्यार्थ्यांना आवाहन

रचनात्मक कार्यक्रमातील शेवटचे कलम 'विद्यार्थी' आहे. म. गांधी म्हण-तात मी विद्यार्थ्यांशी नेहमी गाढ संपर्क साधीत आलो आहे. अनेक विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेज सोडून देशकार्याला वाहून घेतल्यामुळे त्यांचा देशाला खूप लाभ झाला. त्यांच्या मते अनुभावाअंती असे दिसून येते की. प्रचीलीत शिक्षण व्यर्थ व अस्वाभावीक आहे. परंतु त्याची मोहिनी विद्यार्थ्यावर आहे. कारण त्यांना कॉलेजातील शिक्षणामुळे प्रतिष्ठीत जीवनाचे साधन उपलब्ध होते. प्रचलीत शिक्षण म्हणजे पांढरपेशांच्या समाजात प्रवेश करण्याचा एक परवाना आहे. ते परकीय इंग्रजी भाषाचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी किती तरी वर्षे वाया घालतात. आधुनिक विचार संपत्ती व आधुनिक शास्त्रे यांचा परिचय करुन घेण्याच्या दृष्टीने देशी भाषा निरुपयोगी आहे अशी विद्यार्थ्यांनी व त्यांच्या शिक्षकांनी गैरसमजूत करुन घेतलेली आहे असे त्यांना वाटते.

त्यांची अशी अपेक्षा होती की शिक्षणातून राष्ट्राचे भावी पुढारी निर्माण व्हावेत. विद्यार्थ्यांनी पक्षीय राजकारणात पडण्यापेक्षा संशोधकाची चोख भूमिका पार पाडावी. त्यांनी वीरपुरुषांचा आदर्श समोर ठेवून त्यांच्यातील उत्तम गुणांचे अनुकरण करावे. त्यांनी खादीचे कपडे वापरुन परदेशी वस्तू वापरण्याचा मोह टाळावा. सूतकताई शिकूण त्यांनी त्यातील आर्थिक, सामाजिक आणि नैतिक रहस्य समजून घ्यावे. विद्यार्थ्यांनी इतर धर्माच्या विद्यार्थ्यांबरोबर व हरिजनांबरोबर ते आपले आप्तेष्ट आहेत अशा भावनेनी त्यांच्याशी मैत्री जोडावी. त्यांनी खेडयात जावून साफसफाईचे, भंग्याचे काम करावे. खेडयातील मुलांना व प्रौढाना शिकवावे. त्यांनी शिकलेले नवनवीन ज्ञान मातृभाषेत भाषांतरीत करुन खेडयात साप्ताहिक-फेऱ्या काढून त्याचा प्रचार करावा. त्यांनी निर्भय बनावे. दुर्बलांना सहकार्य करावे. प्राण धोक्यात घालून अहिंसक मार्गाने दंगे शांत करण्यास त्यांनी तत्पर राहवे. त्यांचे मुलीशी वर्तन अत्यंत शुद्ध व सभ्य असावे. त्यानी आपल्या सोयीनुसार आळसात वेळ न घालावा किमान एक वर्ष देश कार्यासाठी द्यावे. त्यामुळे त्यांची समाज विकासाला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

भरीव मदत होईल असे ते प्रतिपादन करतात.

## कांही निरीक्षणे

म. गांधींनी रचनात्मक कार्यक्रम खूप सुक्ष्म विचार करुन मांडला आहे. या कार्यक्रमातून सामान्य माणसाच्या कल्याणा विषयीची तळमळ पानोपानी लक्षात येते. विकासाचा विचार करताना शहरीभागापेक्षा खेडयाकडे अधिक लक्ष द्यावे असा त्यांचा आग्रह दिसतो. या कार्यक्रमातून त्यांनी विव्दता प्रचूर नव्हे तर आपल्या प्रमुख समस्या त्यावरील उपयासह अत्यंत सोपा भाषेत प्रभाविरित्या मांडल्या आहेत. त्यांनी अनेक ठिकाणी उपरोधाने आपल्या दोषावर नेमके बोट ठेवलेले आहे. सत्ता, संपत्ती, स्वार्थ आणि गुन्हेगारी वृत्तीनी कालवंडलेल्या आजच्या कॉंग्रेस पक्षाने अंतर्मुख होवून हा कार्यक्रम पक्षाचा व शासनाचा कार्यक्रम म्हणून राबविला तर कॉंग्रेस पक्ष पुन: एकदा उजळून निघेल. देशातील सामान्य माणसाच्या विकासाचा स्वार्थी वा ढोंगीवृत्तीने नव्हे तर प्रामाणिकपणे विचार व कार्य करणाऱ्या कोणत्याही पक्षास वा कोणत्याही विचारसरणीच्या कार्यकर्त्यांस त्यांचा हा कार्यक्रम "किमान समान कार्यक्रम" म्हणून स्विकारण्याजोगा आहे. म. गांधीजीच्या रचनात्मक कार्यक्रमात समग्र व व मूलभूत समाज परिवर्तनाचे सामर्थ्य आहे असे आम्हास वाटते.

# हिंदू कोण ?

हिंदू लोक हिंदुस्थानचे मुळचे रहिवासी आहेत, असे मानले जात नाही. हिंदुस्थानातील हिंदू लोकांची संख्या वीस कोटीहून अधिक आहे. त्यांना 'हिंदू' म्हणतात; कारण ते एकदा सिंधू (इंडस्) नदीच्या पलीकडे राहत होते. वेद त्याचे- सर्वांत जुने धर्मग्रंथ आहेत. वेद हे अपौरुषेय आहेत आणि अनादि आहेत, असे पुष्कळ श्रद्धाळू हिंदू मानतात. हे वेद ख्रिस्तपूर्व २००० वर्षे या वेळी रचले असावेत, असे पाश्चात्य संशोधकांचे मत आहे. लोकमान्य टिळक यांनी वेद हे निदान १०,००० वर्षापूर्वीचे असावेत, असे दाखविले आहे. हिंदूचे एक व्यवच्छेदक लक्षण असे की ब्रम्ह किंवा परामात्मा हे तत्त्व सर्वव्यापी तत्त्व आहे. अशी त्यांची श्रद्धा आहे.आपणा सर्वांचे साध्य मोक्ष हे आहे आणि मोक्ष याचा अर्थ जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होऊन ब्रम्हात विलीन होणे. हिंदूच्या नीतिशास्त्रांतील मुख्य गुण म्हणजे नम्रता व समदृष्टी. त्यांच्या लौकिक व्यवहारावर मुख्य वर्चस्व जातिसंस्थेचे आहे. सिंधू नंदी ओलांडून आर्य लोकांची जी शाखा भारतात आली आणि या विस्तीर्ण देशात वसाहत करुन राहिली, त्यांना हिंदू म्हणतात. खरोखर 'हिंदू धर्म' यापेक्षा 'आर्यधर्म' हा शब्द अधिक अर्थसूचक झाला असता.

– म. गांधीजी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# १६

# आत्मचरित्रातून जाणवणारे गांधीजींचे मनोबल

## गो. न. मठगीरवार

गांधीजींचे आत्मचरित्र वाचताना एक गोष्ट जी प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे त्यांच्या ठिकाणी असलेले विस्मयजनक मनोबल. एखाद्या बाबतीत अंतर्मनाची एकदा साक्ष पटली आणि त्याबाबतची भूमिका पक्की झाली की मग गांधीजींना त्या भूमिकेपासून कुणीही विचलित करु शकत नव्हते. पण असा मनोनिग्रह होण्या-पूर्वी त्याला सत्याचा आधार मिळणे आवश्यक असते. केवळ सत्याच्या कसोटीवरच हा मनोनिग्रह टिकून राहू शकतो. गांधीजींच्या आत्मचरित्रात असे अनेक प्रसंग आहेत की जिथे त्याचे हे आत्मबल, आणि मनोनिग्रह आपल्याला जाणवतो. गांधीजींच्या एकुणच तत्त्वाज्ञानाचा केंद्रबिंदू, मला या आत्मबलात दिसतो. अहिंसा, सत्याग्रह, सविनय कायदेभंग, असहकार इत्यादि अनेक विषयांचा संकलपनात्मक केंद्रबिंदू हा या आत्मबलात मला दिसतो. आपल्या प्रत्येक कृतीमागे सत्याचे अधिष्ठान असावे असा गांधीजींचा आग्रह असे. त्यामुळे सत्य हेच त्यांच्यासाठी एकमेव दैवत होतं आणि सत्याची उपासना हीच खऱ्या अर्थाने परमेश्वराची उपासना होती.

गांधीजी ज्या पद्धतीने जीवन जगले त्या पद्धतीत संघर्ष हा अटळ होता. आपल्या मनाविरुद्ध होणारी कोणतीही गोष्ट स्वीकारायची नाही आणि कितीही बलाढय शक्तीशी टक्कर घ्यावी लागली तरी सत्याचा आग्रह सोडायचा नाही अशी भूमिका घेऊन जगणाऱ्या माणसाच्या जीवनात संघर्ष हा अटळ असतो. हा संघर्ष कधी कधी त्या व्यक्तीच्या निष्ठेची कसोटीही पाहतो. अशा कसोटीला पुरेपूर उतर-णारे आत्मबल गांधीजींच्या ठिकाणी होते आणि ते त्यांनी जाणीवपूर्वक जपले होते याची साक्ष आपल्याला त्यांचे आत्मचरित्र वाचताना पदोपदी पटते.

माणूस म्हणून जगताना जे जे आपल्या ठिकाणी कमीपणा आणू शकत त्याचा निकराने विरोध करावा अशी गांधीजींची भूमिका होती.विवेक हेच माणूस म्हणून जगण्याचं व्यवच्छेदक लक्षण असल्यामुळे तो कधीही आपण गमावू नये असा त्याचा आग्रह असे. म्हणूनच संघर्षाचा पवित्रा घेतानाही गांधीजी विवेकाचा आधार कधी सोडीत नसत,

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आणि त्यांच्यातील कमालीची विनयशीलता ही त्या संघर्षाला एक नवे परिमाण उपलब्ध करुन देई. ही विनयशीलता फक्त प्रचंड आत्मबल ज्याच्या ठिकाणी आहे तोच माणूस दाखवू शकतो, भ्याडाचा तो गुणधर्म नव्हे. गांधीजींची ही विनयशीलता त्यांच्या मनोनिग्रहातून आलेली होती आणि ती अनेकदा शस्त्रापेक्षाही जास्त प्रभावी ठरायची. पण आपण कुणीतरी 'महात्मा' आहोत किंवा आपल्या ठिकाणी इतरांना शक्य नसलेला एखादा अचार गुणधर्म आहे असा फाजिल अभिमान गांधीजींना कधी शिवला नाही. उलट "मला जे शक्य आहे ते एखाद्या लहान मुलालाही शक्य आहे" असे ते विनयाने म्हणतात. गांधीजींचे खरं मोठेपण हे त्यांच्या स्वतःच्या आत्मबलात नसून सामान्यतल्या सामान्य मांणसातही हे आत्मबल त्यांनी निर्माण केलं यात आहे अस मला वाटतं, गांधीजींच्या सहवासात राहिलेला माणूस काही प्रमाणात का असेना या आत्मबलाची 'लागण' झाल्याशिवाय सुटूच शकत नव्हता.

खरं तर चोरांची, सापांची, भूता–खेतांची सदैव भीति मनात बाळगणारे, चार–चौघात कधीही तोंड न उघडणारे आणि कमालीचे लाजाळू आणि संकोची स्वभाव असलेले, श्रावणाच्या पितृभक्तीची किंवा राजा हरिश्चंद्राची कथा वाचून हळवेपणाने मुळूमुळू रडणारे आणि प्रकृतीने अतिशय किरकोळ असलेले गांधीजी पुढील काळात भल्याभल्यांशी टक्कर घेण्याच्या पावित्र्यात कसे काय उभे राहिले याचे नवलच वाटते. आत्मबलाशी शारिरीक सशक्ततेचा काहीही संबंध नाही याचे गांधीजी उत्तम उदाहरण होत, गंमत म्हणजे स्वतः गांधीजींनाच आपल्या शारि–रीक दुर्बलतेची खंत वाटायची आणि ही दुर्बलता दूर करण्याचे काही त्यांना 'वेड–गळ' वाटणारे प्रयोगही सुरुवातीच्या काळात त्यांनी करुन पाहिले आणि नंतर आपण हे प्रयोग उगीच केले असेही त्यांना वाटू लागले. विवेक जागृत असलेला माणूस कमा-लीचा अंतराभिमुख (Introvert) असतो आणि आपल्या चुकांचा पाढा आपल्या–शीच वाचीत असतो. गांधीजी आत्मचरित्रात असे चुकीचे पाढे वाचताना जागोजागी आढळतात. विवेक जागृत असलेला माणूस स्वतःचाच शत्रू कसा असतो हे गांधीजींचे चरित्र वाचताना जाणवते. आपल्या चुकांचे प्रायश्चित आपण घेतलेच पाहिजे, कारण त्यातूनच आत्मशुद्धीची प्रक्रिया सुरु होते अशी गांधीजींची ठाम समजूत होती. एव–ढेच काय इतरांच्या चुकांचे प्रायश्चितही ते स्वतःच घ्यायचे कारण त्या चुकांत आपलाही सहभाग आहे असे त्यांना वाटायचे. सत्याग्रहींनी मर्यादा ओलांडली किंवा ते हिंसक बनले की गांधीजी प्रायश्चित म्हणून स्वतः उपोषण करायचे. याची लाज वाटून मग सत्याग्रहीही उपोषणाला बसायचे. आपण सुरु केलेल्या चळवळीची आणि चळवळीत उतरलेल्या लोकांच्या चुकांचे प्रायश्चित स्वतःच घ्यायचे. आपल्या नैतिक जबाबदारीची एवढी प्रखर जाणीव आणि त्यासंबंधीची निर्विवाद कटिबद्धता फार कमी लोकांत आढळते.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गांधीजीच आत्मचरित्र म्हणजे जगण्याच्या प्रत्येक क्षणी जाणीवपूर्वक जपलेल्या चांगुलपणाचा इतिहास आहे. आपल्यातील चांगुलपणानेच आपण इतरांना बदलू शकतो. असं गांधीजींनी सिद्ध केलं. हा निखळ मोहक चांगुलपणाच त्यांच्या आत्मबलाचा आधार आहे. या चांगुलपणाच्या आधारावरच एकदा गांधीजींनी आपल्या कडक स्वभावाच्या वडिलांनाही क्षणभर सद्‌गदीत करुन टाकले. चोरुन सिगारेटची थोटकं ओढणे आणि त्यासाठी प्रसंगी नोकरांच्या खिशातील पैसे चोरणें या गुन्हयाचे ओझे आणि मनावरील ताण असह्य झाल्यावर गांधीजी गुन्हयाची लेखी कबूली हातात घेऊन वडिलांकडे जातात. आजारी असलेल्या वडिलाच्या हातात हळूच चिट्टी सरकावून कॉटच्या टोकाशी बसतात. " गुन्हयाची मला शिक्षा व्हावी. पण माझ्या अपराधाचे प्रायश्चित तुम्ही करुन घेऊ नये, इतःपर असा गुन्हा घडणार नाही " अशा आशयाची चिठ्ठी वाचून वडिलांच्या गालावरुन अश्रु ओघळतात आणि चिठ्ठी ओली होते. आत्मचरित्र्यात गांधीजी लिहितात, " काही क्षण त्यांनी डोळे मिटले, आणि मग चिठ्ठी फाडून टाकली. मीही रडलो. त्यांच्या वेदना मी पाहू शकत होतो. त्या अश्रुनी माझे मन आणि पाप धुऊन निघालं. अहिंसेचा पहिला धडा मी असा शिकलो. त्याक्षणी मला त्यात फक्त पितृप्रेम दिसले पण आज मला कळतंय की ती विशुद्ध अहिंसा होती, " कोणताही त्रागा न करता आपल्या गुन्हेगार मुलाच्या स्वभावात बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य करमचंद गांधी यांनी दाखविले होते आणि अशा प्रकारे अहिंसेतील सामर्थ्यांचा पहिला धडा आपल्या मुलाला त्यांनी शिकविला होता.

आपल्या हातून गुन्हा घडला तर कोणतेही प्रायश्चित स्वीकारण्यास तयार असलेले गांधीजी आपला काहीही गुन्हा नसताना आपल्यावर जुलूम करणाऱ्या शक्तीचा तितक्याच निर्धाराने सामना करायचे.अशावेळी आत्मसन्मानाची जाणीव त्यांच्यात तीव्रतेने जागी व्हायची. गांधीजी जेवढे विनम्र होते तेवढेच स्वाभीमानीही होते. स्वावाभिमान (Self Repect) पणाला लागला असेल तर ते कोणतीही तडजोड स्वीकारण्यास तयार नसायचे. अशावेळी त्यांचे मनोबल कमालीचे उत्कट स्वरुप धारण करीत असे. दक्षिण–आफ्रिकेतल्या नाताळ प्रांतात एकदा गांधीजी रेल्वेच्या पहिल्या डब्यातून प्र.ब.स करीत असल्याचे पाहून एका गोऱ्या प्रवाश्याचा वर्णाभिमान जागा होतो आणि तो रेल्वे अधिकाऱ्यांना डब्यात घेऊन येतो. गांधीजी पहिल्या वर्गाचे तिकीट त्याला दाखवितात आणि डबा सोडून आपण कुठेही जाणार नाही असे ठामपणे सांगतात. पण रेल्वे अधिकारी पोलीसांच्या मदतीने गांधीजींना डब्यातून ओढून बाहेर काढतात, आणि त्यांचे सामानही प्लॅटफॉर्मवर फेकून देतात. दुसऱ्या डब्यात बसायचे नाही असा गांधीजींचा निर्धार असल्यामुळे गाडी तशीच पुढे

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

निघून जाते. थंडीची अख्खी रात्र कुडकुडत ते वेटिंग रुम मध्ये काढतात. आपली काही चूक नसताना आपल्याशी झालेंल्या असभ्य वागणुकीचा इतका संयत, 'सुसंस्कृत आणि सभ्य निषेध फक्त गांधीजीच करु शकत होते.

असा निषेध करताना भोगाव्या लागणाऱ्या यातना सहन करण्याची शक्ति त्यांना सहज साध्य होती. वर्णं विद्वेषानं पछाडलेल्या दक्षिण आफ्रिकेतील एका कोच लीडर ' नं एकदा ' कोच ' मुद्दामच ' कोच बॉक्स ' ज्या बाजूच्या सीटवर बसविले आणि नंतर त्यांना अपमानित करण्यासाठी तिथूनही उठण्यास फर्मावि‌ले तेव्हा गांधी–जींनी स्पष्ट नकार दिला. चिडलेल्या एजंटानं त्यांना बेदम मारहाण केली तेव्हा दुसरे गोरे प्रवाशी मध्ये पडले आणि त्यांना त्या एजंटाला बजावलं. गांधीजींना त्यांनी आपल्या सोबत कोच बॉक्स मधे बसवून घेतलं. दक्षिण आफ्रिकेतल्या दरबान कोर्टांत तेथील न्यायधिशानं गांधीजींना त्यांची पगडी उतरवून ठेवण्यात सांगितलं तेव्हा गांधींजी कोर्टं सोडून बाहेर गेले पण डोक्यावरची पगडी काढली नाही. उलट तेथील वर्तमानपत्रात त्यांनी आपली बाजू मांडली आणि पगडी परिधान करण्याचा आपला हक्क या प्रकारे हिरावून घेता येणार नाही असे ठणकावून सांगितले. भारतीय म्हणून गांधीजींना स्वत:बद्दल जसा स्वाभिमान होता तसाच तो इतर भारतीयांच्या बाबतीतही होता, भारतीयांना अपमानास्पद वागणूक मिळू नये आणि त्यांना इतरा सारखीच प्रतिष्ठा मिळावी यासाठी त्यानी दक्षिण आफ्रिकेत जिद्दीने लढा दिला. बालसुंदरम नावाच्या दाक्षिणात्य भारतीय माणसाला त्याच्या दरबान मधल्या मालकानं बेदम मारलं आणि त्याचे समोरचे दोन दातही पाडले तेव्हा गांधीजींचा स्वाभिमान जागा झाला. एका भारतीयाला मिळणारी ही वागणूक पाहून त्यांना सात्त्विक संताप आला आणि त्यांनी बालसुंदरमच्या वतीने कोर्टात दाद मागीतली. कोर्टानं बालसुंदरमच्या मालकास अटक करण्याचं फर्मान काढलं.

गांधीजी अन्यायाच्या विरुद्ध सतत लढत राहिले पण व्यक्तिद्वेषाने त्यांना पछाडलं नाही. म्हणूनच ते वृत्तीच्या विरुद्ध लढले, व्यक्तींच्या विरुद्ध नव्हे. (Hate the sin and not the sinner ( पापाचा तिरस्कार करा, पाप करणाऱ्याचा नव्हे) असे त्यांचे धोरण होते. माणूस आणि त्याचे कृत्य या दोन भिन्न गोष्टी आहेत. असे त्यांचे मत होते. वाईटाला चांगल्याने उत्तर देता येते यावर त्यांचा विश्वास होता, सत्याच्या मार्गावरील प्रवासात त्यांनी राग, द्वेष, स्वार्थ यांना कधी थारा दिला नाही. गांधीजींच्या आत्मचरित्रात असे अनेक प्रसंग आहेत की जिथे अज्ञानातून किंवा गैरसमजातून आपल्यावर जुलूम करणाऱ्या व्यक्तींना गांधीजी उदार मनाने क्षमा करतात. 'क्षमा वीरस्य भूषणम् ' हे विधान खऱ्या अर्थान कुठे लागू पडत असेल तर ते गांधीजींच्या बाबतीत. आपल्या विरुद्ध गांधीजींनी भारतात

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

गरळ ओकली असे विनाकारण वाटून दक्षिण आफ्रिकेतल्या गोऱ्यांनी गांधीजींवर दगड वीटांचा मारा केला आणि लाथाबुक्क्यांनी तुडविले तेव्हा–गांधीजी कमालीचे शांत राहिले. नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये आश्रय घेण्याचेही त्यांनी नाकारले. आपली चूक लक्षात आली की जमाव शांत होईल, माझा त्यांच्या चांगुलपणावर पूर्ण विश्वास आहे असे ते पोलीस अधिकाऱ्यांना सांगत राहिले. काही हल्लेखोरांना तुम्ही ओळखत असाल तर त्यांच्याविरुद्ध आपण कोर्टात केस करु असं जेव्हा पोलीस अधिकारी म्हणाले तेव्हा त्यालाही गांधीजींनी नकार दिला. मी एक–दोघांना ओळखेनही, पण त्यांना शिक्षा करुन काय उपयोग ? मी त्यांना दोष देत नाही. त्याचा असा गैरसमज करुन देण्यात आला की मी येथील गोऱ्या लोकांबद्दल भारतात भडक विधाने केली आहेत. या गैरसमजातून त्यांनी माझ्यावर हल्ला केला असेल तर त्यात त्यांचा काय दोष ? तुम्ही आणि तुमचे नेते या गैर–समजाला कारणीभूत आहेत तेव्हां तुमच्या चुकीची शिक्षा त्यांना काय म्हणून? सत्य–स्थिती काय आहे हे कळल्यावर हल्लेखोरांना पश्चाताप होईल.म्हणून त्यांच्या विरोधात मला तुमच्याकडे साधे निवेदनही द्यायचे नाही. गांधीजींच्या या भूमिकेचा योग्य तोच परिणाम झाला. हल्लेखोर तर खजील झालेच पण वृत्तपत्रांनीही गांधीजींची बाजू उजलून धरलीं आणि हल्लेखोरांना धारेवर धरले. गांधीजी सारखा एक भारतीय माणूस एखाद्या प्रसंगीं केवढा पुरुषार्थ दाखवू शकतो याचीं यावेळी प्रचीती आल्या–मुळे आफ्रिकेतील गोरे लोक एकूणच भारतीय माणसाच्या सामर्थ्याविषयी अधिक जागृत झाले.

प्रिटोरियात एका गोऱ्या न्हाव्यानं गांधीजींचे केस कापण्यास नकार दिला तेव्हा गांधीजींना त्याचा राग आला नाही. यात त्याची काही चूक आहे असेही त्यांना वाटले नाही. काळया माणसाची कटिंग केली तर तर गोरे लोक गिऱ्हाईक गमवावे लागतील अशी भीती त्या न्हाव्याला वाटली तर त्याची काय चूक ? गांधी–जींनी बाजारातून कात्री विकत घेतली आणि आरशासमोर उभे राहून आपले केस आपणच कापले. भारतात आपण आपल्या न्हाव्यांना अस्पृश्यांची कटिंग करण्यास भाग पाडू शकत नाहीत तर इथे काळया गिऱ्हाईकांची कटिंग करा असे गोऱ्या न्हाव्यांना कसे म्हणता येईल असा विचार गांधींनी केला आपल्या पापाचीच ही आपल्याला शिक्षा आहे असा या घटनेचा त्यांनी अर्थ लावला.

सत्याचा आग्रह गांधीजींनी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात सारखेपणाने धरला. व्यापारात किंवा वकीलीत सत्याला फारसे चिटकून राहता येत नाही हा युक्तिवाद गांधीजींना मान्य नव्हता. खोटेपणाचे समर्थन कोणत्याही युक्तिवादाचा आधार घेऊन करता येणार नाही हेच त्यांनी लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला. आयु–ष्यातला जेवढा काळ त्यांनी वकीली व्यवसायात घालविला त्या काळात त्यांनी खोटी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केस आपल्याकडे आणू नये अशी त्यांची सक्त ताकीद असे. त्यामुळे खोटया केसेस त्यांच्याकडे सहसा येतच नसत. एकदा चुकून एका अशीलाने गांधीजींना फसवून एक खोटी केस चालवायला लावली. हे कोर्टात जेंव्हा लक्षात आले तेव्हा गांधीजीनी चक्क न्यायाधीशांनाच आपल्या अशीलाविरुद्ध निकाल देण्याची विनंती केली. आपल्या अशीलाने शेवटपर्यंत आपल्यालाच चिटकून राहावे असा त्यांचा कधीही आग्रह नसे. तो कोणत्याही क्षणी एखाद्या सिनियर वकीलाचा सल्ला घेण्यासाठी मोकळा असे. एवढेच नव्हे तर स्वत: गांधीजीही कोणताही विधि निषेध न बाळगता दुसऱ्या वकीलाचा सल्ला घेण्यास कचरत नसत. आपल्या हातून खरोखरीच गुन्हा घडला असेल तर अशीलाने प्रामाणिकपणे तो कोर्टांत कबूल करावा असा गांधीजींचा आग्रह असे. स्मगलिंगच्या एका प्रकरणात पारशी रुस्तुमजी यांना गांधीजींनी गुन्हा कबूल करण्याची तयारी असेल तर मी सोडविण्याचा प्रयत्न करतो असे सांगून त्यांची सत्वपरीक्षाच पाहिली कस्टम्स अधिकारी आणि ॲटर्नी जनरल या दोघांनाही आपण तुमच्या बाबतीत बोलू आणि त्यांना सारे काही स्पष्ट सांगू, आणि या उपरही शिक्षा झालीच तर त्यात लाज वाटाण्यासारखे काहीच नाही कारण ज्या कृत्याची खरोखर लाज वाटण्यला पाहिजे होती ते कृत्य तुमच्या हातून आधीच घडले आहे असे गांधी-जींनी त्यांना समजावले. पण गांधीजींनी याबाबतीत जें घडले ते सर्व स्पष्टपणे सांगीतल्यामुळे पारशी रुस्तुमची केवळ दंड भरुन सुटले. विशेष म्हणजे आपल्या गुन्हयाची लेखी कबुली काचेत फ्रेम करुन पारशी रुस्तुमजी यांनी आपल्या ऑफी-सात सर्वांना दिसावीं अशी लावली. गांधीजींची काम करण्याची पद्धत ही अशी होती.

ज्यांचे हितसंबंध जपण्यासाठी आपण लढत असतो त्यांनीही चांगल्या वर्तं-णुकीची किमान अपेक्षा पूर्ण करावी असे गांधीजींना वाटत असे. कोणताही लढा विनयाने आणि सनदशीर अशा अहिंसक मार्गानेच लढला पाहिजें असा त्यांचा कटाक्ष होता. अहमदाबादच्या मिल कामगारांच्या प्रश्नावर त्यांनी जिद्दीने लढा दिला. पण जेंव्हा याच कामगारांचे मनोधैर्य खचत असलेले त्यांनी पाहिले तेव्हा त्यांनी जाहिर केले की जोपर्यन्त कामगाराचा प्रश्न सुटत नाही तोपर्यन्त आपण अन्नाचा कणही तोंडात घेणार नाही. गांधीजींच्या या भूमिकेने कामगार हादरले. आपण हातपाय गाळले म्हणूनच गांधीजींनी ही घोषणा केली आहे एवढे समजण्याइतके हे कामगार हुषार नक्कीच होते. आपल्यातील कमकुवतपणाची त्यांनाच लाज वाटली आणि ते पुरते खजिल झाले. याचा योग्य असाच परिणाम मिल मालकांवरही झाला. २१ दिवसांच्या संपानंतर तडजोड झाली आणि कामगारांचा प्रश्न सुटला.

अगदी जवळचे भावनिक नातेसंबंध असलेल्या व्यक्तिच्या आजारपणात माणसाचा खंबीरपणा आणि निष्ठा पणाला लागतात असे मला वाटते. गांधीजींच्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जीवनातील खरे कसोटीचे क्षण त्यांची पत्नी कस्तुरबा आणि मुलगा मनीलाल यांच्या आजारपणात त्यांनी जी भूमिका घेतली यात दिसून येतात.

कस्तुरबांच्या आजारपणात एकदा आफ्रिकेतल्या डॉक्टरांनी गांधीजींच्या मर्जीविरुद्ध त्यांना मांसाचे 'सूप' दिले. गांधीजी या प्रकरणाने व्यथित झाले पण त्यांनीं स्वतःवर पूर्ण नियंत्रण ठेवले. त्यांनी डॉक्टरांचा विरोध असतानाही आपल्या पत्नीला दवाखान्यातून हलविले. कस्तुरबांची स्थिती अतिशय वाईट आहे आणि त्यांना अशा स्थितीत हलविणे धोकादायक ठरेल अशी डॉक्टरांनी दिलेली ताकीदही गांधीजींनी शांतपणे धूडकावून लावली. भर पावसात कस्तुरबासह त्यांनी दवाखाना सोडला, कस्तुरबांनीही "मी तुमच्या बाहूत विसावून जीव सोडेन पण मांसाचे 'सुप' घेणार नाही" असे सांगून गांधीजींना बळ दिले. मला काहीही होणार नाही, तुम्ही काळजी करु नका असे सांगत त्या गांधीजींना धीरही देत राहिल्या, कस्तुरबांना तशा स्थितीत उचलून नेऊन गांधीजींनी त्यांना रेल्वेच्या डब्यात बसविले आणि दरबान ते फिनिक्स असा प्रवास केला. मनाविरुद्ध वागायचे की असा धोका पत्करायचा यातून गांधीजींनी दुसऱ्या पर्यायाची निवड केली. पण याहूनही मोठी हिम्मत गांधीजींनी मनीलाल दहा वर्षाचा असताना त्याच्या आजारपणात दाखविली. त्याही वेळी मुद्दा मनीलाल याला चिकनसूप आणि अंडी द्या म्हणणाऱ्या डॉक्टरची ट्रीटमेंट द्यायची की त्याला घरी घेऊन जायचे हाच होता. आजारपणातून बरे होण्यासाठी चिकनसूप घ्यायची गरज नाही हाच याहीवेळीं गांधीजींचा अट्टाहास होता. या अट्टाहा सापायी त्यांनी फार मोठा धोका स्वीकारला. टायफाईड आणि न्यूमोनिया या दोन्ही रोगांनी पछाडलेल्या आणि ताप चक्क १०४ डिग्री पोहचलेला असतानाही गांधीजींनी त्याला स्वतःची ट्रीटमेंट सुरु केली. 'परमेश्वरा, माझी पत आणि प्रतिष्ठा तुझ्या हातात आहे, आता तूच या कसोटीच्या क्षणी धावू ये" असा धावा त्यांनी केला, मनीलालचा ताप उतरला. पिता आणि पुत्र एकाच बिछान्यात झोपले. यासंबंधी लिहिताना गांधीची म्हणतात, देवानेच त्यावेळी माझी लाज राखली.

एकदा तर कस्तुरबांच्या आजारपणात 'तू मीठ आणि डाळी वर्ज्य कर' असे म्हणताच कस्तुरबा तडकल्या, तुम्ही तरी हे सोडू शकाल काय? असा सवाल त्यांनी गांधीजींना केला. गांधीजी शांतपणें म्हणाले, "कोणत्याही डॉक्टरचा सल्ला नसला तरी या क्षणापासून मी मीठ आणि डाळ एक वर्षासाठी सोडली. आता तू काय करायचे ते तूच ठरव" बिचाऱ्या कस्तुरबांना आपण उगीचच आंपल्या हट्टी नवऱ्याला आवाहन दिलें असे झाले. त्या खूप रडल्या पण गांधीजींच्या निर्णयात बदल होणे शक्य नव्हते. स्वतःच्या आजारपणातही गांधीजी मनाविरुद्ध वागण्यास तयार नसायचे. प्लुरसीच्या गंभीर विकाराने ग्रस्त असताना त्यांनी दूध आणि डाळ वर्ज्य केली आणि डॉ. जींवरांज मेहता किंवा खुद्द गोखलेहीं त्यांना या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

निर्णयापासून विचलित करु शकले नाही.

एखाद्या माणसाचे मनोबल कितीही खंबीर असले तरी त्याच्याही जीवनात मोहाचे काही क्षण येतातच. तेवढया क्षणापुरता तो त्या मोहाला बळी पडतो पण त्याचा विवेक जागा असेल तर लागलीच त्याचा तोलही सावरल्या जातो. तारुण्यात असे प्रसंग जेंव्हा गांधीजींवर आले तेव्हा विवेकानेच त्यांना घसरण्यापासुन सावरले. त्यांना मांसाहाराच्या नादी लावणाऱ्या त्यांच्या एका मित्राने त्यांना कुंटणखान्यातही नेलं. " तिच्या बिछान्यावर मी बसलो. तोंडातून शब्दही फुटत नव्हता माझा थंडपणा पाहून तिचा संयम सुटला आणि तिन शिव्या घालून मला बाहेर काढलं" अस गांधीजी लिहितात, आता या प्रकाराकडे वळून पाहिलं की माझी मलाच घृणा वाटते असंही ते म्हणतात. अशाच एका मोठया क्षणी गांधीजी सावरतात ते केवळ अंतर्मनातुन येणाऱ्या विवेकाच्या हाकेने. १८९३ मध्ये जहाजाच्या कप्तानाने एका बंदरावर गांधी–जींना ' चला थोडं बाहेर जाऊन येऊ ' अस सांगून चक्क एका निग्रो स्त्रीकडे नेले. एजंटानं कप्तान व गांधीजीं यांना निरनिराळया क्वार्टर्समधे पोहचलं. गांधीजी त्या निग्रो स्त्री समोर फक्त खाली मान घालून उभे राहिले. कप्तान थोडया वेळाने परत येतो तेव्हा गांधीजी आले तसेच परत जाताहेत हे त्याच्या लक्षात येते. आपल्या मनात कुठलीच वासना जागृत झाली नाही याबद्दल गांधीजी मनोमन परमेश्वराचे उपकार मानतात पण आपण त्या खोलीत शिरायला नकार द्यायला पाहिजे होता, तेवढे मनोधैर्य आपण कां दाखवू शकलो नाही याची चीड त्यांना येते. या घटनेने आपला परमेश्वरावरील विश्वास असला तरी ' खोटी लाज ' आणि ' खोटी भीड ' निर्धाराने सोडून दिली पाहिजे याची प्रचीतीही त्यांना आली. अशा अनुभवांबद्दल गांधीजी खुलेपणाने आत्मचरित्रात लिहितात, कारण ढोंग करुन सत्य लपविण्याची किंवा आपल्यातील कमकुवतपणा झाकण्याची त्यांना कधीच गरज वाटली नाही. सगळयाच चांगल्या गोष्टीचा पाया हा नैतिक मूल्यात असतो आणि सत्य हेच नैतिक मूल्याचं खरं अधिष्ठान असतं यावर त्यांचा दृढ विश्वास होता. म्हणून सत्याचा मागोवा हेच त्यांच्या जीवन प्रवासाचं मुख्य इप्सित होतं.

गांधीजींनी जी जीवनमूल्ये स्वीकारली होती त्यावरील त्यांची निष्ठा अतूट होती. कसोटीच्या क्षणीही त्यांची मूल्यावरील निष्ठा ढळली नाही. उलट अशावेळी एक नवे अवसान त्यांच्या शरीरात संचारत असे. आपल्या निष्ठांची कसोटी लागते आहे याची जाणीव होताच गांधीजी कणखर व्हायचे आणि परिणामांची चिंता न करता आयुष्यभर जोपासलेल्या निष्ठा आणि मूल्ये आपल्याला किती प्रिय आहेत ते आपल्या कृतीतून दाखवून द्यायचे. अहमदाबादेशील त्यांच्या ' सत्याग्रह आश्रमात ' एका अस्पृश्य कुटंबानं प्रवेश मागीतला तेव्हा गांधीजीसमोर अशाच एक कसोटीचा क्षण उभा राहिला. दुदाभाई,पत्नी दानीबेन आणि त्यांची छोटी कन्या लक्ष्मी या अस्पृश्यता

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कुटुंबाला आश्रमात प्रवेश दिल्यावर मोठे वादळ उठले. आश्रमाला बाहेरुन मिळणारी आर्थिक मंदत बंद झाली. आश्रमावर बहिष्कार घालण्याचाही प्रयत्न झाला. विहिरीवर पाणी भरु देण्याचा प्रश्नावरही बंगल्याच्या मालकाशी वाद झाला. पण या सर्व प्रकारांनी थोडेही न डगमगता गांधीजींनी त्या कुटूंबाला आश्रमात आधार दिला. वेळच आली तर आपण अस्पृश्यांच्या वसाहतीत जाऊन राहू पण या कुटुंबाला सोडणार नाही अशी निग्रही भूमिका गांधीजींनी घेतली. प्रामाणिकपणें स्वीकारलेल्या एखाद्या भूमिकेशी गांधीजी किती जबरदस्तपणें चिटकून राहात याचे हे एक बोलके उदाहरण होय. चंपारण भागातील शेतमजूरांचा प्रश्न ज्या जिद्दीने आणि निश्चयाने गांधीजींनी हाताळला त्याला शेतकरी आंदोलनाच्या इतिहासात तोड नाही. गांधीजीना चंपारण सोडून जाण्यास सांगणाऱ्या कमिशनरची आज्ञा गांधीजींनी धुडकावून लावली आणि कोर्टाला दिलेल्या निवेदनात त्यांनी चंपारण्यात आपले काम मानवी-दृष्टिकोनातून कसे आवश्यक आहे आणि या कामात शासनानेच आपल्या कामात मदत करणे कसे गरजेचे आहे ते पटवून दिले. आपल्यासारख्या स्वाभिमानी माणसाला शासकीय आदेश धुडकावून लावल्यासंबंधीची दंडाची शिक्षा स्वीकारण्याशिवाय पर्याय उरला नाही. कायदा पाळण्याची आपली प्रामाणिक इच्छा आहे. पण त्याहून जास्त अंतर्मनाचा आदेश पाळण्याची इच्छा आहे. या प्रभावी निवेदनानंतर खुद्द न्यायमूर्तीनींच लेफ्टनंट गव्हर्नरांना गांधीजीं विरुद्ध दावा मागे घेण्यास फर्मावले. इतकेच नव्हे तर हेकॉक या कलेक्टरांनी गांधीजींना पत्र लिहून त्यांना चंपारण प्रकरणात आवश्यक वाटणारी कागदपत्रेही दाखविण्याची तयारी दर्शविली. पण या विजयाने गांधीजी उत्तेजित झाले नाहीत. उलट त्यांनी वृत्तपत्राच्या संपादकांना पत्र लिहून चंपारण प्रकरणावर काहीही भडक लेखन करु नये अशी विनंती केली. बागायतदारांना विश्वासात घेऊनच तेथील शेतमजूरांचा प्रश्न सुटू शकेल असा विश्वास गांधीजींना होता म्हणून त्यांनी त्या प्रकरणी कमालीचा संयम दाखविला. एखादे आंदोलन योग्य दिशेने चालविण्यासाठी नेत्याच्या ठिकाणी जो समंजसपणा आणि प्रौढत्व लागते ते गांधीजीच दाखवू शकत होते.

मूल्यांवरील निष्ठेची अशीच एक कसोटी एका कौटुंबिक प्रश्नावर लागली. दक्षिण आफ्रिकेतील वास्तव संपवून भारताकडे परतताना नाताळच्या चाहत्यांनी गांधीजींवर प्रेमाचा अक्षरशः वर्षाव केला. अनेक मौल्यवान भेटवस्तू त्यांना दिल्या. त्यात हिऱ्याच्या अंगठयापासून ते कस्तुरबांना दिलेल्या सोन्याच्या नेकलेसपर्यन्त किंमती वस्तूचा समावेश होता. या भेटवस्तू स्वीकारण्याचा आपल्याला नैतिक अधिकार नाही कारण त्या आपण केलेल्या जनसेवेप्रित्यर्थ आपल्याला मिळत आहेत आणि जनसेवेचा अशां स्वरुपात मोबदला घेणे गांधीजींच्या विचार प्रणालीत बसणारे नव्हते. साधेपणाने जीवन जगण्याचे धोरण सगळया कुटुंबालाच स्वीकारायला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

लावल्यानंतर या मौल्यवान वस्तू कशा बाळगायच्या ? त्या रात्री गांधीजींना झोप आली नाही. आपल्या खोलीत ते सारख्या येरझारा घालीत राहिले. शेवटी एक ट्रस्ट स्थापन करुन या सर्व वस्तू त्या ट्रस्टकडे सोपविण्याचा विचार मनात पक्का झाला आणि मन थोडे शांत झाले. कस्तुरबांना मिळालेले दागिनेही ट्रस्टकडेच सोपवायचे होते. प्रथम कस्तुरबांनी वैताग केला, रडारड झाली. दागिने तुम्हाला लागत नसतील पण माझ्या येणाऱ्या सूनांना तर लागतील अशा प्रत्येक घरात होणारा नेहमीचा संवाद झाला. पण शेवटी पत्नीचे मन वळविण्यात गांधीजी यशस्वी झालेच. समाज सेवकानं किंमती वस्तू स्वीकारु नयेत या एकाच तत्त्वावर ठाम राहिल्यामुळे हे घडू शकले. वैयक्तिक तसेच सार्वजनिक जीवनात आपली प्रतिमा स्वच्छ राहावी असा प्रयत्न करणारे समाजसेवक आता अभावानेच दिसतात. अशा वेळी गांधीजींच्या जीवनातील हा प्रसंग खूप काही सांगून जातो.

गांधीजींचे आत्मचरित्र वाचताना मला हा मनोबलाचा भाग महत्वाचा वाटला. अंतर्मनातून येणारा आवाज प्रमाण मानणाऱ्या गांधींना टॉलस्टॉयच्या (The Kingdom of is God is within you) या पुस्तकाने प्रभावित केले यात नवल नाही.परमेश्वराचं अधिराज्य आपल्यातच आहे आणि म्हणून आपण स्वतःला (Kingdom of god) म्हणून जितके स्वच्छ व चांगले ठेवण्याजा प्रयत्न करु तितके ते परमेश्वराला आवडेल हे खरेच आहे. खुद्द गांधीजींचाच परमेश्वरावरील विश्वास अतूट अशा स्वरुपाचा होता. माझ्या जीवनातील सर्व कसोटीच्या क्षणी परमेश्वर माझ्या मदतीला धावून आला असे गांधींजी म्हणतात. प्रार्थनेला शब्दाची गरज नसते, तीं अंतर्मनाच्या खोल कप्प्यातून उमटते या निष्ठेतून गांधीजींची परमेश्वर निष्ठा व्यक्त होते. त्यांच्या अतूट मनोबलाचा तो एक महत्वाचा दुवा आहे असे मला वाटते.

---

" मी तुम्हाला एक ताईत देतो. जेव्हा तुम्ही शंकित मनोवस्थेत असाल किंवा स्वार्थ प्रबळ होताना तुम्हाला दिसेल तेव्हा हाप्रयोग करून पहा. आपल्या डोळयापुढे अशा गरीब आणि असहाय्य यक्तीचा चेहरा आणा, ज्याला तुम्ही ओळखता, आणि मग स्वतःला काय फायदा होईल? तुमच्या कामाने त्याच्या जीवनाला, त्याच्या भविष्याला काही मदत होईल काय ? दुसऱ्या शब्दांत, तुमच्या कृतीने देशातील लाखो-करोडो उपाशी आणि कंगाल लोकांना स्वराज्याचा मार्ग सापडेल काय ? असा विचार केला की तुमच्या सगळया शंका दूर होतील आणि स्वार्थ मेणाप्रमाणे वितळून जाईल. "

– महात्मा गांधीजी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# १७

# सांप्रदायिक एकता : गांधीजींचा दृष्टिकोन

## श्री. सादीक अली

आपल्या विचारांना ग्रासून टाकणारी आजची सर्वांत मोठी समस्या कोठली असेल, तर ती सांप्रदायिकतेची होय. तशी ही समस्या बऱ्याच काळापासून आपल्या ओळखीची आहे. स्वातंत्र्याआधीपासून नंतर आणि आजही. परक्या ब्रिटिश सत्तेने आपले राज्य सुरळीत चालावे म्हणून या प्रश्नाचा पुरेपूर उपयोग केला आणि त्यामुळे येथले संबंध राजकारण दूषित होऊन बसले. स्वतंत्र, स्वावलंबी राष्ट्र होण्याच्या भारताच्या वाटचालीतली हीच सर्वांत मोठी धोंड ठरली आहे, हे निखालस खरे आहे. सांप्रदायिक एकोप्याची भारताला केवढी निकड आहे, ते समजू शकेल असा गांधीजींपेक्षा दुसरा कोणी राजकीय नेता माझ्या नजरेसमोर येत नाही. गांधीजींचे समग्र तत्त्वज्ञान, त्यांची स्वतःची मूळ प्रकृती, जडणघडण, हिंदू धर्माची त्यांची व्याख्या आणि त्याप्रमाणे होणारे आचरण, इत्यादी मिळून सांप्रदायिक एकतेची प्रेरणा त्यांना मिळे. खऱ्या अर्थाने धर्मशील वृत्तीच्या व्यक्तीची याबाबतीत गफलत होणारच नाही. सुरुवातीला गांधींनी जगातल्या आणि भारतातल्या सर्व प्रमुख धर्मांचा सखोल अभ्यास केला आणि त्यांनी मनाशी काही निष्कर्ष काढले. अवघ्या धर्मांची मूलतत्त्वे खरी आहेत, ते एकमेकांशी मिळून मिसळून राहू शकतात आणि सर्व धर्मांनी तसे एकोप्याने राहायला हवे, याची त्यांना निश्चित जाणीव झाली होती. या एकमात्र सत्यापर्यंत्त पोहोचण्याचे मार्ग तेवढे अनेक आहेत, असा हिंदू धर्मग्रंथांचा एक मध्यवर्ती विचार आहे. अहिंसा आणि सत्य यांच्या द्वारा, दुसरा निर्मळ निष्कर्ष निघणार तरी कोठला ? या सगळ्याचा आधार, याचा कणा म्हणजे मानवता होय. गांधींच्या विचारात ती नेहमीच अग्रस्थानी राहिली. कशीही राजकीय परिस्थिती असू दे, गांधींच्या नजरेसमोरचा 'मानवते' चा हा ध्रुवतारा त्यांनी कधीच ढळू दिला नाही.

परंतु दक्षिण आफ्रिकेहून ते अखेर परतले, तेव्हा भारतात एक विलक्षण गुंतागूंतीचे राजकीय वातावरण त्यांचीच वाट पहात होते. खिलाफत आंदोलनाला

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

साथ देण्याचे त्यांनी ठरविले, तेंव्हा खूप लोक चकित झाले. जातीय सलोख्याशी त्यांची बांधिलकी इतकी दृढ होती की खिलाफतींच्या प्रश्नावर मुस्लिम बांधवांना अनुभवावी लागत असलेली वेदना त्यांना सहज जाणवली. खिलाफत संबंधित असल्याबद्दल त्यांच्यावर बरीच टिकाटिप्पणी झाली. त्याचा मार्ग राजनैतिक दृष्टीने योग्य होता की अयोग्य, हा प्रश्न नाही. अनेक मते यावर मांडली गेली. परंतु याबद्दलच्या आपल्या दृष्टिकोनात काहीं उणेपणा आहे असे गांधीजींना एकदाही वाटले नाही उलट, पुन्हा अशी परिस्थिती उद्भवल्यास आपण हाच मार्ग स्वीकारु असे त्यांनी म्हटले. सांप्रदायिक सलोख्याशी त्यांची असलेली बांधिलकीच यातून दिसून येते. त्यासाठी ते प्राण पणाला लावून झगडत राहिले, परंतु त्यांना यश सहजी मिळावयाचे नव्हते. देशावर परकीय सत्ता होती आणि 'फोडा, झोडा व राज्य करा' या धोरणामुळेच आपली सत्ता टिकेल अशी त्या शासनकर्त्यांची खात्री होती. अशी स्थिती आहे तोवर देशात ऐक्य नांदणार नाही, अशा निष्कर्षाप्रत गांधीजी पोहचले. फाळणी टाळण्यासाठी समझौता करण्याची त्यांची केवढी तयारी होती हे सर्वज्ञात आहे. परंतु 'फोडा, झोडा, राज्य करा' या कुटील नीतीने आपला अखेरचा बळी घेतलाच. फाळणीच्या जखमा भरुन याव्यात यासाठी आपल्या आयुष्याच्या अंतिम, सर्वात पराक्रमाच्या पर्वात गांधीजींनी जे केले, ते सर्वांना ठाऊक आहे. फाळणीचे खापर आपले काही देशबांधव गांधीजींच्या माथ्यावर फोडतात अथवा फाळणीमध्ये त्यांचा मोठा हातच होता असे मानतात. परंतु गांधीवर तो मोठाच अन्याय आहे. वेगवेगळया संदर्भात जातीय सलोख्यावर गांधीनी बरेच लिहिले आहे. त्याचे त्यांना वाटणारे महत्व यांच्या खालील काही अवतरणांवरुन स्पष्ट होईल.

'तरुण होतो, तेव्हापासून हिंदु-मुस्लिम एकतेची तळमळ मला होती.'

'माझ्या हयातींत नाही तरी नंतर हिंदू-मुस्लिम खास समजतील की सांप्रदायिक सलोख्याची माझी तळमळ कधीही कमी झाली नाही.'

'काय आहे आज आमच्या देशाची परिस्थिती ? एका गंभीर सांप्रदायिक दुखण्याने आमचा समाज ग्रासला गेला आहे.'

'एक उद्देश, एक ध्येय आणि समान सुखदुःखामध्ये हिंदू-मुस्लिम ऐक्य सामावलेले आहे. एकमेकाच्या सुखदुःखामध्ये सहभागी होऊन, परस्पर-सहकार्य व सहिष्णुतेने आपण आपले ईप्सित साम्य करु'

'प्रत्येकाने आपल्या धर्मातील सर्वश्रेष्ठ तत्त्वे चाचरणात आणावीत आणि दुसरे धर्म व त्यांचे अनुयायी यांच्याविषयी सद्भाव बाळगावा. जातीय तणाव सैलावण्याची हीच गुरुकिल्ली होय.'

आजही आपल्या देशात कोटयावधीं जनतेला प्रेरित करते, कार्यरत ठेवते ती धर्म हीच प्रेरणा-राजकीय विचार नाही. भल्या बुऱ्यातल्या फरक धर्म त्यांनां

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

शिकवतो इतकेच नाही, तर सदाचरणाचे इतर निष्कर्षही धर्मच इथल्या जनसामान्याला शिकवितो. आयुष्यातली दु:खे सोसायला मदत करतो. परंतु आज भारतावर राज-नीतीचा, विशेषकरुन निवडणुकीच्या राजनीतीचा प्रभाव आहे. राजकारणाद्वारेच सत्ता मिळते, समृद्धी प्राप्त होते. यासाठी धार्मिक भावना भडकावणे सगळयात सोपे, आपल्या समाजाच्या विणीमध्ये जात हा आणखी एक धागा घट्ट विणलेला असतो. निवडणुकीत बाजी मारण्यास त्याचा वापर केला जातो. कोणता पक्ष निवडणुकी-साठी जातीचा उपयोग करतो आणि किती प्रमाणावर, हा प्रश्न मी उपस्थित करीत नाही, जाति-धर्माच्या वैमनस्याच्या या काळात, गांधीजींनी दाखवून दिलेल्या तत्त्वांच्या प्रकाशातच रस्ता सापडू शकेल. गांधी, त्यांचे कार्यक्रम आणि त्यांच्या जीवनदृष्टीशी ज्यांचा काही संबंध आहे, त्यांना ही गोष्ट नेमकी स्वच्छपणे दिसते.

धर्मावर गाढ निष्ठा असली, धर्माविषयी आदरभावना असली, तरी गांधीजीं राजकारणापासून धर्म अलग ठेवण्याच्या मताचे होते. आपल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचे प्रत्येक स्त्री पुरुषास स्वातंत्र्य असावे; मात्र याचा अर्थ असा मुळीच नाही की राजकारणापासून नैतिक मूल्यांची फारकत करावी. तसे झाले तर राजकारण ही एक बीभत्स गोष्ट होऊन बसेल. प्रत्येक धर्माचे श्रेष्ठतम स्वरुप गांधीजी विचारात घेत. धर्मांच्या नावावर भूतकाळात केल्या गेलेल्या गैरव्यवहारांची आठवण पुन्हा भडकावून देण्यासाठी गतकाळात बुडी घेण्याची त्यांची वृत्ती नव्हती. एक नव्या, महान भारताच्या निर्मितीमध्ये ते मग्न होते. अशा भारताची घडण करण्यासाठी इतिहासातून काही लाभ होणार असेल, तर तो घेण्यास त्यांची ना नव्हती. अशी दृष्टी नसेल, तर कैक संकटांना ते आमंत्रण ठरेल. आज राजकारणात ज्या अनिष्ट गोष्टी घुसल्या आहेत, त्याचे कारण असा दृष्टीचा अभाव आणि समा-जाशीं बांधिलकीच नसणे, हे होय. राजकीय पक्षांनी एकमेकांवर जरुर टीका-टिप्पणी करावी, पण एका पक्षाच्या गैरव्यवहार उतारा म्हणून दुसऱ्या पक्षाने तसेच गैरव्यवहार अधिक मोठया प्रमाणावर, आणखी नेटाने करणे, हा नाही ! ही वाट आपल्याला फक्त बदला किंवा (सांप्रदायिक एकोप्याच्या) या सर्वांत नाजूक प्रश्नांकडे गांधीजींच्या, आपल्या पिढीतील सर्वांत व्यक्तिच्या, नजरेने पुन्हा पाहणे महत्वाचे आहे, ते यासाठी. आमची ध्येये जरुर उदात्त आहेत. परंतु ती गाठ-ण्याची साधने चुकली, तर तेथ पर्यन्त पोहोचण्याची आशा करता येणार नाही.

तथापि आज सांप्रदायिक स्थिती काय आहे ? तीं काही चांगली नाही, हे खास. ती अशी का झाली ? याचे कारण आजची राजनीती हे आहे, हे आता जवळ जवळ सर्वांनाच पटलेले आहे.

सध्या देशात 'हिंदुत्वाचे' वारे वाहत आहेत. हिंदुत्वाचे गंभीर, उदार स्वरुप यामुळे प्रगट होत असले, तर याबद्दल माझे काही म्हणणे नाही. परंतु आज

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ज्या पद्धतीने 'हिंदुत्व' या शब्दाचा उपयोग केला जातो आहे, त्यामुळे तर हिंदुत्वाचा फक्त संकुचित अर्थच ध्वनित होतो. त्याच्यामुळे भारतात ऐक्य वाढवण्याऐवजी दुही माजेल, ती देशाला कमजोर बनवून टाकील. गांधीजींच्या विचाराने देश एक करण्यासाठी काही तत्त्वे आवश्यक होती. त्यांच्याच शब्दात ती अशी आहेत.

'अनेक संस्कृती भारतात आल्या, नांदल्या, इथले जीवन त्यांनी प्रभावित केले. त्यांच्यावर येथील संस्कृतींचा प्रभाव पडला, इथल्या अन्नाचा, उदकाचा परिणाम त्यांच्यावर झाला, प्रत्येक संस्कृतीला आपले उचित स्थान प्राप्त होईल, अशा 'स्वदेशी' पद्धतीचेच हे मनोमिलन ठरेल, अगदी स्वाभाविकपणेच.'

'यामुळे तर भारतीय संस्कृती, खास भारताची आहे. ती केवळ हिंदू संस्कृती नाही, इस्लामी वा अन्य नाही. ती या सर्वांचे मिश्रण आहे, मूलतः पौवात्य आहे. स्वतःला 'भारतीय' म्हणवणारा प्रत्येकजण तिला आपली मानील, तिचे संरक्षण करील, तिच्यावर कोणी हल्ला केल्यास त्याच्याशी झुंज देईल.'

सांप्रदायिक एकोप्यासंबंधी बोलताना आजकाल 'व्होट बँका' विषयी बरेच काही बोलले जाते. नेत्यांनी आणि राजकीय पक्षांनी अल्पसंख्यकांना 'एकगठ्ठा मतांच्या बँका' बनवून टाकले आहे. भारतीय समाजाच्या सर्व अंगाबाबत हे खरे आहे. अनुसुचित जाति-जमातींशी व्यवहार 'व्होट बँका' बनवून होतो; परंतु आपल्या या बहुजिनशी बहुढंगी ठेवणीमध्ये 'व्होट बँका' म्हणून उपयोग करता येईल, असे गट आणखी बरेच आहेत. अशा स्थितीत गैर किंवा एकतेशी विसंगत जे काही असेल, ते उघड करुन त्याला विरोध करावयास हवा.

उदारमतवादी प्रवृत्तीवर विशेषतः विचारवंत लोक अधिक भर देताना दिसतात. सर्व धर्मांच्या आचरणात ही उदारतेची, सहिष्णुतेची प्रवृत्ती येऊ शकली तर ते फार उचित होईल. देशातील सर्व विचारशील लोकांनी या सहिष्णुतेचा पाठपुरावा करावयास हवा. असहिष्णु प्रवृत्तीमुळे देशात ऐक्य कसे स्थापन होणार? भिन्न भिन्न धर्मांचे पालन करीत असतानाच शतकानुशतके एकत्र नांदून आपल्या देशबांधवांनी एका निराळयाच संस्कृतीचा अविष्कार केला आहे. पूर्वी कधी असहिष्णुता असलीच तर आता त्या जागी परस्पर समजूत, सहिष्णुता प्रस्थापित झाली आहे. आमचे कलावंत, साधु-संत, फकीर, तसेच विचारवंत यांनी आपल्या कार्य-कर्तृत्वामुळे विविधतेबरोबरच देशाला एकतेच्या मार्गांवर पुढे नेले आहे. आपणास आत्मघात करुन स्वतःलाच नष्ट करुन टाकायचे नसेल, तर एकतेशिवाय आपल्या बांधवांसमोर अन्य मार्ग आहे तरी कोणता?

संप्रदायवादाच्या या प्रश्नात गांधीजींनी विशेष परिश्रम करुन अभ्यासपूर्वक काही निष्कर्ष काढले होते. या कठीण काळात आपण गांधीजींकडे वळून त्या वास्तव उत्तरांचे परिशीलन करावयास नको का? आयुष्याच्या इतर कितीतरी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

महत्वाच्या क्षेत्रासंबंधी सुद्धा आपल्याला सांगण्याजोगे केवढे तरी त्यांच्या ठायी आहे !

सांप्रदायिक सामंजस्याच्या प्रश्नासंबंधी गांधीजींच्या दृष्टीकोनाचा हा अतिशय महत्वाचा पैलू होय. राष्ट्रांचे स्वरुप स्वातंत्र्य मिळविल्यावर कसे दिसावे' याची काही स्वप्ने गांधीजींनी पाहिली होती. राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक–सर्व महत्वाच्या क्षेत्रासंबंधी त्यांचा दृष्टिकोन सुस्पष्ट होता. भारताने केवळ मोठे कार्य करावे एवढीच त्यांची अपेक्षा नव्हती तर, योग्य मार्गाने वाटचाल केल्यास भारत अवघ्या मानवतेसाठी बरेच काही करु शकेल, असे त्यांचे स्वप्न होते. उभ्या विश्वाला एक उदात्त संस्कृती देऊ शकेल असे भारतीय संस्कृतीच्या मूलस्वरुपात काही आहे. ज्या विश्वशांतीची साऱ्या जगाला असोशी लागली आहे, तिची गुरुकिल्ली बव्हंशाने भारताच्या हातीच आहे. भारत योग्य मार्गावर स्थिर नजरेने वाटचाल मात्र करु शकला पाहिजे आणि ही नजर राजकीय, सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात प्रत्यक्षात प्रकट झाली पाहिजे. सांप्रदायिक एकोपा आणि सांमजस्य येथे नांदेपर्यंन्त आपले महान स्वप्न साकार होणार नाही अशी गांधीजीची खात्री होती. असे ऐक्य व सामंजस्य नसेल, तर सारे वातावरण दूषित होऊन जाईल आणि आणि अगदी अपरिहार्यपणे, सगळयाच दिशांनी व्हावयाची प्रगती कुंठित होऊन बसेल..... ( अनुवाद : अरुण इनामदार )

( पंचायत भारतीच्या सौजन्याने )

---

## सहिष्णुता

मला माहीत असलेल्या सर्व धर्मांत अत्यंत सहिष्णू हिंदू धर्म आहे. त्यात विशिष्ट मताचा आग्रह नाही. त्यामुळे आपल्या अनुयायायाला तो आत्माविष्काराला जास्तीत जास्त वाव देतो. या तत्त्वाचे मला जबरदस्त आकर्षण आहे. इतर धर्मांना त्याज्य समजणारा असा धर्म नसल्यामुळे त्या सर्व धर्मांचा आदर करण्याचीच आपल्या अनुयायांना ते सवलत देतो असे नव्हे, तर इतर धर्मात जे काही चांगले असेल, त्याचा गौरव करुन ते आपल्यात पचवून घेण्याचीही सवलत तो देतो.

अहिंसा ही सर्व धर्मात समान आहे; पण हिंदू धर्मात तिचा आविष्कार आणि आचार फार उच्च प्रकारे झाला आहे. हिंदू धर्म, केवळ सर्व मानवजीवच एक आहेत, असे मानीत नाही, तर जीवमात्र एक मानतो. त्याच्यात असलेली गोपूजा हीं माझ्या मताने मानवतेच्या उत्क्रांतिक्रमाला त्याची एक अद्वितीय देणगी आहे. जीवमात्र एक आहे आणि म्हणून पवित्र आहे, या श्रद्धेचा हा व्यवहाराला लागू केलेला आचार आहे.

– महात्मा गांधी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# चार पाऊलं प्रकाशाच्या दिशेनं

## प्रा. प्रभाकर बागले

रोज हिंसात्मक घटना घडत असताना महात्मा गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचं काय करायचं? रोज दूरदर्शनवर सेक्सला आव्हान - आवाहन करणारे चित्रपट दाखविले जात असतील, तर महात्मा गांधींच्य ब्रह्मचर्याचं काय करायचं ? माणसाच्या प्रत्येक हालचालीत आणि हावभावात आकस नि अभिनिवेष दिसत असेल तर त्यांनी सांगितलेल्या सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानाचं काय करायचं ? जागतिकीकरणाच्या दिशेनं जाणा-या जगाला त्यांनी सांगितलेल्या शारीरिक श्रमाचं महत्त्व कसं पटवणार ? इंटरनेट सर्व्हिसेसच्या माध्यमातून जगाशी संवाद साधणा-या आजच्या पिढीला त्यांच्या मौनाचं महत्त्व कसं सांगणार ? कोणत्याही कोनातून त्यांच्याकडे पाहा, ते कालबाह्य वाटू लागतात. आपल्याला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे होताहेत. भारताच्या आजच्या लोकसंख्याविषयक रिपोर्टमध्ये कशावर भर दिलेला आढळतो ? प्राथमिक शिक्षणाचं सार्वत्रिकरण, बालमृत्यूचं प्रमाण कमी करणं, स्त्री शिक्षणावर अधिक भर देणं, संतती नियमनासाठी वापरल्या जाणा-या साधनांची गुणात्मकता वाढविणं आदी प्राथमिक गोष्टींवर त्यात भर दिला असेल तर प्रगतीच्या दृष्टीनं आपण कुठं आहोत, हे लक्षात येतं. मग ज्या पिढीनं महात्मा गांधींना पाहिलंही नाही, तिला त्याचं महात्मा पण कसं पटवून देणार ? पुष्कळदा तर असं वाटतं, महात्मा ही उपाधी त्यांना समजून घेण्यात अडथळा ठरत नसेल ? ही शक्यता नाकारता येत नाही.

महात्मा या शब्दाविषयीचा अविश्वास वाढीला लागला असेल तर तो शब्द बाजूला करून त्यांच्याकडे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. गांधींनी स्वतः या शब्दाला सर्वशक्तीनिशी विरोध केला होता म्हणून त्यांनी केलेल्या कार्याकडं, सातत्यानं केलेल्या लिखाणाकडे आजच्या संदर्भात पाहिलं पाहिजे. हा माणूस श्रमातून, शब्दातून, मौनातून घडत गेला आहे. या घडण्याच्या प्रक्रियेला समजून घेतलं पाहिजे. कारण त्यातून त्यांची एक दृष्टी प्रतिबिंबित झालेली दिसते. ही दृष्टी जीवनाकडे, निसर्गाकडे, धर्म, राजकारण, विज्ञान, सत्य आणि एकंदरच अस्तित्वाकडे कसं पाहते, त्यांना कसं कवेत घेते हे पाहणं, ही काळाची गरज आहे.

टॉयम्बी या प्रगल्भ इतिहासकारानं असं म्हटलं आहे, की विज्ञान आणि तंत्रज्ञानात माणसाला अभूतपूर्व यश मिळालं आहे आणि मानवी नातेसंबंधात त्याला अभूतपूर्व अपयश मिळालं आहे. महात्मा गांधींच्या कृतिशील चिंतनाचाही हा विषय आहे. माणूस, त्याचा निसर्गाशी असलेला संबंध, समाजाशी असलेला संबंध, हे सर्व संबंध आणि स्वतःशी असलेला संबंध, हे सर्व गांधींनी केंद्रवर्ती मानले. निसर्गाचा अंश सेवन करत सामाजिक व मानसिक स्वास्थ्य त्याला मिळावं असं त्यांना वाटत होतं आणि ते केवळ वाटत नव्हतं तर त्यासाठीच एकाच वेळी सोपं व कठीण, पण स्पष्ट असं उत्तर त्यांच्याकडं होतं. ते अर्थशास्त्रज्ञ नव्हते पण आपलं अर्थशास्त्र मानवी गरजेवर आधारलेलं नीडबिड असावं, मानवी लालसेला चाळावणारं ग्रीडबेड नसावं, असं त्यांना वाटत होतं. पण भारतानं आणि जगानच जे अर्थशास्त्र स्वीकारलं ते ग्रीडबेड आहे. त्यानं अनंत प्रश्न निर्माण केले आहेत. जागतिक स्वरूपाचे आर्थिक आपत्ती निर्माण केली आहे. लालसेच्या आवर्तात आपण सापडलो आहोत. अधिक उत्पादनासाठी अधिक विज्ञान, तंत्रज्ञान आवश्यक असतं. पण त्या बरोबर सत्तेचं उत्पादनही होत असतं आणि सत्ता नेहमीच केंद्रीकरण सुचवित असते. सत्तेच्या केंद्रिकरणातून निर्माण झालेल्या अमर्याद मुदीत माणसाची आणि निसर्गाची पिळवणूक सुरुच असते. आज आर्थिक आपत्तीला तोंड देण्यासाठी उत्पादनाच्या साधनांचा शोध घेणं सुरु आहे. आणि जमिनीला कृत्रिमपणे सुपीक कसं ठेवता येईल याचाही शोध सुरू आहे. म्हणजे जमिनीच्या क्षमतांचा शोध सुरू आहे. या सबंध प्रक्रियेत जमीन निकस होणार आहे, याचं भान राहात नाही. काही नैसर्गिक घटकांच्या क्षमता मर्यादित असतात. त्याचं नुतनीकरण होत नसतं. त्यांना जपून वापरावं लागतं. ज्यांचं जीवनाचं आकलन समग्र असतं, त्यांच्याच हे लक्षात येतं. महात्मा गांधींचं

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जीवनाचं आकलन समग्र होतं. ते माणसाच्या आणि जमिनीच्या क्षमतांची सांगड घालू शकत होतं. त्यांची सर्जकशक्ती कशी टिकून राहील, या विषयीचं चिंतन त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसत होतं. शरीर आणि माती यांच्या मधलं जैवीक, (ऑरगॅनिक) नातं आणि त्या नात्याला असलेलं आत्मीक परिमाण ते समजून घेत असत. अशा या त्यांच्या समग्र आकलनाच्या पार्श्वभूमीवर यंत्राला नव्हे, यंत्रविस्ताराला असलेला विरोध लक्षात घेतला पाहिजे. यंत्राच्या बेसुमार विस्तारात माणसाचा विवेक सापडला आहे. त्यामुळे त्याच्या आत जणू एक पोकळी तयार झाली आहे. म्हणजे यंत्राने तयार केलेली दुराव्याची (ॲलिनेशन), भावना. यालाच परमात्मा म्हणता येईल. आज आत्मनिष्ठेची जागा परमात्म्यानं घेतली आहे. महात्मा गांधींच्या मर्मदृष्टीला हे आधीच जाणवलं होतं. आज आपल्याला आपल्या परमात्म्य संज्ञेसकट (एलिनेटेड कॉन्सनेश) जीवन जगावं लागत आहे आणि हा एक न ओळखू येणारा असा रोग आहे. आणि हा रोग आहे याचं भान उरलं नाही ही आपली शोकांतिका आहे. गांधींची प्रत्येक कृती ही भान निर्माण करण्याच्या दृष्टीने निर्माण केलेली आहे. यासाठी त्यांनी श्रमाला जीवनाच्या केंद्रस्थानी ठेवलं आहे कारण शारीरिक श्रमातून नात्याची नाळ निर्माण होत असते. श्रम आणि वस्तू यांच्यामध्ये दुरावा नसतो. हे एक नव संबंधित्व असतं. माणसाची कृती मग ती रचनात्मक असो की सर्जनात्मक तीत एका नव्या संबंधाचा जन्म होत असतो. या संबंधाचा एक धागा वस्तू विश्वाशी, एक समाजाशी आणि एक 'स्व' शी निगडीत असतो. आणि हे तीन्ही घटक परिवर्तनशील असल्यामुळे त्यांच्या मधल्या संबंधाचं नुतनीकरण सुरू असतं. ज्या व्यक्तीला या संबंधाच्या नुतनीकरणाचं भान असतं, त्याला मानवी जीवनातल्या सत्याचं स्वरूप समजतं. सत्याला नेहमी प्रयोगाच्या कक्षेत का आणावं लागतं, हे कळतं. महात्मा गांधी सतत सत्याचे प्रयोग करीत होते. शब्द व कृती यांच्या संयोगातून एक अस्तित्वनिष्ठ आकृतीबंध आकारीत होते. त्याची सत्यावरची निष्ठा प्रयोगशील राहण्यातून निर्माण झाली होती. त्यांच्या साहित्याचं वाचन करताना त्यांच्या भाषेतून हे प्रत्ययाला येतं. त्यांचे शब्द नेमके साधे, समर्पक असतात. आंतरिक धारणेचा सिमेटिंग फोर्स त्यांच्या मागे दिसतो. कष्टाची सवय झालेलं शरीर आणि अभंग मन त्यांच्या मागे काम करताना दिसतं. त्यामुळे त्यांच्यामधून व्यक्त होणारा भाव आश्वासक असतो असं असलं तरी शब्दाचा उपयोग करणारा हा माणूस शब्दावर विश्वास ठेवणारा नव्हता. त्याच्यावर विसंबून राहणारा नव्हता. कारण शब्दाच्या सामर्थ्याबरोबर त्यांच्या अमर्याद मर्यादांचं भान त्याला होतं. म्हणून तो मौन स्वीकारी. मौनातल्या चिंतनानं स्वतःला समृद्ध करून घेई. ही समृद्धी आपल्या शब्दाच्या पाठीशी तो उभी करी. संवादपूर्ण नातं केवळ शब्दावरच अवलंबून नसतं. शब्दातील जी परस्परता आहे, अन्योन्नता आहे, ती त्यासाठी अधिक मोलाची असते. या मौलिक भावाचा आज विसर पडला आहे. आज शब्द नको तेवढे पसा पसा वापरले जाताना दिसतात. त्यातून दुरावा पाझरताना दिसतो. कारण त्याच्यामागचं मन दुभंगलेलं दिसतं. आपले शब्द निडबेड नाहीत ते ग्रीड़बेड आहेत. अशा शब्दांनी आपल्या संज्ञेला (कॉन्सनेशन) संस्कारित केलं आहे. तीची संरचना असणारी माणसं एकत्र येतातं. सत्ता वा संघटनेची उभारणी करतात. तिची घटना अस्तित्वात आणतात. आणि मग लक्षात येतं की, संज्ञेची व संस्थेची संरचना संवादित झाली आहे. कारण दोघीच्या मुळाशी तृष्णा काम करताना दिसते. लालसा काम करताना दिसते. तृष्णा अमर्याद असल्यामुळे संघटनाही विस्तारते. या विस्ताराबरोबर जीवनातली गुंतागुंत अधिक वाढते. सामान्य माणसाच्या हिताच्या दृष्टीनं जन्माला आलेली संस्था यंत्रवत होत जाते. संस्थांतर्गत पर्यावरणाचे प्रश्न निर्माण होतात. उत्तराच्या शोधात हे प्रश्न बाहेर पडतात पण मग लक्षात येतं, प्रश्नाचा आकारमान वाढत आहे आणि हे अटळ असतं. कारण बाह्य विश्वातले प्रश्न आपल्या आतल्या प्रश्नाचा विस्तार असतो. महात्मा गांधींनी हे ओळखलं होतं म्हणून त्यांनी संस्थांच्या आणि यंत्राच्या निर्मितीमागील धोका निदर्शनाला आणला आणि त्यांना विरोध केला. हा त्यांचा विरोध आपल्याला कालबाह्य वाटेल, हास्यास्पद वाटेल कारण त्यांनी सांगितलेल्या धोक्याचं गांभीर्य आपण अजूनही लक्षात घेतलं नाही. यंत्रनिर्मित वस्तूंचं प्रचंड प्रमाणावरचं उत्पादन माणसाला वस्तूवत करतं. निर्जीव वस्तूच्या सहवासात आज त्याला सतत राहावं लागतं. त्याचा परिणाम त्याच्या संज्ञेवर होतो. ती संज्ञा आपली संवेदनक्षमता हरवून बसते आणि वस्तूवत होते. त्याला वास्तविकरणाची (रिफिकेशन) प्रक्रिया

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

म्हणतात. आज आपली संज्ञा या प्रक्रियेमध्ये सापडली आहे. दुसरा धोका आपल्याला परिचित असा आहे विभूतीपुजेचा धोका हा आपल्या सवयीचा भाग झालेला आहे. ही विभुतीपुजा (डिफीकेशन) वेगवेगळे रूपं घेते. पुजा करणारा, स्तुतीसुमनं उधळणारा स्वतःच्या क्षमता त्या व्यक्तीच्या स्वाधीन करतो आणि तिच्यावर विसंबून राहतो. अधिकारी व्यक्तीच्या भोवती घुटमळणारा घोळका हे नित्याचं दृष्य आहे. हा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. महात्मा गांधींच्या मर्मदृष्टीनं तो आधीच हेरला होता आणि म्हणून त्यांना वस्त्विकरण नको होतं. विभुतीपुजाही नको होती कारण या दोन्ही प्रक्रिया माणसाला बहिर्मुख ठेवणा-या आहेत. आंतर्मुख होण्यामध्ये अडथळे निर्माण करणा-या आहेत. उपभोक्ता संस्कृतीचे निष्क्रिय घटक बनविणा-या आहेत. या उपभोक्ता संस्कृतीनं एक सत्य जन्माला घातलं आहे. ते सत्य कोणतं ? प्रचंड प्रमाणावरचं उत्पादन, त्याचे उत्पादक - मालक, प्रसारमाध्यमावरली त्यांची पकड, उपभोक्त्याला 'लॉलीपॉप' कमी न पडू देणं, त्याच्या विचारशक्तीसाठी सतत अंगाई गीतांची व्यवस्था करणं, हे आजचं सत्य आहे. या वास्तवात आजचा माणूस अडकला आहे. स्वतःची सर्जनशीलता गमावून बसला आहे.

यातून एक नवा प्रश्न निर्माण झाला आहे. सर्जनाच्या मूल्याविषयी आपण आज बधिरं झालो आहोत. प्रत्येक गोष्टीकडे उपभोक्त्याच्या नजरेनं पाहत आहोत. संकल्पनाकडेही याच दृष्टीनं पाहिलं जात आहे. याबाबत महात्मा गांधींची दृष्टी वेगळी होती. एक उदाहरण घ्यायचं झालं तर नैतिकता आणि स्वातंत्र्य या दोन्ही संकल्पनाचं घेता येईल. महात्मा गांधींच्या जीवनातल्या या दोन कळीच्या संकल्पना. पण त्यांनी कधीच संकल्पना म्हणून त्यांचा विचार केला नसावा. तेवढी त्यांना उसंतही नव्हती. पण साध्या विषयीची त्यांची एक निश्चित धारणा होती. दृष्टी होती. स्वातंत्र्याच्या प्रश्नाकडे त्यांनी राजकीय प्रश्न म्हणून कधीच पाहिले नाही. स्वातंत्र्याचे अनेक परिमाण त्यांना दिसत होती. आर्थिक, सामाजिक, मानसिक अशा सगळ्या प्रकारच्या परिमाणामधून एक पर्यावरण निर्माण होत असतं. त्यात माणूस मोकळा श्वास घेत असतो. विकसत वाढत असतो पण त्याच्यासाठी व स्वातंत्र्याच्या स्वास्थ्यासाठी नैतिकतेची गरज असते. या सर्जनक्षमतांशी निगडीत असतो. या सर्जनक्षमता अपरिहार्यपणे अहिंसात्मक असतात आणि राजकीय स्वातंत्र्याच्या स्वास्थ्याला आशय पुरवित असतात. महात्मा गांधींनी स्वातंत्र्याला अहिंसेशी निगडित करून जे नैतिक अधिष्ठान दिलं, ते केवळ अपूर्व आहे. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी झगडा देताना त्या व्यक्तीचं नैतिक संवेदन श्रेष्ठ असावं लागतं. गांधी एकाच वेळी अशा माणसाला घडवित होते आणि राजकीय स्वातंत्र्यासाठी झगडत होते. अस्तित्वाच्या झगड्यात जे लायक करण्याचं, नैतिक संवेदनसकट लायक करण्याचं असिधाराव्रत एखादा गांधीच स्वीकारत असतो आणि एकंदर माणसाच्या उत्क्रांती प्रक्रियेला नैतिकतेच्या कक्षेत खेचत असतो. हा माणूस उपोषण, मौन, प्रार्थना यांच्या आधारे आंतरिक पर्यावरण स्वच्छ व शुद्ध ठेवी. मौनाच्या क्षणात जाणवणारं सत्य व व्यवहारिक सत्य यांची सांगड घाली. श्रम आणि श्रेष्ठ दर्जाची नैतिकता यांच्यामधलं नातं कृतीतून दाखवी.

खरोखरच हा माणूस लोकविलक्षण होता. आपल्या गरजा मर्यादित करत तो जगला. त्यानं आपल्या मनाला सतत 'नीडबेड' ठेवलं. त्याच्या 'स्व' तृष्णेच्या आहारी गेला असता, तर तो आक्रमक झाला असता. त्याला 'स्व' चं विसर्जन हवं होतं. त्याला ते दोन कारणांसाठी महत्त्वाचं वाटत असावं. 'स्व'ला विसर्जित करणं कष्टसाध्य असतं असं आव्हान त्यांना स्वीकारावं वाटतं. कारण या आवाहनात अन्तःशक्तींची जुळणी करावी लागत असते. ही नवी जुळणी त्याला नवसामर्थ्य देत असते. या नव्या सामर्थ्याच्या प्रकाशात तो स्वच्या आक्रमक प्रवृत्तीकडे पाहू लागतो. आणि अधिक नम्र होऊ लागतो. दुसरं कारण असं की, ज्या घटकात 'स्व' ला विसर्जित केलं जातं त्या घटकांची प्रतिष्ठा त्याला प्राप्त होत असते. थेंब होऊन समुद्रात झोकून दिल्यानं थेंबाला समुद्राची भव्यता प्राप्त होत असते. या माणसानं स्वतःला अंतर्बाह्य अभंग ठेवलं आणि मानवतेत विसर्जित करून घेतलं. त्यामुळे त्याच्या दृष्टीत एक समग्रता आली. मानवतेची भव्यता प्राप्त झाली. त्यानं आपल्या संज्ञेला लालसेकडे झुकू दिलं असतं तर ती एका आवर्तात सापडली असती. भेलकांडत गेली असती. आज व्यक्तीच्या आणि समूहाच्या संज्ञेची ही गत झाली आहे. यातून सावरण्यासाठी चार पावलं गांधींच्या म्हणजे प्रकाशाच्या दिशेने उचलली गेली पाहिजेत ही या क्षणाची काळाची गरज आहे. ■■■

(दै. सकाळ वरून साभार)

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

## १९

# मार्क्स, फुले, गांधी व आंबेडकर

## (वैचारिक संश्लेषणाची गरज)

## ल. भा. कुरकुरे

भारतीय समाजवादी समाजपरिवर्तनाचे एक परिपूर्ण खंबीर क्रांतिकारक वैचारिक अधिष्ठान निश्चित करण्यासाठी मार्क्स, फुले, गांधी व आंबेडकर यांच्या विचारांचे एक सुसंगत पुरोगामी संश्लेषण करणे आवश्यक व शक्य आहे असे मला वाटते. भारतीय समाजवादी समाजपरिवर्तनाच्या चळवळीत आज सत्तारूढ पक्षापासून कम्युनिस्ट पक्षापर्यंत सर्व राजकीय पक्षांमध्ये विघटन वेगाने सुरू झाले असून तत्त्वशून्यता, संधिसाधूपणा, सत्ताकांक्षा, संपत्ती, कीर्ती व वृत्तपत्रीय प्रसिद्धी यांचा हव्यास व ध्यास, सोयीच्या तडजोडी आणि लंबकाप्रमाणे एका टोकापासून दुस-या टोकापर्यंत हेलकावणे इत्यादी प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर वेगाने प्रभावी ठरत आहेत. गांधी विचारांवर आत्यंतिक श्रद्धा आहे असे दाखवून मार्क्स विचारांचा निषेध करणे, राष्ट्रीय एकात्मतेची वरवरची भूमिका घेऊन फुले, आंबेडकर यांचा मूलगामी सामाजिक समतेचा विचार जातीयवादी म्हणून त्याज्य मानणे आणि फुले, आंबेडकर भक्तांनी गांधींचा व्यापक एकात्म राष्ट्रीय चळवळीचा विचार आणि मार्क्सचा वर्ग संघर्षाचा व आर्थिक समतेचा विचार यांपासून अलिप्त राहणे, मार्क्सविचारांवर निष्ठा बाळगणा-यांनी फुले-आंबेडकरांच्या जाती निर्मूलनाने सांधावयाच्या सामाजिक क्रांतीच्या विचाराची सपशेल उपेक्षा करणे इत्यादी वैचारिक मतभेदाच्या नावाखाली कोणतीच वैचारिक निष्ठा न बाळगणे, मार्क्स, फुले, गांधी व आंबेडकर या विभूतींच्या नावाभोवती असलेल्या वाढ याचा फायदा घेऊन त्यांच्या ख-या ख-या वैचारिक दिशेची उपेक्षा करणे, पोथीनिष्ठेने त्यांच्या विचारांची केवळ पोपटपंची करणे, स्वतंत्र प्रज्ञा वापरून प्राप्त परिस्थितीचे त्यांच्या वैचारिक दिशेशी अनुसंधान सांधण्याचा प्रयत्न न करता यांत्रिक पद्धतीने त्या विचारांशी शब्दप्रामाण्य बाळगून चूकीचा आचार करणे ह्या विविध अपप्रवृत्तींचा परिणाम भारतीय समाजवादी समाजपरिवर्तनाच्या चळवळीवर असा झाला आहे की, ती चळवळ तत्त्वशून्य व भ्रष्ट झाली असून निष्प्राण बनली आहे. एवढेच नव्हे तर समाजवादी समाजपरिवर्तन ही छुप्या सत्ताकांक्षेची घोषणा म्हणून वापरली जात आहे. ह्या परिस्थितीतून भारतीय समाजवादी समाजपरिवर्तनाची खरीखुरी जोमदार तत्त्वनिष्ठ चळवळ निर्माण होण्याच्या दृष्टीने मनोधैर्य व चारित्र्यसंपन्नता असलेले आणि समाजासाठी समर्पणाची भूमिका घेणारे स्वयंप्रज्ञ व तत्त्वनिष्ठ व विचारी कार्यकर्ते तयार व्हावयाचे असतील तर मार्क्स, फुले, गांधी व आंबेडकर यांच्या विचारांचे संश्लेषण करून एक नवीन क्रांतिकारक रसायन कसे उपलब्ध होऊ शकेल याचा शोध घेतला पाहिजे.

मार्क्स, फुले, गांधी व आंबेडकर हे चौघेही प्रस्थापित समाजामध्ये आमूलाग्र क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणणे जीवितकार्य मानून समर्पित वृत्तीने अविरत झटणारे कृतिशील तत्त्वचिंतक व द्रष्टे ठरले आहेत. ते चौघेही सामान्य माणसाच्या परिस्थितीत जीवन जगत असता विषमता, अन्याय, अस्पृश्यता, अपमान यांपैकी कोणत्या ना कोणत्या कारणाने व्यथित होऊन त्या व्यथेतून जीवित कार्याची प्रेरणा मिळालेले असे मानवतेचे सेवक म्हणून मान्यता पावले आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधूभाव ही अंतिम मूल्ये चौघांच्याही विचारास मान्य आहेत. ते ज्या परिस्थितीत जीवन जगत होते व समाजाच्या ज्या वर्गाच्या व जातीच्या समस्यांना

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

तोंड देत होते व समाज परिवर्तनाच्या ज्या अवस्थेत कार्यरत होते त्यामुळे आपणास वैचारिक भूमिकांमध्ये फरक आहे असे वाटते परंतु त्यांची दिशा मानवाच्या प्रगतीची व्यापक ऐक्याची व्यक्तिस्वातंत्र्याची, समतेची, शोषणमुक्तीची, वर्गविहीन समाजाची, जातिविहीन समाजाची, शांतताप्रधान विकसनशील समाजाचीच आहे. मार्क्स हा धर्मश्रद्धेवर व अंधश्रद्धेवर प्रहार करणारा आहे पण फुले, गांधी, आंबेडकर धर्मश्रद्धा ही एक प्रभावी मानवी प्रेरणा मानणारे असूनही अंधश्रद्धेच्या निर्मूलनाची भूमिका घेतात. फुले, आंबेडकर तर ब्राह्मणी धर्माविरूद्ध बंड करून उठतात. फुले, सार्वजनिक सत्यशोधक धर्मप्रतिपादन करतात व एकाच कुटुंबातील व्यक्तींनी हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन असा आपल्या इच्छेप्रमाणे निरनिराळ्या धर्मश्रद्धांचा स्वीकार करावा असे लोकशाही व्यक्तिस्वातंत्र्य प्रतिपादन करतात. आंबेडकर धर्मांतर करून बौद्ध धर्माचा स्वीकार करतात व सामाजिक आशय असलेल्या धम्माचे प्रतिपादन करतात. गांधी सर्वधर्म समभावाची भूमिका घेतात. स्वतःला हिंदू धर्मातील वैष्णव पंथाचे म्हणवितात पण सत्य व अहिंसा हाच खरा धर्म मानतात. पण फुले, गांधी व आंबेडकर यांच्या धर्मनिष्ठा डोळस, चिकित्सक व गतिमान असून विज्ञाननिष्ठेला व मार्क्सच्या ऐहिक व भौतिक दृष्टिकोनाला विरोधी नाहीत. धर्म ही अफूची गोळी आहे असे मार्क्स म्हणतो. धर्म म्हणजे मानवी जीवनाचे विकृत रूप. दैन्य व दुःख सोसणा-या जनतेला दिलेली भूल म्हणजे धर्म. तरी आत्मविमोचन मात्र मार्क्सला केवळ इष्टच नव्हे तर ज्यामुळे मनुष्य अधःपतीत व अपूर्ण राहतो ती प्रत्येक गोष्ट नष्ट करून किंवा फेकून देऊन मनुष्याने आपल्या उच्चतम सुप्त स्वातंत्र्याचा लाभ करून घेणे हे त्याचे कर्तव्यच आहे असे वाटते. धर्म म्हणजे मनुष्याच्या आत्मजाणिवेच्या अपूर्णतेची अभिव्यक्ती असे मार्क्सला वाटते पण फुले यांच्या धर्ममिमांसेत त्यांनी सत्य आणि निती यावर विशेष भर दिला आहे. मानवाचा धर्म सत्य खरी निती असे ते म्हणतात. गांधींच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा विविध कार्याची प्रेरणा धार्मिक आहे असे ते म्हणत. धर्म हे त्यांना जीवनाचे प्राणतत्व वाटे. त्याशिवाय ते एक क्षणभरही जगू शकणार नाहीत, असे ते म्हणत. धर्म ही मानवी मनाची मूलभूत गरज आहे. या दृष्टीने धर्म हाच जगाचा आधार आहे असे ते मानीत. सत्याच्या निधीध्यासाने गांधींना राजकारणाकडे खेचून घेतले होते. त्यांच्या मते धर्माचा राजकारणाशी संबंध नाही त्यांना धर्माचा अर्थच कळत नाही असे त्यांचे मत होते. राजकारणाचे अध्यात्मिकरण म्हणजे नैतिकीकरण व्हावे असा त्यांचा आग्रह होता. राजकारणात सत्याची व न्यायाची प्रतिष्ठापना करणे हे अध्यात्मिकरणाचे प्रयोजन होते. त्यांनी राजकारणाची साध्ये मिळवितांना शक्ती व संघर्ष यांना महत्त्व न देता सामान्य जनाचे कल्याण, मानवी गुणाची जोपासना, सामाजिक समता व न्याय यांच्यावर भर दिला. आंबेडकरांनी तर जो धर्म लक्षावधी माणसांना कुत्र्यापेक्षाही हीन लेखतो, माणसा-माणसांत विभाजन करतो, श्रेणीबद्धता राखतो तो धर्म नव्हे असे म्हणून हिंदू धर्मावर प्रहार केला. त्यांना माणसाने धर्माचा गुलाम होणे मान्य नव्हते. धर्माने गुलामगिरी लादण्यासही त्यांचा विरोध होता. धर्मातील असुरक्षितता आणि शोषण व दांभिकता यांना मार्क्स व आंबेडकर या दोघांचाही विरोध होता. परंतु आंबेडकरांना धर्म ही मानवाची महत्त्वाची गरज आहे असे वाटते. आंबेडकर म्हणतात, माणूस केवळ भाकरीवर जगत नाही त्याला नैतीक, बौद्धीक व सांस्कृतिक भूक असंते. ही नैतिक, बौद्धीक व सांस्कृतिक भूक भागविण्याचे सामर्थ्य धर्मात आहे. धर्म हा माणसाच्या सामाजिकतेचा अविभाज्य भाग आहे. सामाजिक नितीमत्तेशी माणसाचे जीवन व त्याची प्रतिष्ठा बांधलेली आहे म्हणूनच माणसाने धर्मप्रणित रूढी, परंपरांचे गुलाम होता कामा नये. त्यांची कामगार, पुढा-यांवर म्हणजे कम्युनिष्टावर व समाजवाद्यांवर टिका होती की ते भांडवलशाहीवर टीका करतात, पण

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ब्राह्मणशाहीवर टीका करीत नाही. त्यांच्या मते स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यांचा अभाव म्हणजे ब्राह्मणशाही किंवा ब्राह्मण्य. फुले यांनी देखील ब्राह्मणांच्या वर्णश्रेष्ठत्वाच्या अहंकारावर व कपटीपणाने गरीब जनतेची लुबाडणूक करण्यावर प्रखर हल्ले चढविले होते. आंबेडकरांनी म्हटले आहे, लेनिन हिंदुस्थानात जन्मला असता तर त्याने प्रथम जातिभेद व अस्पृश्यता यांना साफ गाडून टाकले असते व तसे केल्याखेरीज क्रांतीची कल्पना त्याने मनातही आणली नसती.

मार्क्सने जगातील कामगार एक आहेत असे कम्युनिष्ट जाहीरनाम्यातून सांगितले तर फुले यांनी जगातील मानव एक आहेत असे आपल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात सांगितले. गांधीदेखील मानवतावादीच आहेत. आंबेडकरांनी अस्पृश्यांना मानवाची प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी आपले सर्व आयुष्य वेचले. मार्क्सला वर्गविहीन समाज निर्माण करूंन समतेची ध्येय गाठावयाचे होते, तर फुले यांना जातिविहीन समाज निर्माण करून एकात्म व समताधिष्ठित भारत निर्माण करावयाचा होता. आंबेडकरांनी अस्पृश्य समाजात जागृती करून व तो समाज संघटित करून त्यांच्यासाठी संरक्षणात्मक राजकीय तरतुदींचा आग्रह धरण्याचा मार्ग चोखाळला. मार्क्सचा मार्ग वर्गसंघर्षाचा व वर्गयुद्धाचा तर गांधींचा मार्ग पुरोगामी वर्गसमन्वयाचा, अहिंसेचा, सत्याग्रहाचा आणि सर्वोदयाचा. गांधी अहिंसक अराज्यवादी तर मार्क्स कामगारवर्गीय राज्यसत्तेकडून राज्यविहीन अवस्थेकडे जाणारा अराज्यवादी. आंबेडकरांनी देखील सत्याग्रहाचा मार्ग अवलंबिला पण तो गांधींच्या सत्याग्रहापेक्षा वेगळा आहे. आंबेडकर म्हणतात, ज्या कार्यापासून लोकसंग्रह होतो ते सत्कार्य आहे आणि त्यासाठी केलेल्या आग्रहास सत्याग्रह म्हणावे.

आपण ही व्याख्या गीतेवरून घेतली असे आंबेडकरांचे म्हणणे आहे. त्यांच्या मते, गीता स्पष्टच सांगते की, जर आपले स्वजन आपले हक्क हिरावून घेत असतील तर त्यांच्याविरूद्ध युद्ध करावे. अशा प्रकारे मार्क्स, फुले, गांधी व आंबेडकर यांच्या समाज परिवर्तनाच्या कार्याची दिशा एक आहे व त्यांनी पुढे ठेवलेली अंतिम मूल्ये तीच आहेत म्हणून त्यांच्या विचारांचे तपशीलवार परिशीलन करून संश्लेषणाचा प्रयत्न झाला पाहिजे.

टीपाः 1) A Dictionary of Marxist Thought, Basil Blackwell publisher Ltd. (1983) pp. 413-414. २. बहिष्कृत भारत, ४ ऑक्टोबर १९२९ , ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारतातील अग्रलेख, संपादक रत्नाकर गणवीर, रत्नमित्रा प्रकाशन (१९७६) पृ. १७६

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

२०

# गांधी आणि नेहरू : दोन परंपरा

आचार्य राममूर्ति

आपले व नेहरूंचे विचार जुळत नाहीत, हे माहीत असून देखील गांधीजीनी नेहरूंना आपले वारस कां घोषित केले ? हा प्रश्न लोक नेहमी विचारत असतात. पुढेही विचारत राहतील.

या प्रश्नांचे खरे उत्तर इतिहासात आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कॉंग्रेसची उद्दिष्टे काय असावीत याबद्दल कॉंग्रेस कार्यसमितीत ऑक्टोबर १९४५ च्या पहिल्या आठवड्यात चर्चा होणार होती, त्यावेळी गांधीजीनी नेहरूंना लिहिले होते -

''मतभेद मूलभूत असतील तर लोकांना ही गोष्ट कळली पाहिजे ---- आपण एकमेकांचा दृष्टीकोन नीट समजून घ्यावा अशी माझी इच्छा आहे. माझे व तुमचे संबंध केवळ राजकीय नाहीत, त्याहून कितीतरी खोल आहेत. मात्र राजकीय क्षेत्रातही आपण एकमेकांना स्पष्टपणे समजून घ्यावे अशी माझी हार्दिक इच्छा आहे ---- मी आता वृध्द झालो आहे. तुम्हाला मी माझा वारस बनवले आहे. म्हणूनच मी माझ्या वारसाला समजून घ्यावे व त्याने मला समजून घ्यावे हे आवश्यक आहे. तेव्हाच माझे समाधान होईल''.

चर्चा व पत्रव्यवहाराचा क्रम १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळेपर्यंत चालूच राहिला, तरीही समाप्त झाला नाही. फाळणीनंतरच्या घटनांमुळे त्यात खंड पडला. मूलभूत प्रश्नांबाबत नवीन संसदेतील निर्वाचित प्रतिनिधीनीच निर्णय घ्यावेत अशीही नेहरूंची इच्छा होती.

## कॉंग्रेसमधील विचारप्रवाह

स्वराज्याचे स्वरूप कसे असेल, स्वतंत्र भारताच्या उभारणीची दिशा कोणती असेल, आर्थिक विकासाची काय योजना असेल इ. प्रश्नांबाबत कॉंग्रेसमध्ये नेहमीच वेगवेगळे विचारप्रवाह होते. पण स्वराज्यासाठी लढा चालू असतांना गांधीजीचा कार्यक्रमच अग्रभागी रहात असे व त्यानुसारच लढे चालत. गांधीजी केवळ स्वांतत्र्य - सेनानी नव्हते, ते राष्ट्र - निर्माता आणि हिंसामुक्त समाज रचना व जीवनपध्दतीचे द्रष्टे व प्रयोगकर्तेही होते. स्वांतत्र्य जसजसे जवळ येताना दिसू लागले तसतशी त्यांना चिंता वाटू लागली की भारत आता कोणती दिशा घेणार ? - पश्चिमी देशांचे आधुनिकीकरण करणार की आपली परिस्थिती, परंपरा व राष्ट्रीय प्रतिभेनुसार नवा रस्ता शोधणार ? अहिंसेसारख्या प्रश्नावर गांधीजी व कॉंग्रेस यांचे दृष्टीकोन वेगळे होते हे १९३४ पासूनच समोर येऊ लागले होते, मात्र १९३९ मध्ये दुसरे महायुध्द सुरू झाल्यानंतर भारत संकटाच्या छायेत येऊ लागला तेव्हा मतभेद अधिक तीव्रपणे उघड झाले. पुढे तर अशी वेळ आली की गंधीजीनी आपल्या शेवटच्या पत्रात लॉर्ड माऊंटबॅटनना लिहिले - ''तुम्ही बाजूला व्हा आणि फाळणीबद्दलचा निर्णय हिंदू - मुसलमानाच्या खुल्या सशस्त्र संघर्षातून होऊ द्या '' गांधीजीसाठी अहिंसेची ही शेवटची हाक होती. मात्र कॉंग्रेस नेत्यांनी फाळणीला आधीच संमती दिली होती. गांधीजीची दृष्टी नैतिक होती तर नेत्यांची राजकीय, नैतिक दृष्टी स्वीकारली असती तर व्यापक सशस्त्र संघर्ष टाळता आला असता आणि कदाचित फाळणीही टळली असती.

## नेहरू : सर्वमान्य नेतृत्व

गांधीजी नेहरूंचे विचार जाणत होते. ''नेहरूंचे राष्ट्रप्रेम, मानवता, शांतता व लोकशाहीवरील त्याची निष्ठा, यांचे त्यांना कौतुक होते. नेहरू भारतीय संस्कृतीला संगम - संस्कृती मानत नसत. १९२९ मध्ये वयाच्या ४० व्या वर्षीच ते कॉंग्रेसचे, अध्यक्ष झाले आणि तेव्हापासूनच जनतेचे लाडके बनले. गांधीजींनी तेव्हा लिहले होते -- ''राष्ट्र नेहरूंच्या हाती सुरक्षित आहे.'' त्यानंतर १९३०, १९३२, १९४२ च्या आंदोलनानंतर

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

१९४६ मध्ये स्वाभाविकपणे तेच हंगामी सरकारात पंतप्रधान झाले. त्याच्या व सरदार पटेलांच्या नेतृत्वाखाली १९४७ मध्ये देशाने फाळणीसह स्वांतत्र्याचा स्वीकार केला. युवक, महिला, अल्पसंख्यांक, सामान्य जनता, देश - विदेशातील लोक - - - सर्वांना स्वीकारार्ह अशी नेहरूंशिवाय दुसरी कोणी व्यक्ती तेव्हा नव्हती. समाजवादी पुढारीही आशेने त्यांच्याकडे पहात होते. सरदार पटेल, मौलाना आझाद, राजेंद्रप्रसाद इ. नेत्याचे स्वंतत्र्य स्थान होते, मात्र नेहरूंच्या नेतृत्वाखाली जादू त्यांच्यात नव्हती. नेहरू सर्वांच्याच आशांचे केंद्र होते. देशाला ते योग्य मार्गाने नेतील असा सर्वांनाच विश्वास होता. गांधीजीसारखा नव्या मार्गाचा मार्गदर्शक राहिला नव्हता.

स्वांतंत्र्यानंतर भारतापुढील सर्वात मोठा प्रश्न राजकीय, म्हणजे लोकशाहीबद्दलचा असेल हे गांधीजीनी अनेक वर्षाआधीच ओळखले होते. भारतासारख्या विशाल आणि विविधतासंपन्न देशात लोकशाहीशिवाय अन्य पध्दती चालू शकत नाही. लोकशाही पध्दतीच प्रत्येक प्रौढाला सत्तेत भागीदार करते. दबलेल्या, मुक्या लोकांना वाणी देते. राष्ट्राची शक्ती शांतता व रचनेच्या दिशेने घेऊन जाऊ शकते. लोकशाहीतच भारताचे भविष्य सुरक्षित आहे. एवढेच गांधीजी मानत नव्हते. तर लोकशाहीचा विकास होतांना लोकशक्ती व सैन्यशक्तीत संघर्ष अटळ आहे असा त्यांचा विश्वास होता, हे त्यांच्या शेवटच्या पत्रातून दिसते.

शांतता व लोकशाही यांच्या दृष्टीने नेहरूंहून उपयुक्त दुसरी व्यक्ती तेव्हा नव्हती, हे निर्विवाद आहे. आज परिस्थिती इतकी खालावून देखील भारतात मतपेट्याद्वारा सरकार बनत आहे, बदलले जात आहे याचे श्रेय दोन गोष्टींना आहे : राष्ट्रीय आंदोलनाची परंपरा आणि उदार लोकशाहीची नेहरूंमुळे खोल रूजलेली मुळे.

१९३९ ते १९४७ पर्यंतची ऐतिहासिक परिस्थिती आणि तिच्यातील नेहरूंची भूमिका पाहिली तर नेहरूच देशाच्या आकांक्षाचे प्रतिनिधीत्व करीत होते आणि देश त्यांच्यासोबत होता हे स्पष्ट होते. गांधीजीनी नेहरूंना वारस बनवून देशाच्या इच्छेवर मोहरच लावली. गांधीजीचा आशीर्वाद आणि देशवासियांचे प्रेम यांच्या बळावर नेहरू - पटेलांच्या जोडीने फाळणीनंतरच्या संकटातून देशाला तारून नेले.

## नेहरूंची महत्वाकांक्षा : देशाची आकांक्षा

नेहरू गांधीजीचे वारस तर झाले, पण त्यांना वारस कोणता सोपवायचा याची गांधीजींना चिंता होती. म्हणूनच १९४५ पासून अखेरपर्यंत भारताच्या नवनिर्माणाबद्दलची आपली कल्पना ते नेहरूंपुढे पुन्हा पुन्हा मांडत होते. आजच्या जगात गांधीजींचा मार्ग कामाचा नाही, अशी नेहरूंची प्रामाणिक धारणा होती. म्हणून पंतप्रधान झाल्यावर त्यांनी गांधीजींना अभिप्रेत चित्र मनातून अगदी काढून टाकले. इतके पार काढून टाकले की नवी घटना, योजना, कशावरच गांधीजींची, काँग्रेसच्या जुन्या ठरावांची आणि प्रतिज्ञांची छाया त्यांनी पडू दिली नाही.

गांधी - नेहरूंच्या चित्रात कोणता फरक होता ? नेहरूंच्या समोर पाश्चिमात्य देशांचा नमुना होता 'नेशनस्टेट' (राष्ट्र - राज्य) चा केंद्रीत तांत्रिकीचा, प्रचंड व्यापार, व प्रचंड योजनांचा. राज्य म्हणजेच राष्ट्र, राज्याहून वेगळे असे राष्टाचे अस्तित्व नाही, अस्मिता नाही, जीवन नाही ही धारणा त्या नमुन्याच्या मुळाशी होती. स्वतंत्र भारत एक शक्तिशाली 'नेशन - स्टेंट' बनावे, जगात त्याचा माथा उंच व्हावा, ही नेहरूंची महत्वकांक्षा होती. भारताच्या जनतेचीही हीच आंकाक्षा होती. गांधीजी मात्र नेहरूंच्या महत्वाकांक्षेत, देशाच्या या तात्कालिक आकांक्षेत सहभागी नव्हते. त्यांची नजर दूरच्या क्षितिजाकडे होती.

एखादे आधुनिक नेशन - स्टेट शक्तिशाली कसे बनते ? सुनिश्चित भूप्रदेशावर राज्य सार्वभौम असणे, देशभर नोकरशाहीची सुसंघटित शासनव्यवस्था, अद्यतन शस्त्रास्त्रे, मोठे केंद्रित प्रचंड व्यापार, प्रचंड बाजार, प्रचंड विकास - योजना, विद्यापीठे, मोठी वृत्तपत्रे, मोठ मोठे राजकीय पक्ष - ही चिन्हे आधुनिक, सशक्त नेशन - स्टेटची. नेहरूंना प्रचंडतेचे आकर्षण होते. भाक्रा - नांगलचे धरण आणि पोलादाच्या मोठ्या

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कारखान्यांना त्यांनी 'आधुनिक भारताची मंदिरे' म्हटले होते. स्वतंत्र भारताच्या नव्या शक्तीचे दर्शन त्यांना या मंदिरात होत असे.

## नेशन - स्टेटचा विचार

शक्तीचा स्त्रोत राज्यात आहे हाच नेशन - स्टेटचा विचार आहे. म्हणूनच राज्याची शक्ती राष्ट्राच्या शक्तीचा मापदंड बनते. राष्ट्रात राज्यशक्तीखेरीज दुसरी स्वायत्त शक्ती मग राहू शकत नाही. राज्यशक्तीनेच राष्ट्राचे संरक्षण, विकास, लोककल्याण, राष्ट्र - जीवनाचे नियमन व संचालन इ. सर्व काही होऊ शकते, तेच उचित व आवश्यक आहे असे मानण्यात येते.

नेशन - स्टेटचा विचार राज्यवादी विचार आहे. नेहरू पूर्णपणे तो विचार मानत होते, तेच नव्हे तर सामान्य काँग्रेसजनही मानत होते. ज्या मार्गाने चालून चिमुकले इंग्लंड इतके सामर्थ्यवान बनले. त्या मार्गाने भारतही तसाच का बनणार नाही ? - अशी काँग्रेसच्या बहुसंख्य नेत्यांची व कार्यकर्त्यांची धारणा होती. नेहरू, पटेल, आझाद इ. पुढा-यांचा गांधीजीच्या जीवन - तत्त्वज्ञानावर किंवा सामाजिक तत्त्वज्ञानावर विश्वास नव्हता. त्यांची जीवनमुल्ये वेगळी होती, आस्था वेगळ्या होत्या. ते स्वातंत्र्यलढ्यातील आघाडीचे सैनिक होते, गांधीजीच्या नेतृत्वाखाली लढत होते पण सैनिक शिष्य नसतो, सहकारी असतो. हे पुढारी गांधीजीचे शिष्य होते असे मानण्याची चूक केली जाते ; ती आता तरी दुरूस्त व्हावी. पाश्चिमात्य देशांचा मार्ग अनुसरण्याची इच्छा त्यांच्या मनात मुळचीच होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच साहजिकच त्यांनी तो मार्ग अनुसरला. देशाला वेगाने त्या मार्गावरून नेण्याच्या दृष्टीने २६ जानेवारी १९५०.ला जी घटना लागू झाली, ती १९३५ मध्ये इंग्रजांनी बनवलेल्या कायद्याच्या आधारे बनवलेली होती. नंतर वर्षभराने, १ एप्रिल १९५१ ला ज्या पंचवार्षिक योजनांचा प्रारंभ झाला. ती रशियाच्या नमुन्यानुसार बनवण्यात आली होती. दोन वर्षांनी १९५३ मध्ये उत्तर प्रदेशात इटावा जिल्ह्यात सामुदायिक विकास कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यामागे अमेरिकेची बुध्दी व प्रेरणा होती. अशा प्रकारे स्वांतत्र्यानंतर पहिल्या पाच - सहा वर्षातच खालील गोष्टी निश्चित झाल्या (१) इंग्रजानी गुलाम भारताकरिता बनवलेली नोकरशाहीची रचना स्वतंत्र भारतातही तशीच राहील. (२) आधुनिक उद्योगवादी पाश्चिमात्य देशांचाच मार्ग आर्थिक - सामाजिक विकासासाठी भारत अनुसरेल. (३) पाश्चिमात्य देशांप्रमाणेच भारताचेही राजकीय स्वरूप 'नेशन - स्टेट' हे असेल.

अशाप्रकारे स्वातंत्र्यलढ्याचे नायक गांधीजी राष्ट्रनिर्माण करतांना नाकारले गेले - काँग्रेस आणि जनता दोहोंनी त्यांना नाकारले.

## गांधीजीचे कल्पनाचित्र

गांधीजीच्या मनात स्वतंत्र भारताचे कोणते चित्र होते ? देशातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत स्वातंत्र्य पोचेल तेव्हाच त्यांच्या दृष्टीने ते सार्थक होणार होते. 'राष्ट्र' म्हणजे त्यातील कोट्यावधी स्त्री-पुरुष, समाज व प्रकृती हा त्यांना अभिप्रेत अर्थ होता. त्यांच्या योजनेत राष्ट्र साध्य होते, राज्य साधन. देशाचा विकास व्हावा, पण अर्ध्याहून जास्त देशवासी भुकेकंगाल रहावेत, अभाव, अज्ञान व अन्यायाने ग्रस्त असावेत - अशा विकासाचे व अशा स्वातंत्र्याचे आकलन गांधीजींना होऊच शकत नव्हते. लोक सुखी व समर्थ असतील तर त्यांचे राज्यही शक्तीशाली असेल अशी त्यांची धारणा होती. गरीब व कमजोर राष्ट्रातील राज्य भ्रष्ट व निरंकुशच असू शकते, शक्तिशाली नव्हे.

गांधीजी राज्यवादी नव्हते, लोकवादी होते. ते नेशन जाणत होते, स्टेट मानत होते, मात्र नेशन - स्टेटचा आदर्श त्यांना मान्य नव्हता. जनतेच्या संघटित नैतिक शक्तीवर त्यांचा विश्वास होता. त्यांच्या नेतृत्वाखाली जनतेच्या सत्याग्रही शक्तीने एका अतिसंघटित साम्राज्याच्या शक्तीशी दोन हात केले. जनतेच्या ह्यांच शक्तीचा त्यांना विकास करायचा होता. यातूनच खरी लोकशाही साकार होईल अशी त्यांची दृष्टी होती. राज्याच्या दैनंदिन हस्तक्षेपापासून मुक्त लोकजीवनाचे क्षेत्र त्यांच्या रचनेत अभिप्रेत होते. या मुक्त क्षेत्रात लोकांनी

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

स्वतः निर्णय घेऊन व आपल्या सामुहिक शक्तीने आपल्या दैनंदिन जीवनाचे नियमन व संचालन करावे आणि अशा त-हेने लोकशाहीचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा, अभ्यास करावा अशा अभ्यासासाठी भारतातील पाच लाख गावे स्वाभाविक युनिटस् होती. भारतात लोकशाही असेल तर भारताच्या शहरात आणि खेड्यांत लोकशाहीचे रूप का प्रकट होऊ नये ? सरकार जेवढे कमी असेल आणि तेवढे शुध्द व सक्षम असेल जेवढे जास्त असेल तेवढे भ्रष्ट व अक्षम असेल अशी गांधीजीची धारणा होती. एक दमन-तंत्र या नात्याने सरकारचा सतत क्षय व्हावा आणि जनतेची सहकारशक्ती व प्रतिकारक्ती वाढत जावी हाच लोकशाही शक्तिशाली व प्रतिकारशक्ती वाढत जावी हाच लोकशाही शक्तिशाली बनवण्याचा एकमेव राजमार्ग आहे. गांधीजींची सामाजिक अंहिसा म्हणजे विशुध्द लोकशाहीचा प्रयोग होता. त्यांच्या कल्पनाचित्रात लाखो खेडी व शहरे स्वायत्त व परस्परावलंबी अशी लोकशाहीची युनिट्स होती.

## स्वप्नांचा चक्काचूर

नेशन - स्टेटचा आपल्या देशातील गेल्या ४०-४१ वर्षातला अनुभव काय आहे ? अतिकेंद्रित राज्यव्यवस्था देशाला राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्रात कोठे घेऊन जाते हे आज दिसत आहे. समाज इतका पांगळा का बरे झाला आहे ? गांधीजीनी जागृत केलेली प्रतिकारशक्ती गेली कुठे ? राज्यवादी कल्याणवादाने सरकार 'मायबाप' आहे असे जनतेला शिकवून इतके लाचार कसे केले ? एवढ्या विशाल देशाचे सहअस्तित्व दिवसेंदिवस संकटात का पडत आहे ? राज्याच्या शक्तीचाही आतून -हास का होत आहे ? हा दुहेरी --हास थांबवण्यात राज्याच्या हाती एवढी शक्ती असून देखील का अपयशी ठरत आहे ?

नेहरूंनी विकासाचा जो मार्ग स्वीकारला त्यावर चालून आपण आज कुठे पोचलो आहोत ? गेल्या ४० वर्षात मोठ मोठी कल्याणकारी कामे झाली. पण फक्त तीनशे वर्षापूर्वी समृध्दतम असलेला भारत आज जगातल्या सर्वाधिक गरीब १३ देशांमध्ये आहे - पाकिस्तान व श्रीलंकेहूनही गरीब आहे. देशाचा विकास आणि जनतेचा -हास ही विसंगती पावलोपावली दिसते. एकीकडे संपन्न शहरी 'इंडिया' आणि दुसरीकडे विपन्न ग्रामीण भारत - ही फाळणी भारत - पाकिस्तान फाळणीहून जास्त भयंकर आहे. इंग्रजाच्या काळात भारतातील लक्ष्मी इंग्लंडला जात होती. आज खेड्यातील लक्ष्मी (पैसा), सरस्वती (प्रतिभा) व शक्ती (श्रम) तिन्ही शहराकडे जात आहेत आणि तेथून परदेशांकडे. भारताच्या शोषणासाठी इंग्रजानी राबवलेले वसाहतवादी आर्थिक धोरण स्वतंत्र भारतात खेड्यांच्या शोषणासाठी, विकासाच्या नावावर पंचवार्षिक योजनांद्वारे राबविले जात आहे. खेड्यांचा कच्चा माल स्वस्त दराने विकणे व शहरांचा तयार माल चढत्या भावाने विकत घेणे व तीन चतुर्थांश लोकसंख्येचे योजनापूर्वक निरूद्योगीकरण (डी-इंडस्ट्रियालयझेशन) केले जात आहे. अशा स्थितीत दारिद्रय, विषमता, बेकारी दूर होणे तर सोडाच, त्यांना किंचित तडादेखील जाऊ नये यात आश्चर्य कसले ? परिणामी राष्ट्र - जीवन अनेक प्रकारच्या विघटनकारी प्रवृत्ती व सामाजिक व सरकारी हिंसेने ग्रासून टाकले आहे.

अशी स्थिती का बरे आहे ? लोक भय व आशकांग्रस्त का होऊ लागले आहेत ? आपल्याच प्रतिनिधींच्या सत्तेबद्दल इतका दुरावा व अविश्वास लोकांच्या मनात का आहे ? खरे म्हणजे स्वतंत्र देशात राज्यशक्ती व लोकशक्ती यांचे देशाच्या नवनिर्माणाच्या कामात परस्पर - सहकार्य असायला हवे. या स्थितीचे कारण हे आहे की आम्ही इंग्रज गेल्यानंतर पारतंत्र्यातील शासनतंत्र बदलले नाही, पत्रव्यवहाराची पध्दती बदलली नाही, जनता व सरकार यांच्यातील परस्परसंबंध बदलले नाहीत. पोलीस, प्रशासन, जमीन व साधनांची मालकी, शिक्षण, न्याय - - - - सगळे काही जसे इंग्रजाच्या काळी होते तसेच आजही आहे. ना राज्यव्यस्था बदलली, ना समाजरचना, ना जीवनशैली. राज्याचा विस्तार झाला, राष्ट्राची घडण झाली नाही. जनतेच्या शक्तीने देश घडवण्याचा प्रयत्नही झाला नाही. त्या दिशेने आपण पावले टाकलीच नाहीत. स्वातंत्र्याच्या स्वप्नांचा आपण चक्काचूर होऊ दिला.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

आज देश एका विशाल शासक व शोषक वर्गाच्या मुठीत आहे. उत्पादकांवर अनुत्पादक कुरघोडी करीत आहेत. उत्पादन यंत्रे करीत आहेत, माणसाचे हात व मेंदू बेकार आहेत. जणू काही देश वरच्या दहा टक्के लोकांचाच आहे, बाकी नव्वद टक्के त्यांच्या मर्जीवर अवलंबून आहेत असे वाटते. दारिद्र्याच्या समुद्रात वैभवशाली दिखाऊ बेटे बनवण्यासाठीच ४१ वर्षांपूर्वी आपण निघालो होतो काय ?

तेव्हा नेशन -स्टेट (राष्ट्र - राज्य) म्हणजे राष्ट्रविरोधी राज्य सिध्द झाले आहे.

## राष्ट्र निर्मितीची दिशा :

गांधीजींचा वेगळा रस्ता कोणता होता? त्यांचे म्हणणे होते की भारत खेड्याचा देश आहे, म्हणून खेडेच भारताच्या पुनर्निर्माणाचा आधार असू शकते. आणि खेड्यांचे पुनर्निर्माण औद्योगीकरणापासून सुरू झाले पाहिजे. नेहरूंना हे पटले नाही. एका पत्रांत त्यांनी गांधीजींना लिहिले ''सामान्यतः खेडे बौध्दिक व सांस्कृतिक दृष्टीने मागासलेले असते. मागासलेल्या वातावरणात प्रगती होऊ शकत नाही. संकुचित बुध्दीचे लोक असत्य व हिंसा यांना कित्येकदा बळी पडतात''. नेहरूंच्या मते, सर्वांच्या अन्न, कपडा, घर, शिक्षण, आरोग्य या जीवनावश्यक गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत ----- दळणवळणाच्या साधनांचा वेगाने विकास करावा लागेल. लहान मोठे उद्योग विकेंद्रीत केले जाऊ शकतात, पण देशात जर शहर व खेडी यांच्या दोन अर्थनीती राहतील तर संघर्ष होईल, एक दुसरीवर कुरघोडी करील. शिवाय, देशाचे संरक्षण व वैज्ञानिक प्रगतीकडेही लक्ष पुरवावे लागेल''. नेहरूंचे हे विचार दोन वेगळ्या जीवन - तत्त्वज्ञानांशी जोडलेले वाटतात.

गांधी - नेहरूंची जीवन - तत्त्वज्ञाने तर वेगळी होतीच, त्यांच्या चिंतनाच्या दिशाही वेगळ्या होत्या. गांधीजीच्या दृष्टीने खेडे भारतातील भीषण वास्तव्याचे प्रतीक होते, म्हणूनच राष्ट्रीय पुरुषार्थाचा तो आरंभबिंदू होता. खेड्याची उपेक्षा देशासाठी दुहेरी अभिशाप ठरत आहे हे आपण आज पाहू शकतो. एकीकडे खेडी खंगत आहेत, तर दुसरीकडे शहरे व महानगरे विशाल झोपडपट्ट्या व गुन्हेगारी अड्डे बनत आहेत. उद्ध्वस्त होणारी खेडी व फुगणारी शहरे दोन्ही देशाच्या गळ्याला तांत लावीत आहेत.

गांधीजी दुहेरी अर्थनीतीचे समर्थक नव्हते. त्यांना ग्रामकेंद्रीत समन्वित राष्ट्रीय अर्थनीती हवी होती. जीवनाला ते समग्र मानत. त्यांना माहीत होते की खेडी मागासलेली आहेत. एकदा त्यांनी खेड्यांना 'शेणाचे ढीग' म्हटले होते. म्हणूनच राष्ट्राच्या पुनर्निर्माणाची कसोटी खेडे आहे असे ते मानत. माणसाचे शोषण होणार नाही, त्याचा -हास होणार नाही, या मर्यादेत विज्ञान तंत्रज्ञान त्यांना स्वीकारार्ह होते. रेल्वे, डाक, तार, विमाने, यांची आवश्यकता त्यांना दिसत होती, पण प्रत्येक गोष्ट माणसाच्या कसोटीवर ते कसत. माणसाच्या बळी देऊन कोणतीही गोष्ट त्यांना नको होती. ही त्यांची दृष्टी चुकीची होती असे आज कोण म्हणू शकेल ?

गांधीजीच्या स्वप्नातील खेडे नेहरूंना वाटे तसले मागासलेले संकुचित, हिंसा व असत्यात बुडलेले नव्हते. ते होते एक उन्नत जिवंत सहअस्तित्व. त्यांनी चित्र रेखाटले होते -- ''माझे गाव ( १ ते २ हजार लोकसंख्येचे) एक पूर्ण गणराज्य असेल. आपल्या प्राथमिक गरजांबाबत ते स्वावलंबी असेल. गावे अन्य गरजांबाबत परस्परावलंबी असतील. प्रत्येक गाव आपल्या गरजेपुरते धान्य, कापडासाठी कापूस पिकवील. यानंतर जमीन वाचली तर ती पैसा देणा-या इतर पिकांसाठी वापरली जाईल - गांजा, तंबाखू, अफू करता मात्र नव्हे. शक्यतोवर प्रत्येक काम परस्पर - सहकार्यांनी होईल. ग्राम - समुदाय सत्याग्रह व असहकाराच्या पध्दतीने कामे करतील. गाव आपल्यातूनच पहारा देण्यासाठी लोकांची निवड करील. गावाचे शासन पांच पंचाच्या हाती राहील. त्यांची निवडणूक सर्व प्रौढ स्त्री - पुरूषांद्वारा दरवर्षी होईल. पंचायत कायदेमंडळ, न्यायपालिका स्वतंत्र असेल ''.
व कार्यपालिका असेल. या गणराज्यातच प्रत्येक व्यक्ती

राष्ट्रीय पुनर्निर्माणाची ही दिशा गांधीजीनी अभिप्रेत होती. काळानुसार व गरजानुसार यात आवश्यक फेरबदल केले जाऊ शकतील. पंचाऐवजी सर्व प्रौढांची ग्रामसभा कदाचित जास्त लोकतांत्रिक मानली जाईल.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने गावाची ग्रामसभा, मंडळ सभा, ब्लॉक स्तरावर प्रखंड सभा, जिल्ह्याची जिल्हासभा, अशा पाय-या करता येतील. या सभा आपापल्या क्षेत्रात शेती, ओलित, उद्योग, व्यापार, मजुरी, कर्ज, शिक्षण, आरोग्य, न्याय, शांतता, संरक्षण इ. प्रश्न सोडवू शकणार नाहीत असे मानण्यास जागा नाही. सर्व रचनेचा आर्थिक आधार मग शेती - उद्योग - पशुपालनाची अर्थनिती असेल, तर गावाची स्वायत्तता हा राजकीय आधार असेल. या योजनेत सर्व आधुनिक सोयींना उदा. शुध्द पाण्याची केंद्रीय व्यवस्था, रस्ते, वीज, घराघरात चालणारी उत्पादक यंत्रे इ. ना. स्थान होते ; स्थान नव्हते ते शोषण व व्यसन यांना. गाव जर अशा रितीने वैज्ञानिक व आधुनिक झाले तर पोट भरण्यासाठी कोण शहरात जाऊन सडकेवर झोपायला तयार होईल? नेहरूंनी संरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला होता. पण या ग्रामव्यवस्थेत देशाचे संरक्षण न होऊ शकण्याचा धोका कोठे होता ?

गांधीजींनी या रचनेला ग्रामस्वराज्य म्हटले. त्यांच्या कल्पनातल्या 'सांसदीय स्वराज्यात' गावागावात स्वराज्य होते, दिल्लीत संसदही होती. मात्र तिचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. याउलट नेहरूंचे चित्र 'सांसदीय सरकार'चे होते. त्याचा अर्थ होता दिल्लीत देशाचे सरकार, ज्याचे शासन खेड्यापाड्यात चालेल - अर्थात एक अत्यंत केंद्रीत व्यवस्था. भारतात मौर्य साम्राज्याच्या काळापासून ब्रिटिश काळापर्यंत बावीस - तेवीसशे वर्षात कोणतीही केंद्रीत व्यवस्था टिकाऊ ठरली नाही, याला इतिहास साक्षी आहे. सर्वात अधिक टिकले ते मोगल साम्राज्य - तेही फक्त १८१ वर्षे. ब्रिटिश साम्राज्य १७५७ ते १९४७ पर्यंत, म्हणजे केवळ १९० वर्षे टिकले.

भारतासारख्या विशाल आणि विविधतेने भरलेल्या देशात केंद्रीत व्यवस्थेच्या आधारावर स्थायी राष्ट्रनिर्मिती करणे अशक्य आहे.

## दोन प्रवाह

गांधीजी व नेहरू ही केवळ व्यक्तींची नावे नाहीत, ऐतिहासिक दृष्टीने पहाता ही दोन परंपराची नावे आहेत. नेहरू - परंपरेत इंदिराजी व राजीवजी आहेत. या परंपरेच्या हाती सत्ता आहे. शासकवर्गाचा व श्रीमंताचा पाठिंबा या परंपरेला आहे. गांधी - परंपरेत विनोबा, लोहिया, जे.पी.चे 'जनता सरकार' ही बदलत्या परिस्थितीनुसार बदललेली नावे आहेत. मात्र सर्वांची दिशा एकच आहे. सर्वांचा पायाभुत आधार मनुष्य आहे, लोकशक्ती आहे, मुक्ती आहे. राज्यशक्ती लोकशक्तीला पूरक आहे. गावातील साधनांची मालकी ग्रामसमुदायात निहित आहे, राज्यात नाही. खाजगी मालकीतून भांडवलशाही जन्मते आणि राज्याच्या मालकीतून साम्यवाद. भांडवलशाही व साम्यवाद या दोन्ही केंद्रित व राज्यवादी व्यवस्था आहेत. लोकशाहीसाठी, उदार लोकशाहीसाठी तिस-याच प्रकारची मालकी हवी. विकेंद्रित व्यवस्थेत मालकी गावाचीच असू शकते.

लोकशक्तीचा सिध्दांत लोकशाहीला प्रतिनिधिशाहीहून फार पुढे घेऊन जातो. त्यात मतदार स्वतः लोकशाहीचा वाहक व माध्यम बनतो. या आधारे नवी 'शेजारशक्ती' (नेबरहुड पॉवर) उभी राहते. आजची लोकशाही मतदारांना केवळ शासक निवडण्याचा अधिकार देते. लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीने एवढे पुरेसे नाही. समाज, सरकार, देश, जग यांना हिंसामुक्त जीवनाकडे घेऊन जाण्यातच लोकशाहीचे यश आहे. लोकशक्ती जागृत होईल तेंव्हाच हे शक्य होईल. राज्याच्या भरवशावर लोकशाहीचा व्हायचा तेवढा विकास होऊन चुकला आहे. राज्याधारित लोकशाहीने तिस-या जगातील प्रत्येक देशाला भ्रष्ट व निरंकुश शासनाच्या हाती दिले. म्हणूनच राज्यवादावर सर्व बाजूंनी आक्रमण होत आहे. समाजवादी, मानवतावादी, क्रांतीवादी, पर्यावरणवादी, लोकशाहीवादी सारे त्यावर तुटून पडत आहेत. आम्ही यापासून धडा शिकला पाहिजे.

गांधी व नेहरू यांच्या परंपरा म्हणजे इतिहासाचे दोन प्रवाह आहेत. भारताच्या विकासाच्या मार्गात दोघांमधील चढाओढ अनिवार्य आहे. भारतीय लोकशाही कशाची निवड करते हा या शतकातील शेवटच्या वर्षामधला निर्णायक प्रश्न आहे.

■■■

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# गांधी आणि विनोबा

रामभाऊ म्हसकर

## जीवन विषयक बैठकीत मूलभूत फरक

गांधी - विनोबांच्या जीवनाविषयक बैठकीतील मूलभूत फरक लक्षात आला की, त्या दोघांचे आकलन सोपे होणार. गांधीना उपजतच सेवा करण्याची आवड. थोडक्यात ते कर्मप्रवृत्त. विनोबांचा पिंड याच्या उलट. एखाद्या वस्तुचा त्याच्या मुळाशी जाऊन शोध घेणे, हा त्यांचा छंद, त्यांच्यासाठी प्रवृत्ती गौण, निवृत्ती महत्वाची.

गांधी - विनोबांच्यासाठी गीता हा मार्गदर्शक ग्रंथ. वाल्मिकीने प्रथम रामायण लिहिले आणि तदनुसार राम वर्तले असे सांगतात. कधीकधी विनोदाने म्हटले जाते की, नाटकाबर हुकुम नट वागत गेला. सीतेला घेऊन राम वनात गेला. आता पुढे काय करायचे, ते वाल्मिकीच्या गाइडबुकवरून रामाने ठरवायचे !

गांधीजीनी 'आपले जीवन हाच आपला संदेश' म्हणून सांगितले, आता असा हा जीवनपट लक्षात घेऊन त्यांच्या जीवनाची बैठक शोधून काढायचे काम विनोबासारख्यांचे. याला 'डिस्कव्हरी' म्हणता येत नाही. इन्व्हेन्शन म्हणावे लागेल. आश्रमाला आधारभूत असलेल्या तत्त्वांची बैठक 'मंगल प्रभात' मध्ये बापूंनी मांडली. त्याचा गाभा विस्तारासह अभंगव्रत विवेचनात विनोबांनी उलगडून दाखविला.

## कर्मप्रवृत्ती - कर्मनिवृत्ती :

कर्मप्रवृत्त आणि कर्मनिवृत्त अशी ही जोडगोळी आकलन व्हायची कशी ? गीतेचा मराठी पद्यानुवाद लिहायला सुरूवात करण्यापूर्वी गीतेच्या चौथ्या आणि पाचव्या अध्यायाचा चित्तात स्पष्ट खुलासा झाल्यावरच त्यांनी ' गीताई 'च्या लेखनाला सुरूवात केली. कर्म, विकर्म आणि अकर्म याचा खुलासा त्यांनी गीता प्रवचनात स्पष्टपणे केलेलाच आहे. कर्मप्रवृत्त आणि कर्मनिवृत्तांना मिळणारे फळ एकच असते. प्रवृत्ती की निवृत्ती हे स्वभावतःच मनुष्य जन्माला घेऊन येत असतो आणि प्राप्त गुणांच्या आधारे त्याने स्वतःचा विकास करायचा असतो. हा आहे मुलभूत सिध्दांत.

ही वस्तू एकदा आकलन झाली की सेवापरायण गांधी सेवेतून संयमाकडे, संयमाकडून ब्रम्हचर्याकडे आणि त्यातून पुढे ब्रम्हप्राप्तीकडे कसे वळले हे लक्षात येईल. याउलट 'अथातो ब्रम्हाजिज्ञासा' म्हणत घर सोडणारे विनोबा कांचनमुक्ती, भूदान - यज्ञ, ग्रामस्वराज्य, आचार्यकुल आदी प्रवृत्तीत का शिरले हेही कळले. निर्गुण ब्रम्हाला साकार देहात वावरतांना मर्यादा येतातच. गीताईच्या तिसऱ्या अध्यायत तेराव्या श्लोकात यज्ञात उरले खाती संत ते दोष जाळीती, रांधिती आपुल्यासाठी पापी ते पाप भक्षिती या श्लोकात संत शब्दाचा अर्थ विनोबांनी समाजसेवक, यज्ञात उरलेले भोगणारा, असा केला आहे.

## संत ते ?

आज सामाजात संतचा अर्थ ईश्वराला आळवीत बसणारा, हा रूढ आहे. सर्वत्र ईश्वराला पाहणारा ज्ञानी. हा अर्थ जणू लोपलाच आहे आणि सन्मार्गाने वागणारा सज्जन हा अर्थ राहिलाच नाही. 'संत' या शब्दाचा आजचा रूढ अर्थ विनोबांना लावला गेल्याने समाज परिवर्तनासाठी त्यांनी केलेले सर्व प्रयत्न जणू लोपल्यासारखेच झाले आणि एका दृष्टीने विनोबांचा हा पराजय आम्ही चाहत्यानी केला असे म्हणावे लागेल.

विनोबांच्या लहानपणाची गोष्ट. लोकमान्य टिळकांच्या 'केसरी' तील लेखाने भारावलेला हा विनायक. (विनोबांचे बालपणीचे नाव) गावात एक कीर्तनकार आला. किर्तनांनंतर गोष्टी चालल्या. धाकट्या विनायकाची देशभक्ती तेव्हाही डोके वर काढू लागली होती. कुणीतरी कीर्तनकारांना म्हटले, ''हा विनायक देशाच्या स्वातंत्र्याबाबत विचार करतो,'' कीर्तनकाराने म्हटले, ''बाबारे, ठेविले अनंते तैसेचि राहावे, चित्ती असू द्यावे समाधान.'' तेव्हा विनायक तत्काळ बोलून गेला, ''संताचे हे वचन मला मान्य आहे. 'ठेविले अनंते' तसा मी राहायला तयार आहे, परंतु 'ठेविले इंग्रजे' तसा मी कसा राहीन ?''

## महात्मा आणि संत

आता यात समाज परिवर्तन, सामाजिक क्रांतीची त्यांची दृष्टी दिसते. विनोबांना 'संत' विशेषण जोडून आम्ही त्यांच्या शिडातील हवा तर काढून टाकली नाही ना, असा प्रश्न पडतो. 'महात्मा' विशेषणाने गांधी अलंकृत असले तरी महात्माच्या वलयाखाली ते दबलेले दिसत नाहीत ! ■■■

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

# २२

# गांधीजी व त्यांचे टीकाकार

## वसंत बोंबटकर

जगात व देशात गांधीजींची एकशे पंचेविसावी जयंती साजरी केली जात आहे. त्यांची एकशे पंचेवीस वर्षे जगण्याची आकांक्षा होती व त्यानुरूप त्यांची शारीरिक स्थिती पण दिसत होती पण मध्येच त्यांची अमानुष हत्या झाली. यावर्षी गांधीजींच्या कार्याबद्दल बरेच मंथन - टीकाटिपणी चाललेली आहे. विचारभेद हे जिवंतपणाचे लक्षण आहे. अखिल समाजहित भावनेतून झालेले वैचारिक मंथन व मतभेदातूनही समाजाच्या प्रगतीला हातभार लावण्यास मदतरूप ठरत असतात. अशा प्रामाणिक मतभेदांचे स्वागत आहे पण सत्य माहिती करून न घेता उथळ, प्रचारकांच्या माध्यमातून राष्ट्रग्रहदूषित झालेले वक्तव्य ऐकून किंवा लिखाण वाचून जी मते बनविली जातात ती त्यांनाच खाली पाडतात व समाजाची पण हानी करतात.

### गांधी व देशगौरव सुभाषबाबू

गांधीजींचे व सुभाषबाबूंचे कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून व कार्यपद्धतीवरून मतभेद झाले. देशभक्त भगतसिंगाबाबत गांधीजींच्या भूमिकेबाबतही कटूतापूर्ण प्रचार झाला.

गांधीजींच्या आश्रमात सुभाषबाबूंबर विषप्रयोग झाला, अशी पण बातमी पसरविण्यात आली. आज गांधीजींच्या पाठीमागे जे राष्ट्रपिता बिरूद लावले जाते त्याची प्रथम घोषणा आझाद हिंद सेनेच्या व्यासपीठावरून सुभाषबाबूंनी केली. त्यांच्यावर विषप्रयोग झाला असता तर ही घोषणा स्वतः सुभाषबाबूंनी कशाला केली असती ?

भारतासारख्या निःशस्त्र नागरिकांचा देश बलाढ्य शस्त्रसंपन्न इंग्रजी सत्तेविरूद्ध यशस्वी शस्त्रास्त्र लढा देऊ शकणार नाही हे व्यावहारिक सत्य गांधीजींनी ओळखले होते तसेच नाना धर्म-जाती, ग्रंथ, प्रांत, भेद असणा-या भारतात लोकशाही ख-या अर्थाने नांदायची असेल तर एकूण सा-या समाजाला अनात्याचारी, साधन शूचितेच्या आधारानेच आबाल वृद्धांना भाग घेता येईल व भारताला सांस्कृतिक आध्यात्मिक उंची गाठण्यासाठी सत्य, अहिंसा, साधनशुद्धी हाच एकमेव पर्याय आहे असा त्यांचा ठाम विश्वास होता. तेव्हा सुभाषबाबू व शहीद भगतसिंग यांच्या देशभक्तीबद्दल गौरव भावना ठेवूनही त्यांच्या कार्यपद्धतीला गांधींनी विरोध केला. स्वतः भगतसिंगही म्हणाले की, बॉम्ब-बंदुकीच्या मार्गाने देश स्वतंत्र होणार नाही हे मी जाणतो, पण इंग्रजांना इशारा देण्याकरिता ही कृती मी केली. तेव्हा सुभाषबाबू व भगतसिंग यांच्य आड लपून गांधीजींवर टीका करणारांना त्या दोन थोर देशभक्तांनीच परस्पर उत्तर दिले आहे. आज गांधीजींचा सत्य, अहिंसा व साधनशुद्धीचा मार्ग देशाने सोडल्याने भारतात अराजक, हिंसाचार, घराणेशाही, माफिया माजून लोकशाहीचे धिंडवडे चालले आहेत हे दिसून येईल.

### भारताची फाळणी कोणामुळे ?

पाकिस्तान गांधींनी जीनांच्या झोळीत टाकला हा तर शंभर नंबरी असत्य प्रचार आहे. गांधीजी शेवटपर्यंत इंग्रज व मुस्लिम लीगचे पुढारी यांच्याशी या मुद्यावर टक्कर देत राहिले परंतु गांधीजींच्या पश्चात त्यांना विश्वासात न घेता कॉंग्रेसचे ज्येष्ठ पुढारी पं. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल व मौलाना आझाद यांनी भारताच्या फाळणीचा करार तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड माऊंट बॅटन यांच्याशी केला. त्यानंतर कॉंग्रेसच्या कार्यकारिणीत निमंत्रित सदस्य (गांधीजींना १९३४ सालापासूनच आमरण कॉंग्रेसचे सदस्यत्व

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सोडले होते.) म्हणून जेव्हा गांधीजी हजर होते तेव्हा खाली मान घालून खिन्न स्वरात आम्ही पाकिस्तान देण्याचे वचन देऊन आलो आहोत असे पंडित नेहरूंनी सांगितले. देशात हजारो निरपराध लोकांची कत्तल, लाखो स्त्रियांची विटंबना, कोट्यवधी लोकांचे निर्वासित जीवन बघून भारताची फाळणी करण्याशिवाय दुसरा मार्ग नाही. या निर्णयावर हे पुढारी आले होते. या बैठकीत हजर असलेले जयप्रकाश नारायण यांनी सेवाग्रामला बैठकीत आम्हाला या घटनेचे वर्णन करताना सांगितले की, नेहरूंचे हे निवेदन ऐकून गांधीजींवर भयंकर आघात झाला. त्यांनी विनवले की, पुढचे पाऊल टाकण्यापूर्वी मला एक तरी संधी द्या. हा म्हातारा आमचे ऐकत नाही असे व्हाईसरॉयला सांगा. मी देशाची फाळणी टाळण्यासाठी काही तरी मार्ग काढीन. नंतर गांधीजींनी एकेकाकडे दृष्टिक्षेप टाकला. पुढे जयप्रकाशजींनी सांगितले की, कोणी काही बोलले नाही. जणू काही सर्वांची तोंडे शिवून टाकली होती. गांधीजींना फक्त खान अब्दुल गफार खान यांनी पाठिंबा दिला. आम्ही समाजवादी तटस्थ राहिलो. ही मोठी चूक झाली व काँग्रेस वर्किंग कमिटीने पाकिस्तानला मंजुरी दिली. गांधीजी यातून मार्ग काढू शकतील यांचा त्यांना भरवसा नव्हता.

## पाकिस्तान पंचावन्न कोटी रुपये

दुसरा जहाल प्रचार चालतो की, गांधीजींनी पंचावन्न कोटी रुपये पाकिस्तानला देवविले. गांधीजी कोण होते त्यांना पंचावन्न कोटीचे दान करणारे ? वस्तुस्थिती ही आहे की, देशाची फाळणी झाल्यावर हिशोबानुसार पाकिस्तानला भारताकडून पंचावन्न कोटी रुपये देणे लागत होते व ती पाकिस्तानची रक्कम द्यायला स्वतंत्र भारताचे सरकार पाकिस्तान त्या पैशांचा उपयोग शस्त्रास्त्र खरेदीसाठी करील, या भीतीपोटी त्यांचे देणे त्यांना देत नव्हते.

गांधीजींनी म्हटले आहे की, नवजात स्वतंत्र भारताचे सरकारने आपले करार पाळले नाहीत तर जगात भारताची अब्रू जाईल व पुढे देशोदेशांशी व्यवहार करण्याच्या कार्यात अडथळा येईल. भारताची विश्वासार्हता जाणे धोक्याचे ठरेल. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर उपवास करून गांधीजींनी भारताला पाकिस्तानचे निघत असलेले पैसे द्यायला लावून देशाला वचनभंगातून वाचवून त्याला जगात प्रतिष्ठा मिळवून दिली असे कोणीही म्हणेल.

## शेळपट देशाला बनविले काय ?

शेळीचे दूध पिऊन गांधींनी देशाला शेळपट बनविले असे सुरक्षा शिपायांच्या घे-यात वावरणा-यांनी म्हणावे हा तर प्रचंड विनोदच आहे.

गांधीजींनी भारतालाच नव्हे तर जगातील सर्व मानवजातीला कोणता धडा दिला असेल तर निर्भयतेचा. अन्यायाविरूद्ध ठामपणे उभे राहण्याचा, अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार तुम्हाला अहिंसेने करता येत नसेल तर मिळेल त्या साधनांनी हिंसा, अहिंसेचा विचार न करता प्रतिकार करा असे त्यांनी सांगितले आहे आणि वीरालाच अहिंसेचे धनुष्य पेलेल ये-या गबाळ्याला नाही हेही त्यांनी सांगितले. काश्मीरवर जेव्हा पाकिस्तानातून हल्ला झाला तेव्हा भारत सरकार हतप्रभ झाले असता गांधीजींनीच सांगितले की, तातडीने विमानातून सैन्य पाठवा हे किती पण जाणतात ?

ज्यांच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता त्या ब्रिटीशांच्या दक्षिण आफ्रिका खंडातील वसाहतीत हा नवखा तरूण देशापासून हजारो मैल दूर भोळ्या-भाबड्या मूठभर अशिक्षित भिन्न प्रांतिय भाषिक मजूर स्त्री-पुरुषांची फलटण उभारून सत्याग्रह लढा पुकारून सरकारला कसा नमविता झाला. हा पराक्रम जगाने पाहिला.

पाकिस्तान झाल्यानंतर आजचा बांगला देश त्यावेळचा पूर्व पाकिस्तान येथे नौखाली जिल्ह्यातील

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

स्त्रियांवर अन्याय, अत्याचार होत आहेत. सक्तीने हिंदूचे धर्मांतर केले जात आहे हे ऐकून वयाच्या ७९ व वर्षी अनवाणी एकाकी कोणतेही सरकारी संरक्षण न स्विकारता खेड्या-पाड्यात व घरा-घरात गांधीज गेले आणि अत्याचाराविरूद्ध आवाज उठविला व मुसलमानांना भर सभेत ईश्वर अल्ला तेरे नाम व राम रहिमचा मंत्र उच्चारायला लावला. त्यांच्या सेवेला असणारी त्यांची तरुणी नात व नातसून यांना त्यां दंगलग्रस्त भागात रात्री एक-एकट्याने फिरण्यास लावून हिंदू स्त्री-पुरुषांना निर्भयतेचे धडे दिले. गांधीजींच्य अहिंसेच्या नावाने बोटे मोडणारे हिंसेचे उपासक मात्र आपल्या गल्लीत काट्या आपटत राहिले आणि भारता हिंदू, शिखांनी मुसलमानांची बेअब्रू केली. त्यांची धर्मस्थळे जमीनदोस्त केली व तिकडे पाकिस्ताना मुसलमानांनी शीख, हिंदू तसाच व्यवहार केला व उभय समाजांनी मानवतेला व आपल्या धर्माला काळी फासला. बंगाल, बिहार येथे शांती कार्य करीत करीत हा परममहावीर महात्मा दिल्लीत आला व विन लागला की, मला पाकिस्तानात लाहोर, कराचीला दंगे शमविण्यास जायचे आहे पण दिल्ली जर पेट राहिली तर मी पश्चिम पाकिस्तानात कोणत्या तोंडाने जाऊ ? हा महात्मा व्यक्तिगत भूमिकेवरून म्हण होता. मी भारत, पाकिस्तान दोन देश मानत नाही. व्हिसा व पासपोर्टची सुद्धा त्यांनी गरज मानली नव्ह पण आम्ही तथाकथित शूर लोकांनी गांधीजींची हत्या करण्यातच धन्यता मानली आणि आजही एकीक प्रातःस्मरणीय म्हणून गांधीजींचे नाम जपायचे व दुसरीकडे त्यांच्या मारेक-यांचे गुणगाण करायचे विरोधाभास का ? त्यांच्या इतका हिंदू विरळा!

## दलितांवर अन्याय केला

रात्रंदिवस गांधीद्वेषाने काठोकाठ भरलेली भाषणे व लेखन काही लोक करतात. काहींच्या सभे मंगलाचरण तर गांधीनिंदेपासूनच सुरू होते. परंतु सबंध भारतभर अस्पृश्यता निवारणासाठी यात्रा काढू मंदिर, विहिरी, त्यांच्यासाठी खुल्या करून दलित मुलीला मानसकन्या बनवून ज्या लग्नात एक पक्ष स्पृश व एक अस्पृश्य असेल त्याच लग्नात मी जाईन असा निर्धार करून व माझ्या आश्रमात सर्व जाती-धर्मा लोक राहतील, ज्यांना हे पसंद नाही त्यांनी आश्रम सोडून जावे हे सांगणारा अस्पृश्यता हा हिंदू धर्माव कलंक मानणारा व त्यासाठी पुनर्जन्म मिळाला तर तो दलितांच्याच घरात यावा जेणेकरून मला दुष प्रथेशी लढता येईल असा म्हणणारा आणि भारताच्या राजगादीवर दलित महिला बसलेली बघण्याची आश लावून बसलेला, ज्या मंदिरात दलितांना प्रवेश नाही त्या मंदिरात न जाणारा व आपली पत्नी व चिटणी गेल्याचे कळताच प्राणोत्क्रमण होण्याइतपत कासावीस झालेला व त्यांचा त्याग करण्यास तयार झालेल गांधी हा दलितांचा शत्रू? अरे काही तरी ईमान ठेवा ? मतभेद असतील, मार्ग असतील, गांधीजींनी ज स्पृश्यांमध्ये दलितांबाबत होणा-या अन्यायाविरोधी विवेक जागविला नसता तर हजारो वर्षापासून घट्ट चिकटून बसलेली अस्पृश्यतेची परंपरा राष्ट्रीय पातळीवर ढिली पडली नसती, त्यासाठी यादवी युद्धच व्हा लागले असते. जसे अमेरिकेत गुलामगिरी नष्ट करण्यासाठी निग्रोसाठी झाले. दुस-या बाजूने डॉ बाबासाहेबांनी दलितांना स्वाभिमान शिकविला. अन्यायाविरूद्ध लढायला शिकविले. अशा त-हेने महात्म गांधी व बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य परस्परांना पोषकोपुरक झाले. गांधीजींच्याच आग्रहावरू बाबासाहेबांना घटनासमितीत व स्वतंत्र भारताच्या प्रथम मंत्रिमंडळात घेण्यात आले. ते गांधी दलितांचे वै ? जे सत्तेसाठी दलितांना न विचारता टोप्या फिरवितात ते मात्र दलितांचे कैवारी ? पुणे कराराचे स्तो माजविण्यात येते व जुन्या इतिहासाचा कोळसा चुकीचा संदर्भ देऊन उगळण्यांने उभय समाजाचे कोणते हीत साधणार नाही उलट कटुता वाढून अभिप्रेत एक रस्ता कधीही येणार नाही. ■■

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY (973
CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

■ मुखपृष्ठ रेखाटनः
लहरीकांत शहा
व
आर्टी कम्युनिकेशन्स
उषाकिरण सिनेमा मागे, लातूर.
■ मुखपृष्ठ मुद्रणः
स्नेहा ऑफसेट, लातूर.

CC-O. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

नागोराव कुंभार

## सं[illegible]ची अन्य प्र[illegible]

- [illegible]च्या वाटा आणि[illegible]
- [illegible]स्वरूप आणि संद[illegible]
- [illegible]श.द. जावडेकर : स[illegible]
- न्याय म्हणजे काय? (संपा[illegible]
- धर्मनिरपेक्षता म्हणजे काय? [illegible]
- लोकशाही : स्वरूप व समस्या (संपा.)
- समताः स्वरूप व समस्या (संपा.)
- गं.बा. सरदारः व्यक्ती व विचार (संपा.)
- डॉ. राधाकृष्णनः व्यक्ति व विचार (संपा.)
- पं. नेहरूः विचार दर्शन (संपा.)
- ग्रामीण विकास : समस्या व उपाय (संपा.)
- प्रौढ शिक्षणः एक राष्ट्रीय समस्या (संपा.)
- समाज सुधारक म. फुले (संपा.)
- मंडल आयोग : शोध आणि बोध (संपा.)
- विश्लेषक तत्त्वज्ञान (संपा.)
- डॉ. आंबेडकर : विचार दर्शन (संपा.)
- उदारमतवाद (संपा.)
- शाहिर अण्णाभाऊ साठे (संपा.)
- न्या. महादेव गोविंद रानडे (संपा.)
- बहुजन महासंघ : संकल्पना व सिध्दी (संपा.)
- शैक्षणिक समस्या व उपाय (संपा.)
- आचार्य शं.द. जावडेकर : विचारदर्शन (संपा.)
- भूकंपः एक नैसर्गिक आपत्ती (संपा.)
- सामाजिक चळवळीः काल, आज आणि उद्या (स
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे (संपा.)
- गोपाळ गणेश आगरकरः विचार दर्शन (संपा.)
- THE CONCEPT OF JUSTICE: BIBLIOGRAPHY

CC-0. Jangamwadi Math Collection. Varanasi. An eGangotri Initiative